# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–१ : (तत्त्वज्ञान)**

**सत्र १** DSC 1

## भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय

**(Introduction to Indian Philosophy)**

**सत्र २** DSC 2

## ग्रीक तत्त्वज्ञानाचा परिचय

**(Introduction to Greek Philosophy)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-49570-85-6

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ तत्त्वज्ञान अस्थायी मंडळ ■


अध्यक्ष – **प्रा. (डॉ.) एन. के. रासकर**
मुधोजी कॉलेज, फलटण, ता. फलटण, जि. सातारा

- **प्रा. (डॉ.) सुनिल भोईटे**
  सी. टी. बोरा कॉलेज, शिरूर,
  ता. शिरूर, जि. पुणे
- **डॉ. मनाली लोंढे**
  प्राचार्या, साऊथ इंडियन वेल्फेअर सोसायटी
  कॉलेज, वडाळा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने जून २०२४–२५ पासून बी.ए.भाग–१ तत्त्वज्ञान विषयाचा अभ्यासक्रम नविन शैक्षणिक धोरणानुसार सत्रपद्धतीनुसार व सुधारित स्वरूपात लागू केला आहे. त्यानुसार दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी 'तत्त्वज्ञान' विषयाचा दोन्ही सत्राचा अभ्यासक्रम विचारात घेवून सदरच्या ग्रंथातील स्वयं अध्ययन साहित्य अनुभवी शिक्षकांकडून लेखण करून तयार करण्यात आले आहे. जून २०२४ पासून या वर्गासाठी तयार केलेल्या 'भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय व ग्रीक तत्त्वज्ञानाचा परिचय' या ग्रंथात विद्यार्थ्यांना समजेल, उमजेल अशा भाषेत लिखाण करण्यात आले आहे.

'भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय' या सत्र–१ साठीच्या अभ्यासक्रमात भारतीय तत्त्वज्ञानाचे स्वरूप, चार्वाक दर्शन, जैन दर्शन, बौद्ध दर्शन या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच 'ग्रीक तत्त्वज्ञानाचा परिचय' या सत्र–२ साठी तयार केलेल्या अभ्यासक्रमात आयोनियन तत्त्वज्ञान, एलियाटिक तत्त्वज्ञान, सॉक्रेटिस व प्लेटोचे तत्त्वज्ञान, ॲरिस्टॉटल या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या ग्रंथाची एकूण ८ घटकांमध्ये विभागणी करून मांडणी केली आहे. सर्व विद्यार्थी व शिक्षकांना सदरचा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

सदरहू ग्रंथाच्या लिखाणाचे काम शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कक्षेतील तसेच इतर विद्यापीठातील विविध मान्यवर शिक्षकांनी वेळेत पूर्ण केल्याबद्दल, संपादक या नात्याने त्यांचे आम्ही आभारी आहोत. या ग्रंथाचे प्रकाशन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक म्हणून त्यांचे मनापासून आभारी आहोत.


**■ संपादक ■**

**प्रा. सायरा मुलाणी**
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) नवनाथ रासकर**
मुधोजी कॉलेज, फलटण,
ता. फलटण, जि. सातारा

| दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय**<br>**ग्रीक तत्त्वज्ञानाचा परिचय**<br>**बी. ए. भाग–१ तत्त्वज्ञान** |
|---|---|

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–१<br>घटक क्रमांक | सत्र–२<br>घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. (डॉ.) नवनाथ रासकर**<br>मुधोजी कॉलेज, फलटण, ता. फलटण, जि. सातारा | १ | १ |
| **प्रा. (डॉ.) वेदप्रकाश डोनगावकर**<br>मातोश्री शांताबाई गोटे आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, हिंगोली रोड, वाशिम, ता. जि. वाशिम | २ | – |
| **प्रा. (डॉ.) पुरंदर चौगुले**<br>वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, ता. कराड, जि. सातारा | ३ | – |
| **प्रा. (डॉ.) सुनिलदत्त गवरे**<br>आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, शिवले, जि. ठाणे | ४ | – |
| **प्रा. सायरा मुलाणी**<br>राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड, कोल्हापूर, जि. कोल्हापूर | – | २ |
| **प्रा. (डॉ.) बाळासाहेब मुळिक**<br>शंकरराव मोहिते कॉलेज, अकलूज | – | ३ |
| **प्रा. (डॉ.) सुनिल भोईटे**<br>सी. टी. बोरा कॉलेज, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे | – | ४ |

### ■ संपादक ■

| **प्रा. सायरा मुलाणी**<br>राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड,<br>कोल्हापूर, जि. कोल्हापूर | **प्रा. (डॉ.) नवनाथ रासकर**<br>मुधोजी कॉलेज, फलटण,<br>ता. फलटण, जि. सातारा |
|---|---|

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–१ : भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय** | |
| १. | भारतीय तत्त्वज्ञानाचे स्वरूप | १ |
| २. | चार्वाक दर्शन | १३ |
| ३. | जैन दर्शन | २३ |
| ४. | बौद्ध दर्शन | ४६ |
| | **सत्र–२ : ग्रीक तत्त्वज्ञानाचा परिचय** | |
| १. | आयोनियन तत्त्वज्ञान | ६५ |
| २. | एलियाटिक तत्त्वज्ञान | ७६ |
| ३. | सॉक्रेटिस व प्लेटोचे तत्त्वज्ञान | ९१ |
| ४. | ॲरिस्टॉटलचे तत्त्वज्ञान | १०९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# भारतीय तत्त्वज्ञानाचे स्वरूप
## (Nature of Indian Philosophy)

**अनुक्रमणिका**


१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ तत्त्वज्ञानाची संकल्पना

१.४ तत्त्वज्ञानाच्या शाखा

१.५ भारतीय तत्त्वज्ञानाची सामान्य वैशिष्ट्ये

१.६ दर्शनांचे वर्गीकरण व तत्त्वज्ञानाचे मानवी जीवनातील महत्त्व

१.७ परिशिष्ट

१.८ संदर्भ ग्रंथ


## १.१ उद्दिष्ट्ये –

या प्रकरणाच्या अभ्यासाने

१. तत्त्वज्ञानाची संकल्पना व अर्थ लक्षात येईल.

२. तत्त्वज्ञानाच्या मुलभूत शाखा समजून घेता येतील.

३. भारतीय तत्त्वज्ञानाचे सामान्य स्वरुप लक्षात येईल.

४. दर्शनांचे वर्गीकरण लक्षात येईल.

५. तत्त्वज्ञानाचे मानवी जीवनातील महत्त्व लक्षात येईल.

## १.२ प्रास्ताविक

भारतीय भूभागात उदयाला आलेल्या तत्त्वज्ञानाला भारतीय तत्त्वज्ञान असे म्हटले जाते. वेद, उपनिषदे व त्यास अनुसरणारी सांख्य, न्याय, वैशेषिक, योग, मीमांसा, वेदांत या वैदिक दर्शनांची व चार्वाक, बौद्ध, जैन या अवैदिक दर्शनांची निर्मिती भारतीय भूमीतच झाल्याने या सर्वास 'भारतीय तत्त्वज्ञान' असे म्हटले जाते. यातील सर्व दर्शनांची धर्मांची व त्यातील विचारांचीही ओळख भारतीय तत्त्वज्ञानात अशीच आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाचा विकास आणि उदय भारतात झालेला असला तरी विस्तार जगातील अनेक राष्ट्रांमध्ये झालेला दिसतो. तिबेट, चीन, जपान, श्रीलंका, थायलंड, व्हिएतनाम, मलेशिया, मँगोलिया आदि राष्ट्रांमध्ये बौद्ध तत्त्वज्ञान प्रसिद्ध तर आहेच शिवाय त्याचा स्वीकारही धार्मिक व सामाजिक जीवनात झालेला आहे. उपनिषदे व अद्वैत वेदांताचाही परदेशात अभ्यास केला जातो त्याच बरोबर भारतातील या विचारांशी

संबंधित अनेक संप्रदाय युरोपिय देशांमध्ये, अमेरिकतही कार्यरत आहेत. त्यास अनुयायी वर्गही आहे. हा भारतीय तत्त्वज्ञानाचा एका अर्थाने गौरव आहे, म्हणूनच विकास आणि विस्तारही आहे.

**भारतीय तत्त्वज्ञानाचे कालखंड**

भारतीय तत्त्वज्ञानाचे सामान्यपणे प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ व आधुनिक काळ असे तीन कालखंड सांगितले जातात. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी आपल्या 'भारतीय तत्त्वज्ञान' या ग्रंथात चौथा कालखंड सांगितला आहे. त्यास ते समकालीन कालखंड असे म्हणतात.

**प्राचीन काळ**

वेद उपनिषदे, रामायण महाभारत, गीता, धर्मशास्त्रे तसेच सांख्य न्याय, वैशेषिक, योग, मीमांसा या वैदिक तर चार्वाक, जैन, बौद्ध या अवैदिक परंपरांचा समावेश प्राचीन काळात होतो.

**मध्ययुगीन काळ**

हा प्रामुख्याने संत परंपरेचा काळ आहे. यामध्ये स्वामी चक्रधर, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत कबीर, संत तुलसीदास, गुरुनानक आणि संबंध भारतातील विविध प्रांतात जे संत उदयाला आले त्यांचा समावेश होतो. संतांनी प्रामुख्याने ईश्वर एकच आहे. सर्व धर्म सारखे आहेत, असे सांगून समाजातील अंधश्रद्धा, रुढी, परंपरा नाकारल्या. हे समाजोद्धाराचे आणि सर्वसामान्य व्यक्तीच्या उद्धाराचे कार्य केले असे म्हणता येईल. त्यांनी समाजाची मानसिकता ओळखून सर्वांना सोपा असा भक्तिमार्ग जीवनमार्ग म्हणून सांगितला.

**आधुनिक काळ**

साधारणपणे हा काळ १९ व्या शतकापासून सांगितला जातो. श्री.अरविंद, विवेकांनद, इकबाल, गांधी, रमण महर्षी, गुरुदेव रानडे, डॉ.राधाकृष्णन, डॉ.आंबेडकर, म.फुले, जे.कृष्णमूर्ती, आचार्य रजनिश इ. भारतीय तत्त्वचिंतकांचा यामध्ये समावेश होतो. या सर्व तत्त्वचिंतकांनी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा-साहित्याचा अभ्यास करुन चिकित्सा-विश्लेषण करीत आपल्या स्वतःचे तत्त्वज्ञान मांडले असे म्हणता येईल. या काळास समकालीन असेही म्हणता येईल.

**उत्तर आधुनिक काळ (समकालीन)**

डॉ. डोणगावकरांच्या मतानुसार आधुनिक काळाचा एक उत्तर काळही आहे. या उत्तर आधुनिक काळाला तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात तत्त्वचिंतनाचा काळ म्हणतात. यास आपण समकालीन कालखंड असेही म्हणू शकतो. यामध्ये दयाकृष्ण, मे. पुं. रेगे, देवीप्रसाद चटोपाध्याय इ. येतात.

## **१.३ तत्त्वज्ञानाची संकल्पना** (Concept of Philosophy)

तत्त्वज्ञान ही ज्ञानशाखा सर्व शास्त्रांची जननी आहे. Philosophy is the mother of all sciences या शास्त्राला इंग्रजीत Philosophy तर मराठी 'तत्त्वज्ञान' हा शब्द वापरला जातो. संस्कृतमध्ये तत्त्वज्ञानाला 'तत्त्वज्ञान' आणि 'दर्शनशास्त्र' असे म्हटले जाते. हिंदी भाषेतही दर्शनशास्त्र असेच म्हटले जाते.

तत्त्वज्ञान हा शब्द तत्त्व आणि ज्ञान या दोन शब्दांपासून बनला आहे. यातील तत्त्व हा शब्द तत् आणि त्व या दोन धातूंपासून बनला आहे. तत् म्हणजे 'ते' आपल्याभोवतीचे संबंध जग त्यातील वस्तू इ. यास तत्त्व म्हणतात. तर 'त्व' म्हणजे ते पणा होय. जे काही आपल्या सभोवताली असणारे बाह्य जग त्याची असण्याची एक रित असते. त्याला कशाचा तरी आधार असतो ते तत्त्व होत. हा शब्द 'सत्' 'सत्य' यासाठी वापरता येतो. अशा सत्य-सत् किंवा तत्त्वाच्या ज्ञानाला तत्त्वज्ञान म्हणतात.

**आन्विक्षिकी–** प्रत्यक्ष आणि शास्त्र संमत विषयांचे तात्त्विक स्वरुप समजून घेणारी विद्या म्हणजे अन्विक्षिकी विद्या होय. न्याय दर्शनात अन्विक्षिकी विद्येला सर्वश्रेष्ठ विद्या म्हणून स्थान आहे. जी विद्या अन्विक्षा किंवा अन्वेषण करते तिला अन्विक्षिकी असे वात्सायन यांनी म्हटले आहे. अन्विक्षिकी हे न्याय शास्त्राचे प्राचीन नाव आहे. कौटिल्याने शासन कलेच्या अध्ययनामध्ये अन्विक्षिकी विद्येचा समावेश व्हावा असे म्हटले होते.  काही ठिकाणी यास आत्मविद्या असेही म्हटले आहे.

तत्त्वज्ञानाला 'दर्शन' असेही हिंदी आणि संस्कृत मध्ये म्हटले जाते. त्यानूसार दर्शन हा शब्द दृश या धातूपासून बनला असून त्याचा अर्थ 'पाहाणे' असा होतो. यावरुन 'दृष्यते अनेन इति दर्शनम्' अशी व्याख्या केली जाते. दर्शन किंवा पाहण्याची क्रिया ही गोष्ट वस्तूतः डोळ्यांनी होत असते पण डोळ्यांनी दिसणाऱ्या सामान्य वस्तूंच्या मागे असलेल्या सत्याला किंवा तत्त्वाला पहाणे अनुभवणे म्हणजे दर्शन होय त्यास आपण साक्षात अनुभूती म्हणतो तेच दर्शन होय.

तत्त्वज्ञानाला इंग्रजीत Philosophy असा शब्द आहे. हा शब्द Philos आणि Sophia या दोन ग्रीक धातूंपासून बनला असून त्याचा अर्थ शहाणपणावरील प्रेम किंवा ज्ञानावरील प्रेम असा होतो. Philos म्हणजे प्रेम तर Sophia  म्हणजे शहाणपण किंवा ज्ञान होय. यावरुन शहाणपणावरील किंवा ज्ञानावरील प्रेम असा Philosophy चा अर्थ होतो.

**तत्त्वज्ञानाच्या व्याख्या** (Definition)

तत्त्वज्ञानाच्या विविध व्याख्या दिल्या जातात. त्यातील काही महत्त्वाच्या पुढीलप्रमाणे भारतीय मतानुसार

१) न्याय दर्शनानुसार तत्त्वाच्या ज्ञानाने निःश्रेयस किंवा मोक्ष प्राप्ती करुन देणारे शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान होय. या दर्शनात प्रमाण, प्रमेय, संबंध इ. १६ तत्त्वांचे ज्ञान यास तत्त्वज्ञान म्हटले आहे.

२) कणादमुनींच्या मतानूसार पदार्थाच्या साम्य व भेदाच्या ज्ञानाच्या आधारे मोक्ष मिळवून देणारे शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान होत.

३) उपनिषदे सांगतात की, ज्या ज्ञानानंतर इतर कोणत्याही ज्ञानाची आवश्यकता नसते अशा ज्ञानास तत्त्वज्ञान म्हणतात.

**पाश्चात्य मतानूसार–**

१) ॲरिस्टॉटलच्या मते 'स्वतःच्या अस्तित्वाचे स्वरुप आणि स्वतःच्या स्वभावात असलेल्या सदुणांचा शोध घेणारे शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान होय'.

२)  हायडेगरच्या मतानूसार 'जे आहे, त्याच्यापलीकडील अन्वेषण म्हणजे तत्त्वज्ञान होय.

३)  विल ड्युरंटच्या मते, संपूर्ण अनुभवाचा अभ्यास किंवा संपूर्णाच्या भागाच्या अनुभवाचा अभ्यास म्हणजे तत्त्वज्ञान होय.

A study of experience as a whole or a portion of experience in relation to the whole.

४)  इंद्रियगोचर विश्वाला आधारभूत असणाऱ्या अंतिम सत्याचा अभ्यास म्हणजे तत्त्वज्ञान होय.

## **१.४ तत्त्वज्ञानाच्या शाखा** (Branches of Philosophy)

तत्त्वज्ञान हे आद्यशास्त्र आहे त्यामुळे त्यास सर्व शास्त्रांची जननी असे म्हटले जाते. जीव-जगत् आणि ईश्वर या तीन प्रमुख संकल्पनांचा तत्त्वज्ञानात अभ्यास केला जातो म्हणून ते व्यापक अभ्यासविषय असलेले शास्त्र आहे. सृष्टीतील एकूणच मूर्त आणि अमूर्त अशा सर्वच विषयांचा यामध्ये समावेश होतो. ही व्याप्ती लक्षात घेवून अभ्यास विषयांनूसार सत्ताशास्त्र, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र, सौंदर्यशास्त्र, सामाजिक, राजकीय तत्त्वज्ञान, विज्ञानाचे तत्त्वज्ञान, शैक्षणिक तत्त्वज्ञान, अस्तित्ववादी तत्त्वज्ञान, भाषा विज्ञान, इ. प्रमुख ज्ञानशाखा तत्त्वज्ञानात कार्यरत आहेत. या प्रमुख शाखांच्या पैकी काही महत्त्वाच्या शाखांचे संक्षिप्त स्वरुपात येथे विवेचन केले आहे.

### १.  **सत्ताशास्त्र** (Metaphysics)

सत्ताशास्त्र ही तत्त्वज्ञानाची मूलभूत, प्राचीन आणि महत्त्वाची शाखा आहे. 'सत्ता' या शब्दानूसार सत्य (अंतिम सत्य), अंतिम सत्ता असा अर्थ अभिप्रेत आहे. ॲरिस्टॉटलने अंतिम सत्तेला अनुसरून भौतिक वस्तूंच्या पलिकडे असलेल्या गोष्टींचा अभ्यास केला. त्यास Metaphysics असे म्हणतात.

यामध्ये विश्वाच्या बुडाशी असलेल्या अंतिम तत्त्वाचा अभ्यास केला जातो. ते तत्त्व एक की अनेक आहे? ते जड की चेतन आहे? इ. प्रश्नांची चर्चा यात केली जाते. या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी अनेक विचारधारा उदयाला आल्या. उद. एकतत्त्ववाद, द्वैतवाद, अनेक तत्त्ववाद, चिदवाद, जडवाद इ. सत्ताशास्त्रात ईश्वर, आत्मा, मोक्ष, महाभूते, जीव-अजीव, प्रकृति-पुरुष, पदार्थ, दिक्-काल इ. संकल्पनांचाही वरील विचारप्रवाहानूसार अभ्यास केला जातो.

### **ज्ञानशास्त्र (**Epistemology)

ज्ञानशास्त्र ही पण तत्त्वज्ञानाची प्राचीन आणि महत्त्वाची शाखा आहे. ज्ञानशास्त्राला ज्ञानमीमांसा असेही म्हणतात. सत्ताशास्त्राच्या दृष्टिकोनातून ज्ञानशास्त्राला अत्यंत महत्त्व आहे. कारण सत्ताशास्त्रात ज्या अंतिम तत्त्वांचा अभ्यास केला जातो ते अंतिम तत्त्व आपल्याला कसे समजेल? त्याचे ज्ञान कसे होते? या प्रश्नावर येथे भर आहे. त्याशिवाय बाह्य जगाचे ज्ञान याविषयीही येथे चर्चा केली जाते.

याशिवाय या शाखेत ज्ञान म्हणजे काय? ज्ञानाची उत्पत्ती कशी होते? त्याचे स्वरुप कसे असते? ज्ञान स्वतः प्रमाण आहे की परतःप्रमाण, ज्ञानातील दोष, ज्ञेय, ज्ञान आणि ज्ञाता यांचा अभ्यास केला जातो. यामध्ये ज्ञानाचे प्रकार यावरही प्रकाश टाकला जातो.

**तर्कशास्त्र** (Logic)

खरे तर तर्कशास्त्र हे ज्ञानशास्त्राशी निगडीत आहे, असे असले तरी या शास्त्राची व्याप्ती मानवी जीवनाइतकी असल्याने, किंबहुना आपल्या ज्ञानाचे भांडार या ज्ञानशाखेनेच समृद्ध होत असते. म्हणूनही याचा स्वतंत्र विचार तत्त्वज्ञानात केला आहे. तर्कशास्त्राचा मुख्य अभ्यासविषय 'अनुमान' हा आहे. म्हणून त्यास अनुमानाचे शास्त्र असे म्हणतात. भारतीय तत्त्वज्ञानात प्राचीन काळी यास 'न्यायशास्त्र' असे म्हटले जात असे. तर्कशास्त्राला 'आन्विक्षिकी' असाही शब्द प्रचलित होता. म्हणून त्यास आन्विक्षिकी विभाग असे म्हटले जात असे. तर्कशास्त्राला इंग्रजीत Logic हा शब्द वापरला जातो. हा शब्द Logos या लॅटिन शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ चर्चा, अभ्यास, विचार असा सांगितला जातो. यावरुन Logic किंवा तर्कशास्त्र म्हणजे विचाराचे शास्त्र होय असे म्हटले जाते. तर्कशास्त्राच्या विगमन आणि निगमन अशा दोन प्रमुख शाखा असून त्यास अनुक्रमे वैगमनिक तर्कशास्त्र व नैगमनिक तर्कशास्त्र म्हटले जाते. पारंपारिक व आधुनिक तर्कशास्त्र असेही वर्गीकरण केले जाते. तर्कशास्त्राचा उपयोग संगणक प्रणालीसाठी केला जातो.

**नीतिशास्त्र** (Ethics)

नीतिशास्त्र हे आदर्शवादी शास्त्र आहे. नीतिशास्त्राला 'नैतिक तत्त्वज्ञान' असेही म्हटले जाते. नीतिशास्त्राला इंग्रजीत Ethics आणि Moral Philosophy असे म्हटले जाते. Ethics हा शब्द Ethos या ग्रीक शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ चालीरिती, रुढी असा होतो. तसेच Morality हा शब्द Mores या लॅटिन शब्दापासून बनला असून त्याचाही अर्थ चालीरिती, रुढी असाच होतो. म्हणून यास चालीरिती-रुढींचे अभ्यास करणारे शास्त्र ते नीतिशास्त्र असे म्हटले जाते. मानवी आचरणाचे मूल्यमापन करणारे शास्त्र म्हणून नीतिशास्त्राकडे पाहिले जाते. नीतिशास्त्र हे आदर्शवादी शास्त्र असल्याने आचरण म्हणजे काय? या प्रश्नाऐवजी आचरण कसे असावे? यावर या शास्त्रात अधिक भर असतो. अलिकडच्या काळात अधिनितीशास्त्र व उपयोजित नीतिशास्त्र आणि अनुशंगिक उपशाखा उदयाला आलेल्या दिसतात. अधिनीतिशास्त्रात प्रामुख्याने नैतिक संकल्पनांचा प्रामुख्याने अर्थ स्पष्ट करण्यावर भर दिला जातो. तर उपयोजित नीतिशास्त्रात आपल्या मानवी जीवनातील निर्माण झालेल्या समस्यांसाठी मानवी आचरण कसे जबाबदार आहे? या चुकीच्या आचरणाचा काय परिणाम होईल? तसेच त्यातून सामाजिक आणि वैश्विक समस्या कशा निर्माण होतील याचा आढावा घेतला जातो.

**सौंदर्यशास्त्र** (Aesthetics)

ही एक तत्त्वज्ञानातील महत्त्वाची शाखा आहे. यामध्ये सौंदर्य म्हणजे काय? सौंदर्याचे निकष कोणते आहेत? सौंदर्य वस्तूनिष्ठ असते की व्यक्तिनिष्ठ? सौंदर्याची सत्ता मानसिक आहे की शाब्दिक? सौंदर्य हे बाह्य

गोष्टींवर अवलंबून असते की, आंतरिक घटकांवर? अशा प्रश्नांची चर्चा केली जाते. 'ऊस डोंगापरी रस नोहे डोंगा' हा संत चोखोबांचा विचार किंवा ज्या वस्तू बाहेरुन सुंदर असतात त्या आतून कुरुप असतात हा शेक्सपियरचा विचार सौंदर्य शास्त्राशी निगडीत आहे. तात्पर्य सौंदर्य ही स्थीर संकल्पना असून ते एक तत्त्व म्हणून सौंदर्य शास्त्रात स्वीकारले आहे.

अशा तऱ्हेने तत्त्वज्ञानाच्या प्रमुख शाखा आहेत, तर सामाजिक तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, विज्ञानाचे तत्त्वज्ञान, शैक्षणिक तत्त्वज्ञान, मनाचे तत्त्वज्ञान, इतिहासाचे तत्त्वज्ञान, कलेचे तत्त्वज्ञान इ. अनेक उपशाखा आहेत.

## १.५ भारतीय तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये–

भारतीय तत्त्वज्ञानाचे सामान्य स्वरुप समजून घेण्यासाठी एकंदर भारतीय तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये लक्षात घ्यावी लागतात. भारतीय तत्त्वज्ञान हे भारतीय जीवनाप्रमाणे वैविध्यपूर्ण आहे असे असले तरी त्यामध्ये एकता आहे. काहीएक समान धागा आहे.

**१. मोक्ष**

चार्वाक वगळून सर्व भारतीय दर्शने 'मोक्ष' ही संकल्पना स्विकारतात. माणसाने आपल्या आयुष्यात जे काही मिळवायचे ते अर्थपूर्ण असले पाहिजे. ती अर्थपूर्णता त्याच्या परम प्राप्तव्यात आहे. ते सत्ता, संपत्ती, पैसा अशा बाह्य गोष्टींमध्ये नसून ती त्याची स्वतःचीच विशिष्ट अशी अवस्था आहे. यालाच कैवल्य, मोक्ष, अपवर्ग, निःश्रेयस, निर्वाण इ. शब्दांनी उल्लेखले जाते. सर्व दर्शनांनी मोक्ष हेच आपल्या / मानवी जीवनाचे ध्येय सांगितले आहे.

भारतीय दर्शनांनी मनुष्याचे परमसाध्य किंवा परमार्थ ही याच देही – याच डोळा अनुभवता येणारी गोष्ट आहे. कारण ती स्वतःचीच एक अवस्था आहे. या अवस्थेत सत्याचा साक्षात्कार होतो. हेच मोक्ष होय असे म्हटले आहे. मोक्ष ही संज्ञा-संकल्पना ऐकल्याबरोबर आपल्याला ते मान्य होत नाही. पण त्याचा नेमका अर्थ कळल्यावर मात्र आजही 'मोक्ष' ही संज्ञा – संकल्पना स्वीकारता येते. मोक्ष म्हणजे मोकळीक, सुटका होय. ही सुटका कशातून हवी असते? या संदर्भात 'संसारचक्रातून' जन्ममृत्युच्या फेऱ्यातून सुटका असे म्हटले जाते. जन्म-मृत्यचक्रात अडकल्याने तो दुःखात असतो. त्यामुळे जन्म-मृत्युच्या चक्रातून सुटका म्हणजे मोक्ष होय, मुक्ती होय. पण हे पटण्यासारखे नाही. कारण पुर्नजन्म कोणालाच नको असे नसते. प्रत्येकाला जीवनाविषयी आकर्षण असते. म्हणून मोक्षाचा अर्थ म.गांधी म्हणतात, तसी वासनाशुन्य, निरहंकारी अवस्था असा अर्थ घेता येईल आणि हे कोणाही सुजान व्यक्तीला मान्य होईल. माणसाच्या मनाची निर्वासन वासनाहित अहंकारशुन्य अवस्था असे यास म्हणतात. त्यालाच समाधानाची आणि काहीही न मिळविण्याची तृप्त अशी अवस्था असेही म्हणता येईल.

## २. कर्मसिद्धांत

चार्वाक सोडून सर्व भारतीय दर्शनांनी हा सिद्धांत स्वीकारला आहे. जन्म मृत्युचे रहाटगाडगे चालू राहते ते आपल्या पूर्वकर्मामुळे असा भारतीय तत्त्वज्ञानाचा सिद्धांत आहे. 'पुनरपि जनन - पुनरपि मरण' हे रहाटगाडगे चालू असते. याशिवाय विश्वातील सर्व घटकांचे नियामक तत्त्व, प्राण्यांची कर्मे व त्यास अनुरुप अशी त्यांना मिळणारी फळे यांच्या नित्यसंबंध असतो. यालाच कर्मसिद्धांत किंवा कर्मविपाक असे म्हणतात.

जगातील विविध घटना, घडामोडींचा अन्वय विज्ञान-वैज्ञानिक नियमाने-भौतिक कारणकार्यभावाने लावते. मात्र सृष्टीतील निरनिराळ्या घटना प्राणीमात्रांच्या कर्मानूसार होत असतात असे भारतीय तत्त्वज्ञान मानते. माणसाला चांगली नोकरी मिळाली तर त्याच्या कर्मामुळे अमुक एका मुलीशी लग्न होते ते त्या दोघांच्या पूर्वकर्मामुळे. एकाद्याला श्रीमंत घरात जन्म मिळतो तर एखाद्याला गरीबीत रहावे लागते. इ. असे कर्मसिद्धांताचे मत आहे. एवढेच नव्हे तर एका विशिष्ट परिस्थितीत त्याच्या त्या परिस्थितीत बदल होतो तेही कर्मानेच अशी ही भूमिका आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या भूमिकेतून पाहिले तर माणसाच्या कुठल्याही कृतीला जशी भौतिक बाजू असते तशी नैतिक बाजूही असते असे म्हटले जाते. कृतीचा चांगलेपणा किंवा वाईटपणा या गोष्टी नाकारता येत नाहीत. त्या गोष्टी दिसतात त्या डोळ्यांबरोबर आपल्या मनालाही कळतात, जाणवतात. कर्मविषयक सिद्धांत म्हणजे नियतीवाद नाही. कर्म घडले की त्याचे फळ मिळतेच. ते फळ मिळाल्यावर मग नवीन कार्य करण्याविषयी आपल्याला स्वातंत्र्य असते हेही येथे सांगितले जाते. कर्म करण्याचे आपल्याला स्वातंत्र्य असल्याने मोक्षाची शक्यता आहे. कर्म करण्याविषयी आपल्याला स्वातंत्र्य नसतेच तर मोक्ष मिळवावे, त्यासाठी धडपड करावी असे म्हणता येणार नाही. आणि मग भारतीय तत्त्वज्ञानाला अर्थच उरला नसता. कर्म हे आपल्या हातातील गोष्ट असल्याने आपल्याला आत्मस्वातंत्र्य आहे असा अर्थ होतो. म्हणून या बाबतित नियतीवाद मान्य करता येत नाही. तसे म्हणणे चूक आहे.

## ३. पुनर्जन्म

हा कर्मसिद्धांताशी निगडीत असा विचार आहे. चार्वाक सोडून सर्वांनी हाही सिद्धांत मान्य केला आहे. माणसाच्या वाट्याला असे काही अनुभव येत असतात की, त्याचे निरसण आपल्याला भौतिक जीवनातून चालू जीवनाने करता येत नाही. एखाद्या निष्पाप मुलाला पोलिओसारखा आजार होऊन ते कामयचे पंगू होते. वाईट मार्गांनी धन मिळवणारी माणसे आयुष्यात सुखी-समृद्ध जीवन जगतात. हे कसे? त्याचे निवारण व्हावे यासाठी पूर्वजन्म व पुनर्जन्म हे सिद्धांत मानावे लागतात. असे केल्यावर चालू जीवनातील घटनांचा अन्वयार्थ लावता येतो आणि हा सिद्धांत स्वीकारता येतो.

कर्मसिद्धांत चालू जीवनापूरता स्वीकारता येईल, तरीही पुनर्जन्म व पूर्वजन्म ह्या कल्पना आणि कर्मसिद्धांत यांच्यातील संबंध दाखवता येतो. कर्मफल भोगून झाल्याशिवाय कोणत्याही कर्माचा नाश होत नाही. याला 'कृत प्रणाश' म्हणतात. यासाठी पुढील जन्म अनिवार्य ठरतो. तसेच जन्मतःच चांगले वाईट भोग

सुरु होतात. त्यांची उपपत्ती लावण्यासाठी पूर्वजन्म मानावा लागतो, तो मानला नाही तर 'अकृताभ्यागम' हा दोष पदरी येतो.

**४. परस्परावलंबन**

भारतीय दर्शने स्वतंत्रपणे विकसित झाली नाहीत किंवा परस्परांपासून वेगळी राहीली नाहीत. एकमेकांना समांतर राहून वाढली विकसीत झाली. एकमेकांना समजून घेवून किंवा इतर सर्व दर्शनांचे विचार लक्षात घेवून ते जसे आहेत तसे मांडून आपले विचार भारतीय दर्शनांनी मांडले आहेत. त्यामुळेच त्यांच्या विचारात अधिक प्रगल्भता, परिपक्वता आली आहे. आजही हे विचार ताजेतवाने किंवा नवीन वाटतात. सर्वच दार्शनिकांनी वादि प्रतिवादी पद्धती किंवा पूर्वपक्ष-उत्तरपक्ष पद्धतीचा वापर आपल्या विचारांचा पाठपुरावा करताना केलेला दिसतो. या हेतूने भारतीय दर्शनांमध्ये त्यांच्या मांडणीमध्ये हमरी-तुमरी दिसत नाही.

**प्रमाणचर्चा**

परस्परांबद्दल आदर असतानाही ही दर्शने एकमतावर का आली नाहीत? असा प्रश्न पडतो. त्याचे कारण प्रत्येक दर्शन हे विश्वाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन आहे. त्यामुळे या विश्वाला समजून घेण्यासाठी आपापल्या दृष्टिकोनानूसार ही दर्शने काही प्रमाणे (ज्ञान मिळवण्याची साधने) मानतात. त्याबाबतीत एकवाक्यता नाही म्हणून त्यांच्या भूमिकेतही एकमत नाही. प्रमाणांना भारतीय तत्त्वज्ञानात स्वतंत्रपणे स्थान आहे. सर्व दर्शने आपल्या विषयाशी आणि दृष्टिकोणानूसार प्रमाणचर्चा करतात. त्यामुळेच प्रमाणांची संख्या कमी जास्त राहिली आहे.

**जगतनिर्मिती संदर्भातील तत्त्वचिंतन**

तत्त्वज्ञानाचा जीव, जगत आणि ईश्वर यामध्ये जगत् हा एक महत्त्वाचा असा अभ्यासविषय आहे. त्याविषयक सर्वच भारतीय दर्शने कमी अधिक प्रमाणात चर्चा करताना दिसतात. जगाची-विश्वाची निर्मिती कशी झाली आहे? त्यास कारण काय? की ते पूर्वीपासूनच आहे? असे प्रश्न करुन भारतीय तत्त्वज्ञान या संदर्भात मांडणी करताना दिसते.

**पुरुषार्थ विचार**

हेही भारतीय तत्त्वज्ञानाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे भारतीय दर्शनातील चार पुरुषार्थ होत. पुरुषाने म्हणजे व्यक्तीने (स्त्री-पुरुष) काय मिळविले तर त्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त होईल हे लक्षात घेवून धर्माने म्हणजे नीतीने वागून अर्थाची म्हणजे पैशाची विनियोगाची-निर्वाहाची साधने प्राप्त करावीत आणि कामेच्छा - समाधानाची पूर्तता करुन घ्यावी. एकदा कामाची प्राप्ती झाली की समाधान प्राप्त होते यास मोक्ष म्हणता येईल. आपल्या कामना - इच्छा (ज्या योग्य आहेत अशा) अर्थाच्या प्राप्तीने शक्य आहेत. म्हणून अर्थाला महत्त्व आहेच पण त्यास धर्माचे चांगल्या मार्गाचे अधिष्ठान हवे. एकूण माणसाने आपले आयुष्य कसे व्यतित करावे याविषयी 'पुरुषार्थ' विचार भारतीय तत्त्वज्ञानात सांगितला जातो.

अशा तऱ्हेने भारतीय तत्त्वज्ञानाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये सांगितली जातात. अशी काही समान वैशिष्ट्ये सर्व दर्शनात आढळत असली तरी त्यांच्यात विविधता म्हणजे वेगळेपणाही आहे.

## १.६ भारतीय तत्त्वज्ञानाचे वर्गीकरण–

चार्वाक, जैन, बौद्ध, न्याय, वैशेषिक, सांख्य योग, मीमांसा व वेदान्त अशी ही भारतीय तत्त्वज्ञानात प्रमुख नऊ दर्शने येतात. सामान्यतः भारतीय तत्त्वज्ञानात आस्तिक व नास्तिक असा भेद करुन सर्व दर्शनांचे वर्गीकरण दोन गटामध्ये किंवा प्रकारात केले असले तरी आस्तिक – नास्तिक या शब्दांचा जो अर्थ लावला जातो तो मूलतः व्यापक आहे. केवळ ईश्वर मानणारा व न माणनारा असा याचा अर्थ नाही. आपण व्यवहारात तसाच अर्थ लावतो. पण हा अर्थ संकुचित आहे. व्यापक अर्थाने जी दर्शने वेदांना मानतात ती आस्तिक म्हणजे वैदिक दर्शने तर जी दर्शने वेद मानत नाहीत, आपला दर्शनविचार स्वतंत्रपणे मांडतात त्यांना अवैदिक म्हणजे नास्तिक दर्शन म्हणतात.

न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा, आणि वेदान्त अशी सहा दर्शने आस्तिक म्हणजे वैदिक होत. ती वेदांना मानतात, अर्थात वेदांना नाकारत नाहीत एवढेच. याउलट जैन, बौद्ध आणि चार्वाक ही तीन दर्शने वेदांना अमान्य करतात. स्वतःचा विचार स्वतंत्रपणे मांडतात. शिवाय ईश्वरही नाकारतात म्हणून ती अवैदिक म्हणजे नास्तिक दर्शने होत. अर्थात 'ईश्वर' संकल्पना नाकारतात म्हणूनही ती नास्तिक दर्शने होत. 'ईश्वर' संकल्पना नाकारण्याच्या किंवा वेदांना विरोध करण्याच्या मुद्यावर ती पूर्णतः टिकतात. अशा तऱ्हेने भारतीय तत्त्वज्ञानाचे वैदिक आणि अवैदिक असे दोन प्रमुख वर्ग केले जातात.

**तत्त्वज्ञानाचे महत्त्व/उपयोग**

तत्त्वज्ञानाचा उपयोग किंवा महत्त्व काय? त्याच्याशिवाय काही अडले आहे काय? या संदर्भात पुढील विवेचन देता येईल.

१. खरे तर तत्त्वज्ञान आपल्याला टाळता येत नाही कारण आपण जगत असतो व जगताना कोणतातरी दृष्टिकोन स्वीकारीत असतो. प्रत्येकाचा स्वतःच्या व जगाच्या संदर्भात कोणता तरी दृष्टिकोण हा असतोच, असे असेल तर मग तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला, त्यातील प्रश्नांचा, समस्यांचा उदा. ईश्वर, आत्मा, विश्व–जगत यांचा जाणीवपूर्वक अभ्यास केला तर आपल्या दृष्टिकोणात अधिक सजगता येऊ शकते. यातून आपल्या स्वतःला तत्त्वचिंतनाने वळण देता येइल. इंद्रिये, मन, वृत्ती, सवयी यांना काबूत ठेवून स्वतःला घडविता येईल.

२. तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्याने माणसाचे विचार व्यापक होतात. स्वतःच्या दुःखाकडे तो विश्वाच्या संदर्भात पहात असतो. त्यामुळे दुःखाचे आघात सहन करण्याची त्याची क्षमता इतरांहून अधिक असते. कोणत्याही संकटाने डगमगत नाही. वास्तव स्वीकारण्याची व त्यावर मात करण्याची त्याची तयारी असते. ज्याचा आणि तत्त्वज्ञानाचा संबंध नसतो. असा एखादा माणूस आयुष्यातील बारीक सारीक गोष्टींनी, दुःखे व संकटांनी खचून जातो. सुखाच्या झुळुकीने हुरळून जातो तर दुःखाच्या तिरीपीने उद्विग्न

होतो. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने सुख-दुःखे समान वाटतात. जीवनाचे ते दोन रंग वाटतात. दृष्टी व्यापक असल्याने त्यांचे जीवनात येणे-जाणे याविषयी सहज घेतले जाते. तत्त्वज्ञानाचा हा फायदाच आहे. म्हणून त्याचे महत्त्व वाढते.

३. तत्त्वज्ञानातील युक्तिवाद सूक्ष्म आणि काटेकोर असतात. त्यांच्या अभ्यासाने स्वतःच्या जीवनाला घडविण्यासाठी लागणारी वैचारिक शिस्त व प्रगल्भता अंगी येते.

४. तत्त्वज्ञान हे समीक्षाशास्त्र म्हणून कार्य करते. ही चिकित्सा किंवा समीक्षा भाषेची असते. त्याचप्रमाणे भाषेतून मांडल्या जाणाऱ्या साहित्याची चिकित्सा ते करते. उदा. काव्य, कादंबरी, कथा आदि साहित्यप्रकार, शिवाय तत्त्वज्ञान इतर ज्ञानशास्त्रांची म्हणजेच विज्ञानाची व सामाजिक शास्त्रांचीही चिकित्सा करते. एकंदर मानवी संस्कृतीच्या हर पैलूंशी संबंधीत गोष्टींची चिकित्सा करते व त्यांच्यात अन्वय लावते. आधी विश्लेषण मग संश्लेषण या पद्धतीने तत्त्वज्ञानाचे कार्य चालते. या दृष्टीने तत्त्वज्ञान महत्त्वाचे आहे. संश्लेषणाने कोणत्याही गोष्टीत एकात्मता दाखविली जाते. एकात्मता-समन्वय या गोष्टी वैश्विक जाणिव विकसित करण्यास मदत करतो. म्हणून तत्त्वज्ञान महत्त्वाचे व मानवी समाजाच्या फायद्याचे आहे.

५. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने माणूस आतून घडतो. रोजी-रोटीपेक्षाही हे महत्त्वाचे आहे. अन्य एखाद्या अभ्यासक्रमाने रोजी-रोटी मिळेल. नोकरी मिळेल. पण तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने आपल्या सोबत इतरांच्या रोजी रोटीचाही प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न होवू शकतो. कारण तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने माणसाची इतरांबद्दलची कणव जागी असते. म्हणजे माणसातील मनुष्यत्त्व घडते. तत्त्वज्ञानाचे हे कार्य मौलिक आहे म्हणून महत्त्वाचे आहे.

६. जेवणात जसे मीठ असते तसे जीवनात तत्त्वज्ञान असते. असे ख्यातनाम तत्त्वचिंतक प्रा.मे.पुं. रेगे यांनी म्हटले आहे. बाजारात सर्वात कमी किंमतीत मीठच मिळत असते तरी जेवणाची चव एका मीठानेच शक्य होते. इतर गोष्टी कमी-जास्त झाल्या तरी चालू शकते. पण मीठ मात्र चवीसाठी आवश्यक असते. तसेच मानवी जीवनाचे आहे. मानवी जीवनाला अर्थ प्राप्त करुन देण्याचे कार्य तत्त्वज्ञान करते. माणसाला माणूस म्हणून जागविण्याचे ते कार्य करते. या दृष्टीने तत्त्वज्ञान महत्त्वाचे आहे.

७. बर्ट्रांण्ड रसेल यांच्या मते, आजच्या माणसापुढे प्रमुख असे दोन प्रश्न आहेत. एक निसर्गाला समजून घेणे व त्यावर प्रभुत्त्व गाजविणे ते विज्ञान, तंत्रज्ञानाने शक्य आहे. तर दुसरा प्रश्न विज्ञानाने मिळालेल्या ज्ञानाचा व तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा या प्रश्नासाठी तत्त्वज्ञान उपयोगी ठरु शकते. कारण विज्ञान व तंत्रज्ञान वापरण्यासाठी शहाणपण लागते. ते तत्त्वज्ञानाने प्राप्त होते. हेच तत्त्वज्ञानाचे महत्त्व होय.

रसेल म्हणतात, माणसाकडे चिमुटभर जरी तत्त्वज्ञान असले तरी त्याच्यात युद्धवृत्ती, आपपर भाव, रागद्वेष, रक्तपिपासू वृत्ती दिसणार नाही.

८. तत्त्वज्ञानाच्या मुशीतून घडल्याने सॉक्रेटीसच्या ठिकाणी सत्यासाठी बलीदान देण्यासाठी लागणारे धाडस आणि धैर्य उत्पन्न झाले म्हणूनच त्याने अडीच हजार वर्षापूर्वी सत्यासाठी हेमलॉक विष प्राशन करुन न्याय देवतेविषयी आदर व्यक्त केला आणि तत्त्वज्ञानाला सन्मानित केले. हेच तत्त्वज्ञानाचे महत्त्व होय.

९. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने मानवी मन आणि समाज अधिक प्रगल्भ, सजग, सतर्क, सुक्ष्म आणि व्यापक विचाराचा बनतो. जे सारभूत आणि सत् स्वरुप असते त्याचा ते स्वीकार करते. धान्य निवडताना जे सुपाने पाखडण्यातून घडते तेच तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाने व्यक्तिच्या आणि समाजाच्या बाबतीत घडते. चांगले काय, योग्य काय ते समजते. हा तत्त्वज्ञानाचा फार मोठा फायदाच आहे. यादृष्टीने ते महत्त्वाचे आहे.

अशा तऱ्हेने तत्त्वज्ञानाचे अनेक अंगी महत्त्व सांगता येईल.

## १.७ परिशिष्ट

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**प्र. १ योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. ......... हे शास्त्रांचे शास्त्र आहे.

अ) राज्यशास्त्र **ब) तत्त्वज्ञान** क) अर्थशास्त्र ड) इतिहास

२. ......... ही तत्त्वज्ञानाची मुलभूत शाखा आहे.

अ) सौंदर्यशास्त्र **ब) सत्ताशास्त्र** क) कलेचे तत्त्वज्ञान ड) नितीशास्त्र

३. ज्ञानाच्या स्वरुपाविषयी ......... शाखेत अभ्यास केला जातो.

अ) सौंदर्यशास्त्र **ब) ज्ञानशास्त्र** क) नीतिशास्त्र ड) सत्ताशास्त्र

४. नीतिशास्त्र हे ....... शास्त्र आहे.

अ) व्यवहारिक **ब) आदर्शवादी** क) अध्यात्मिक ड) सामान्य

५. भारतीय तत्त्वज्ञानानूसार ....... हे मानवी जीवनाचे ध्येय आहे.

**अ) मोक्ष** ब) पैसा क) नोकरी ड) सत्ता

६. ......... हे भारतीय तत्त्वज्ञानाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

अ) विज्ञान **ब) कर्मसिद्धांत** क) बौद्धीक चर्चा ड) यापैकी नाही

७. ......... हे वैदिक दर्शन आहे.

**अ) सांख्य** ब) चार्वाक क) बौद्ध ड) जैन

८. ........ हे अवैदिक दर्शन आहे.

**अ) चार्वाक** ब) सांख्य क) न्याय ड) योग

९. भारतीय दर्शनांचे ......... प्रकार होतात.

**अ) दोन** ब) तीन क) चार ड) पाच

१०. .......... ला सर्व शास्त्रांची जननी म्हणतात.

**अ) तत्त्वज्ञान** ब) अर्थशास्त्र क) राज्यशास्त्र ड) समाजशास्त्र

११. .......... म्हणजे अंतिम सत्याचा शोध होय.

अ) विज्ञान **ब) तत्त्वज्ञान** क) संगीत ड) यापैकी नाही

सूचना- वरील पर्यायांमध्ये ठळक शब्द योग्य पर्याय आहेत.

**प्र.२ टीपा लिहा.**

१. तत्त्वज्ञान म्हणजे काय? ४. कर्मसिद्धांत

२. सौंदर्यशास्त्र ५. प्रमाणचर्चा

३. सत्ताशास्त्र ६. भारतीय तत्त्वज्ञानाचे वर्गीकरण

**प्र.३ थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. तत्त्वज्ञानाचे स्वरुप स्पष्ट करा.

२. नीतिशास्त्राचे स्वरुप स्पष्ट करा.

३. तर्कशास्त्राचे स्वरुप स्पष्ट करा.

४. मोक्षाची संकल्पना स्पष्ट करा.

५. पुर्नजन्माची संकल्पना स्पष्ट करा.

प्र.४ दीर्घोत्तरी प्रश्न

१. भारतीय तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. तत्त्वज्ञानाचे महत्त्व स्पष्ट करा.

३. तत्त्वज्ञानाच्या विविध शाखा स्पष्ट करा.

## १.८ संदर्भ ग्रंथ

१) श्रीनिवास दीक्षित, भारतीय तत्त्वज्ञान, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२) डॉ. ग. ना. जोशी, भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास खंड १, शुभदा प्रकाशन, पुणे

३) डॉ. वेदप्रकाश डोनगावकर, भारतीय तत्त्वज्ञान, मैत्री प्रकाशन, लातूर

४) डॉ. वेदप्रकाश डोनगावकर, तत्त्वज्ञानाची ओळख, श्री प्रकाशन, वाशिम

५) प्रा. राजेंद्र प्रसाद, दर्शन की रूपरेषा, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली

❑❑❑

# घटक २
# चार्वाक दर्शन

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ ज्ञानसिद्धांत

२.३ तत्त्वमीमांसा (जडवाद)

२.४ ईश्वराचे खंडन

२.५ आत्म्याचे खंडन

२.६ नीतिशास्त्र (सुखवाद)

२.७ मोक्ष

२.८ परिशिष्ठ :

अ) बहूपर्यायी प्रश्न

ब) टीपा लिहा

क) लघुत्तरी प्रश्न

ड) दीर्घोत्तरी प्रश्न

## २.० उद्दिष्ट्ये

१) चार्वाक दर्शन हे भारतीय संस्कृतितील एक महत्वाचे दर्शन असल्यामुळे या दर्शनाचा परिचय करुन देणे.

२) भारतीय दार्शनिक परंपरेतील प्रमुख सहा प्रमांणापैकी चार्वाक दर्शनानी स्वीकारलेल्या एकमेव 'प्रत्यक्ष' या प्रमाणाचे स्वरूप समजावून सांगणे.

३) इतर प्रमाणांच्या बाबतीत चार्वाकांची नकारात्मक भूमिका विशद करणे.

४) चार्वाक दर्शनातील तत्त्वासंबंधीच्या जडवादी भूमिकेचा परिचय करुन देणे.

५) ईश्वराच्या अस्तित्वाविषयी चार्वाकांनी मांडलेली भूमिका समजावून सांगणे.

६) चार्वाकांनी आत्म्याच्या स्वरूपासंदर्भात मांडलेल्या भूमिकेचा परिचय करुन देणे.

७) सुख हे देखील मानवी जीवनाचे ध्येय असते; या विषयीचे चार्वाकांचे मत विशद करणे.

८) मोक्ष या संकल्पनेला अनुसरुन पुरुषार्था विषयी चार्वाकांचे मत विशद करणे.

## २.१ प्रास्ताविक

भारतीय परंपरेत आस्तिक आणि नास्तिक असे दोन प्रमुख संप्रदाय आहेत. चार्वाक नास्तिक संप्रदयातील दर्शन आहे. अर्थात चार्वाक वेद व इतर वैदिक ग्रंथांचे प्रामाण्य स्वीकारीत नाहीत. या दर्शनाला 'लोकायत' दर्शन असेही म्हणतात. लोकायत या शब्दाचा अर्थ 'लोकांनी आयत केलेले' किंवा 'लोकांनी आयत करण्यायोग्य असलेले' असा होतो. माधवाचार्यांच्या एका विचाराच्या आधारे असे म्हणता येईल की, चार्वाक जो पर्यंत जीव आहे, तो पर्यंतच सुख भोगता येत असल्याचा संदेश देत. 'अर्थ आणि काम' या दोनच पुरुषार्थाचा स्वीकार करतात. शिवाय ते पारलौकिक बाबीही अमान्य करतात. विशेष म्हणजे लोकही चार्वाकाच्या या भूमिकेला अनुसरुन वागताना दिसतात. अर्थात चार्वाकाची ही भूमिका लोकांनी स्वीकारलेली आहे, किंबहुना ती स्वीकारण्यायोग्य ही आहे. म्हणून या दर्शनाला 'लोकायत' हे नाव पडले. या शिवाय या दर्शनाची भौतिकवादी–जडवादी दर्शन म्हणूनही ओळख आहे. कारण हे दर्शन या विश्वाच्या बुडाशी जडतत्त्वाची सत्ता असल्याचे मत मांडते.

चार्वाक दर्शनाच्या नाव आणि प्रवर्तकावरून अभ्यासकांमध्ये मतमतांतरे आहे. काहींच्या मते चार्वाक नावाचा एक ऋषी होता आणि त्याने जडवादी विचारांचा प्रचार व प्रसार केला; म्हणून या दर्शनाला चार्वाक असे नाव पडले. काहींच्या मते चार्वाक हा शब्द चारु + वाक् या दोन शब्दापासून बनला आहे. 'चारु' याचा अर्थ 'गोड' तर 'वाक्' याचा अर्थ 'बोलणे वा बोलणारे' असा होतो. चार्वाकी लोक हे गोड बोलणारे होते म्हणून या दर्शनाला चार्वाक हे नाव पडले. काही विद्ववाणांच्या मतानुसार देवगुरू बृहस्पती हे चार्वाक दर्शनाचे प्रवर्तक होते.

भारतीय तत्त्वज्ञानातील इतर दर्शनाप्रमाणे चार्वाक दर्शन हे सुद्धा अंतिम सत्याचा विचार करणारे दर्शन आहे. अंतिम सत्याचा विचार करीत असतांना चार्वाक हे केवळ 'प्रत्यक्ष'या एकमेव प्रमाणाचा स्वीकार करतात. अर्थात त्यांच्या सत्ताशास्त्रीय विचारांचा आधार हा त्याची ज्ञानमीमांसा आहे.

## २.३ ज्ञानसिद्धांत

**प्रत्यक्षासंबंधी मत :–**

चार्वाक हे जडवादी दर्शन आहे. त्यांच्या मते, पृथ्वी, अग्नी, जल आणि वायू या चार महाभूतापासून विश्वाची आणि विश्वातील प्रत्येक वस्तूची निर्मिती झाली आहे. चार्वाक आकाशाला तत्त्व म्हणून स्वीकारीत नाहीत. कारण ते आकाशाला प्रत्यक्षाचा विशय मानत नाहीत. ते या विश्वातील जेवढे म्हणून ज्ञान आहे ते सर्व प्राप्त करण्यासाठी प्रत्यक्ष हे एकमेव प्रमाण स्वीकारतात. त्यांच्या मते आत्मा म्हणजे 'चैतन्य विशिष्ट देह' होय. ज्ञान हा त्या आत्म्याचा गुण आहे. अर्थात आत्मा हा ज्ञाता आहे. भारतीय दर्शनात प्रामुख्याने सहा प्रमाणांचा विचार झालेला आहे. पण चार्वाक हे प्रत्यक्ष हे एकच प्रामण स्वीकारतात. या संदर्भात त्यांचे 'प्रत्यक्षमेवैक प्रमाणम्' हे वाक्य प्रसिद्ध आहे.

**अनुमानासंबंधी मत :–**

चार्वाक अनुमानाला प्रमाण मानत नाहीत. पण चार्वाकांच्या या भूमिकेवर आक्षेप घेत प्रश्न उपस्थित केला जातो की, जर 'नदिच्या काठी फळे आहेत' असे वाक्य ऐकल्याबरोबर फळाची इच्छा असणारे लोक नदीतीराकडे जाण्यास कसे प्रवृत्त होतील? या संदर्भात चार्वाक म्हणतात की, ''हा सर्व मनोरंजनाचा खेळ आहे. कारण अणुमानाचे प्रामाण्य मानणाऱ्यांनी व्याप्ति आणि पक्षधर्मता यांनी युक्त असलेले लिंग (हेतू) हे निर्दोष अनुमानाचे गमक म्हणून स्विकृत केले आहे आणि व्याप्ति म्हणजे (निश्चित आणि संदिग्ध अशा) दोन्ही प्रकारच्या उपाधींनी रहित असा संबंध आहे. परंतु हा संबंध चक्षू आदी इंद्रियांप्रमाणे केवळ अस्तित्वात असल्यानेच (अनुमानाचे) अंग बनतो असे नाही, तर त्याचे ज्ञान झाले तरच (तो अनुमानास सहाय्यक होतो.)'' एकंदर व्याप्तिचे ज्ञान प्रत्यक्षाने होत नाही. या सोबतच चार्वाक व्याप्तिचे ज्ञान अनुमानानेही होत नाही असे म्हणतात. ''कारण त्या एका अनुमानासाठी आवश्यक असलेल्या व्याप्तिज्ञानाचा उपाय म्हणून दुसऱ्या अनुमानाचा अवलंब करावा लागेल आणि त्या अनुमानासाठी आणखी तिसऱ्या, याप्रमाणे अनवस्था–प्रसंग ओढावेल.'' एकंदर अनुमान हे व्याप्तिवर आधारित असते आणि व्याप्ति ही प्रत्यक्ष वा अनुमानाचाही विषय नसते, म्हणून चार्वाक व्याप्तिवर आधारित अनुमानाचा स्वीकार करीत नाहीत. अनुमानाच्या संदर्भाने चार्वाक असेही म्हणतात की, अनुमाण प्रमाण गौण मानले नाही तर अर्थनिश्चय करणे कठिण होते.

चार्वाक हे 'प्रत्यक्ष प्रमाणवादी' आहेत. ते व्याप्तिवर आधारित अनुमानाचा मूळीच स्वीकार करीत नाहीत. अर्थात चार्वाक प्रत्यक्षावर आधारित अनुमानाचा स्वीकार करीत असावेत. काही अभ्यासकांच्या मतानुसार, 'पुरंदर' सारख्या काही चार्वाकवाद्यांनी लोकप्रसिद्ध अनुमानाचा स्वीकार केला आहे. त्यांच्या मते व्यावहारिक जीवनात निर्माण होणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी अनुमान प्रमाणाची आवश्यकता असते. परंतु लोकप्रसिद्ध अनुमान म्हणजे काय? हे याठिकाणी जाणणे आवश्यक आहे. श्री.ह.दिक्षीतांच्या मताप्रामणे, ''लोकप्रसिद्ध म्हणजे लोकांत जे प्रसिद्ध आहे ते; असा अर्थ नाही.'' तर ''इंद्रियविषय यारूपाने जे सिद्ध होऊ शकते त्याच्या संबंधीचे अनुमान (हे) प्रमाण होय.'' पण लौकिक मार्गाचे उल्लंघन करुन केले जाणारे अनुमान अर्थात परलोकाचे अस्तित्व सिद्ध करू पाहणारे अनुमान निषिद्ध आहे. कारण त्यांच्या मते परलोकाचे अस्तित्वच नाही.

**शब्द संबंधी मत :–**

चार्वाक हे प्रत्यक्षवादी असल्या कारणाने शब्द प्रमाणाचाही स्वीकार करीत नाहीत. चार्वाकाच्या काळात प्रामुख्याने वैदिक वचनांचा प्रभाव होता. वैदिक वचन हेच धर्म व समाज व्यवस्थेसाठी प्रमाण होते. पण चार्वाक वेद व वैदिक वचनांचे प्रामाण्य अमान्य करतात. त्यांच्या मते 'धुर्तप्रलापस्त्रयी' म्हणजे हे वैदिक साहित्य, ज्यात तीन वेदांचा समावेश आहे; ते धुर्ताचे प्रलाप आहे.

वास्तविक पाहता शब्दप्रमाण वा आप्तवचन हे इतरांच्या ज्ञानाचे कथन असते. या कथनाच्या आधारे श्रोत्याला वा वाचकाला ही 'काही प्रमाणात' त्याच प्रकारचे ज्ञान प्राप्त होते. पण त्याचे ते ज्ञान पहिल्या व्यक्तीप्रमाणे सक्षम वा दृढ असते असे म्हणता येत नाही. अर्थात शब्दप्रमाण वा आप्तवचनाच्या विस्तारिकरणामध्ये जे मूळ सत्य आहे; ते बाजूला पडत असते. दुसरा मुद्दा असा की, शब्दप्रमाण वा

आप्तवचनाचा जो स्त्रोत आहे ते ग्रंथ किंवा व्यक्ती यापैकी जे काही असेल; ते प्रामाणिक, शहाणपणायुक्त, ज्ञानयुक्त आहे की नाही? त्यात असलेली भावना निस्वार्थ आहे की नाही? असा प्रश्नही या ठिकाणी उपस्थित होतो. तिसरा मुद्दा असा की, ग्रंथांमध्ये सागितलेल्या 'विषयाची' प्रत्यक्षात पडताळणी वा निरीक्षण केले असता त्याचा प्रत्यय येतो का? अर्थात हे सर्व ग्रंथ प्रत्यक्षाची साक्ष देऊ शकतात का? असा प्रश्नही या ठिकाणी उपस्थित होतो.

## २.३ तत्त्वमीमांसा (जडवाद)

विश्वाच्या बुडाशी असलेल्या मूळ तत्त्वाचा विचार हा भारतीय तत्त्वज्ञानातला प्रमुख विषय आहे. सामन्यत: जे स्वंयम् निर्मित आहे, ज्याच्यापासून इतर सर्व वस्तू उत्पन्न होतात, जे अविनाशी-अविकारी आहे त्याला मूलतत्त्व म्हणतात. चार्वाकांच्या मते 'पृथ्वी-आप-तेज-वायू: इति तत्त्वानी।' म्हणजे पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू हेच ते तत्त्व आहेत. या तत्त्वाचे स्वरूप जड आहे. म्हणून त्यांच्या सत्तेसंबंधीच्या भूमिकेला जडवाद असे म्हणतात.

चार्वाक हे आकाशाला तत्त्व म्हणून स्विकारत नाहीत. ते केवळ उर्वरित चार महाभूतांनाच तत्त्व म्हणून स्वीकारतात. त्यांच्या मते, 'तत्समुदाये शरीरेन्द्रिय विषय संज्ञा' म्हणजे या चार महाभूतांच्या समुदायातून किंवा संयोगातून जे निर्माण होते त्याला शरीर, इंद्रिय, विषय या संज्ञा दिल्या जातात. असे हे महाभूत जरी स्वरूपाने जड असले तरी त्यांच्या पासून चैतन्याची निर्मिती होत असते. 'किण्वादिभ्यो मदशक्तिवत्' म्हणजे ज्याप्रमाणे काही फळातून मादक शक्ती निर्माण होते त्याप्रमाणे 'भूतान्येव चेतयन्ति' म्हणजे या चार महाभूतातून चैतन्याची निर्मिती होत असते.

सामान्यत: हे जड स्वरूपी चार महाभूत कायम टिकणारे आहेत. ते कशानेही बाधित होत नाहीत. जगताची निर्मिती या चार तत्त्वापासूनच झाली. विशेष म्हणजे या जगतातील इतर वस्तूंची निर्मितीसुद्धा या चार महाभूतापासून होते. पण या ठिकाणी एक प्रश्न असा पडतो की, या चार महाभूतापासून या जगताची निर्मिती कशी झाली असावी? त्यामागे दुसरे काही कारण आहे का? या प्रश्नाच्या संदर्भात चार्वाकांनी जी भूमिका मांडली आहे; ती स्वभाववाद म्हणून ओळखली जाते. त्या स्वभाववादाचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

**स्वभाववाद (निसर्गवाद) :**

चार्वाक दर्शनामध्ये विश्वाच्या निर्मितीसाठी पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू या चार महाभूतांना महत्व दिले आहे. त्यांच्या मते, या चार महाभूताच्या संयोगातूनच या विश्वाची व विश्वातील इतर वस्तूची निर्मिती झाली आहे. सामान्यत: श्रुति ग्रंथामध्ये सांगितल्यानुसार या विश्वाच्या निर्मिती मागे जे मूळ कारण आहे ते 'ईश्वर' आहे. पण चार्वाक हे श्रुतिमत अमान्य करतात. कारण त्यांच्या दृष्टिकोनातून जे काही घडले आहे आणि जे काही घडत आहे; त्यासाठी वस्तूचा अर्थात तत्त्वांचा स्वभाव कारणीभूत आहे. अर्थात जे काही घडते ते स्वभावानुसार घडते असे मानणारा हा सिद्धांत म्हणजे स्वभाववाद होय.

अग्नीचा स्वभाव उष्णता, पाण्याचा थंडावा, वायूचा स्पर्श ही चित्र-विचीत्रता कोणीही उत्पन्न केलेली नाही; तर ती आपापल्या स्वभावानुसार उत्पन्न झालेली आहे. या शिवाय मोर सुंदर पिसारा फुलवतो,

कोकिळा मधुर आवाजात गाते, कावळा कर्कश आवाज करतो. या सर्व उदाहरणात त्या त्या वस्तूचा स्वभाव व्यक्त झाला आहे. अशाच प्रकारचा स्वभाव चार महाभूतांचा आहे. मात्र अशा या स्वभावासाठी इतर कोणत्याही घटकाची आवश्यकता नसते. चार्वाकाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक भूताच्या ठिकाणी चैतन्य असते. या चैतन्यामुळेच त्या त्या तत्त्व वा पदार्थाच्या स्वभावाला गती प्राप्त होत असते.

एकंदर जे काही घडले आणि घडत आहे त्यामागे त्या त्या वस्तूचा स्वभाव हे प्रमुख कारण आहे. स्वभावाच्या गतिशीलतेचे कारण हे चेतना आहे. असा हा स्वभाव आणि चेतना दोन्हीही बाबी चार महाभूताच्या ठिकाणी आहेत. परिणामी या चार महाभूताच्या संयोगातून हे विश्व व विश्वातील इतर वस्तू निर्माण झाल्या आहेत.

## २.४ ईश्वराचे खंडण

चार्वाक हे नास्तिक दर्शन आहे. नास्तिक या शब्दाचे दोन अर्थ होतात. त्यापैकी एक व्यावहारिक तर दुसरा तात्त्विक आहे. व्यावहारिक अर्थाने जे ईश्वराला नाकारतात ते नास्तिक होत. तर तात्त्विक अर्थाने जे वेदाचे प्रामाण्य नाकारतात ते ही नास्तिक होत. या दोन्ही अर्थाने चार्वाक नास्तिक आहेत. अर्थात चार्वाक वेदाचे प्रामाण्य नाकारतात आणि वेदात वा इतर वैदिक ग्रंथात सांगिलेला ईश्वरही नाकारतात.

वैदिक परंपरेनुसार या विश्वाची निर्मिती ईश्वरापासून झाली आहे. पण चार्वाक जडवादी दर्शन आहे. यांच्या मते, पृथ्वी, आप, तेज आणि वायू या चार महाभूतांपासून या विश्वाची निर्मिती झाली आहे; विश्वनिर्मितीमागे ईश्वर वा इतर कोणत्याही घटकाचा ते स्वीकार करीत नाहीत. कारण त्यांचे स्पष्ट मत आहे की, 'न परमेश्वरोऽपि कश्चित् ।' म्हणजे परमेश्वर म्हणून कोणीही अस्तित्वात नाही.

चार्वाक अनुमानाप्रमाणे शब्दप्रमाणाचाही अस्वीकार करतात. अर्थात ते वेदप्रामाण्य ही नाकारतात. परिणामी ते वेदातील सर्व संकल्पनांचाही अस्वीकार करतात. सामान्यत: वेद वा वैदिक ग्रंथात स्वर्ग प्राप्ती, कर्म फळ प्राप्ती इत्यादी विषयाला महत्व देण्यात आले आहे. पण चार्वाक म्हणातात की, 'स्वर्गोत्पादकत्वेन विशेषाभावात् ।' म्हणजे स्वर्गाची प्राप्ती करुन देण्यात (वेदांचा) विशेष अभाव दिसून येतो. या शिवाय 'एष्यत्फलत्वात्' म्हणजे फलप्राप्तीच होत नसल्यामुळे (वेद) हे अनावश्यक आहेत. परिणामी ज्याअर्थी वेद स्वर्गादी फल देऊ शकत नसल्याने निरर्थक आहेत त्या अर्थी त्यात सांगितलेली ईश्वर कल्पनाही निरर्थक ठरते.

### आत्म्याचे निरूपण

सामान्यत: आपण असे मानतो की, चार्वाक हे एक नास्तिक, अवैदिक अर्थात वेद विरोधी दर्शन आहे आणि त्यानुसार तो ईश्वर, आत्मा वगैरे मानत नाही. पण चार्वाकाचे विचार व्यवस्थितपणे समजून घेतल्यास आपल्या हे लक्षात येईल की, चार्वाक हे आत्म विरोधी नाहीत. अर्थात ते आत्म्याचे अस्तित्व स्वीकारतात. मात्र त्यांचा आत्मा हा वैदिकांप्रमाणे नाही. म्हणून चार्वाक हे आत्म्याचे निराकरण करतात असे म्हणन्याऐवजी चार्वाक हे त्यांना मान्य असलेल्या आत्म्याचे निरूपण करतात असे आपल्याला म्हणावे लागेल. किंबहुना असे म्हणनेच योग्य ठरेल.

चार्वाक देहाहून वेगळा असा आत्म मान्य करीत नाहीत. त्यांच्या दृष्टिकोनातून देह आणि आत्मा हे परस्पराहून वेगळे नाही. ते सजीव देहाला आत्मा मानतात. अर्थात ज्या देहात जीव आहे; त्यालाच ते आत्मा म्हणतात. जीवाचे तात्पर्य चैतन्याशी आहे. अर्थात ज्या देहात चैतन्य आहे त्यालाच चार्वाक आत्मा मानतात. ज्याप्रमाणे चार महाभूताच्या संयोगातून या विश्वाची निर्मिती झाली आहे; त्याचप्रमाणे चैतन्याची निर्मिती देखील चार महाभूताच्या संयोगातून होत असते. ''किण्व वा गुळ आदी पदार्थापासून मद वा मादक पदार्थ जसा तयार होतो. तसेच पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू हे चार तत्त्व जेव्हा देहाच्या आकारात परिणत होतात तेव्हा त्यापासूनच चैतन्यही निर्माण होते.'' पानाचा विडा चघळल्यानंतर त्यातील चूना, काथ आणि पान यांचा संयोग होऊन जसा लाल रंग निर्माण होतो तसा पृथ्वी, जल, अग्नी आणि वायू यांच्यात संयोग होऊन चैतन्याची अर्थात आत्म्याची उत्पत्ती होते. सर्व दर्शनात सांगितल्यानुसार ''चार महाभूतांपासून जेव्हा देहाची निर्मिती होत असते तेव्हा चैतन्यही उत्पन्न होत असते आणि जेव्हा देहरूपात असलेले ते चार महाभूते विनाश पावतात तेव्हा आपसूकच त्यातून चैतन्यही विनाश पावते.'' याचा अर्थ असा की, चैतन्य विशिष्ट देह हाच आत्मा होय आणि देहाव्यतीरिक्त आत्म्याला प्रमाण नाही. अर्थात चैतन्या शिवाय देहाची आणि देहाशिवाय आत्म्याची कल्पनाच करता येत नाही. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास जोपर्यंत देह आहे तो पर्यंत चैतन्य आहे आणि जो पर्यंत चैतन्य आहे तोपर्यंतच देह हा आत्मा आहे. विशेष म्हणजे चार्वाक ही याच आशयाचा विचार मांडतात. त्यांच्या मते, 'चैतन्यविशिष्ट: काय: पुरुष: ।' म्हणजेच चैतन्ययुक्त शरीरच पुरुष होय. त्यांच्या मते, पुरुष हा शरीर आणि इंद्रियांचा संघात आहे आणि चैतन्य हे त्या संघाताचे क्षेत्रज्ञ होय. अर्थात शरीर व इंद्रियांनी युक्त असलेला पुरुष आणि चैतन्य यांच्यात अद्वैत आहे आणि असा हा पुरुष प्रत्यक्ष इंद्रियांचा विषय देखील आहे. अर्थात व्यावहारिक जीवनात आपण ज्या शरीराला अनुसरूण 'मी' म्हणतो तोच आत्मा होय.

अशा प्रकारे चार्वाक चार महाभूताच्या संयोगातून देह आणि चैतन्याची उत्पत्ती मानतात. विशेष म्हणजे ते चैतन्य असलेल्या देहालाच आत्मा मानतात. काही ठिकाणी त्यांनी आत्म्याला 'काय: पुरुष'म्हणजे देहधारी पुरुष असेही म्हटले आहे. चार्वाकांची ही आत्मा संकल्पना इतर वैदिक दर्शनातील आत्मसंकल्पनेपेक्षा निराळी आहे. कारण या दोन्ही ठिकाणच्या आत्म संकल्पनेतला मूलभूत भेद असा आहे की, जिथे इतर दर्शने आत्म्याला अजन्मा आणि अमृत मानतात. तिथे चार्वाक शरीररूपी आत्म्याच्या उत्पत्ती आणि विनाशाचा पुरस्कार करतात.

## २.६ नीतिशास्त्र (सुखवाद)

सामान्यत: धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. पण प्रबोधचन्द्रोदय नाटकात सांगितल्याप्रमाणे चार्वाकांनी 'अर्थकामौ पुरुषार्थ' म्हणजे अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ आहेत; असे सांगितले आहे. चार्वाकांचे स्पष्ट मत आहे की, 'न धर्मात् आचरेत्' म्हणजे धर्मानुसार आचरण करु नये. चार्वाक काम या पुरुषार्थाला साध्य आणि त्यासाठी अर्थ या पुरुषार्थाला साधन मानतात. त्यांच्या मते, 'काम एव प्राणिनां कारणम्' म्हणजे काम हेच सर्व प्राणिमात्राच्या जन्माचे कारण आहे. म्हणून खरे पाहता, 'काम एवैक पुरुषार्थ:' म्हणजे काम हेच एकमेव पुरुषार्थ आहे. त्यांच्या दृष्टिकोनातून मोक्ष हे परलोकाचे वा

भविष्यकाळातले सुख सूचविणारे आहे. पण अशा प्रकारचे हे सुख अनिश्चित असते. परिणामी मोक्ष अस्वीकार्य आहे. चार्वाक हे वर्तमानवादी आहेत. म्हणजेच ते वर्तमान सुखालाच तेवढे महत्व देतात. म्हणजे ते भविष्यातल्या वा पुढच्या जन्मातल्या सुखाचा विचार करीत नाहीत. याशिवाय ते भौतिकवादी देखील आहेत. म्हणजेच ते या भौतिक जगताला अनुसरूणच सुखाची अभिलाषा ठेवतात. ते परलोकाला मान्यता देत नाहीत.

चार्वाकांच्या दृष्टिकोनातून सुख हेच परम प्राप्तव्य आहे. वास्तविक पाहता सुख प्राप्त करणे हाच मानवी स्वभाव आहे. तेव्हा मानवाने सुखाचा त्याग करणे योग्य नाही. चार्वाकांची हीच भूमिका सुखवाद म्हणून ओळखली जाते.

चार्वाक हे भोगवादी दर्शन आहे. त्यांच्या दृष्टिकोनातून जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत मानवाने सुख प्राप्तीला महत्व दिले पाहिजे. या भौतिक जगतामध्ये ज्याज्या विषय-वस्तू भोगण्यासारख्या आहेत त्यात्या सर्व विषय-वस्तूंचा भोग घेतला पाहिजे. अर्थात मनुष्याने आपल्या वासना आणि तृष्णा यांचे दमन न करता त्यांना पूर्णत्वास नेले पाहिजे. सामान्य भाषेत सांगावयाचे झाल्यास प्रत्येक व्यक्तीने आपल्या इच्छा पूर्ण केल्या पाहिजेत. कारण त्यातच खऱ्या अर्थाने सुख आहे. सर्वदर्शनसंग्रह या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे :

यावज्जीवं सुखं जीवेन्नास्ति मृत्योरगोचरः ।

भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ।।

म्हणजे जो पर्यंत जीव आहे तोपर्यंत सुखाचा भोग घ्यावा. जीव म्हटले की मृत्यू निश्चित आहे. देहाची राख झाल्यानंतर तो पुन्हा येत नाही. यावरून हे स्पष्ट आहे की, चार्वाक हे वर्तमान जीवनाला महत्त्व देतात. विशेष म्हणजे ते या वर्तमान जीवनातील वर्तमान सुखालाच तेवढे मानतात. कारण त्यांच्या मतानुसार भूतकाळ हा होऊन गेलेला असतो. तर भविष्यकाळाविषयी सर्व काही अनिश्चित आहे. तेव्हा वर्तमान जीवन व वर्तमान सुख हेच श्रेष्ठ मानले पाहिजे. कामसूत्र या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे 'वरमद्य कपोतः श्वो मयुरात्।' अर्थात उद्याच्या मोरापेक्षा (आज) हातात असलेला कबुतर बरा. वर्तमान सुखाबरोबर चार्वाक स्वतःच्या सुखालाही महत्व देतांना दिसतात. याच कामसूत्र ग्रंथात सांगितल्यानुसार 'कोहयबालिशो हस्तगतं परगतं कुर्यात्।' म्हणजे जे आपल्या हाती आहे ते दुसऱ्याच्या हाती देणे हे बालीशपणाचे ठरेल. चार्वाकांच्या या वाक्यावरून त्यांच्या स्वार्थ सुखवादाचा गंध स्पष्टपणे यायला लागतो.

सुखवादी दृष्टिकोणानुसार सुख प्राप्त करणे हा मानवाचा मूळ स्वभाव असल्यामुळे तो स्वभाव जोपासणे हे प्रत्येकाचे कर्तव्य मानले जाते. सामान्यतः सुख हे दुःख मिश्रीत असतेच. म्हणून दुःखांना घाबरुन सुख त्यागायचे नसते. साळीवरची साल काढून माणसे जसे तांदूळ खातात; तसेच दुःख बाजूला सारुन सुखाचा अनुभव घेतला पाहिजे. कारण त्यातच खऱ्या अर्थाने शहाणपण आहे. दैनंदिन व्यवहाराला अनुसरूण सांगावयाचे झाल्यास भिकारी आपल्या दारावर भीक मागायला येतील म्हणून ज्याप्रमाणे आपण घरी अन्न शिजवायचे सोडत नाही. किंवा मास्यात काटे असतात म्हणून आपण जसे मासे खाण्याचे सोडत नाही. त्याप्रमाणे जीवनात दुःख आहे म्हणून आपण सुख भोगायचे सुद्धा सोडायचे नसते. कारण सुख हेच तर प्राप्त करण्यासारखे असते.

## २.७ मोक्ष

भारतीय वैदिक परंपरेत प्रामुख्याने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. यापैकी मोक्ष हे परम् प्राप्तव्य आहे. सामान्यत: चित्त वा आत्म्यांच्या दु:खापासून निवृत्तीच्या आवस्थेला मोक्ष मानले जाते. अर्थात जीवनात दु:ख उत्पन्न करणाऱ्या सर्व विषय, वासना इत्यादी पासून स्वत:ला परावृत्त करुन चित्त वा आत्म्याला स्थिर करणे म्हणजे मोक्ष होय. मोक्षाच्या या आवस्थेला जीवनमुक्ती म्हटले जाते.

चार्वाक हे वरील चार पुरुषार्थांपैकी अर्थ आणि काम या दोनच पुरुषार्थाचा स्विकार करतात. धर्मानुसार आचरण करू नये असे त्यांचे स्पष्ट मत आहे. कारण याने फल प्राप्ती होत नाही आणि (फलप्राप्ती होते असे कोणाचे म्हणने असेल तर) ती प्राप्ती ही संशयास्पद असते; असे म्हणून चार्वाकप्रचलित अर्थाने मोक्षाचे महत्वही नाकारतात. बृहस्पतिच्या या मतानुसार सांगावयाचे झाल्यास अग्नीहोत्र (यज्ञ) करणारे, तीन वेदी, संन्यासी होऊन त्रिदण्ड धारण करणारे, अंगाला भस्म लेपून साधू म्हणवणारे जे लोक आहेत ते बुद्धीहीन व पौरुषहीन आहेत. त्यांचे ते आचरण वा व्यवहार हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. अर्थात अशा या लोकांच्या व्यवहार व आचरणाला अनुसरूण कर्म केल्याने मोक्ष प्राप्त होत नाही.

चार्वाक हे ज्याप्रमाणे भोगवादी, वर्तमानवाद, सुखवादी, स्वसुखवादी आहेत त्याप्रमाणे ते कर्मवादी सुद्धा आहेत. त्यांच्या मतानुसार शेती, गोपालन, व्यवसाय, दण्डनीति (राजकीय नोकरी) इत्यादीच्या माध्यमातून जे काही प्राप्त होते त्यातून सुखानूभव घ्यायचा असतो. भारतीय वैदिक परंपरेत त्यागाच्या माध्यमातून ज्या जीवनमुक्तीचे समर्थन झाले आहे; त्या जीवनमुक्तीला अनुसरूण सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, जीवनमुक्ती ही त्यागात नाही तर भोगात आहे आणि भोग हे कुठल्यातरी पारलौकिक शक्तिला अनुसरूण नाही तर सुख-दु:ख मिश्रीत कर्माने मिळवलेल्या साधन-संपत्तीतून आहे.

भारतीय परंपरेत जीवनमुक्ती शिवाय विदेहमुक्तीचा विचारही आलेला दिसतो. या संदर्भात चार्वाक 'मरणमेवापवर्ग:' असे म्हणतात. म्हणजे त्यांच्या मते मृत्यू हाच अपवर्ग (मोक्ष) होय. अशा प्रकारे चार्वाक कर्म भोगातून जीवनमुक्ती आणि मृत्यूतून विदेहमुक्ती सूचवितांना दिसतात.

**सरावासाठी प्रश्न**

**अ) बहूपर्यायी प्रश्न :**

१. चार्वाक हे काय आहे?

अ) धर्म ब) दर्शन क) संस्था ड) या पैकी नाही

२. चार्वाक किती प्रमाण स्वीकारतात?

अ) ०१ ब) ०२ क) ०३ ड) ०४

३. चार्वाक अनुमान हे प्रमाण नाकारतात.

अ) चूक ब) बरोबर क) दोन्ही ड) या पैकी नाही

४. चार्वाक सुखवादी दर्शन आहे.

अ) चूक　　ब) बरोबर　　क) दोन्ही　　ड) या पैकी नाही

५. चार्वाक आत्मा मानतात की नाही?

अ) मानतात　　ब) नाही　　क) दोन्ही　　ड) यापैकी नाही

६. चार्वाक किती महाभूते स्वीकारतात?

अ) ०१　　ब) ०२　　क) ०३　　ड) ०४

७. चार्वाक कोणते महाभूत नाकारतात?

अ) पृथ्वी　　ब) आप　　क) तेज　　ड) आकाश

८. चार्वाक दर्शनाचा प्रवर्तक कोण आहे?

अ) कपिल　　ब) बृहस्पति　　क) कणाद　　ड) शंकर

९. चार्वाक हे दर्शन आस्तिक आहे की नास्तिक?

अ) आस्तिक　　ब) नास्तिक　　क) दोन्ही　　ड) या पैकी नाही

१०. चार्वाकाचा कालखंड कोणता आहे?

अ) समकालीन　　ब) आधुनिक　　क) मध्ययुगीन　　ड) प्राचीन

**ब) टीपा लिहा :**

१) जडवाद

२) प्रत्यक्ष प्रमाणाचे स्वरूप

३) अनुमानाची अनावश्यकता

४) सुखाचे महत्व

५) चार महाभूते

६) आत्म्याचे स्वरूप

७) चार्वाकांचा स्वभाववाद (निसर्गवाद)

**क) लघुत्तरी प्रश्न :**

१) चार्वाक दर्शनाचा परिचय द्या.

२) चार्वाक दर्शनाला लोकायत दर्शनक का म्हटले जाते? ते लिहा.

३) चार्वाक या शब्दाचा अर्थ स्पष्ट करा.

४) चार्वाकांची सुख विषयक भुमिका मांडा.

५) चार्वाकांनी स्वीकारलेल्या महाभूतांची चर्चा करा.

६) चार्वाक दर्शनातील प्रत्यक्ष प्रमाण स्पष्ट करा.

७) चार्वाकाच्या दृष्टिकोनातून अनुमानाचे स्वरूप स्पष्ट करा.

८) चार्वाकाचा स्वभाववाद काय आहे? ते लिहा.

ड) दिर्घोत्तरी प्रश्न :

१) चार्वाकाची तत्त्वमीमांसा सविस्तरपणे स्पष्ट करा.

२) चार्वाकाची ज्ञानविषयक भूमिका सविस्तरपणे मांडा.

३) चार्वाकांनी मांडलेली सुख विषयक भुमिका सविस्तरपणे मांडा.

४) चार्वाकाच्या सुखवादाचे चिकित्सकपणे परिक्षण करा.

५) चार्वाकांच्या तत्त्व आणि ज्ञानविषयक भुमिकेतील संबंध स्पष्ट करा.

६) चार्वाकांचा जडवाद सविस्तपणे मांडा.

७) चार्वाक प्रत्यक्षाशिवाय इतर प्रमाणे का नाकारतात? ते स्पष्ट करा.

८) चार्वाकाच्या स्वभाववादासंदर्भात इतर उदाहारणे देवून मांडणी करा.

## २.८ संदर्भ ग्रंथ


१) श्रीनिवास दीक्षित, भारतीय तत्त्वज्ञान, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२) डॉ. ग. ना. जोशी, भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास खंड १, शुभदा प्रकाशन, पुणे

३) डॉ. वेदप्रकाश डोनगावकर, भारतीय तत्त्वज्ञान, मैत्री प्रकाशन, लातूर

४) डॉ. वेदप्रकाश डोनगावकर, तत्त्वज्ञानाची ओळख, श्री प्रकाशन, वाशिम

५) प्रा. राजेंद्र प्रसाद, दर्शन की रूपरेषा, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली


❑❑❑

# घटक ३
# जैन दर्शन
## (Jainism)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय - विवेचन

  ३.२.१ जैन परंपरा

  ३.२.२ अहिंसातत्त्व

  ३.२.३ अनेकांतवाद

  नयवाद

  स्याद्‌वाद

  ३.२.४ वस्तुमीमांसा (मेटॅफिजिक्स)

  ३.२.५ जैन तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये.

३.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सारांश

३.७ सरावासाठी प्रश्न

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये :

वरील घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला -

- 'जैन' म्हणजे काय याची कल्पना येईल.
- जैन धर्माची परंपरा इतिहास समजेल
- श्वेतांवर व दिगंबर या दोन पंथातील फरक समजेल.

- अहिंसा तत्व व त्याचे महत्व समजेल.
- अनेकांतवाद – नयवाद व स्याद्वाद याचे आकलन होईल.
- सहा द्रव्यांची माहिती मिळेल, (सद्वस्तूशास्त्र)
- जैन तत्त्वज्ञानांची वैशिष्ट्ये अभ्यासता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

भारतीय दर्शनांची संख्या अनेक आहे. माधवाचार्यांच्या 'सर्वदर्शनसंग्रह' या प्रख्यात ग्रंथात विविध सोळा दर्शनांचे निरूपण केले आहे. पण त्यातील महत्वाची अशी नऊ दर्शने, आहेत. ती म्हणजे १) चार्वाक (लोकायतिक), २) जैन, ३) बौध्द, ४) न्याय, ५) वैशेषिक, ६) सांख्य, ७) योग, ८) पूर्वमीमांसा (मीमांसा), आणि ९) उत्तरमीमांसा (वेदांत). त्यांची आस्तिक दर्शने व नास्तिक दर्शने अशी विभागणी केली आहे. आस्तिक दर्शन म्हणजे 'वेदांचे प्रामाण्य मानणारी व नास्तिक म्हणजे 'वेदांचे प्रमाण न मानणारी' असे अर्थ केले जातात. आस्तिक म्हणजे परमेश्वराचे 'अस्तित्व' मानणारी असा अर्थ होत नाही. न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा (मीमांसा) व उत्तरमीमांसा (वेदांत) ही सहा आस्तिक दर्शने होत. चार्वाक, जैन आणि बौध्द ही नास्तिक दर्शने होत. जैन दर्शन अवैदिक आहे. त्याची परंपरा वेदपूर्वकाळापासूनची आहे. यज्ञयागावर भर देउन, देव-देवतांना प्रसन्न करून त्यांच्या आधारे अभ्युदय मिळवू पाहणारी एक दर्शन परंपरा म्हणजे वैदिक परंपरा होय, तर शरीरक्लेश व तप यावर भर देऊन स्वत:च्याच तपोबलावर (पुरूषार्थ) नि:श्रेयस साधू पाहणारी दुसरी परंपरा म्हणजे श्रमण परंपरा होय. जैन व बौध्द, ही श्रमण परंपरेतील आहेत.

जैन धर्मास जिनधर्म, अर्हतधर्म असेही म्हणतात. यातील 'जिन' हा शब्द महत्त्वाचा असून त्याची व्याख्या, 'कर्मारातीन जयतीति जिन' अशी केली आहे. जो कर्माला जिंकणारा आहे त्यास जिन म्हणतात. थोडयाशा विस्ताराने सांगायचे तर जो क्रोध, मान, माया लोभ या चार कषायांना, अंतरंग व बाह्य परिग्रहांना जिंकणारा, ईर्ष्या, असूया, तिरस्कार यावर विजय मिळविणारा, भय, गारव इ. वर विजय मिळविणारा, घाती व अघाती कर्मांना जिंकणारा तो जिन होय. त्यालाच जिनदेव, जिनेंद्र भगवान, जिनराज असेही म्हणतात. त्यांनी केलेल्या धर्मोपदेशास, विचारास, मोक्षमार्गास जिनधर्म किंवा जैनधर्म असे म्हणतात.

### ३.२.१ जैन परंपरा :

भ. महावीर हे जैन धर्मातील २४ वे तीर्थंकर होत. त्यांना वीर, अतिवार, सन्मति, वर्धमान असेही म्हणतात. त्यांचा जन्म कुण्डपूर या ठिकाणी ख्रिस्तपूर्व ५९९ या वर्षी एका राजघराण्यात झाला तर ख्रिस्तपूर्व ५२७ मध्ये त्यांचे निर्वाण झाले. एकूण ७२ वर्षे ते जगले. त्यांच्या पित्याचे नाव सिध्दार्थ व मातेचे नाव त्रिशला होते. दिगंबर जैनांच्या मान्यतेनुसार ते बाल ब्रह्मचारी होते तर श्वेतांबर जैनांच्या मान्यतेनुसार त्यांचा विवाह यशोदा हिच्याशी झाला होता, त्यांना एक मुलगी सुध्दा होती. भ. पार्श्वनाथ व भ. महावीर यांची माहिती इतिहासास अवगत आहे भ. महावीर हे शेवटचे (२४वे) तीर्थंकर होते तर सध्याच्या कालचक्राला

(हुंडा अवसर्पिणी) अनुसरून भ. वृषभदेव (भ. आदिनाथ हे पहिले तिर्थंकर होत. त्यांचा कालावधी फार प्राचीन आहे. तीर्थंकर म्हणजे भवसागरातून तरून जाण्यास मार्ग दाखविणारा होय.

**कालचक्र – (षट् कालपरिवर्तन) :**

जैनांच्या मते त्यांचा विशिष्ट भूगोल आहे, विश्वरचना आहे. त्या विश्वाचा किंवा सृष्टीचा क्रम ठरलेला आहे. त्या सृष्टीचे परिवर्तन सातत्याने होत राहते. जैनांच्या भूगोलामध्ये भरतक्षेत्र आहे. त्या भरतक्षेत्राच्या आर्यखंडामध्ये अवसर्पिणी व उत्सर्पिणी हे काळाचे दोन विभाग आहेत. आपण भरतखंगत मोडतो. ज्यामध्ये मनुष्य व तिर्यच प्राणी यांचे आयुष्य, शरीराची उंची, वैभव इ. गोष्टी कमी–कमी होत जातात त्यास अवसर्पिणी आणि ज्यामध्ये या गोष्टी वाढत–वाढत जातात त्यास उत्सर्पिणी म्हणतात. अवसर्पिणी व उत्सर्पिणी या दोन्हींचे सहा–सहा भेद आहेत. अवसर्पिणी काळाचे. १) सुषमासुषमा २) सुषमा ३) सुषमा–दु:षमा ४) दु:षमा–सुषमा ५) दु:षमा व ६) अतिदु:षमा (दु:षमा–दु:षमा) हे सहा भेद आहेत; तर उत्सर्पिणी काळाचेही सहा भेद असून ते याच्या उलट असतात. ते म्हणजे १) दु:षमा–दु:षमा, २) दु:षमा, ३) दु:षमा–सुषमा, ४) सुषमा:दुषमा, ५) सुषमा ६) सुषमा–सुषमा येथे काळाच्या विभागाला 'समा' म्हणतात. 'सु'म्हणजे चांगले व 'दु'म्हणजे वाईट या दोन्ही काळांची परिवर्तने सातत्याने होत असतात.

ज्याप्रमाणे कृष्णपक्षानंतर शुक्लपक्ष आणि शुक्लपक्षानंतर कृष्णपक्ष सातत्याने फिरत असतात त्याचप्रमाणे अवसर्पिणीनंतर उत्सर्पिणी आणि उत्सर्पिणीनंतर अवसर्पिणी या अनुक्रमाने सातत्याने फिरत असतात. हे कालचक्र कधीही थांबत नाही.

सध्या अवसर्पिणी काळ चालू आहे. या अवसर्पिणी काळातील सुषमा–दु:षमा नावाच्या तृतीय काळात प्रथम तीर्थंकर भगवान वृषभदेवाचा (भ. आदिनाथ) यांचा जन्म झाला. भगवान वृषभदेवाच्या निर्वाणानंतर (मोक्ष) तीन वर्षे आणि साडे–आठ महिने व्यतीत झाल्यानंतर दु:षमा–सुषमा या चतुर्थ काळाला सुरूवात झाली. या कालखंडात बाकीचे २३ तीर्थंकर झाले. भगवान महावीर मोक्षाला प्राप्त झाल्यानंतर तीन वर्षे, आठ महिने आणि एक पक्ष काळ व्यतीत झाल्यानंतर 'दु:षमा' नावाच्या पंचमकाळाला सुरूवात झाली. जैन परंपरेचा अभ्यास करताना वरील कालचक्र अभ्यासणे महत्वाचे ठरते. कारण आतापर्यंत अनेक अवसर्पिणी व उत्सर्पिणी कालखंडांचे चक्र अव्याहतपणे परिवर्तन होत आले आहे. यापूर्वीच्या कालखंडामध्ये २४ तीर्थंकर होउन गेले आहेत. भविष्यकाळातील वरील कालचक्रामध्ये तीर्थंकर होणार आहेत; आणि सध्याच्या कालचक्रात सुध्दा तीर्थंकर झाले आहेत. सध्याच्या कालचक्रातील २४ तीर्थंकर खालीलप्रमाणे–

१) ऋषभनाथ (देव) २) अजितनाथ ३) संभवनाथ ४) अभिनंदननाथ ५)सुमतिनाथ ६)पद्मप्रभ

७) सुपार्श्वनाथ ८) चंद्रप्रभ ९)पुष्पदंत १०) शीतलनाथ ११) श्रेयांसनाथ १२) वासुपूज्य

१३) विमलनाथ १४) अनंतनाथ १५) धर्मनाथ १६) शांतिनाथ १७) कुंथुनाथ १८) अरहनाथ

१९) मल्लिनाथ २०) मुनिसुव्रतनाथ २१) नमिनाथ २२) नेमिनाथ २३) पार्श्वनाथ २४) महावीर

भ. महावीर हे जैन धर्माचे संस्थापक नसून जैन धर्माचे प्रवर्तक आहेत. भ. पार्श्वनाथ सुध्दा जैन धर्माचे प्रवर्तक आहेत. सध्याच्या अवसर्पिणी कालचक्रातील प्रथम तीर्थंकर भ. वृषभदेव हे आदि प्रवर्तक आहेत. यावरून जैन धर्माची स्थापना ही अनादी -अनंत आहे हे स्पष्ट होते. वेद आणि अन्य साहित्यामध्ये ऋषभनाथ, अजितनाथ, अरिष्टनेमि इ. तीर्थंकरांचे उल्लेख मिळतात. भागवत पुराणात ऋषभदेवाला विष्णूचा आठवा अवतार मानले आहे. विश्वातील सर्वात प्राचीन ग्रंथ ऋग्वेदामध्ये ऋषभदेवाचाही उल्लेख सापडतो. अग्निपुराण, कर्मपुराण, वराहपुराण, मार्कंडेयपुराण, वायुपुराण इ. मध्येही ऋषभदेवाचा उल्लेख सापडतो. ताण्ड्य आणि शतपथ ब्राम्हणमध्ये ऋषभदेवास पशुपति म्हटले आहे. धम्मपदामध्येसुदा भ. ऋषभदेव आणि भ. महावीर यांचे उल्लेख सापडतात.

ज्या दिवशी भ. महावीरांना निर्वाणप्राप्ती झाली त्याच दिवशी गौतम गणधरास केवलज्ञानाची प्राप्ती झाली. पुन्हा ज्या दिवशी गौतम स्वामी निर्वाणास प्राप्त झाले त्याच दिवशी श्री सुधर्म स्वामींना केवलज्ञान प्राप्त झाले. सुधर्म स्वामी मोक्षास गेल्यानंतर जंबुस्वामीना केवलज्ञान प्राप्त झाले. त्यानंतर कोणीही अनुवध्द केवली झाले नाहीत. या तिघांनी संपूर्ण आगमाचे ज्ञान मुखोद्गत करून जतन केले. त्या ज्ञानाचा प्रचार व प्रसार केला. या तीन केवलींचा कालखंड १२+१२+३६=२ वर्षाचा होता.

दिगंबर संप्रदायाप्रमाणे वरील तीने केवली गणधरानंतर विष्णू इ. ५ श्रुतकेवली झाले. त्यांना पूर्वश्रुतज्ञान मुखोद्गत होते. भद्रबाहू हे शेवटचे श्रुतकेवली होते. भद्रबाहूनंतर विशारवाचार्य इ. अकरा दशपूर्वी, नक्षत्र इ. एकदशांगधारी व सुभद्र इ. लोहाचार्यापर्यंत चार एकांगधारी आचार्याची वंशावली पाहावयास मिळते. या सर्व आचार्याची स्मरणशक्ती कमी झाली होती. त्यामुळे त्यांच्याकडे श्रुतज्ञानाचे थोडेच ज्ञान अवगत होते. त्यानंतर पूर्वज्ञानाचे कोणतेही आचार्य झाले नाहीत. वीर निर्वाणानंतर सुमारे ७०० वर्षानी झालेल्या आचार्य धरसेन याना दुसऱ्या पूर्वातील काही अधिकाराचे ज्ञान होते. ते गिरिनगर येथील चंद्रगुंफेत राहत होते. त्यांच्याकडील ज्ञान जतन होउन त्याचा प्रचार व्हावा या उद्देशाने त्यांनी ते ज्ञान आचार्य पुष्पदंत व भूतबली यांना दिले. या दोन्ही आचार्यानी धरसेनाकडून प्राप्त झालेल्या मौखिक ज्ञानाच्या आधारावर 'षट्खंडागम' ग्रंथाची सूत्ररूप रचना केली. हा दिगंबर संप्रदायातील पहिला लिखित स्वरूपातील ग्रंथ आहे. या ग्रंथाशिवाय नंतरच्या आचार्यानी लिहिलेल्या ग्रंथांना सुध्दा दिगंबर जैनांनी मान्यता दिली. नंतर त्या ग्रंथाचे विषय व स्वरूपावरून त्यांचे प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग या चार प्रकारात वर्गीकरण केले. भगवान महावीरांनी उपदेशिलेल्या आगम ज्ञानाची केवली गणधरांनी पूर्ण रूपात मुखोद्गत करून ते श्रुतकेवलीपर्यंत प्रवाहित केले. नंतर तेथून पुढे अकरा दशपूर्वी, एक दशांगधारी, एकांगधारी यांच्या मार्फत पुढे प्रवाहित झाले. अखेर त्या मौखिक ज्ञानास धरसेनाचार्याच्या तळमळीने पुष्पदंत व भूतवली आचार्यानी षट्खंडागम ग्रंथाच्या रूपात शब्दबध्द केले.

**जैन धर्मातील पंथ : दिगंबर व श्वेतांबर :**

भ. महावीरांच्या निर्वाणानंतर काही वर्षानी जैन धर्मामध्ये पंथभेद सुरू झाले. भ. महावीरांनी आचरण विषयक जे नियम सांगितले होते त्याप्रमाणे आचरण ठेवणे काही समुदायास पचनी पडणे अत्यंत अवघड

झाले. विशेषत: अत्यंत कडक तप करणे, काही साधकांना कठीण वाटू लागले. त्यामुळे त्यांच्यात सुरूवातीस दिगंबर व श्वेतांबर असे मुख्य पंथ निर्माण झाले. त्यानंतर अनेक उपपंथ दिगंबर व श्वेतांबर पंथांमध्ये निर्माण झाले. तथापि, त्यांच्या तत्वज्ञानात्मक दृष्टिकोणात फारसा फरक पडला नाही. त्या दोन्ही पंथातील/संप्रदायातील फरक खालीलप्रमाणे-

१) दिगंबर याचा अर्थ आकाश हेच अंबर असणे होय. अंवर म्हणजे वस्त्र. दिगंबर पंथामध्ये जे मुनि असतात ते पुर्णपणे नग्न स्वरूपात असतात. अंगावर कोणतेही वस्त्र असत नाही. पूर्ण परिग्रहाचा त्यांनी त्याग केलेला असतो. याउलट श्वेतांवर म्हणजे शुभ्र पांढरे वस्त्र परिधान करणारे असा होतो. श्वेतांबर पंथातील मुनि हे पांढरे वस्त्र धारण करतात. त्यामुळे पूर्ण बाहय परिग्रहाचा ते त्याग करू शकत नाहीत.

२) दिगंबर पंथामध्ये कडक व्रताचरण व उग्र तपस्या करण्यावर भर दिला जातो. दिगंबर जैन मुनिंना दिवसातून एकदाच आणि तेही स्वत:च्या (दोन्ही तळहातावर दोन्ही तळहात जोडून, त्याचा भिक्षापात्रासारखा वापर करून) श्रावकांनी दिलेला आहार घ्यावा लागतो. पिंडशुध्दीचे नियम पाळावे लागतात. श्वेतांबर मुनी व माताजी यांना भिक्षापात्र ठेवता येते. हातात काठी घेउन चालता येते. त्यामुळे व्रताचरणात शिथिलता येते. त्यामुळे तपस्येची उग्रता सुध्दा कमी होते.

३) आगम ग्रंथात फारसा फरक नाही. तत्वज्ञानात फरक नाही.

४) स्त्रीला स्त्रीजन्मातून थेट मोक्ष मिळत नाही. तिला मोक्ष मिळविण्यासाठी स्त्री जन्माचा छेद करून पुरूष जन्म घ्यावा लागतो, असे दिगंबर जैनांचे मत आहे. मात्र श्वेतांबर जैनांच्या मते स्त्री-जन्मातून थेट मोक्षास जाता येते.

५) एकोणीसावे तीर्थकर भ. मल्लिनाथ हे पुरूष होते असे दिगंबर जैन मानतात तर ते स्त्री होते असे श्वेतांबर जैन मानतात.

### २.२.२ अहिंसातत्व:

अहिंसारूपी प्रचंड व्यापक अशा खडकावर जैन तत्त्वज्ञान उभे आहे. 'अहिंसा परमो धर्म': असे जैन लोक म्हणतात. या विश्वातील सर्वांचा, यच्चयावत जीवांचा कल्याण करणारा परम पवित्र धर्म, उच्च कोटीचा धर्म म्हणजे अहिंसा होय. जैन धर्माच्या दृष्टिकोणातून विचार केला तर अहिंसा हा जैनांचा प्राण आहे. आणि तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून विचार केला तर अनेकांतवाद हा जैन तत्तवज्ञानाचा पाया आहे. जैन सद्वस्तूशास्त्राचा पाया हा अनेकांतवाद आहे. त्यामुळे सूक्ष्म विचार केला तर अहिंसा आणि अनेकांतवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कारण अनेकांतवादातून अहिंसा धर्माचे पालन होते. विचारशुध्दी होते. त्यातून मानसिक स्तरावरील हिंसा टळते. धर्मा-धर्मात- विचारात सहिष्णुता निर्माण होते. त्यामुळे कठोर शब्द बोलणे, वादविवाद कमी होतो. त्यायोगे होणारी हिंसा टळते. तसे पाहिले तर अहिंसा या मूलभूत प्रेरणेतूनच अनेकांतवादाचा जन्म होतो.

जैन दर्शनानुसार सम्यग्दर्शन, सम्यक्ज्ञान व सम्यक्चारित्र या रत्नत्रयातून मोक्षमार्ग बनतो. या रत्नत्रयांपैकी सम्यक्चारित्राचा संबंध हा अहिंसेशी येतो. सम्यक्चारित्राचे पालन श्रावक-श्राविका, मुनि-आर्थिका याना करावे लागते. श्रावकांच्या आचारधर्मात पाच अणुव्रते, तीन गुणव्रते, चार शिक्षाव्रते यांचा समावेश होतो. मुनिंच्या आचारधर्मात पाच महाव्रते, पाच समिती व तीन गुप्ती यांचा समावेश होतो. याशिवाय श्रावकांकरिता मद्य, मांस, मधू, शिकार करणे, रात्रीभोजन त्याग ही व्रते सुध्दा पाळावी लागतात. यामुळे अहिंसाव्रताचे पालन होते.

प्रमत्तयोगपूर्वक जीवाला दु:ख देणे, मन दुखविणे, अथवा शरीरास इजा करणे, कष्ट देणे, किंवा ठार मारणे म्हणजे हिंसा होय. आणि यापासून विरक्त होणे, प्रेमाने वागणे, गोड बोलणे, मन न दुखविणे, जितेंद्रिय, पापभीरू, दयाळू, कृतज्ञतेने आचरण करणे म्हणजे अहिंसा, हिंसा, असत्य, चोरी, कुशील (विवाहपूर्व व विवाहबाहय संबंध) परिग्रह या पंचपापापासून मन-वचन कायेने परावृत्त होणे म्हणजे व्रत होय.

जैन मताप्रमाणे त्रस व स्थावर असे जीवाचे दोन प्रकार आहेत. व्दि-इंद्रियापासून ते पंचेद्रियापर्यंतचे जीव म्हणजे त्रस जीव होत. उदा. मनुष्य, गाय, किडे, पक्षी इ. पृथ्वी, जल, अग्नि, वायू व वनस्पतीरूप जीवांना स्थावर जीव म्हणतात. ते एकेंद्रिय जीव असतात. श्रावक त्रस जीवांची हिंसा टाळू शकतात. परंतु स्थावर जीवाची हिंसा टाळणे अवघड असते. कारण त्यांना उपजिविकेसाठी शेती,व्यापार आदि कार्ये अपरिहार्यपणे करावी लागतात. तथापि विनाकारण जमीन खोदणे, डोंगर फोडणे, पाण्याचा अपव्यय करणे, विनाकारण जमीन पेटवणे, विनाकारण जंगले तोडणे, आग लावणे इ. पापरूप घटना टाळता येतात.

त्रस जीवांची हिंसा चार प्रकारची असते. संकल्पी, आरंभी, उद्योगी व विरोधी, श्रावकास संकल्पी हिंसेचा त्याग करता येतो. आरंभाशिवाय इतर कार्यामध्ये होणारी हिंसा श्रावकाने सोडली पाहिजे. म्हणजे मनोरंजनासाठी, जिभेचे चोचले पुरविण्यासाठी धर्माच्या नावावर होणारी पशुहत्या श्रावकांनी सोडली पाहिजे.

प्रमादपूर्वक द्रव्य व भावप्राणांचा वियोग करणे म्हणजे हिंसा होय. म्हणून श्रावकाने कोणत्याही जीवास दु:ख देणाऱ्या किंवा त्याचा घात करणाऱ्या सर्व प्रमादपूर्ण कृतींपासून परावृत्त झाले पाहिजे. तसेच या कृतीचे पालन कृत, कारित व अनुमोदन न देता पालन केले पाहिजे. म्हणजेच स्वत: एखाद्या जीवनाचा घात करायला नको, दुसऱ्यांकडून घात करायला लावू नये आणि जो कोणी घात करत असेल तर त्यास अनुमोदन देऊ नये.

आपल्या घरी कुत्रा, मांजर, बैल, गाय इ. पाळीव प्राणी असतील तर त्यांना वेळेवर अन्न-पाणी दिले पाहिजे. त्यांना मारू नये, पशूंचे कान-नाक टोचू नये, बैल इ. कडून त्यांच्या शक्तीपेक्षा जास्त काम करून घेउ नये. त्यांना बांधून ठेवू नये. खोटे बोलू नये, चोरी करू नये, परिग्रह मर्यादित ठेवावा. यामुळे अहिंसेचे पालन होते. थोडक्यात, पाच अणुव्रतांचे जे अतिचार आहेत ते होऊ देऊ नयेत. विरतिचारपूर्वक पंच अणुव्रतांचे पालन होणे आवश्यक आहे. त्यामुळे अहिंसेचे पालन होते.

अहिंसा हा शब्द नकारात्मक असला तरीही अहिंसा तत्व नकारात्मक नाही. अहिंसा म्हणजे प्रेम, दयाभाव, ममताभाव होय. मित्राप्रमाणे शत्रूवरही प्रेम करणे म्हणजे अहिंसा होय. जगताना शांततेने, सहानुभूतीने, समतेने, समभावाने व प्रेमळपणाने वागणे-बोलणे अहिंसेचीच रूपे आहेत.

विश्व कल्याणासाठी, समाजहितासाठी, राष्ट्रप्रगतीसाठी अहिंसेचे पालन झाले पाहिजे. त्यामुळे परस्परावरील प्रेम वाढते, शांतता लाभते, निरामय जीवन जगता येते, पिळवणूक थांबविता येते. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी अहिंसेची गरज आहे. जल व जंगल वाचविण्यासाठी अहिंसेची गरज आहे. यच्ययावत् जीवांना सुखाने, समाधानाने जगण्यासाठी, स्वत:मधील उन्मत्तपणा, रागीटपणा, कपटीपणा, तिरस्कार कमी करून आत्मौपम्य भावना वाढविण्यासाठी अहिंसेची गरज आहे. आत्मोन्नतीसाठी अहिंसा हवी. परिग्रहपरिमाणासाठी, धार्मिक तेढ-धर्मा-धर्मातील भांडणे, वैयक्ति भांडणे, नक्षलवाद आंतरदेशीय, आंतरभाषिय, आंतरराष्ट्रीय समस्या मिटविण्यासाठी अहिंसेची गरज आहे. धार्मिक सहिष्णुतेसाठी, कौटुंबिक मतभेद, हिंसा थांबविण्यासाठी अहिंसा गरजेची आहे. आंतकवाद, अराजकता, विद्रोही कारवाया इ. कमी करण्यासाठी अहिंसेची गरज आहे.

### ३.२.३ अनेकांतवाद :

अनेकान्तवाद जसा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तशाच प्रकारे सद्वस्तूशास्त्राच्या अभ्यासाचा पाया आहे. अहिंसा तत्त्वाच्या मूलभूत प्रेरणेतून अनेकांतवादाचा जन्म झाला आहे. बौध्दिक पातळीवर अहिंसा म्हणजे अनेकांतवाद होय. सर्वधर्म सहिष्णूता म्हणजे अनेकांतवाद होय. सद्वस्तूंचे ज्ञान करून घेतांना तिच्या सर्व बाजूंचा विचार करणे म्हणजे अनेकांतवाद होय. अनेकांत हा शब्द 'अनेक' व 'अंत' या दोन पदांच्या मिश्रणाने बनला आहे. आचार्य कुंदकुंद, अमृतचंद्र आचार्य, आचार्य अकलंकदेव, आचार्य माणिक्यनंदी, आचार्य धर्मभूषण, उपाध्याय यशोविजय, उपाध्याय विजयरत्नसूरी, पंडित वंशिधर, आचार्य मल्लिसेन इ. नी अनेकांतवादाविषयी मते मांडली आहेत. आचार्य अकलंकदेव यांच्यानुसार वस्तू सर्वथा सत् आहे व असत्ही आहे. नित्यही आहे व अनित्यही आहे. अशा प्रकारे सर्वथा एकांताचे निराकरण करणाऱ्या पध्दतीचे नाव अनेकांत आहे. आचार्य अभिनिव धर्मभूषण यांनी 'न्यायदिपीक' मध्ये म्हटले आहे की, ज्याचे किंवा ज्याच्यामध्ये अनेक अनेक अंत अर्थात धर्म सामान्य, विशेष पर्याय गुण प्राप्त होतात त्यास अनेकांत म्हणतात. आचार्य गुणरत्नसूरी यांच्या मते सत्, असत्, उभयरूप, नित्य, अनित्य, उभयरूप, सामान्यविशेष, उभयरूप, वाच्य, अवाच्य उभयरूप अनेकांत होय. पं. वंशीधर म्हणतात, परस्पर विरोधी दोन तत्वांचा एकत्र समन्वय म्हणजे अनेकांत होय. हेच विचार हेगेलच्या वाद-प्रतिवाद व सुसंवाद या सिध्दांतात दिसून येतात. अन्य दर्शनामध्ये वस्तूला फक्त सत् किंवा असत्, सामान्य किंवा विशेष, नित्य किंवा अनित्य, एक वा अनेक आणि भिन्न किंवा अभिन्न मानले आहे तिथे जैन दर्शनात वस्तूला सत् आणि असत्, सामान्य आणि विशेष, नित्य व अनित्य, एक आणि अनेक, तसेच भिन्न व अभिन्न स्वरूपात स्वीकारले आहे. जैन दर्शनाची ही सत् असत्, सामान्य विशेष, नित्य अनित्य, एक अनेक आणि भिन्न अभिन्नरूप वस्तूविषयक मान्यता परस्पर दोन तत्त्वांच्या एकत्र समन्वयाला सूचित करते. पं. वंशीधर असे म्हणतात की, जैन दर्शनात वस्तुला अनंतधर्मात्मक आणि अनेकांतात्मक असे उभयरूप मानले आहे. एकाच वस्तुमध्ये एकाच वेळेस अनंतधर्माचे

(गुण) अस्तित्व असणे ही वस्तुची अनंतधर्मात्मकता आहे आणि अनंतधर्मात्मक अशा त्याच वस्तूमध्ये परस्परविरोधी धर्मांचे (गुण) असणे ही त्या वस्तूची अनेकात्मकता आहे.

वस्तू 'अनंतधर्मात्मक' असते हे खरे असले तरीही आपण तशाप्रकारे वस्तूकडे पाहतोच असे नाही. त्यामुळे वाद-तंटा निर्माण होतात. म्हणून वस्तुस्वरूपसंबंधीचा आपण ग्रह'हत्ती आणि सात आंधळे' या गोष्टीतल्या प्रमाणे नेहमीच एकांगी राहणार ही जाणीव ठेवणे म्हणजे अनेकांतवाद पत्करणे होय. कितीही प्रयत्न केला तरी वस्तूचे आपणास होणारे ज्ञान व त्या वस्तूचे संपूर्ण स्वरूप यामध्ये अंतर राहणारच. कारण व्यवहारामध्ये किंवा नेहमीच्या ज्ञानात आपण वस्तूस्वरूपाचा कुठला तरी एकच अंत पकडीत असतो. आपल्या ज्ञानास मर्यादा पडतात म्हणून आपणास वस्तूस्वरूपाचे एकान्तिक ज्ञान होते. परंतु केवलज्ञान प्राप्त झालेल्या भगवंतास वस्तुस्वरूपाचे तिच्या भूत, वर्तमान व भविष्यकाळातील संपूर्ण पर्यायासह संपूर्ण ज्ञान युगपत (एकाचवेळेस) होते. त्यामुळे त्यांचे ज्ञान अनेकांतात्मक किंवा अनेकांतवादी असते.

एका व्यावहारिक उदाहरणाच्या आधारे अनेकांतवाद दृष्टिकोन खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. समजा मी एका स्त्री बद्दल बोलतो आहे की जी माझी माता आहे. अशा वेळेस ती स्त्री केवळ माझीच माता आहे. अशा दृष्टिकोन होय. जो खरा आहे परंतु पूर्ण नाही. म्हणून त्या स्त्रीचा विचार करताना ती माझ्या इतर भावंडाचीही आई आहे. माझ्या वडिलांची धर्मपत्नी आहे. माझ्या मामाची बहीण आहे. माझ्या आजी-आजोबा (वडीलांकडील) यांची सून आहे. माझे आजी-आजोबा (आईकडील) यांच्या दृष्टिने मुलगी आहे. माझ्या काकूच्या अपेक्षेने ती जाउु आहे. माझ्या अपत्यांच्या दृष्टिने ती आजी आहे. माझ्या नातवांच्या अपेक्षेने ती पणजी आहे. तिच्या व्यवसायाच्या अपेक्षेने ती गृहिणी आहे. अशा अनंतबाजूने तिच्याविषयी विचार करणे म्हणजे अनेकांतवादाच्या दृष्टिकोन बाळगणे होय.

**अनेकांताचे आधारसूत्र :**

कोणत्याही मिथ्या अभिनिवेश व आग्रहातून मुक्त होण्याचा प्रयोग म्हणजे अनेकांत होय. त्याचे खालीलप्रमाणे पाच आधारसूत्र सांगता येईल.

१) सप्रतिपक्ष  २) सहअस्तित्व  ३) स्वतंत्रता  ४) सापेक्षता  ५) समन्वय

**१) सप्रतिपक्ष :** विश्वामध्ये कोणत्याही पदार्थाचे अस्तित्व त्याच्या विरोधी तत्त्वाशिवाय असूच शकत नाही. ज्याला आस्तित्व आहे त्याला प्रतिपक्ष असतोच. 'यत् सत् तत् प्रतिपक्ष' कोणतेही अस्तित्व असे नाही की ज्यास प्रतिपक्ष नाही.

**२) सहअस्तित्व :** प्रत्येक वस्तूमध्ये अनंतविरोधी युगल आहेत ते सर्व एकत्र राहतात. जसे दोन विरोधी विचार असणारे एकत्र राहतात. त्या सर्वांनी एकत्र राहणे हेच आपल्या विश्वाचे सौंदर्य आहे. म्हणून विरोधकांना संपविण्याची भाषा करू नये.

**३) स्वतंत्रता :** विश्वातील प्रत्येक पदार्थाचे अस्तित्व स्वतंत्र आहे. कोणीही कोणाच्याही अस्तित्वामध्ये हस्तक्षेप करीत नाही. हा जैन तत्त्वज्ञानात्मक विचार आहे. म्हणून सर्व पदार्थ आपापल्या मौलिक गुणांनी वैशिष्टयपूर्ण आहेत.

**४) सापेक्षता :** आपले अस्तित्व स्वतंत्र व निरपेक्ष असले तरीही आपले व्यक्तित्व सापेक्ष आहे. जीवनाचा मूळ आधार परस्परावलंबन आहे असे अनेकांतवादाचे सूत्र आहे.

**५) समन्वय :** कोणताही विचार समग्रसत्य नसतो. तो सत्यांश असतो. माझेच खरे आहे हा विचार म्हणजे एकांगी आग्रही विचार होय. तो मनुष्याला असत्याकडे घेऊन जातो. सत्याच्या शोधाला मार्ग आहे अनाग्रह, अनाग्रही मनुष्य भिन्न विचारांमध्ये समन्वय साधू शकतो.

**नयवाद :**

अनेकान्तवाद हा एक दृष्टिकोण आहे, हा दृष्टिकोन वस्तुस्वरूपाच्या ज्ञानाच्या अपेक्षेने वापरल्यास त्यातून नयवाद निष्पन्न होतो आणि विधानाच्या अपेक्षेने वापरल्यास त्यातून स्याद्‌वाद निष्पन्न होतो. म्हणून नयवाद व स्याद्‌वाद ही अनेकांतवादाचीच दोन रूपे आहेत.

व्याख्या - स्वामी समंतभद्र म्हणतात, 'स्थाव्दादप्रविभक्तार्थ विशेषव्यंजको नय:'। म्हणजेच स्याव्दाद अर्थात श्रुतप्रमाणाव्दारे गृहीत अर्थ विशेषांचे /धर्माचे जे वेगवेगळे कथन करते त्यास नय म्हणतात.

आचार्य प्रभाचंद्र म्हणतात, प्रतिपक्षी अर्थात विरोधी धर्माचे निराकरण न करता वस्तूच्या एक अंशाला वा धर्माला ग्रहण करणाऱ्या ज्ञानाच्या अभिप्रायाला नय म्हणतात.

नय म्हणजे अंश, अंग किंवा पाहणाऱ्याचा विशिष्ट अभिप्राय (नयो ज्ञातुरभिप्राय:)

वस्तूचे ज्ञान निरनिराळया नयांनी होउु शकते. म्हणून कुठलाही एक नय स्वीकारताना इतर नय वगळावयाचे नाहीत हा विचार म्हणजे नयवाद होय.

धवला ग्रंथामध्ये 'प्रमाणपरिगृही तार्थेक देशे वस्त्वध्यवसायो नय:' अशी नयीच व्याख्या केली आहे. अर्थात प्रमाणाच्याव्दारे ग्रहण केलेल्या पदार्थाचे एक देश निश्चय करणाऱ्या ज्ञानाला नय म्हणतात.

**नयांचे भेद :**

नयाचे प्रामुख्याने द्रव्यार्थिक निश्चय पयायर्थिक व्यवहार असे दोन भेद आहेत. अभेदाला ग्रहण करणारा द्रव्यार्थिक नय तर भेदग्राही पर्यायर्थिक नय होय. यांना मूळ नय म्हणतात. वस्तूस्वरूपाला सम्यक्‌रितीने समजण्याच्या या दोन दृष्टी आहेत. मोक्षमार्गामध्ये दोन्ही नयांचे अवलंबन अनिवार्य आहे. ज्याप्रमाणे नदीचे दोन्ही किनारे एकमेकांच्या विरूध्द असूनही, नदीकरिता, नदीच्या वाहण्याकरिता अनुकूल असतात; त्याप्रमाणे निश्चय व व्यवहारनय दोन्ही परस्पर विरोधी असूनही आत्मसाधनेकरिता अवलंबनीय असतात. कोणत्या तरी एका नयाचा आश्रय करणारा मुक्ती प्राप्त करू शकत नाही.

नयांच्या सापेक्ष महत्वासंबंधी प्रा. डॉ. ए. एन. उपाध्ये म्हणतात, व्यवहारनय तोपर्यंतच लाभदायक आहे की जोपर्यंत निश्चयनयाकडे घेउुन जातो. एकटा व्यवहार अपूर्ण आहे, कधीही पूर्ण होउु शकत नाही. आचार्य समंतभद्र दोन्ही नयांचे सापेक्ष महत्व विशद करताना म्हणतात की, जे आध्यात्मिक जीवनाच्या पहिल्या पायरीवर रेंगाळत आहेत त्यांच्याकरिता व्यवहारनय उपयुक्त आहे. परंतु जे आपले लक्ष्य जाणतात आणि चैतन्य स्वरूपाचा अनुभव घेतात त्यांचेकरिता व्यवहार बिलकुल उपयोगी नाही.

वस्तुस्वरूपाचे समिचीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी नयांच्या विभागाची आवश्यकता असते. धवलकारांनी म्हटले आहे की जिनेंद्रांच्या मतामध्ये नयवादाशिवाय सूत्र व अर्थाचे प्रतिपादन होउु शकत नाही. म्हणून जे मुनी नयवादामध्ये निपूण असतात तेच खरे सिध्दांतांचे ज्ञाते होऊ शकतात. 'द्रव्यस्वभावप्रकाशनचक्र' मध्ये लिहिले आहे की जी व्यक्ती नयदृष्टीने विहीत आहे, तिला वस्तुस्वरूपाचे समग्र ज्ञान होउु शकत नाही.

वरीलप्रमाणे समस्त नयांचे मूळ आधार द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक हेच दोन नय आहेत. याचेच उत्तरभेद सात नय सांगितले आहेत. ते खालीलप्रमाणे दाखविले आहे.

**नय**

| **द्रव्य (निश्चय) नय** | **पर्याया (व्यवहार) नय** |
|---|---|
| १) नैगमनय २) संग्रहनय ३) व्यवहार नय | १) ऋजुसुत्रनय २) शब्दनय |
| | ३) समभिरूढ नय |
| | ४) एवंभूतनय |

**अ) द्रव्य नय :** कोणत्याही वस्तूच्या ठिकाणी असा नित्य अंश असतो की ज्यायोगे तीच ती वस्तू आहे असे ज्ञान होते त्यास द्रव्य नय म्हणतात.

उदा, सोने हे द्रव्य आहे. त्याला वितळून नेकलेस बनविले, नंतर नेकलेस वितळवून अंगठी बनविली, नंतर अंगठी वितळून एअररिंग बनविली तरीही त्यामधील सोनेपणा तोच राहतो. तो कधीही बदलत नाही. सोने हे द्रव्य तेच राहते. यालाच द्रव्यनय म्हणतात.

**द्रव्यनयाचे प्रकार :**

द्रव्यनयाचे १) नैगमनय २) संग्रहनय ३) व्यवहारनय असे तीन प्रकार आहेत. त्याचे स्वरूप खालीलप्रमाणे-

**१) नैगमनय :** कोणत्याही वस्तूबद्दल विचार करण्याची किंवा संकल्प करण्याची जी पध्दती असते तिला नैगमनय म्हणतात. प्रत्येक वस्तूला सामान्य (पूर्णत्व) व विशेष (अपूर्ण पर्याय) असे गुण असतात. या पध्दतीमध्ये वस्तूचे सामान्य गुण व विशेष गुण लक्षात घेतलेले असतात. म्हणजेच सामान्य गुणात व विशेष गुणात फरक केलेला नसतो. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की, अपूर्ण पर्यायांच्या ठिकाणी पूर्णत्त्वाचा संकल्प करणे यास नैगमनय म्हणतात.

वस्तूस्वरूपास अतीत (भूतकाळ), अनागत (भविष्यकाळ) व वर्तमान विकल्परूपाने साधणारा तो नैगमनय होय. म्हणजेच जे ज्ञान भूत व भविष्यकालीन पर्यायांचा वर्तमानकालीन पर्यायामध्ये संकल्प करते ते नैगमनय होय.

उदा., एक मनुष्य भाकरी करण्याची (संकल्प) सामग्री पीठ, इंधन, पाणी इ. गोळा करीत होता. अशा वेळी एकाने त्यास विचारले की, आपण काय करीत आहात? त्याने उत्तर दिले की मी भाकरी करीत आहेत. वस्तुत: त्याने उत्तर दिले त्यावेळी तो भाकरी करीत नव्हता. परंतु उत्तर देणाऱ्याचा संकल्प पीठ-पाणी इ. साधनांव्दारा भाकरी करण्याचा होता. येथे पदार्थाच्या वर्तमान-भूत-भावी पर्यायामध्ये भेद न करता एकरूप द्रव्य विवक्षित आहे. सामान्य अंश विवक्षित आहे. म्हणून तो द्रव्य नय आहे.

**२) संग्रहनय :**

जे ज्ञान आपापल्या जातीला अनुसरून पदार्थांचे किंवा त्यांच्या पर्यायांचे एकरूपाने ग्रहण करते त्यास संग्रहनय म्हणतात. थोडक्यात यामध्ये कोणत्याही वस्तूच्या सामान्य गुणांचाच विचार केलेला असतो. (एका विशिष्ट जातीत असलेल्या सर्व व्यक्तींमध्ये जे गुण समान असतात ते सामान्यगुण होत). या नयानुसार, कोणत्याही वस्तूचे विशेषगुण त्या वस्तूच्या सामान्य गुणांपेक्षा वेगळे नसतात. उदा. जर वृक्षच नसते तर आम्रवृक्ष अस्तित्वात राहिला नसता. म्हणजे आम्रवृक्षाच्या ठिकाणी असणारे विशेष गुण हे आम्रवृक्षाच्या सामान्य गुणांपासून वेगळे राहू शकत नाहीत असे संग्रहनय म्हणतो.

**३) व्यवहारनय :**

जे ज्ञान संग्रहनयाचे ग्रहण केलेल्या पदार्थाला विधीपूर्वक भेद करून जाणते ते व्यवहारनय होय. उदा. द्रव्याचे जीव-अजीव भेद करून जाणणे अथवा जीवाचे संसारी व मुक्त असे भेद करून जाणणे. पुद्गलाचे परमाणू व स्कंध असे भेद करून जाणणे. याप्रमाणे विधीवत् भेद होत जातील तेथपर्यंत भेद करता येतील. संग्रहनयाच्या अपेक्षेने हे भेदरूप असल्यामुळे यास व्यवहारनय म्हणतात. थोडक्यातस, व्यवहार नयामध्ये कोणत्याही वस्तूच्या ठिकांणी असणारे विशेषगुणच लक्षात घेतले जातात.

**ब) पर्यायनय :**

वस्तूच्या निरनिराळया अवस्थांना जैन भाषेत पर्यायनय म्हणतात. वस्तूच्या स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी तिच्या ठिकांणी असणाऱ्या विविध पर्यायनयाचा वापर केला जातो. पर्यायनयाचे ४) ऋजुसूत्रनय ५) शब्दनय ६) समभिरूढ नय व ७) एवंभूतनय असे चार प्रकार आहेत.

**४) ऋजुसूत्रनय :**

जे ज्ञान भूतभविष्यकालीन पर्यायाला सोडून (गौण करून) केवळ वर्तमानकाळात एखादी वस्तु कशी आहे याचा विचार करते त्यास ऋजुसूत्रनय म्हणतात. ऋजु म्हणजे सरळपणा आणि जो ऋजुपणाचा स्वीकार करतो तो ऋजुसूत्रनय होय. हा नय भूतकाळ व भविष्यकाळ यातील विषयांचे ग्रहण न करता

वर्तमानकाळाच्या विषयभूत पदार्थाचे ग्रहण करतो. कारण अतीताचा नाश व अनागताची उत्पत्ती नसल्यामुळे त्यात व्यवहार असत नाही. आपला संबंध फक्त वर्तमानकाळाशीच असतो; असे ऋजुसूत्रनय स्पष्ट करतो.

उदा, एखाद्याला त्याच्या पुण्यकर्मामुळे पूर्वजन्मी स्वर्गलोक मिळाला असेल परंतु ते पुण्य संपल्यामुळे या जन्मी माणूस झाला असेल तर पूर्वीच्या स्वर्गलोकी जीवनाचा त्याला वर्तमानकाळी काहीही उपयोग होणार नाही. येथे तो फक्त सद्य स्थितीत कसा आहे याचा विचार केला जातो. या अर्थाने हा नय विशिष्ट क्षणी वस्तूचे असलेले रूप लक्षात घेतो.

**५) शब्दनय :**

शब्दनयाचा दृष्टिकोन हा शब्द व त्याचे अर्थ यांच्याशी संबंधित असतो. जे ज्ञान भिन्न लिंग, भिन्न भिन्न काळ व भिन्न कारक इत्यादिकांमुळे अर्थामध्ये भेद करून जाणते, अशा शब्दास शब्दनय म्हणतात. थोडक्यात येथे भिन्न शब्द एकच वस्तू निर्देश करू शकतात. उदा, दगड, पाषाण, अश्मा हे शब्द दगड ही वस्तू दाखवितात. तसेच विद्या व ज्ञान या भिन्न लिंगी शब्दाचा अर्थ भिन्न जाणणे. येथे पर्याय मुख्यरूपाने विवाक्षित असल्यामुळे व सामान्य गौण अंश असल्यामुळे हाही पर्याय नयच आहे.

**६) समभिरूढ नय:**

एकाच वस्तूचा किंवा व्यक्तीचा निर्देश करण्यासाठी उपयोगात आणलेल्या समानार्थक शब्दांच्या सहाय्याने त्याचा निर्देश करणे म्हणजे समभिरूढ नय होय. उदा, व्दिप, हस्तिन्, करिन हे गजनिर्देश (हत्ती) शब्द आहेत. नाना अर्थाचा समभिरोह करविणारा समभिरूढ नय होय. नानार्थाला सोडून एकाच अर्थाने रूढ असतो तो समभिरूढ होय. जे ज्ञान-लिंग-वचन मध्ये भेद नसतांना सुध्दा शब्दभेदामुळे अर्थभेद करून जाणते, त्यास समभिरूढनय म्हणतात. उदा, इंद्र, शत्रू, पुरंदर हे तीनही शब्द पुल्लिंगी एकवचनी आहेत. त्यांचा अर्थ देवांचा राजा आहे. तथापि प्रत्येक शब्द हा स्वतंत्र अर्थाला सांगणारा आहे. जसे जो राज्यसभेत शोभतो तो इंद्र, जो शक्तीशाली आहे तो शत्रू जो नगराचा विध्वंस करतो तो पुरंदर याप्रमाणे शब्द-भेदामुळे हा नय अर्थभेद मानतो.

**७) एवंभूतनय :**

जे ज्ञान ज्या काळी, ज्या शब्दानुसार क्रिया होत असेल त्याकाळी, त्या शब्दाव्दारे त्या पदार्थाला जाणते त्यास एवंभूतनय म्हणतात. त्या त्या वस्तूच्या किंवा व्यक्तीच्या त्या त्या स्थितीला अनुसरून त्या त्या वस्तूला किंवा व्यक्तीला जेव्हा नाव दिले जाते तेव्हा त्या विचारपध्दतीला एवंभूतनय म्हणतात. उदा, नरसिंह हे नाव ज्यावेळी एखादा पुरूष सिंहासारखे वर्तन करीत असेल त्यावेळी देतात. गौ या शब्दाचा अर्थ हिंडणारी, फिरणारी गाय असा आहे. परंतु गाय जेव्हा स्थिर व स्वस्थ बसली असेल तेव्हा तिला गौ म्हणता येणार नाही.

**(स्याद्‌वाद सप्तभंगीनय) :**

स्याद्‌वाद म्हणजे पाहिलेल्या वस्तुस्वरूपाला अभिव्यक्त करण्याची भाषा पध्दती आहे. अनेकांत आणि स्याद्‌वाद एकाच सिध्दांताच्या दोन बाजू आहेत. पदार्थ अनेकांतात्मक (अनेक विरोधी धर्मयुगलात्मक) आहे, या संकल्पनेनेच स्याद्‌वादाच्या मान्यतेला जन्म दिला आहे. अनेकांतवादाच्या सिध्दांताचा उपदेशक म्हणजे स्याद्‌वाद. अनेकांत दर्शनाचे प्रतिपादन करणारी भाषाशैली म्हणजे स्याद्‌वाद होय. आचार्य समंतभद्रानी आपल्या, 'आत्ममीमांसा' या ग्रंथामध्ये स्याद्‌वाद शब्दाचा प्रयोग केला आहे. समंतभद्रानी स्याद्‌वादाचे लक्षण सांगताना म्हटले आहे की, सर्वथा एकांताचा त्याग करून सातभंग आणि नयाच्या अपेक्षेने, स्वभावाच्या अपेक्षेने, सत् आणि परभावाच्या अपेक्षेने, असत् इ. प्रकाराने जे कथन केले जाते ते स्याद्‌वाद होय. स्याद्‌वादाशिवाय हेय (ग्रहण न करण्यायोग) व उपादेय (ग्रहण करण्यायोग्य) यांची व्यवस्था बनू शकत नाही. अकलंकानी अनेकांतात्मक अर्थाच्या कथनाला स्याद्‌वाद म्हटले आहे. 'षड्दर्शनसमुच्चय' मध्ये म्हटले आहे की, सर्व दर्शनाना मान्य असणाऱ्या वस्तुच्या सद्‌भूत अंशाचे परस्पर सापेक्ष कथन करणे म्हणजे स्याद्‌वाद होय. मल्लिषेण यानी म्हटले आहे की, स्यात हे अनेकांताचा द्योतक आहे. म्हणून नित्य, अनित्य वगैरे अनेक धर्म असणाऱ्या एका वस्तूचे कथन म्हणजे स्याद्‌वाद होय. येथे स्यात् शब्द कथंचित अर्थाचा घोतक आहे. कथंचित, कथंचन, कोणत्यातरी अपेक्षेने, कोणत्यातरी दृष्टिकोनातून असा स्यात् शब्दाचा अर्थ आहे. आचार्य अकलंक यांच्या मतानुसार एकाच वस्तूमध्ये प्रत्यक्ष आणि अनुमान प्रमाणाच्या अविरूध्द अस्ति नास्तिची विकल्परूप सप्तभंगी जाणली पाहिजे. एकाच घटाचा (घागरीचा) गौण व मुख्य नयाच्या विवक्षेने १) स्यात्‌घट २) स्यात्‌अघट ३) स्यात् उभय घट अघट ४) स्यात् अवक्तव्य ५) स्यात् घट अवक्तव्य ६) स्यात् अघट अवक्तव्य आणि ७) स्यात् उभय अव्यक्तव्य या सात पध्दतीने निरूपण केले जाऊ शकते.

**स्याद्‌वाद सप्तभंगी : शक्यतांचे सूसूत्रीकरण :**

**१) स्यात् अस्ति :**

स्यात् अस्ति म्हणजे 'असे असू शकेल'. काही अपेक्षेने असू शकेल. 'स्यात् अस्ति' ही विधान करण्याची पहिली तऱ्हा आहे. अर्थातच जी वस्तू/सत्ता अस्तित्वात असू शकेल तिचे अस्तित्व निरूपाधिक नसते. त्याचे आस्तित्व 'स्व-द्रव्य, स्व-क्षेत्र, स्व-काल, स्व-भाव' यांच्या अपेक्षेने आहे ही अपेक्षा दाखविण्यासाठी 'घट आहे' म्हणतात त्याच्या पाठीमागे 'स्यात् लावतात. माझ्या खोलीत 'घट' आहे; असे म्हणतांना तो घट पृथ्वी (माती) या द्रव्याने बनला आहे, सुवर्णद्रव्याने नाही. या खोलीत आहे म्हणजे पलिकडच्या खोलीत नाही. तो या वेळी आहे पण १० व्या शतकाच्या संदर्भात विचार केल्यास हया घटाचे नास्तित्वच सांगावे लागते. अशा रीतीने 'स्यात् आस्ति' यास अनेक उपाधी (condition) असतात.

**२) स्यात् नास्ति : स्यात् नास्ति म्हणजे असे नसू शकेल.**

ज्या घटासंबंधी आपण 'तो आहे' (स्यात् अस्ति) म्हणतो त्यासंबंधीच पर-द्रव्य, काल, क्षेत्र आणि भव या अपेक्षेने तो नाही; असेही म्हणता येईल पण हे म्हणतानाही अपेक्षा किंवा संदर्भ आहे हे दाखविण्यासाठी 'स्यात् नास्ति' असा प्रयोग करतात. उदा, 'स्यात् अस्ति' मध्ये आपण घट मातीचा आहे

असे म्हटले आहे. तसे येथे घट धातूचा (द्रव्य) बनविलेला आहे. तो दुसऱ्या ठिकाणी आहे, तसेच तो वेगळया वेळी आहे, आणि वेगळया आकाराचा आहे या अर्थाने अस्तित्वात नाही.

**३) स्यात् आस्ति नास्ति :**

याचा अर्थ 'असे असू व नसू शकेल'. एकच वस्तू भिन्न दृष्टिने पाहिल्यास एकदा असते व एकदा नसते असे म्हणता येऊ शकेल, म्हणजे या तिसऱ्या प्रकारात ती वस्तू कशी आहे व ती कशी नाही याचाही विचार करता येतो, आणि ती दोन्ही विधाने आपापल्या परीने खरी असतात.

**४) स्यात् अवक्तव्यम :**

याचा अर्थ 'वर्णन न करण्यासारखे असेल' 'स्याद् अवक्तव्यम्' म्हणजे दोन विरोधी गुण एकाच वस्तूच्या ठिकाणी असतात. म्हणून त्या वस्तूचे नेमके स्वरूप कसे आहे हे ठरविणे अशकय बनते. उदा, पृथ्वी. ही म्हटले तर स्थिर आहे आणि म्हटले तर स्थिर नाही. म्हणून ती नेमकी कशी आहे हे सांगता येत नाही. या अर्थाने ती अवर्णनीय (अवक्तव्यम्) आहे.

**५) स्यात् आस्ति अवक्तव्यम् :**

याचा अर्थ वस्तू ही 'असू शकेल पण वर्णन करण्यासारखे नसू शकेल'. म्हणजे पृथ्वी आहे, स्थिर आहे आणि तरीही तिचे नेमके स्वरूप कसे आहे ते सांगणे कठीण आहे. ते समजण्यासारखे नाही.

**६) स्यात् नास्ति अवक्तव्यम् :**

याचा अर्थ 'असे नसू शकेल व वर्णन करण्यासारखे नसू शकेल' म्हणजे एखादी वस्तू अशी नाही आणि त्याच बरोबर ती अवर्णनीय आहे. उदा, पृथ्वी फिरत नाही असे दिसते, पण त्याचबरोबर तिचे स्वरूप अव्यक्तही आहे.

**७) स्यात् आस्ति नास्ति अवक्तव्यम् :**

याचा अर्थ 'एखादी वस्तू अशी आहे, अशी नाही; आणि तरीही ती अवर्णनीय आहे, म्हणजे पृथ्वी एका अर्थाने स्थिर आहे, एका अर्थाने फिरत आहे आणि तरीही तिचे खरे स्वरूप आकलनीय नाही म्हणून ते अवक्तव्यम् (अवर्णनीय) आहे, असा त्याचा अर्थ आहे.

वरीलप्रमाणे ज्ञान मिळविण्याचा भिन्न-भिन्न सात बाजू आहेत. त्याव्दारे वस्तूची संपूर्ण कल्पना येते. तसेच वरील नयवाद व स्यात्वाद या आधारे जैनांनी अनेकांतवाद मांडला आहे.

**अनेकांतवादाचे महत्व :**

१) दहशतवादाचे निर्मूलन, वैचारिक प्रदूषण कमी करणे, भ्रष्टप्रकृतीचे निराकरण करणे, कौटुंबिक संघर्ष व कलह कमी करण्यासाठी अनेकांतवादाची आवश्यकता आहे.

२) हट्टाग्रह, आग्रही, दुटप्पी मत कमी होऊन आदर व अनाग्रही वृत्ती वाढत जाण्यास अनेकांतवादाची मदत होते.

३) अनेकांतवादाच्या अभ्यासाने परमत सहिष्णुता, धार्मिक सहिष्णुता वाढीस लागते. त्यामुळे धर्मा-धर्मातील व्देष, तिरस्कार, वाद कमी होण्यास मदत होते.

४) अनेकांतवाद धार्मिक व आध्यात्मिक जीवनाला स्पर्श करतो. त्यामुळे आध्यात्मिक उन्नतीची पातळी वाढून मोक्षमार्गाकडे वाटचाल करणे सोपे होते.

५) अनेकांतवादामुळे मनाची व विचारांची शुध्दता होते. मन स्वच्छ होते.

६) जगाला विनाशाच्या खाईत घेउन जाणाऱ्या दहशतवादी राष्ट्रांचा वर्चस्ववाद, युध्दे, जातीय दंगली, सीमावाद, पर्यावरण, धर्मांधता या सर्व समस्यांचे निराकरण करता येते.

७) मानसिक शांती प्राप्त करण्यासाठी, सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी अनेकांतवादाची गरज आहे.

८) वैचारिक सहिष्णुता निर्माण करण्यासाठी, लोकशाहीची मूल्ये समृध्द करण्यासाठी, धर्मनिरपेक्षतेसाठी, समता, स्वातंष्य, बंधुता व न्याय ही सामाजिक मूल्ये रूजविण्यासाठी अनेकांतवादाची गरज आहे.

९) सामाजिक जीवन, राजकीय जीवन, आर्थिक जीवन सुधारण्यासाठी अनेकांतवादाची गरज आहे.

१०) सामाजिक सहआस्तित्वासाठी व विविध विचारांचे समन्वय करून वाद मिटविण्यासाठी अनेकांतवादाची गरज आहे.

११) देशांतर्गत शांततेसाठी व जगाच्या सुरक्षिततेसाठी, राष्ट्राराष्ट्रमधील शीतयुध्दे व अंतर्गत बंडाळी, अराजकता, धर्माधर्मातील तेढ, इ.चे निराकरण अनेकांतवाद करू शकतो.

१२) परस्परांमये सद्‌भावना, साहचर्य व मैत्री अनेकांतवादाने होउु शकते.

### ३.२.४ वस्तुमीमांसा (मेटॅफिजिक्स) :

जैनांच्या मते ब्रहमांड/विश्व, किंवा जग हे सहा प्रकारच्या द्रव्यानी बनले आहे. ती द्रव्ये सहा असून त्यात घट किंवा वाढ होत नाही. ती द्रव्ये सत् असतात. सत् म्हणजे अस्तित्वात असणे. त्यांची सत्ता असणे होय. जी द्रव्ये असतात त्यांना सद्‌वस्तू असेही म्हणतात. सत्‌ची व्याख्या'उत्पादव्ययध्रौव्ययुक्तं सत्' अशी उमास्वामीनी दिली आहे, सद्‌वस्तू/सत् उत्पन्न होते, तिचा विनाशही होतो. परंतु हे सर्व घडत असतांना ज्याच्या आधाराने ते घडते असा धृव अंशही असतो. जैनांना सद्‌वस्तू एकमेव आहे हे मान्य नाही. त्यांच्या मते सद्‌वस्तू अनेक आहेत.

'गुणपर्यायवद्द्रव्यम' अशी द्रव्याची व्याख्या आहे. जे द्रव्याच्या सर्व भागात (प्रदेशात) व सर्व अवस्थात (पर्यायात) राहते त्यास गुण म्हणतात. जे द्रव्याबरोबर सहभागी असते त्यास गुण म्हणतात. गुण द्रव्यापासून भिन्न असत नाही. कारण गुणापासून भिन्न असे द्रव्याचे अस्तित्व नाही. तसेच द्रव्यापासून भिन्न

असे गुणाचे अस्तित्व नाही. त्यांचे प्रदेशही भिन्न भिन्न नाहीत. त्या दोन्हीमध्ये एकच द्रव्यपणा व एकच क्षेत्रपणा आहे. त्यांच्यात काळपणासुध्दा एकच आहे. थोडक्यात गुणांच्या समुहाला द्रव्य म्हणतात. मिरचीचा तिखटपणा काढून घेतला तर मिरची उरत नाही त्याप्रमाणे द्रव्यापासून त्याचा गुण काढून घेतला तर द्रव्य नावाची गोष्ट शिल्लक उरत नाही. पर्याय मात्र येउन जाउन असतात. सत् किंवा सद्‌वस्तू ही नित्य असूनही बदलणारी असते. असा अनेकान्तपक्ष जैनांनी स्वीकारला आहे. तसेच सद्‌वस्तू एक नसून सहा आहेत हा अनेकतत्ववादी व अनेकांतवादी दृष्टिकोन जैनांनी स्वीकारला आहे.

थोडक्यात जे तिन्ही काळामध्ये उत्पाद, व्यय व ध्रौव्यरूपाने अस्तित्वात असते त्यास द्रव्य म्हणतात. जो गुणपर्याय स्वभावी आहे त्यास द्रव्य म्हणतात. गुणांपासून द्रव्य वेगळे असू शकत नाही. याउलट जे गुण येउन-जाऊन असतात, बदलतात, प्रत्येक क्षणाला बदलतात त्यास पर्याय म्हणतात. गुणांमुळे द्रव्यातील ध्रौव्यत्व टिकून राहते आणि पर्यायांमुळे उत्पाद व व्यय होतात. जर द्रव्यामध्ये गुण व पर्याय नसते तर उत्पाद, व्यय व ध्रौव्य या गोष्टी शक्य झाल्या नसत्या.

द्रव्य, गुण व पर्याय यामध्ये कोणताही भेद नाही. गुण व पर्यायांपासून द्रव्य भिन्न नाही आणि द्रव्यापासून गुण व पर्याय भिन्न नाहीत. म्हणून गुण व पर्यायापासून द्रव्याला अभिन्न मानले आहे.

हे विश्व द्रव्यांनी बनले आहे. विश्व याचा अर्थ तीन लोक (अधोलोक, मध्यलोक व उर्ध्वलोक) असा घ्यावयाचा आहे. त्या द्रव्यांची एकूण संख्या सहा आहे. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काळ ही सहा द्रव्ये होत. यापैकी जीव द्रव्य अनंत आहेत, पुद्गल द्रव्य जीवांपेक्षाही अनंत आहेत. काल द्रव्य असंख्यात आहे. बाकीची तीन द्रव्ये एक-एक आहेत. या प्रत्येक द्रव्यांचा स्वभाव वेगवेगळा आहे. ते आपल्या स्वभावाला कधीही सोडत नाही. या द्रव्यांचा निर्माता कोणीही नाही. ते स्वत:सिध्द आहेत. त्यांची सिध्दता देण्यासाठी इतर कोणत्याही गोष्टीची गरज नाही. ही द्रव्ये अनादीअनंत आहेत. लोकाकाशाच्या पूर्ण भागात ही द्रव्य व्यापलेली आहेत. किंबहुना या सहा द्रव्यांपासूनच त्रिलोक बनले आहे. आकाश द्रव्यापासून अलोक बनले आहे. व्यवहारनयाने विचार केला तरीही सर्व द्रव्ये कारणरूप आहेत व लोक (विश्व) त्याचे कार्य आहे. निश्चयनयाने विचार केला तर कोणतेही द्रव्य कोणाचेही कारण नाही आणि त्याचे कोणतेही कार्य नाही. अनादिकाळापासून हे असेच चालत आले आहे.

**सहा द्रव्ये :**

जैनांनी जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल ही सहा द्रव्ये मानली आहेत. त्यांचे मुख्य वर्गीकरण जीव व अजीव या दोन द्रव्यात केले जाते. पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल ही अजीव द्रव्ये होत. या सहा द्रव्यांनी विश्व बनले आहे. किंवा या विश्वाचे हे सर्व घटक आहेत. किंवा लोकाकाशाचा संपूर्ण भाग या सहा द्रव्यांनी भरला आहे. याला वस्तुमीमांसा असे म्हणतात. त्यांचे थोडक्यात स्वरूप खालीलप्रमाणे-

जीवद्रव्य: ज्ञान व चेतना ज्यास आहे तो जीव, 'जीवति, अजीवीत, जीविष्यति स:जीव:।' जो (वर्तमानात) जगतो, जो (भूतकाळात) जगला आणि (भविष्यात) जगेल तो जीव होय. दहा प्राणांपैकी

यथायोग्य प्राणांना धारण करून त्रैकालिक जीवनाचे अनुभव करतो तो जीव होय. पाच इंद्रिये, मन, वचन, काय, श्वासोच्छवास व आयू हे दहा प्राण आहेत. जीवाचे प्रामुख्याने मुक्त व संसारी असे दोन प्रकार आहेत. संसारी जीवांचे पुनश्च त्रस व स्थावर असे दोन प्रकार पडतात. एकेंद्रिय जीवांना स्यावर म्हणतात. दोन व दोनपेक्षा अधिक इंद्रिय असणाऱ्या जीवांना त्रस म्हणतात. त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे-

**१) एकेंद्रिय जीव :** ज्यांना पाच इंद्रियापैकी फक्त स्पर्शनेंद्रिय असते आणि आयू, श्वासोच्छवास व काय (शरीर) हे तीन प्राण, असे एकूण चार प्राण असतात त्यांना एकेंद्रिय जीव म्हणतात. त्यांचे पृथ्वी, जल, अग्नि, वायू व वनस्पतीकायिक असे पाच प्रकार पडतात. ज्यांना फक्त एक इंद्रिय असते (स्पर्श) त्यास एकेंद्रिय म्हणतात.

**२) व्दीन्द्रिय जीव :** ज्यांना आयू, श्वासोच्छवास, काय, स्पर्शनेंद्रिय, रसनेंद्रिय व वचन असे सहा प्राण असतात त्यांना व्दिन्द्रिय जीव म्हणतात. उदा. अळी, गांडूळ इ. यांना फक्त रसना व स्पर्श अशी दोनच इंद्रिये असतात.

**३) त्रीन्द्रिय जीव :** ज्यांना आयू, श्वासोच्छवास, काय, स्पर्शनेंद्रिय, वचन, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रिय असे सात प्राण असतात त्यांना त्रीन्द्रिय जीव म्हणतात. उदा. मुंगी, ढेकूण इ. यांना फक्त रसना, स्पर्श, घ्राण अशी तीन इंद्रिये असतात.

**४) चतुर्रिंद्रिय :** ज्यांना आयू, श्वासोच्छवास, काय, वचन, स्पर्शनेंद्रिंय, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रियव चक्षुरिंद्रिय असे आठ प्राण असतात त्यांना चतुरिंद्रिय जीव म्हणतात. यांना स्पर्श, रसना, घ्राण व चक्षू अशी चार इंद्रिये असतात. उदा. भूंगा, डास इ.

**५) असंज्ञी/विमनस्क पंचेंद्रिय जीव :** ज्यांना आयु, श्वासोच्छवास, काय, वचन, स्पर्शनेंद्रिय, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रिय, चक्षुरिंद्रिय व कर्णेद्रिय असे नउ प्राण असतात त्यांना असंज्ञी/विमनस्क पंचेद्रिय जीव म्हणतात. उदा. कबुतर, गाय, घोडा इ. यांना स्पर्श, रसना, घ्राण, चक्षू व श्रवण अशी पाच इंद्रिये असतात.

**६) संज्ञी समनस्क पंचेंद्रिय जीव :** ज्यांना आयू, श्वासोच्छवास, काय, वचन, स्पर्शनेंद्रिय, रसनेंद्रिय, घ्राणेंद्रिय, चक्षुरिंद्रिय, कर्णेद्रिय व मन असे दहा प्राण असतात. त्यांना संज्ञी किंवा समनस्क पंचेंद्रिय जीव म्हणतात. उदा. मनुष्य इ. यांना पाच इंद्रिये व सहावे मन हे इेंद्रिय असते. अशा प्रकारे संसारी जीवाला कमीत कमी चार व जास्तीत जास्त दहा प्राण असतात.

**मुक्त जीवांचे दोन प्रकार होतात**

अ) सिद्ध जीव-संसारी जीवांविषयी उदासीन असतात.

ब) अर्हत जीव-संसारी जीवांना मार्गदर्शन करणारे अर्हत किंवा तीर्थंकर होत.

## अजीव द्रव्ये :

जे चेतना व ज्ञानरहित आहेत ती अजीव द्रव्ये होत. त्यांचे खालीलप्रमाणे पाच प्रकार आहेत.

**१) पुद्गल द्रव्य :**

ज्या लहान-मोठया संघातांनी जगातले विविध पदार्थ बनले आहेत त्या अणूंना पुद्गल म्हणतात. 'पूर्यन्ते च गलयन्तिच' अशी त्या शब्दाची उत्पत्ती आहे. पुद्गल द्रव्यास आकार असतो. तसेच ते द्रव्य स्पर्श, रस, गंध व वर्ण या गुणांनी सहित असते. (स्पर्शरसगंधवर्णवंत पुद्गला:) पुद्गलास जड म्हणतात.

**२) धर्मद्रव्य व अधर्मद्रव्य :**

ही दोन्ही द्रव्ये क्रियाहीन व अमूर्त आहेत. त्यांचे साक्षात ज्ञान फक्त केवली आणि मुक्त जीवानाच होते. ही द्रव्ये लोकाकाश भरून टाकतात, लोकाकाशाच्या पलिकडे अलोकाकाश आहे. तेथे धर्मद्रव्यही नाही आणि अधर्मद्रव्यही नाही. नुसती पोकळी आहे.

धर्मद्रव्य स्वत: उदासीन असून ते गतीस उपकारी आहे. निमित्त आहे. म्हणजेच त गतीस स्वत:प्रेरणा देत नाही. उदा. पाण्यामुळे माशांना इकडे-तिकडे फिरणे शक्य होते. पाणी स्वत: माशांना ढकलत नाही. पुद्गला स्कंधाच्या व जीवांच्या गती धर्मद्रव्यामुळे शक्य होतात. परंतु धर्मद्रव्यामुळे त्यांच्यात गती निर्माण होत नाही.

ज्याप्रमाणे धर्मद्रव्य गतीचे उदासीन कारण आहे, त्याचप्रमाणे अधर्मद्रव्य स्थिरतेचे उदासीन कारण आहे. वृक्षांची छाया पांथस्थाला वळेच रोखून धरत नाही. तरीही दमलेला पांथस्थ वृक्षाच्या छायेमुळे विश्रांतीसाठी थांबतो. अधर्मद्रव्याचे कार्य याच तऱ्हेने चालते.

**३) आकाश :**

आकाश हे चौथे अजीव द्रव्य आहे. ते प्रदेशांचे बनले आहे. एका पुद्गल परमाणुमुळे जेवढा अडथळा निर्माण होतो. तेवढयास एक प्रदेश म्हणतात. इतर द्रव्यांना अवकाश करून देणे, त्यांच्या अवगाहनास सहाय्यभूत होणे हे आकाशाचे कार्य असल्याने त्याचे लोकाकाश व अलोकाकाश असे दोन भाग मानले आहेत. अलोकाकाशात काहीच नाही. ती केवळ पोकळी आहे. त्यात धर्म व अधर्म द्रव्य नसल्याने त्यात पदार्थाच्या गतीची आणि स्थितीची शक्यताच नाही.

जीव, पुद्गल, धर्म, अधर्म व आकाश ही पाच द्रव्य अस्तिकाय आहेत. त्यांना पंचास्तिकाय म्हणतात. अस्तिकाय म्हणजे जे अस्तित्वात आहे व शरीराप्रमाणे जे अनेक प्रदेशात राहते ते असा आहे.

**४) काल :**

काल हे सहावे द्रव्य असून ते अस्तिकाय नाही. कारण त्याचे अणू एकमेकांना चिकटून त्यांचा शरीराप्रमाणे अनेक प्रदेशात राहणारा संघात बनत नाही. रत्नराशीतील प्रत्येक रत्नाप्रमाणे कालाचे अणू एकमेकांपासून विलग राहतात. कालद्रव्यामुळेच पदार्थात बदल अथवा विकार घडून येतात. पदार्थ परिणाम पावतात. पदार्थ परिणाम पावून गुणात फरक पडत असला तरी तोच हा पदार्थ अशी प्रत्यभिज्ञा येते तीही

कालद्रव्यामुळेच. दिवस, रात्र, महिना असा खंडरूपाने जो काल आपल्या प्रत्ययास येतो त्याचे समय हे पर्याय होत.

### ३.२.५ जैन तत्वज्ञानाची वैशिष्टये :

#### १) निवृत्तीवाद व प्रवृत्तीवाद यांचा सुंदर संगम :

जैन तत्वज्ञान निवृत्तीवादी आहे. संन्यासमार्गी आहे. केवळ निजरूपाचा अभ्यास करून मोक्ष मिळविण्यासाठी धडपडणारे आहे. त्याचा समाजाशी, सामाजिक बांधीलकीशी, देशसंरक्षण, देशप्रगती, तांत्रिक प्रगती इ. गोष्टींशी काहीही संबंध नाही. त्यामुळे जैन लोकांमधून सैनिक तयार होत नाहीत, देशासाठी बलिदान देत नाहीत, संसाराकडे पाठ फिरवितात अशी टीका केली जाते. परंतू ही टीका निराधार आहे. जैनांच्या निवृत्तीवादामध्ये कडक आचरणाचा समावेश होतो. त्यांचा आचारधर्म जितका व्यक्तिगत आत्मोन्नतीचा तितकाच सामाजिकही आहे. जैनांची अहिंसा देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मदत करू शकत नाही अशीही टीका केली जाते. पण हे खरे नाही. अणुव्रते व महाव्रते यांचा विचार केला, हिंसेच्या प्रकारांचा सूक्ष्म विचार केला तर असे दिसून येते की, श्रावकांना आपला जीवनचरितार्थ चालविण्यासाठी आरंभी, उद्योगी व विरोधी हिंसा काही प्रमाणात मान्य आहेत. फक्त संकल्पी हिंसा मान्य नाही. त्यामुळे व्यापार-उद्योग करून स्वत:बरोबर देशाची प्रगती करणे, मिलिटरीमध्ये जाउुन देशरक्षण करणे, देशाला स्वातंष्य मिळवून देण्यासाठी हौतात्म्य पत्करणे, फाशीचा हसत हसत स्वीकार करणे, उत्तम शेती करून इतरांना मार्गदर्शन करणे, शाळा-कॉलेजस व धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्थाची-गुरूकुलांची स्थापना करून समाजाचा विकास साधण्यास जैन धर्म कुठेही मागे राहिलेला नाही. हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. मग जैन धर्म केवळ निवृत्तीवादी कसा?.

जैन तत्वज्ञानातील महाव्रतांचा विचार केला तर जैन मुनींना पाळावी लागणारी कठोर व्रते, सोसावी लागणारी २२ प्रकारचे परिषह, चार प्रकारच्या कषायांना, नऊ प्रकारच्या नो-कषायांना जिंकणे, तीन प्रकारच्या गारवांना व चार प्रकारच्या संज्ञांना जिंकणे, समाज जागृतीसाठी प्रवचन करणे, धर्मप्रभावना करणे इ. गोष्टी पुरूषार्थ गाजविण्याच्या व समाजहिताच्या नाहीत का? जैन मुनी अविरतपणे विहार करतात, धर्मोपदेश देतात. युवकांना, संसारी लोकांना चांगल्या विचारात-आचारात स्थिर करतात हे समाजकार्य नाही का? त्यामुळे जैन तत्वज्ञान केवळ निवृत्तीवादी आहे असे म्हणजे निराधार ठरते.

#### २) अनेकांतवाद :

अनेकांतवाद ही जैनांनी जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. अहिंसा जैनांचा प्राण आहे त्याच्या रक्षणासाठी अनेकांतवादाचा जन्म झाला. विश्वाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन म्हणजे अनेकांतवाद. सर्व विचारांमध्ये तत्त्वांमध्ये सूसुत्रता आणण्याची दृष्टि अनेकांतवादामध्ये आहे. नयवाद व स्याद्वाद ही अनेकांतवादाचीच रूपे आहेत. अनेकांतवादाच्या अभ्यासाने धार्मिक सहिष्णुता, बौध्दिक सहिष्णुता वाढते. 'माझे तेवढेच खरे' हा विचार गळून पडतो. अराजकता, हिंसाचार, एकांगी विचार, एकतत्ववाद यावर अनेकांतवाद हा उपाय आहे, कौटुंबिक कलहापासून ते वैश्विक कलहापर्यंतच्या समस्यांचे निराकरण

अनेकांतवादात आहे. अनेकांतवादाच्या अभ्यासाने बुध्दीची मशागत होते. मन प्रसन्न होते. सहअस्तित्व, सामोपचाराने व दुसऱ्याचे विचार व त्याचे महत्व समजावून घेउुन जगण्याची एक कला म्हणजे अनेकांतवाद होय. इतकी महान व सर्वसमावेशक दृष्टी कोणीही दिली नाही.

**३) स्वतंत्रता :**

केवळ चार शब्दामध्येच जैन धर्माची/तत्वज्ञानाची वैशिष्टये सांगावयाची झाली तर अहिंसा, अपरिग्रह, अनेकांतवाद व स्वतंत्रता या चार शब्दात सांगता येईल. जर एकाच शब्दात जैन धर्माचे व्यवच्छेदक लक्षण (वैशिष्टय) सांगा असे कुणी म्हंटले तर त्याचे उत्तर स्वतंत्रता (व्यक्ती स्वातंष्य) असे देता येईल . तत्वज्ञानाची अशी एक प्रणाली की जी सर्व जीव स्वतंत्र आहेत, सर्व जीव परस्परांपासून भिन्न आहेत असे मानते ते म्हणजे जैन तत्वज्ञान होय. सर्व जीवात्मे भिन्न असतात हे जैन धर्माचे व्यवच्छेदक लक्षण आहे. हा व्यक्तिस्वातंष्याचा उद्घोष जैन तत्वज्ञानात सापडतो. विश्वात्म्याची संकल्पना जैन धर्मात नाही. जीव मुक्त झाले तरीही त्यांचा समावेश विश्वात्म्यामध्ये होत नाही. त्यांचे अस्तित्व स्वतंत्रच राहते.

**४) निरिश्वरवाद :**

ईश्वरवादी नैयायिक इ. म्हणतात की, हे जग एक कार्य आहे. या कार्याला काहीतरी कारण पाहिजे. ते कारण म्हणजे ईश्वर होय. परंतु जैनांचा दृष्टिकोन असा ईश्वरवादी नाही. कारण जैनांचा मते हे जग ईश्वराने निर्माण केले नाही. कोणत्याही देवाच्या आज्ञेनुसार हे जग चालत नाही, त्यात बदल होत नाहीत. देव असेलच तर तो काहीही मागत नाही. काहीही देत नाही. नवसाला पावत नाही. व्यक्तीला स्वत:चा पुरूषार्थ स्वत:च गाजवावा लागतो. त्यात ईश्वराची मदत होत नाही.

**५) अहिंसा :**

'अहिंसा परमो धर्म:।।' म्हणतात. सर्व धर्माना अहिंसा थोडया फार प्रमाणात मान्य आहे. परंतु अहिंसा हा जैन धर्माचा प्राण आहे. जैन तत्वज्ञानाची पायाभरणी भक्कम अशा अहिंसा तत्वावरच झालेली आहे. अहिंसा तत्व वगळल्यास जैन तत्वज्ञानाची ओळख मिटते. म्हणून जैन तत्वज्ञान म्हणजे अहिंसा व अहिंसा म्हणजे जैन तत्वज्ञान असा त्यांचा अविनाभावी संबंध आहे. अहिंसा शब्द नकारात्म असला तरी त्याचे सर्व कार्य सकारात्मक आहे. जसे हिंसा करू नका म्हणजेच अहिंसेचे पालन करा. प्राणीमात्रांवर दया करा. त्यांना वेळेवर पाणी द्या, अन्न द्या, त्यांना मारू नका, त्यांची हत्या करू नका, मन, वचन व कायेने त्यांच्यावर, अखिल जीवजातीवर प्रेम करा असे सांगणारा व स्व-कृत व कारित हिंसेत सहभाग न देणारा विचार म्हणजे अहिंसा. आत्मौपम्य दृष्टिचा विकास अहिंसेमुळे होतो. आंतरराष्ट्रीय कलह, युध्दे अहिंसेने मिटू शकतात. कौटुंबिक समस्या, अराजकता, बंडाळी, मोर्चे, निदर्शने यावर अहिंसा हा उपाय आहे. आध्यात्मिक, सामाजिक, वैश्विक प्रगतीचा उपाय अहिंसा आहे. अहिंसेच्या पालनासाठी अनेकांतवादाची मांडणी व त्यातूनच निर्माण होणारे नयवाद व स्याद्वाद यातून वैचारिक व बौध्दिक सहिष्णुता वाढते. आध्यात्मिक, बौध्दिक दादागिरी कमी होते. दुसऱ्याचे मत जाणून घेउुन त्याचा आदर करण्याची प्रेरणा अहिंसेमुळेच मिळते. अहिंसेनेच भारताला स्वातंत्र्यही मिळाले आहे.

**६) कमीसिध्दांत :**

जैन दर्शनाचा सखोल विचार केला तर आपली उन्नती होणे, गरीबी येणे, नोकरी मिळणे, नोकरी जाणे इ. गोष्टीसाठी देव अथवा दैव यांना कारणीभूत मानले नाही. नियतीवाद अथवा नशीबवादही मानला नाही. त्यासाठी कर्मसिध्दांत स्विकारला वरील सर्व गोष्टी केलेल्या चांगल्या -वाईट कर्माची फळे म्हणून मिळतात. असे जैनांचे मत आहे.

## ३.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) 'जिन' म्हणजे काय?

२) जैन धर्मानुसार कालचक्राचे प्रमुख प्रकार कोणते आहेत?

३) दिगंबर संप्रदायातील पहिला लिखित स्वरूपातील ग्रंथाचे नाव काय?

४) नयाची व्याख्या द्या

५) स्याद्‌वादाची व्याख्या द्या

ब) योग्य पर्याय निवडा.

१) पंचेद्रियजीवाचे ............. प्रकार पडतात.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

२) ............ म्हणजे अहिंसातत्वाचा विस्तार होय.

अ) कर्मसिध्दांत ब) नीतिशास्त क) स्याद्‌वद ड) अनेकांतवाद

३) द्रव्यनयाचे प्रमुख प्रकार .............. आहेत.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

४) जैन दर्शनाचे मते वस्तूस्वरूप ............असते.

अ) साधे ब) अनंतधर्मात्मक क) सुंदर ड) नयात्मक

५) अंगप्रविष्ठामध्ये ............. ग्रंथाचा समावेश होतो.

अ) १० ब) ११ क) १२ ड) १४

## ३.४ पारिभाषिक शब्दांचे अर्थ :

१) **अवसर्पिणी :** ज्या कालचक्रामध्ये (षट्कालपरिवर्तन) मनुष्य व तिर्यंच प्राणी यांचे आयुष्य, शरीराची उंची, वैभव कमी-कमी होत जातात तो कालचक्र.

२) **उत्सर्पिणी :** ज्या कालचक्रामध्ये मनुष्य व तिर्यंच प्राणी यांचे आयुष्य, शरीराची उंची, वैभव इ. वाढत-वाढत जातात ते कालचक्र

३) **पूर्वश्रुत/पूर्व :** भ. महावीर पूर्वकालीन अनेक विचारप्रवाह व मतमतांतरांचे संकलन ज्यामध्ये ते पूर्वश्रुत होय.

४) **अंगप्रविष्ट ग्रंथ/साहित्य :** ज्या आगम साहित्याच्या विभागणीत आचारांग, सूत्रकृतांग, स्थानांग इ. १२ अर्धमागधी ग्रंथाचा समावेश होतो, त्यास अंगप्रविष्ट म्हणतात.

५) **प्रमाद :** जाणून बजुन, संकल्प करून, उन्मत्त होउन हिंसा करणे.

६) **सत्प्रतिपक्ष :** यत् सत् तत् प्रतिपक्षः ज्याला आस्तित्व आहे त्याला प्रतिपक्ष असतोच.

७) **आत्मौपम्य दृष्टिकोन** : जगातील यच्चयावत् प्राणीमात्राला स्वतः जसे आहोत तसे प्रेमपूर्वक, आदरपूर्वक पाहून आपण एक आहोत हा दृष्टिकोन.

८) **सत् :** उत्पादव्ययध्रौव्ययुक्तं सत्। सत् म्हणजे सत्ता; सत् हे द्रव्याचे लक्षण आहे.

९) **जैनधर्म :** तिर्थकरांनी केलेल्या धर्मोपदेशात, विचारास, मोक्षमार्गास जिनधर्म किंवा जैनधर्म म्हणतात.

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ) १) 'कर्मारातीन जयतीति जिन'। अर्थात कर्मांना जिंकणारा तो जिन्

२) अवसर्पिणी व उत्सर्पिणी

३) षट्खंडागम

४) वस्तूकडे पाहण्याचा विशिष्ट अभिप्राय/दृष्टिकोन

५) पाहिलेल्या वस्तुस्वरूपास अभिव्यक्त करण्याची भाषा

ब) १) २ २) अनेकांतवाद ३) ३ ४) अनंतधर्मात्मक ५) १२

## ३.६ सारांश :

जैन धर्मास जिनधर्म म्हणतात. तिर्थकरांनी सांगितलेला धर्म म्हणजे जैनधर्म एकूण २४ तीर्थकर चालू कालचक्रात झाले आहेत. या कालचक्रापूर्वी व पुढे येणाऱ्या कालचक्रातही २४ तीर्थकर अनादी काळापासून झालेले आहेत व पुढेही होणार आहेत. या अर्थाने जैन धर्म अनादी अनंत आहेत. भ. महावीर असोत अथवा

भ. वृषभदेव (पहिले तिर्थंकर) असोत, ते जैन धर्मप्रवर्तक आहेत. या कालचक्रातील भ. वृषभदेव हे आद्य प्रवर्तक तर भ. महावीर अंतिम प्रवर्तक आहेत. त्यामुळे जैन परंपरा खूप प्राचीन आहे. भ. महावीरानंतर जैन धर्माची पताका गौतम, सुधर्म व जंबूस्वामी या केवली भगवंताच्या खांद्यावर पडली. त्यानंतर श्रुतकेवली, दशपूर्वधर, एकादशांगधर, दश-नउ-आठ अंगघर व अखेर एक अंगघरांनी ती पताका खांदावर घेतली आणि अखेरीस एक अंगघर पुष्पदंत व भूतबळी आचार्यानी षट्खंडागम ग्रंथाची रचना लिखित स्वरूपात केली. नंतर अनेक आचार्य आतापर्यंत झालेले आहेत. जैन आगम प्रणालीचे वर्गीकरण प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग व द्रव्यानुयोग या चार अनुयोगद्वारात केले आहे.

भ. महावीरानंतर काही वर्षांनी जैन धर्मात दिगंबर व श्वेतांबर पंथ निर्माण झाले. परंतु दोन्ही पंथाचे तत्वज्ञान एक सारखे आहे. 'अहिंसा हा त्यांचा प्राण आहे' अहिंसेच्या रक्षणासाठी-विस्तारासाठी अनेकांतवादाचा जन्म झाला. आजच्या कौटुंबिक, धार्मिक, वैचारिक, बौध्दिक, वैश्विक, राजकीय, सामाजिक कलह तंटे इ. शांततेने मिटवून निरामय जीवन जगण्याची कला अनेकांतवादाने जगाला दिली आहे. स्याद्वाद व नयवाद ही अनेकांतवादाचीच रूपे आहे. जैनांच्या मते ६ द्रव्यांतून विश्व बनले आहे. या विश्वाला कोणीही निर्माण केले नाही. हे विश्व अनादी अनंत आहे. जन देव वीतरागी असतात. त्यामुळे ते काहीही मागत नाहीत, काहीही देत नाहीत, नवसाला पावत नाहीत.. या अर्थाने जैन धर्म निरीश्वरवादी आहे. स्वतंत्रता, अपरिग्रह, अहिंसा व अनेकांतवाद या चार खांबावर जैन धर्म आधारला आहे.

## ३.७ सरावासाठी प्रश्न :

१) जैनांचा अनेकांतवाद सविस्तर स्पष्ट करा.

२) अनेकांतवादाची प्रस्तुतता स्पष्ट करा

३) सहा द्रव्यांचे स्वरूप स्पष्ट करा

४) जैन धर्माची परंपरा थोडक्यात स्पष्ट करा.

५) सप्तभंगीनय स्पष्ट करा.

६) नय म्हणजे काय ते सांगून द्रव्यार्थिक (निश्यच) नयाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

७) नय म्हणजे काय ते सांगून पर्यायार्थिक (व्यवहार) नयाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

८) जैन धर्माची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

९) श्वेतांबर व दिगंबर पंथातील भेद स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) भारतीय तत्वज्ञान, श्रीनिवास दीक्षित

२) अनेकांतवाद (विचारांची सहिष्णुता) - डॉ. पाराज

३) जैन भारती - आर्थिका ज्ञानमती


❑❑❑

# घटक ४
# बौद्ध दर्शन

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

    ४.२.२ आर्य सत्यें

    ४.२.३ आर्य अष्टांगिक मार्ग- मध्यम प्रतिपद:

    ४.२.४ प्रतित्य समुत्पाद

    ४.२.५ अनात्मवाद

४.३ सारांश

४.४ प्रश्न

४.५ संदर्भ


## ४.० उद्दिष्टे :

१) बौद्ध दर्शनाचा अभ्यास करता येईल.

२) चार आर्य सत्ये समजावून घेता येतील.

३) आर्य अष्टांगिक मार्गाचा अभ्यास करता येईल.

४) पटिच्चसमुष्पाद म्हणजे काय त्याचा अभ्यास करता येईल.

५) बौद्धांचा अनात्मवाद अभ्यासता येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

ख्रिस्तपूर्व ५६३ या वर्षी गौतम बुद्धांचा जन्म झाला. एका दृढ निश्चयाने त्यांनी सर्व त्यागले. त्यांना स्वत ज्या धर्माचे दर्शन झाले होते त्याच्या संबंधी पहिले प्रवचन दिले त्यात चार आर्यसत्यांचा उपदेश त्यांनी केला आहे. दुःख, दुःखाचे कारण, दुःखाचा निरोध व दुःख निरोधाचा मार्ग ही ती चार आर्यसत्ये होती. सर्व बौद्ध संप्रदायांना सम असलेले सिद्धांत आपणास १) सर्व क्षणिकम् २) सर्व दुःखम् ३) सर्व आनात्ममू ४) सर्व स्वलक्षणम् आणि ५) निवा शान्तमू अशा प्रकारे सांगता येतील.

भगवान गौतम बुद्ध हे यज्ञयाग व कर्मकांड यांनी दुषित झालेल्या वैदिक संस्कृतीच्या व तत्त्वज्ञानाच्या विरुद्ध जरी उभे राहिले तरी त्यांची स्वतःची वाढ जुन्या वैदिक व ब्राह्मणी परंपरेतच झाली होती. सर्वसंग परित्याग करून अकांचन व अनिकेत अवस्थेत जगणाऱ्या संन्याशांचा आदर्श समोर ठेवून त्यानी आपले भिक्षु अनुयायी तयार केले स्वतः इच्छांपासून मुक्त झालेले, अनिकेत, अकांचन, अनासक्त भिक्षु, केवळ भिक्षा मागून व ती मिळाली तरच खाणारे भिक्षु, त्यांनी आपल्या संघात तयार केले, आणि ते संन्यासी संपूर्ण विश्वाविषयी मैत्री व करुणा बाळगून, सर्वांचे शुभ चिंतून आपल्या संकुचित अहंकाराला पूर्णपणे विसरून दुःखी जीवांना दिलासा देत, त्यांना लोभ व विषयभोग यांपासून दूर जाण्याचा उपदेश करीत हिंडत असत. म्हणजेच स्वतः गौतम बुद्ध हे ब्राह्मणी परंपरेतले, उपनिषदांच्या परंपरेत व वेदात वर्णिलेला एक थोर व आदर्श ऋषी व मुनी होते व जन्मभर ते एक निरिच्छ व अनिकेत संन्यासाप्रमाणे जगले त्यांचा खरा विरोध उपनिषदांनी सांगितलेल्या अनासक्त यतिधर्माला नव्हता तर देवादिकांचे बंड माजवून यज्ञयाग करून लोकांना अंधश्रद्धांच्या जाळ्यात अडकवून ठेवणाऱ्या यज्ञीय पुरोहित वर्गाला होता.

गौतम बुद्ध हे काही कोणी उपरे, बाहेरून आलेले, अभारतीय व अनार्य नव्हते. तर ते आर्य संस्कृतीत परंपरेत वाढलेले होते. त्यांचा मूळ पिंड वैदिक व औपनिषद स्वरूपाचाच होता. त्यांनी सांगितलेल्या सत्याची नावेही 'आर्यसत्य'च होती. त्यांचा अष्टांगमार्ग हे पातंजल योगाचेच एक विकसित रूप होते. भगवान बुद्ध हे भारतीय परंपरेचे व संस्कृतीचे एक शुद्ध व अविकृत रूपातील प्रतिनिधी होते असे मानणे अधिक उचित ठरेल. हातात कमंडलू घेऊन, अनवाणी पायांनी, निसर्गात अनिकेत जीवन जगणारे संन्यासी, परिव्राजक हाच आदर्श गौतम बुद्धांना प्रिय वाटत होता. भगवान बुद्ध समाजात निःस्वार्थी व अनासक्तपणे हिंडून मार्गदर्शन करीत असत.

जगाचे व विश्वाचे सत्ताशास्त्रीय स्वरूप कसेही असले तरी मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात नीति-नियमांचे व नैतिक सदाचरणाचे कार्य व महत्त्व अबाधितपणे टिकून राहून मानवी जीवनाचे दुःखापासून संरक्षण व सुटका व्हावी म्हणून बुद्ध नैतिक सदाचरणाला सर्व मतभेदांच्या वर व पलीकडे ठेवतात. बौद्धांची नीती सामाजिकतेवर भर देण्यापेक्षा व्यक्तीच्या पवित्र जगण्यावर व अंतरिक विकासावर अधिक भर देणारी आहे. बुद्ध हे फार जुन्या काळापासून चालत आलेल्या रूढी, परंपरा, ग्रंथप्रामाण्य, व श्रुतिप्रामाण्ययांना महत्त्व देत नाहीत. ते जरी आत्मा मानत नसले तरी प्रत्येकाने स्वतः सम्यक विचार करून, चिकित्सक व बुद्धिनिष्ठ बनून आत्मप्रामाण्यवादी बनले पाहिजे यावर ते भर देतात. दुर्गुणांवर सद्गुणांच्या आचरणाने मात करावयास पाहिजे. वाईटाला चांगल्याने, अशिवाला शिवाने जिंकले पाहिजे; तरच परिणाम दीर्घकाल टिकून राहतात, ज्या परिस्थितीमुळे मनुष्य स्वार्थी बनतो ती परिस्थितीच नष्ट करावयास पाहिजे व अज्ञानाचा प्रभाव नष्ट करून डोळसपणे जगाचे स्वरूप समजावून घेऊन अनात्म्याला आत्मा समजून भलत्या मोष्टीशी मनाने एकरूप होऊन दुःख ओढवून घेऊ नये. अशी बुद्धांची शिकवण दिसून येते.

### ४.२.२ चार आर्य सत्य:

बौद्ध धर्माची शिकवणूक किंवा तत्त्वज्ञान प्रामुख्याने चार आर्य सत्यांशी निगडीत आहे. या चार आर्य सत्यांमध्येच बौद्ध धर्माच्या तत्त्वज्ञानाचे सार सामावले आहे. गौतम बुद्धांना पिंपळाव्या (अश्वत्थ) वृक्षाखाली या चार महान आर्य सत्यांचे आकलन झाले, ज्ञानप्राप्ती झाली. त्यांनी आपल्या शिष्य व अनुयायांना जो उपदेश दिला तो या चार आर्य सत्यांचा होय.

**१) दुःख :**

दुःख हे पहिले आर्य सत्य आहे. गौतम बुद्धांनी म्हटले आहे, जगात सर्वत्र दुःखच दुःख आहे. मानवाचे जीवन दुःखमय आहे. दुःखाचे स्वरूप भिन्न आहे. सांसारिक सुख क्षणिक असून संसारात दुःखच दुःख आहे. जन्म, जरा, व्याधी, वृद्धावस्था, शोक, मृत्यू, अप्रियाचा संयोग होणे, प्रियाचा वियोग होणे, इच्छेप्रमाणे न होणे किंवा न मिळणे हे दुःख होय. अशा प्रकारे या भौतिक गोष्टी दुःखपरिणामी आहेत. जगात कोणताही प्राणी दुःखापासून मुक्त नाही. जन्म, वृद्धावस्था व जरा या तीन रूपात मानवी जीवनात दुःख दिसते. मानवाच्या जीवनात या तीन गोष्टी नसत्या तर या संसार लोकात सम्यक संबुद्ध अवतरलेच नसते आणि त्यांचा धर्म व संघसुद्धा जगात प्रकाशमान झाले नसते, असे अंगुत्तरनिकायात म्हटले आहे. जे वृद्ध होणार आहे त्यास वृद्ध होऊ न देणे, जे व्याधियुक्त आहे त्यास व्याधियुक्त होऊ न देणे, जे मृत्यूचा विषय आहे त्यास मृत होऊ न देणे, जे क्षीण होणार आहे त्यास क्षीण होऊ न देणे तसेच जे नष्ट होणार आहे त्यास नष्ट होऊ न देणे या पाच गोष्टी कोणताही श्रमण, ब्राह्मण, देव, ब्रह्मदेव या जगात आणू शकणार नाही. थोडक्यात केवळ मानवच नव्हे तर देवसुद्धा दुःखावर मात करू शकले नाहीत. देव आणि सृष्टीच्या रचना करणाऱ्या देवताही माराच्या प्रभावाखाली येतात. कारण त्या तृष्णेच्या शृंखलेने बद्ध असतात. त्यामुळेच देवदेवतांनाही दुःख अनुभवावे लागते. अशा प्रकारे दुःखाने संपूर्ण जीवन वेढलेले आहे. परंतु या सत्याची जाणीव होऊन खरा बौद्ध भिक्षु दुःखित होत नाही. त्याला जगातील दुःखी जीवाबद्दल करूणा वाटते पण त्याला स्वतःबद्दल करूणा वाटत नाही. त्याचे कारण म्हणजे निर्वाण प्राप्त करून घेण्याची त्याची इच्छा व तयारी असते.

**२) दुःख समुदय (दुःखाचे कारण):**

दुःख समुदय हे दुसरे आर्यसत्य आहे. त्याचा अर्थ दुःखाचे कारण असा आहे. गौतम बुद्धांनी सांगितले की, पुनः पुन्हा उत्पन्न होणारी व अनेक विषयोपभोगात रंगून रूतून बसणारी तृष्णा म्हणजेच इच्छा हे दुःखाचे मूळ कारण असून अज्ञानामुळे इच्छेची निर्मिती होते. जर आपण अज्ञानता नष्ट केली तर आपली दुःखापासून सुटका होऊ शकते. गौतम बुद्धांनी उपदेश दिला की, रूप, गंध, रस, स्पर्श, मानसिक वितर्क व विचार यामुळे मनुष्याची सांसारिक आसक्ती वाढते व या आसक्तीमुळेच त्याच्या हृदयात विभिन्न तृष्णेचा जन्म व विकास होतो. त्यामुळे मनुष्य गर्व, मोह, ममता, राग-द्वेष व कलह इत्यादी दुर्गुणांच्या बंधनात अडकला जातो. तृष्णा तीन प्रकारची असते अ) काम तृष्णा ब) भवतृष्णा आणि क) विभव तृष्णा.

**अ) काम तृष्णा :** भौतिक वस्तूंचे सुख उपभोगण्याची तृष्णा म्हणजे काम तृष्णा होय. यामध्ये सांसारिक सुखोपभोगासाठी लागलेली तृष्णा असते.

**ब) भव तृष्णा :** जीवन जगण्याची वासना किंवा अस्तित्वासाठी लागलेली तृष्णा म्हणजे भव तृष्णा होय.

**क) विभव तृष्णा:** पुनर्जन्माची प्रबळ इच्छा भव नाहीसे करण्याची उच्छेदवाद्यांची तृष्णा, ही तृष्णाच सर्व दुःखाचे व जन्म-मृत्यूचे कारण ठरते.

माणसाची इच्छा म्हणजेव तृष्णा कधीही पूर्ण होत नाही. मनुष्य तिच्या पूर्ततेसाठी जितका प्रयत्न करतो तितका तो दुःखी बनत असतो. या संदर्भात गौतम बुद्ध म्हणतात की, ज्याप्रमाणे एखाद्या तेलाचा दिवा हा तेल आणि वात यांच्या साहाय्याने जळत राहतो, ज्याप्रमाणे त्यामध्ये कोणीतरी मधून मधून तेल आणि वात घालीत राहिला तर तो दिवा अनंत काळपर्यंत जळत राहतो त्याचप्रमाणे केवळ बंधनाप्रमाणे असलेल्या वस्तूंतुंच्या ठायी जो मनुष्य तृष्णा किंया आसक्ती ठेवतो, त्या मनुष्याचाही हव्यास दिवसेंदिवस वाढतच जातो. तृष्णेच्या पूर्ततेसाठी मनुष्य विचित्र वागतो. तो इतरांना क्लेश देतो व त्यांच्याविषयी द्वेष बाळगतो. यामधूनच दुःख निर्माण होते. याशिवाय क्रोधभावना व वैरभावनाही मनुष्याला दुःखच देतात. त्यामुळे प्रत्येक मनुष्याने दैनदिन जीवन जगत असताना ज्या ज्या कारणांमुळे दुःखाची निर्मिती होते ती कारणे जाणून घेणे हेच आर्य सत्य आहे.

**३) दुःख निरोध (दुःखापासून मुक्ती) :**

दुःख निरोध म्हणजे दुःखापासून मुक्ती मिळविणे होय. दुःख निरोध हे तिसरे आर्य सत्य आहे. दुःखाचे कारण माहीत झाल्यास त्या कारणास दूर करणे सरळ व सोपे आहे. अविद्या, अज्ञान व वासना ही दुःखाची कारणे आहेत. दुःखाच्या या कारणांचा विनाश केल्यावर सांसारिक दुःख, कष्ट व जन्म-मरणाच्या बंधनातून मनुष्य मुक्त होऊ शकतो. दुःखापासून मुक्ती मिळविणे ही बौद्ध धर्माची विशेषता आहे. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान यांचा निरोध करून तृष्णेचा शेवट करता येतो. यालाच दुःख निरोध म्हणतात. तृष्णेचा नाश केल्यास सांसारिक दुःखाचा शेवट करता येतो. गौतम बुद्धांनी उपदेश देताना एका ठिकाणी म्हटलेले दिसून येते की, संसारात जे काही प्रिय वाटते व ज्यामध्ये रस आहे, त्या गोष्टीस श्रमण, ब्राह्मण दुःखरूप/रोगरूप समजतील आणि त्यापासून दूर राहतील तेच तृष्णेचा त्याग करू शकतील. तृष्णेचा नाश किंवा उच्छेद झाल्यास सर्व दुःखाचा अंत होऊन निर्वाण प्राप्त होते. तृष्णेच्या नाशाने मनुष्य सर्वच दुःखांतून मुक्त होतो. जन्म-मृत्यूच्या चक्रातून सुटतो व सत्य आणि ज्ञान प्राप्त होऊन तो निर्वाण प्राप्त होतो.

**४) दुःख निरोध मार्ग (दुःखापासून मुक्तीचा मार्ग) :**

दुःख निरोध मार्ग किंवा दुःख निरोध गामिनी प्रतिपदा हे चौथे आर्य सत्य आहे. दुःख निरोध करण्याचा हा जो मार्ग गौतम बुद्धांनी सांगितला आहे यालाच 'आर्य अष्टांगिक मार्ग' असे नाव आहे. गौतम बुद्धांनी दाखविलेला हा मार्ग सदाचारावर आधारलेला आहे. कठोर देहदंडन व आत्यंतिक सुखोपभोग यांच्यातील

सुवर्णमध्य ठरणारा व आठ सद्गुणांनी युक्त असलेला हा जो संयममार्ग बुद्धांनी काढला यास 'मध्यम प्रतिपद' असेही म्हटले आहे. गौतम बुद्धांच्या मते, दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे व तृष्णेपासून मुक्ती मिळविणे अवघड असले तरी ते अशक्य नाही. त्यासाठी बुद्धांनी सहज व सुलभ असा सदाचारावर आधारलेला मार्ग दाखविला आहे. धम्मपदात (४-१२) सदाचाराचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितलेले आहे.

चदनं तगरं वाणी उप्पलं अथ वस्सिकी।
एतेसं गद्यजातानं सीलगन्यो अनुत्तरी।।

(वी. एन. लुणिया, भारतीय संस्कृती, पृ.९६)

चंदन किंवा तगर, कमळ किंवा जुई यांच्या सुगंधापेक्षा सदाचाराचा सुगंध उत्तम असतो. आपली जीवनपद्धती कशा प्रकारची असावी याचे मार्गदर्शन चौथे आर्य सत्य करते. बौद्ध धर्माची नैतिक शिकवण व सदाचरण सांगणारा हा मार्ग म्हणजेच अष्टांगिक मार्ग आहे. निर्वाणप्राप्तीकडे घेऊन जाणाऱ्या मार्गामध्ये अष्टांगिक मार्ग हा परम मंगलमय मार्ग आहे.

### ४.२.३ आर्य अष्टांगिक मार्ग- मध्यम प्रतिपद:

आर्य अष्टांगिक मार्ग हा सदाचारावर आधारित असून यास बौद्ध धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. गौतम बुद्धांच्या मते कठोर तपस्या, समाधी व शारीरिक यातना या गोष्टी तृष्णा, कष्ट व पुनर्जन्म यांपासून मुक्ती मिळण्यासाठी उपयुक्त नाहीत. वासना, तृष्णा व अविद्येचा नाश करण्यासाठी प्रार्थना, स्तुती, यज्ञ, हवन व मंत्र निरर्थक आहेत. त्यामुळे बुद्धांनी सांगितले की, तृष्णेचा विनाश व दुःखाचा निरोध आर्य अष्टांगिक मार्गाचे अनुसरण केल्याने होतो. तृष्णा ही दुःखाची जननी आहे. या तृष्णेचा नाश झाला तर सर्व दुःखांचाही नाश होतो. 'यन किचिसमुदयम्यं सब्बे तं निरोध धम्म' याचा अर्थ असा की, ज्या कशाला उत्पत्ती आहे त्या सर्वाला विरोध आहेच. दुःख तृष्णेपासून निर्माण होते म्हणून त्याला ही विरोध आहेच. केवळ यासाठी खडतर तपश्चर्या, शारीरिक क्लेश, देहदंड व कर्मकांडाची आवश्यकता नाही. गौतम बुद्धांनी सर्वसामान्य लोकांना आचरता येईल असा १) प्रज्ञा/ज्ञान २) शील ३) समाधी हा त्रिमार्ग सांगितला आहे, तोच आर्य अष्टांगिक मार्ग होय.

या मार्गालाच मध्यम प्रतिपद असेही नाव आहे. या मार्गानुसार जीवनात आचरण केल्यास तृष्णेचा नाश होऊन दुःखाचा शेवट होतो आणि मनुष्याला निर्वाण प्राप्ती मिळते. गौतम बुद्धांनी सारनाथ येथील आपल्या पहिल्या प्रवचनात अष्टांगिक मार्गाचा उपदेश कौडिण्य, अश्वजित, महानाम, कश्यप व भदिक या पाच शिष्यांना दिला होता. बुद्धाचे तत्त्वज्ञान 'मध्यम मार्गा'चे म्हणून ओळखले जाते. या मार्गाने सत्याचे ज्ञान होते व विकारांचा शम होतो. त्याने अंतर्ज्ञान, जागृती आणि निब्बान यांचा मार्ग सुकर होतो. बुद्धाने सांगितलेला अष्टांगमार्ग किंवा अष्टांगिक मार्ग होय व त्याची सम्यक् दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्मान्त, सम्यक आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती आणि सम्यक् समाधी ही आठ अंगे आहेत.

अष्टांगिक मार्गाचे तीन आणि त्यामध्ये आठ सत्ये आहेत. सम्यक् हा शब्द सत्य व योग्य अशा अर्थाने वापरला आहे.

**प्रज्ञा ज्ञान :**

श्रद्धा व भावनेने प्राप्त झालेले ओतप्रेत ज्ञान अत्यंत कल्याणकारक असते. यास प्रज्ञा ज्ञान म्हणतात. 'प्रज्ञा ज्ञान' मध्ये सम्यक् दृष्टि व सम्यक् संकल्प हे दोन मार्ग आहेत.

**१) सम्यक् दृष्टि (सम्मा दिट्ठी) :**

सम्यक् दृष्टि म्हणजे चांगली दृष्टि किंवा सत्य दृष्टिकोण होय. मनुष्याने आपली दृष्टी नेहमी सत्य ठेवली पाहिजे. सत्य दृष्टिकोणामुळे मनुष्य पाप व पुण्य, अनाचार व सदाचार आणि सत्य व असत्य यांच्यातील भेद समजू शकतो. चांगले व वाईट कर्म कोणते आहे हे ओळखणे किंवा जाणणे हीच सम्यक दृष्टी आहे. सम्यक दृष्टीचे महत्त्व समजण्यासाठी गौतम बुद्धांनी असे म्हटले आहे की, ''जग ही एक अंधाराची कोठडी असून मनुष्य हा त्यामध्ये एक कैदी आहे. अंधार कोठडीतील गडद अंधाराने मनुष्य या कैद्याला आपण कैदी आहोत हे सुद्धा कळत नाही. अंधारात दीर्घकाळ राहिल्याने आंधळा होऊन राहिलेला आहे. त्याला प्रकाश मिळू शकतो. पण कैद्याच्या मनाची अवस्था अशी नाही की त्याचे मन हे प्रकाश देण्याचे साधन ठरेल. अशा प्रकारे स्वभावतःच त्याची आकलनशक्ती सदोष असते. परिव्राजक हो, या कैद्यांची स्थिती निराशाजनक नाही. कारण माणसातील इच्छा शक्तीला योग्य हेतूसाठी जागृत करू तिला गती देता येते. इच्छाशक्तीला कोणत्या दिशेने गती द्यावी हे पाहण्याइतका माणसाला प्रकाश मिळाला तरी तो मनुष्य अशा रीतीने आपल्या इच्छाशक्तीला गतिमान करू शकेल की शेवटी त्याची इच्छाशक्ती त्यास बंधनातून मुक्त करील. अशा प्रकारे मनुष्य जरी बंधनात असला तरी तो बंधनातून मुक्त होऊ होऊ शकतो.'' मन जी गोष्ट निर्माण करते ते नष्टही करू शकते. जर मनाने मनुष्याला बंधनात टाकले असेल तर तेच मन योग्य दिशेने वळविल्यास त्यास बंधनातून मुक्तही करू शकते. सम्यक दृष्टी हेच करू शकते, मनुष्याला दुःखाचे अस्तित्व व दुःखनिरोधाचा उपाय उदात्त सत्ये न समजणे म्हणजेच अविद्या होय. या अविद्येचा विनाश हाच सम्यक दृष्टीचा अंतिम उद्देश आहे. मिथ्य विश्वास टाकून देणे, निसर्गनियमाविरूद्ध कोणतीही गोष्ट होऊ शकते हे न मानणे व वास्तवाचा व अनुभवाचा आधार नसलेल्या काल्पनिक सिद्धांतास मान्यता न देणे हे सम्यक दृष्टीचे हेतु आहेत. सम्यक दृष्टीसाठी स्वतंत्र मन व स्वतंत्र विचार आवश्यक आहेत.

हिंसा करणे, चोरी करणे, लैंगिक दुर्वर्तन करणे, असत्य भाषण करणे, निंदा करणे, कठोर वागणे, कांड्या पिकवीणे, लोभ बाळगणे, तिरस्कार करणे, श्रमात राहणे हे दहा दुर्गुण असून त्यांच्या विरूद्ध दहा सदगुण असतात. या सर्वांचे मूल लोभ, द्वेष व मोह हे असतात व त्यांच्यापासून सर्व दुर्गुणांचा उगम होतो आणि या तिघांचा लोप झाल्यानंतर ज्या कृती केल्या जातात त्या निर्दोष राहतात व त्या सदगुणाच्या असतात हे कळणे म्हणजे 'सम्यक दृष्टी' होय.

**२) सम्यक् संकल्प :**

प्रत्येक मनुष्याला असलेली ध्येये, आकांक्षा व महत्त्वाकांक्षा ही उदात्त व प्रशंसनीय असावी. ती शुद्र व अयोग्य नसावी हा सम्यक संकल्पाचा आशय आहे. सम्यक दृष्टी असलेल्या साधकाचा निर्वाण प्राप्त करून घेण्याचा दृढ निश्चय म्हणजे सम्यक् संकल्प होय. हा मिथ्या संकल्परहित असतो. चार आर्य सत्यानुसार

आचरण करणे, तृष्णा नष्ट करणे, अहिंसेचे पालन करणे, हिंसा न करणे आणि कामना व राग इत्यादींपासून दूर राहण्याचा संकल्प करणे म्हणजे प्रत्येक व्यक्तीने या प्रकारचा दृढ निश्चय केला पाहिजे अशी बुद्धांची शिकवणूक होती.

सत् संकल्पात विशिष्ट कृती करताना व्यक्तिगत निष्कामता महत्त्वाची असते. समग्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वार्थी व संकुचित असता कामा नये. फक्त अनासक्त व निष्काम दृष्टिकोन हा सम्यक संकल्प होऊ शकतो, कारण केवळ अनासक्त अवस्थेत किंवा निष्काम वृत्तीत मन पार्थिव लाभांपासून आणि स्वार्थी हेतूपासून दूर जाऊ शकते आणि आर्यमार्गावर योग्य दिशेने पुढे वाटचाल करू शकते.

**शील :**

'शील'चा संबंध चारित्रिक श्रेष्ठता व सदाचाराशी आहे. गौतम बुद्धांच्या मते असे दिसून येते की, विद्या अधिक नसली तरी चालते. कारण शील हीच सर्वोत्तम वस्तू आहे यामध्ये सम्यक् वाचा, सम्यक् कर्म व सम्यक् आजीविका या तीन मार्गांचा समावेश होतो.

**१) सम्यक् वाचा :**

सम्यक् संकल्प असणाऱ्या माणसाची मिथ्यावाचाविरहीत लोकसंग्रहकारक संयमयुक्त वाणी म्हणजे सम्यक वाचा होय. सम्यकू वाचा म्हणजे सत्य बोलणे. त्यामध्ये विनम्रता व मधुरता असली पाहिजे. सम्यकू वाचेला सर्वप्रथम स्थान देण्यात आलेले आहे. कारण जर जिभेवर, आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवले तर आपले संपूर्ण वर्तन नियंत्रणाखाली ठेवता येते. असत्य भाषण न करण्याचा किंवा खोटे न बोलण्याचा सदगुण जर पूर्णपणे आचरणात आणावयाचा असेल तर चांगले, शुभ बोलणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. सम्यक वाचेत केवळ खोटे न बोलण्याचा अंतर्भाव नसतो तर दुसऱ्यांना बदनाम न करणे, इतरांविषयी कंड्या न पसरवणे, दुष्ट हेतूने इतरांचे म्हणणे किंवा कृत्ये यांना कपटाने विकृत करून न मांडणे या सर्व गोष्टींचा समावेश होतो. तसेच भांडखोरपणाच्या, अपशब्दांच्या आणि सूडाच्या भाषेचा उपयोग न करणे याही गोष्टींचा सम्यक् वाचेत अंतर्भाव होतो. सम्यक् वाचा पुढील शिकवण देते.

* माणसाने नेहमी सत्य असेल तेच बोलावे.
* कधीही असत्य बोलू नये.
* दुसऱ्याविषयी कधीही वाईट बोलू नये.
* दुसऱ्याची कधीही निंदानालस्ती करू नये.
* आपल्या लोकांविषयी रागाची व शिवीगाळीची भाषा वापरू नये.
* सर्व लोकांशी आपुलकीने, प्रेमाने व सौजन्याने बोलावे आणि वागावे.
* अर्थहीन मूर्खपणाची बडबड करू नये.

* नेहमी समंजसपणे व मुद्देसूद बोलावे.
* चुगलखोरी करू नये.
* कठोर शब्दांचा वापर करू नये.

सम्यक् वाचेचे पालन कोणाच्याही भीतीमुळे व पक्षपाताने होऊ नये. तसेच आपल्या वृत्तीविषयी आपल्या वरिष्ठ लोकांना काय वाटेल याचा सम्यक वावेशी संबंध असू नये, वरिष्ठांची आज्ञा व वैयक्तिक फायदा हे सम्यक् वाचेचे प्रमाण नाही. मनाला रिझविणारी प्रेमळ अशी भाषा जो बोलतो, जो व्यर्थ बडबड करण्याचे टाळतो, वस्तुस्थितीचा विपर्यास न करता तिला धरून योग्य वेळी व नेमके बोलत असतो, उपयुक्त असणारे व धर्माला अनुसरून असणारे असे जो बोलत असतो, त्याच्या वचनात शिस्तबद्धता असते, त्याचे बोलणे योग्य वेळी होत असल्याने ते मौल्यवान असते आणि त्यात तर्कशुद्धता, सौम्यता व प्राणबद्धता असते व ते अर्थाने परिपूर्ण भरलेले असते. अशा त्याच्या बोलण्याला व वचनाला सम्यक वाचा म्हणतात.

**३) सम्यक् कर्म (कर्मांत) :**

बौद्धांना अभिप्रेत असलेले सम्यक कर्म हे सर्वसामान्य व व्यावहारिक स्वरूपाचे सत्कृत्य किंवा सत्कर्म नसून त्याचा संबंध कर्म करणाऱ्या कर्त्याच्या आंतरिक स्थितीशी, मनोवृत्तीशी असतो. बुद्धाच्या मते सम्यक् कर्म है शुद्ध, परिपूर्ण व अखंडित असले पाहिजे, ते शारीरिक व मानसिक दृष्टीने संपूर्णपणे वर्तमानातच घडले पाहिजे व ते वास्तव किंवा विद्यमान असले पाहिजे. फलेच्छेने प्रेरित असलेले, शिक्षेच्या भीतीने केलेले, कायद्याचे पालन करण्यासाठी केलेले कोणतेही कार्य सम्यक कर्म होऊ शकत नाही. अहिंसेचा आचार करायचा पण तो जिवंत प्राणी व वनस्पती यांच्याविषयीच्या आदर भावनेने, अस्तेय मालमत्तेच्या मालकी हक्काविषयींच्या आदरभावनेने, इंद्रिय विषयोपभोगापासून परावृत्त कावयाचे पण ते विशिष्ट मयदिपलीकडे उपभोगात रममाण होण्याने मनाची लोभी वृत्ती वाढून दृढमूल होते असे नीट समजून अशा रीतीने जर सत्कर्मे केली तर ती सम्यक ठरतात. कारण त्यांच्या स्वतःमध्येच त्यांचे हेतू व परिणाम एकत्रित असतात. अशी कर्म केवळ साधनवत न राहता ती साध्येही बनतात.

सम्यक् कर्माचा संबंध सत्कर्माशी आहे. माणसाने हिंसा, चोरी व व्यभिचारापासून दूर राहिले पाहिजे. दान, दया, सत्य, सेवा, अहिंसा व सदाचाराचे पालन केले पाहिजे. तसेच भोगविलासी जीवन जगू नये अशी सम्यक् कर्माची शिकवण आहे. माणसाने योग्य वर्तन करावे. दुसऱ्यांच्या भावना व त्यांचे हक्क यांचा मान राखून प्रत्येक कृती करावी. जीवनाच्या मूलभूत नियमांशी सुसंगत असे वर्तन हे सम्यक् कर्माचे प्रमाण आहे. मानवी जीवन व समाज जीवनाशी सुसंगत असे वर्तन म्हणजे सम्यक् कर्म होय. बुद्ध धम्मातील कायिक, वाचिक व मानसिक सत्कर्म ही व्यक्तीच्या विकासासाठी पोषक ठरली आहेत. थोडक्यात माणसाने नेहमी सत्कर्मे करावीत ही सम्यक् कर्मातची शिकवण आहे.

### ३) सम्यक् आजीविका (आजीव):

सम्यक आजीव म्हणजे केवळ अहिंसेचे निरूपद्रवी जीवन जगणे नसते, लोभीपणाचे व स्वार्थीपणाचे जीवन जगणे नसते, इतरांशी तुलना करून व इतरांना क्षुद्र लेखून स्वतःला उच्च समजून जगणे नसते. सम्यक् आजीव म्हणजे साधेपणाचे जीवन, परंतु विरक्तीचे नव्हे. फार थोडया वस्तूंचे स्वामित्व म्हणजे साधेपणा नसतो, तर साधेपणा म्हणजे स्वामित्वाच्या भावनेपासून मुक्त असणे असते. खरा साधेपणा म्हणजे आपल्या स्वामित्वाच्या सर्व वस्तूंचा त्याग करणे नसते. तर आपल्या वस्तू साध्या माणसाला आपल्या मालकीच्या बनवित नाहीत, तो वस्तूंच्या प्रभुत्वाखाली राहात नाही. सम्यक् आजीव म्हणजे वस्तूंचा संग्रह करण्याशिवाय, विशेषीकरण करण्याशिवाय जगणे, हक्क व विशेषाधिकार यांच्याशिवाय जगणे असते. कारण हे सर्व त्याने स्वतः निर्माण केलेल्या भ्रामक एकटेपणाचे आविष्कार असतात आणि जेव्हा हक्क नसतात तेव्हा कर्तव्येही नसतात.

माणसाने प्रामाणिकपणे उपजीविका करावी. खोटी स्तुती करून काहीही मिळवू नये. चोरी व लबाडीपासून अलिप्त असणारे उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे 'सम्यक आजीव' होय. यामध्ये मृगया, पारध, चोरी, कसाई काम, भ्रष्टाचार, लाचारी, अप्रामाणिकपणा व वेश्या व्यवसाय यांचा समावेश होत नाही. गौतम बुद्धांनी सांगितलेले आहे की माणसाने योग्य मागनिच उदरनिर्वाह केला पाहिजे. आपला उदरनिर्वाह चालवीत असताना इतरांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ते स्वतःच्या आणि समाजाच्या हिताचे असते. उदरनिर्वाहाचे चांगले व वाईट असे दोन मार्ग आहेत. ज्यामुळे इतरांची हानी होते, तेव्हा त्यांच्यावर अन्याय न करता आणि दुसऱ्यांना इजा न देता जगण्यापुरते मिळविण्याचे जे चांगले मार्ग आहेत त्यालाच 'सम्यक् आजीविका' म्हणतात.

**समाधी :**

चित्त एकाग्र करून एकांतवास ध्यानस्त बसणे यास 'समाधी' म्हणतात. यामध्ये सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती व सम्यक् समाधी या तीन मार्गाचा समावेश होतो.

### १) सम्यक् व्यायाम :

सम्यक् व्यायाम म्हणजे विशुद्ध, विवेकपूर्ण, ज्ञानयुक्त व चांगले प्रयत्न करणे होय. सम्यक् व्यायाम म्हणजेअविद्या नष्ट करण्याचा प्राथमिक प्रयत्न होय. अविद्या नष्ट करणे म्हणजे दुःखापासून सुटका करून घेऊन पुढील मार्ग मोकळा करणे होय. सम्यक् व्यायाम यास सम्यक् प्रधान, सम्यक् पराक्रम व सम्यक वीर्य अशीही दुसरी नावे आहेत. सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक वाचा, सम्यक् कर्मात आणि सम्यक् आजीविका या पाच गुणांनी संपन्न असलेल्या माणसाने शीलभूमीवर उभे राहून ध्येय सिद्धीसाठी केलेला अविरत प्रयत्न म्हणजेच सम्यक् व्यायाम होय.

आर्य अष्टांगमार्गाचे ध्येय साध्य करून घेण्यासाठी जी खटपट केली जाते तिच्या रूपाने सम्यकू व्यायाम त्या मार्गात उभे राहिलेले अडसर दूर करण्यापलीकडे अधिक काही करीत नाही किंवा असे अडसर उभे राहू

नये म्हणून किंवा साध्यप्राप्तीसाठी अनुकूल परिस्थिती करण्याचे काम करीत असतो. जे अडसर दूर करावयाचे असतात ते मुख्यतः इंद्रियसुखांची आसक्ती, विरोधी प्रवृत्ती असतात आणि त्या मनाला आपापल्या परीने स्वार्थी, संकुचित व एकाकी बनवीत असतात. ज्या गोष्टी मनावर अनिष्ट परिणाम घडवितात उदा. चित्रे, ग्रंथ, बोलपट, गाणी इत्यादी गोष्टींचे निराकरण करणे आवश्यक असते. काही वेळा काही रूची व गंध हे सुद्धा माणसाचा निर्धार कमकुवत करीत असतात. काही वेळा इंद्रियांचे रक्षण करण्याने आणि शरीराच्या व मनाच्या कार्यशक्ती यांच्यावर नियंत्रण चालवण्यानेही सम्यक व्यायाम केला जातो. सम्यक् व्यायामाचे पुढील हेतू आहेत.

* अष्टांगिक मार्गाच्या विरोधी अशा चित्तवृत्तीचा प्रतिरोध करणे म्हणजेच आपल्या अंगातील दुर्गुण घालविणे.
* अशा प्रकारच्या चित्तवृत्ती अगोदरच उत्पन्न झाल्या असतील तर त्या दाबून टाकणे. आपल्या अंगात नसलेले सदगुण संपादन करणे.
* अष्टांगिक मार्गाला आवश्यक असलेल्या चित्तवृत्ती उत्पन्न करण्यासाठी माणसाला साहाय्य करणे. घालविलेले दुर्गुण पुन्हा आपल्यात येऊ नये असा प्रयत्न करणे.
* अशा प्रकारच्या चित्तवृत्ती अगोदरच उत्पन्न झालेल्या असतील तर त्यांची वाढ व विकास करणे. संपादन केलेल्या सदगुणांची जोपासना करणे.

अशा प्रकारे सम्यक व्यायाम हा आपले विचार चांगले असावेत, सदविचारांची जोपासना करावी, मनात कधीही वाईट विचार आणू नये व वाईट दुर्गुणांचा त्याग करावा अशी शिकवण देतो.

**२) सम्यक् स्मृती :**

चित्त स्थिर ठेवून त्याची चलबिचल होऊ न देणे म्हणजे 'सम्यक् स्मृती' होय. सम्यक् स्मृतीनुसार मनुष्याने नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, काया, वेदना, संज्ञा, वित्त व मन हे सर्व नाश होणार आहे. त्यामुळे त्याने शरीर, मन, वचन आणि सुख-दुःखाच्या प्रती सजग राहिले पाहिजे. तसेच राग-द्वेष जाणले पाहिजेत. याशिवाय सर्व काम विवेक व सावधपणे केले पाहिजे. दुष्ट वासनांवर मनाचा पहारा ठेवणे हे सम्यक् स्मृतीचे दुसरे नाव आहे. सम्यक स्मृतीला जागरूकपणा व विचारीपणा यांची आवश्यकता असते. मनाची सतत जागृती हा त्याचा अर्थ आहे. सम्यक् स्मृतीची पद्धत चतुर्विध आहे. बौद्धांनी त्या गोष्टीचा अत्यंत खोलात जाऊन विचार केलेला आहे.

प्रथमतः आपल्या श्वसनाची, प्रतिक्रियांची, आसनांची, त्याच्या भागांच्या घडणीची, भौतिक गुणधर्माच्या रचनेची आणि त्याच्या दोष क्षमतेची योग्य आठवण ठेवावयाची असते.

१. दुसरी पद्धत म्हणजे वेदने व भाव यांची आठवण ठेवणे, वेदने व भाव कसे निर्माण होतात यांच्यावर लक्ष ठेवणे आणि त्यांचे सुखद परिणाम होत असेल तर त्यांना आसक्त न होणे, दुःखद परिणाम होत असेलतर त्यांच्याविषयी नापसंती न बाळगणे.

२. तिसरी पद्धत म्हणजे विचारांची स्मृती ठेवणे, त्यांची राग, द्वेष, भ्रम, अलिप्तता यांपासून कशी उत्पत्ती होतेते पाहणे व त्यांची निर्मिती कशी होते हे पाहणे.

३. पंच निवरणानि म्हणजे दुष्भावना, आलस्य, चिंता व मनाची संकुचित अवस्था यांच्याशी संलग्न असताना मनाच्या अवस्थांची स्मृती बाळगणे. या मानसिक अवस्थांचा उगम होणे, त्या चालू राहणे व त्यांचा अंत होणे या गोष्टींकडे लक्ष ठेवावे लागते.

स्मृतीने अंतर्दृष्टी प्राप्त होते कारण ते कर्माच्या खऱ्या स्वरूपाचे अवधान असते. सम्यक स्मृती दुःखाच्या समस्येचा परिहार करते कारण तिला स्वतःचे असे वेगळे उद्दिष्ट नसते. कारण हेतूपूर्ण निश्चयामुळे सर्व दुःखांचे कारण असणाऱ्या विरोधी जोड्या निर्माण होत असतात, सम्यक् स्मृती मात्र वस्तू व घटना यांना त्या जशा वास्तवात असतात तसे पाहिल्याने या सर्व गुंतागुंती टाळू शकते. (तत्रैव, पृ. ३६१-३६२) सम्यक स्मृती पुढील बाबींची शिकवण देते.

* बौद्ध धर्मातील विचारांचे व ज्ञानाचे निरंतर स्मरण करीत राहणे.
* दुसऱ्यांच्या वस्तूंचा कधीही हव्यास धरू नये.
* आपल्या हातून वाईट कर्म होऊ नये यासाठी जागरूक व सावधान राहणे.
* दुष्ट वासनांवर मनाचा पहारा ठेवणे.
* चार आर्यसत्ये व पंचशील तत्त्वांचे सतत स्मरण करणे.
* मनुष्याने आपले सुख-दुःख, वेदना, राग-द्वेष व आसक्ती या मनोविकारावर चिंतन करावे व त्यापासून दूर राहावे.

**३) सम्यक् समाधी:**

समाधी म्हणजे केवळ चित्ताची एकाग्रता व ध्यानस्थ अवस्था, चित्ताची एकाग्रता चित्ताच्या सर्व शक्ती एकवटून एकाच आलंबनाकडे लावणे व चित्ताचा विक्षेप थांबविणे म्हणजे सम्यक् समाधी होय. गौतम बुद्धांच्या मते ध्यानमार्गाचा अवलंब करूनच सम्यक समाधी साधता येते. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक् वावा, सम्यक् कर्मांत, सम्यक् आजीविका, सम्यक् व्यायाम व सम्यक् स्मृती प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या माणसांच्या मार्गावर लोभ, द्वेष, आळस व सुस्ती, संशय व अनिश्चय हे पाच अडथळे किंवा बंधने आहेत. हे अडथळे दूर करण्याचा मार्ग समाधी हा होय. वरील पाच अडथळ्यांना अटकाव करणाऱ्या स्वयंप्रेरीत अशा ध्यानावस्थेच्या मार्गावर मनुष्याला नेण्याचे काम समाधी करते. परंतु या ध्यानाच्या अवस्था तात्पुरत्या असल्याने अडथळयांना केलेला अटकाव हा सुद्धा तात्पुरताच ठरतो. मनाला स्थायी स्वरूपाचे वळण आवश्यक आहे. पण असे वळण केवळ सम्यक समाधीनेच लावता येते.

सम्यक् समाधी ही वास्तवात्मक असून ती मनाला एकाग्रतेच्या काळात कुशल कर्माचा विचार करण्याचे शिक्षण देते. तसेच त्याला अनुसरूनव अडथळयामुळे निर्माण होणाऱ्या अकुशल कर्माकडे आकर्षीत होण्याची

मनाची प्रवृत्तीसुद्धा ती नष्ट करते. सम्यक् समाधीमुळे मनाला चांगल्या गोष्टींचा विचार करण्याची सवय लागते. तसेच मनाला चांगली कृती करण्यास प्रेरणा देते.

सम्यक् समाधी ही खऱ्याखुऱ्या अंतर्दृष्टीने मिळत असते. कारण ती पवित्र जीवन जगण्याच्या मार्गावर आपणास नेत असते आणि तिची परिणती निर्वाणात होत असते. निर्वाण हे आर्य अष्टांगमार्गाचे अंतिम गन्तब्य असते. या अष्टांगमागनि जाण्यात दुःखाचा अंत होत असतो. या मार्गात ज्ञान व आचार यांचे ऐक्य होऊन शेवटी मनुष्य अत्युच्च ध्येयाला जाऊन पोहोचतो, निर्वाणात विलीन होतो. (तत्रैव, पु. ३६२-३६३) सम्यक् समाधीच्या पुढील व्यानरूपी चार पायऱ्या आहेत.

१. पहिल्या ध्यानस्थ अवस्थेत वितर्क, विचार, प्रीती, सुख व एकाग्रता प्राप्त होते.

२. दुसऱ्या ध्यानस्त्य अवस्थेत वितर्क व विचार यांचा लोप होतो आणि प्रीती, सुख व एकाग्रता या तीन मनोवृत्ती राहतात.

३. तिसऱ्या ध्यानस्थ अवस्थेत प्रीतीचा लय होतो आणि केवळ सुख व एकाग्रता राहते.

४. चौथ्या ध्यानस्थ अवस्थेत सुखाचा लोप होतो आणि उपेक्षा व एकाग्रता राहते.

अशा प्रकारे सम्यक् समाधीमध्ये मन एकाग्र केल्याने आध्यात्मिक प्रगती होते, धार्मिक ज्ञान वाढते आणि निर्वाण प्राप्ती होते.

सम्यक् दृष्टीपासून सम्यक् समाधीपर्यंतची ही अंगे पायरीने दिलेली आहेत. या अष्टांगिक मार्गाचा उपयोग परिव्रज्या घेतलेल्या भिक्षुला आणि गुहस्थी जीवनातील उपासक व उपासिका यांनाही आहे. गौतम बुद्धांनी सांगितलेल्या मार्गाचे उपलक्षण, धम्मपदात (१४.५) आले आहे. ते म्हणजे,

> 'सब्बपापस्स अकरणं कुसलसस उपसंपदा।
> स-चित्तपरियोगपदयनं एतं बुद्धान सासन।।' (धम्मपद, १४.५, पृ. ३७)

सर्व पापांचा त्याग, सर्व पुण्यकर्माचा संचय आणि चित्त सदैव निर्मल व पवित्र राखणे हे बुद्धाचे अनुशासनआहे.

### ४.२.४ पटिच्चसमुत्पाद :

गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली त्यावेळी त्यांना 'पटिच्वसमुत्पाद' या सिद्धांताचे ज्ञान झाले. दुःख आहे. कारण ते उत्पन्न झालेले आहे. त्याच्या उत्पत्तीची क्रिया चालू असेपर्यंत ते राहणारच असा त्यांचा सिद्धांत होतो. 'पटिच्च' याचा अर्थ जाणणे अथवा बोध घेणे असा आहे. 'समुत्पाद' म्हणजे उत्पत्ती. मुत्पाद या संज्ञेने कार्यकारण परंपरा दर्शविली जाते. 'हे असले तर ते होते, याच्या उत्पत्तीमुळे ते उत्पन्न होते, हे नसले तर ते होत नाही, हे बंद झाले तर ते बंद होते. असे तत्त्वाचे विवरण मज्झिनिकायात (२.३२) केलेले आढळते. दुःखाची उत्पत्ती कशी झाली याचे चिंतन व मनन करताना बुद्धांना अविद्या, संस्कार, विज्ञान, नामरूप, षडायतन, स्पर्श, वेदना, तुष्णा, उपादान, भव, जाति व जरामरणादिक दुःखे ही बारा दुव्यांची साखळी

सुचली. ती बारा कारणकार्ये आहेत. हीच प्रसिद्ध कार्यकारणभावावर आधारलेली साखळी आहे. या साखळीतील प्रत्येक घटक पुढील घटकांचे कारण व आधीच्या घटकाचे कार्य असतो. ही कार्यकारणभावावर आधारित साखळी अशी देण्यात येते. अविद्येतुळे संस्कार, संस्कारामुळे विज्ञान, विज्ञानामुळे नामरूप, नामरूपामुळे षडायतने, षडायतनामुळे स्पर्श, स्पर्शामुळे वेदना, वेदनेमुळे तुष्णा, तृष्णेमुळे उपादान, उपदानामुळे भव, भवामुळे जाति किंवा जन्म आणि जन्मामुळे जरामणादिक दुःखे. साखळीतील पहिला घटक अविद्या आहे, अविद्या म्हणजे अज्ञान. या अविद्येमुळे पुढील घटकांची उत्पत्ती होते. अविद्येचा नाश झाल्यास दुःखाची सुद्धा निर्मिती होत नाही. त्यामुळे अविद्या हे सर्वांचे 'बीज' आहे. परमज्ञानाच्या लाभाने या बीजाचा नाश होतो असे 'मिलिंदपन्ह' या ग्रंथात म्हटले आहे.

प्रतित्य समुत्पाद या सिद्धांताच्या अंतर्गत गौतम बुद्धांनी स्पष्ट केले की प्रत्येक वस्तूच्या उत्पत्तीच्या मुळात कोणतेना कोणते तरी कारण आवश्यक असते. या सिद्धांताद्वारा बुद्धांनी दुःखाचे कारण ताणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार दुःखाची उत्पत्ती सुद्धा कारण असल्याशिवाय होऊ शक्त नाही असे त्यांचे मत आहे. अविद्या हेच दुःखाचे मूळ कारण आहे. प्रतीत्यसमुत्पाद विषयी बुद्धांना अभिमान वाटत होता. ते असे म्हणताना दिसतात की, 'आनंद! हा पतीत्यसमुत्पाद गंभीर आहे. त्याचा प्रभावही गंभीर आहे. या तत्त्वांच्या अज्ञानामुळे ही प्रजा जाळ्यात गुरफटल्यासारखी, दोऱ्याच्या न उलगडणाऱ्या गुंडीसारखी, हरळीत अडकल्यासारखी होऊन तिला दुर्गतीतून अपायातून व पुनर्जन्मातून बाहेर पडता येत नाही' प्रतीत्यसमुत्पाद या सिद्धांतात पुढील बारा दुव्यांची साखळी दिलेली आहे.

**१) अविद्या:** अविद्या म्हणजे अज्ञान हे अज्ञान चार आर्य सत्यांबद्दलचे आहे. अविया हा साखळीतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. हा घटक नष्ट झाल्यास पुढील घटकांची उत्पत्ती होत नाही. अविद्या हे सर्वांचे बीज आहे. परमज्ञानाच्या प्राप्तीने या बीजाचा नाश होतो.

**२) संस्कार :** संस्कार याचा अर्थ कर्म किंवा कृती असा आहे. एकाच जन्मातील अविद्या त्याच जन्मातील संस्कारांना कारणीभूत ठरते.

**३) विज्ञान :** संस्कारामुळे विज्ञानाची उत्पत्ती होते. विज्ञान हे संस्काराचे पुंजीभूत रूप आहे. विज्ञानाने गर्भात प्रवेश केला नाही व ते तेथे राहिले नाही तर गर्भ जिवंत राहत नाही. सत्त्वाच्या (पुन्य) पुनर्जन्मात त्याच्या पूर्व जन्मातून विज्ञान येते.विज्ञानामुळे नवे नामरूप येते.

**४) नामरूप :** विज्ञानापासून नाम व रूप अर्थात गर्भस्य 'भ्रण'चे शरीर व 'मन'ची उत्पत्ती होते. रूप म्हणजे महाभूतांनी घडविलेला जड देह आणि नामात वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान हे चार स्कंध येतात.

**५) षडायतने :** नामरूपात षडायतनांची कल्पना येते. पाच ज्ञानेंद्रिय आणि मन हे सहावे इंद्रिय ही षड आयतने होत.

**६) स्पर्श:** चक्षुस, श्रोत्र, घ्राण, जिव्हा, काय व मन या सहा इंद्रियांचा त्यांच्या रूप, शब्द, गंध, रस, स्पर्श व धर्म या विषयांशी होणारा संयोग तो स्पर्श होय. इंद्रिय द्वारा स्पर्श अर्थात विषयाशी संपर्क स्थापित होतो. उदा. नाकाने सुगंध घेऊन आपण पुष्पा कडे आकर्षित होतो.

**७) वेदना :** वेदना या शब्दाने सुख-दुःख किंवा अदुःख व असुख याबाबतची संवेदना दर्शविली जाते. स्पर्शापासून वेदनेची उत्पत्ती होते. कारण सांसारिक वस्तूच्या संपर्कात आल्यानंतर मनुष्य प्रिय व्यक्तीच्या वियोगाचे दुख व संयोगाचे सुख याबाबतचा अनुभव घेतो.

**८) तृष्णा :** सांसारिक वस्तू प्राप्त करण्याची इच्छा हीच तृष्णा आहे. जेव्हा मनुष्य वेदना द्वारा सुख-दुःखाचा अनुभव घेतो, तेव्हाच तृष्णा उत्पन्न होते. अज्ञानी माणसाचे ठिकाणीच तृष्णा निर्माण होते. तृष्णा ही कामतृष्णा, भावतृष्णा व विभवतृष्णा अशा तीन प्रकारची मानलेली आहे.

**९) उपादान :** उपादान म्हणजे अतितृष्णा. प्राप्त झालेली सुखे नष्ट होऊ नयेत. एवढेच नाही तर त्यापेक्षाही अधिक प्रमाणात सुख प्राप्त व्हावे असा हव्यास म्हणजे उपादान होय. काम उपादान, दृष्टी उपादान, शील उपादान व आत्मवाद उपादान हे उपादानाचे चार प्रकार आहेत.

**१०) भव :** भव म्हणजे जन्म घेण्याची प्रवृत्ती. भव म्हणजे पुनर्जन्माला कारण ठारणारे कर्म. अशी कल्पना नंतरच्या काळातील संस्कृत ग्रंथात आढळते. जुन्या पाली धर्मग्रंथात भव या शब्दाने पुनर्जन्म दर्शविलेला दिसून येतो. हा पुनर्जन्म काम लोक, रूप-लोक व अरूप लोक या तीन लोकांतला आहे.

**११) जाती (जन्म):** भव म्हणजे जन्म घेण्याची प्रवृत्ती उत्पन्न झाल्यावर मनुष्य जन्म ग्रहण करतो. हा जन्म सामान्य अर्थाने समजला जातो तो जन्म नव्हे तर विज्ञान व गर्भातील रूप यांच्या संयोगाला जन्म किंवा जाती हे नाव आहे. १२) जरामरणादिक दुःखे कार्यकारणभावावर आधारित असलेल्या साखळीतील जरामरणादिक दुःखे हा शेवटचा दुवा किंवा घटक आहे. जन्म ग्रहण केल्यानंतरच दुःख उत्पन्न होते. जरा, रोग, शोक, निराशा व मृत्यू ही दुःखाची विविध रूपे आहेत. जन्म घेतल्यावरच मनुष्य दुःख भोगतो.

अशा प्रकारे प्रतीत्यसमुत्पाद या सिद्धांतानुसार स्पष्ट होते की, अविद्येमुळे मनुष्य जन्म ग्रहण करतो व दुःख भोगतो.

### ४.२.५ अनात्मवाद :

आत्मवाद आणि अनात्मवाद या दोन्ही संकल्पना परस्परविरोधी संकल्पना आहेत. प्रामुख्याने वैदिक परंपरेतील सर्व दर्शने आणि काही प्रमाणात जैन (जीव रूपात) ही आत्मवादाचा पुरस्कार करतात. या सर्वांच्या विरुद्ध बुद्ध हे अनात्मवाद मांडतात. बुद्धाच्या या संकल्पनेचे वैशिष्ट्य असे की, बुद्ध पूर्वपक्षाच्या मताचे खंडन करीत आपला सिद्धांत पक्ष वा आपले मत ठेवतात.

**आत्म्याचा विचार प्रमाणरहित आहे :-**

श्रमण ब्राह्मण मतानुसार, 'मृत्यूनंतर आत्मा अरोग, एकांतसुखी असतो.' बुद्ध म्हणतात, जेव्हा मी अशा या श्रमण ब्राह्मणांना विचारतो की, मृत्यूनंतर आत्मा अरोग, एकांतसुखी असतो का? तर तेव्हा ते 'हो' असे उत्तर देतात. पण जेव्हा मी त्यांना असे विचारतो की, अशा या एकांत सुखवाल्या लोकाला (आत्म्याला) तुम्ही जाणता, पाहता, विहारता का? हेच प्रतिपद त्या एकांत सुख (आत्म्याला) असलेल्या लोकाच्या

साक्षात्कारासाठी आहे का? तर तेव्हा ते 'नाही' असे उत्तर देतात. यावरून श्रमण ब्राह्मणांचे कथन प्रमाणरहित ठरते. (दीघ निकाय-१.९) म्हणजेच बुद्ध श्रमण परंपरेनुसार जो आत्मा आहे; तो प्रमाणरहित असल्यामुळे त्याचे खंडन करतात.

**आत्मवाद्यांमध्ये मतभेद :-**

दीघ निकायात २.२.२ या ठिकाणी दर्शविल्याप्रामणे जे आत्मवादी आहेत त्यांच्यातही मतभेद आहेत. काहींच्या मते आत्मा 'रूपवान व अणु' आहे. काहींच्या मते आत्मा 'रूपवान व अनंत' आहे. काहींच्या मते आत्मा 'रूपरहित व अणु' आहे. तर काहींच्या मते आत्मा 'रूपरहित व अनंत' आहे. पण बुद्धांचे मत लक्षात घेतले असता, आत्मा रूपवान व अणु, रूपवान व अनंत, रूपरहित व अणु आणि रूपरहित व अनंत या पैकी काही तरी आहे, असे मानू नये. असे हे काहीही न माणणे म्हणजेच 'अनात्मवाद' होय.

काही आत्मवादी वेदनेला (अनुभूती) आत्मा समजतात. तर काही अवेदनेला आत्मा समजतात. वेदनेला आत्मा समजणाऱ्याच्या संदर्भात बुद्ध प्रश्न उपस्थित करतात की, ते सुख वेदना, दुःख वेदना, अदुःख-असुख वेदना या पैकी कोणत्या वेदनेला आत्मा समजतात? कारण जर ते एका वेळी सुख वेदनेला आत्मा समजत असतील तर त्याच वेळी ते दुःख वेदनेला व अदुःख-असुख वेदनेला आत्मा समजत नाहीत. याच अर्थाने जर कोणी दुःख वेदनेला आत्मा समजत असतील तर ते त्या वेळी सुख वेदनेला आणि अदुःख-असुख वेदनेला आत्मा समजत नाहीत. यावरून या तीनही वेदनेतला आत्मा एक नसून वेगवेगळा आहे. अर्थात आत्मा नित्य नसून अनित्य आहे, असे मानावे लागेल. या ठिकाणी बुद्ध म्हणतात की, या तीन्ही वेदना क्षय, व्यय, विराग आणि निरोध हे धर्म असलेल्या आहेत. परिणामी सुख वेदनेचा अनुभव करतांना 'हा माझा आत्मा आहे'; असे वाटते. पण त्याच सुख वेदनेचा निरोध झाला असता, 'माझा आत्मा विगत (भूत काळात गेला) झाला'; असे वाटते. परिणामी वेदनेला आत्मा माणणे योग्य नाही. परंतु काही लोक अवेदनेला आत्मा समजतात. ते, 'वेदना माझा आत्मा नाही. तर अ-प्रति-संवेदना माझा आत्मा आहे.' असे मानतात. अशांनाही बुद्ध विचारतात की, जिथे सर्व काही अनुभवले जाते तिथे 'मी आहे' असे कसे म्हणता येईल ? अर्थात असे म्हणता येणार नाही. म्हणून 'वेदना माझा आत्मा नाही. तर अ-प्रति-संवेदना माझा आत्मा आहे.'; असे माणणेही योग्य नाही.

**ज्ञात्याच्या रूपात आत्मा अमान्य :-**

काही लोक, 'वेदना माझा आत्मा नाही आणि अ-प्रति-संवेदना माझा आत्मा नाही. तर माझा आत्मा 'वेदित' (अनुभव करण्यायोग्य वा ज्ञाता) असलेला, वेदना धर्म असलेला माझा आत्मा आहे.' असे म्हणतात. त्यांना बुद्ध प्रश्न विचारतात की, जर सर्व वेदना सर्वार्थाने नष्ट झाल्या तर त्या वेदनेच्या अभावात, वेदनेचे निरोध होण्याने, तिथे 'मी आहे' असे कसे होईल? म्हणजेच आत्मवादी जर वेदनांचा ज्ञाता म्हणून आत्मा स्वीकारत असतील तर निरोध नियमाने सर्व वेदनाचा नाश होतो आणि मग अशा परिस्थितीत तिथे 'मी आहे' (वेदनेचा ज्ञाता) असे कसे म्हणता येईल? असा प्रश्न बुद्ध उपस्थित करतात. अर्थात बुद्ध 'वेदना' धर्म असलेला आत्मा आणि 'वेदनेचा ज्ञाता' म्हणून असलेला आत्मा स्वीकारीत नाहीत. कारण या लोकात

'मी' आणि 'माझा' या रूपात आत्म्याला कोणीही ग्रहण करीत नाही. या शिवाय 'मी' आणि 'माझा' या रूपाने आत्म्याला जाणणारा कोणीही ज्ञात्याच्या (धर्मवाला) रूपात आत्म्याला ग्रहण करून 'मुक्त' होत नाही. तर बुद्धाच्या मतानुसार, जो या संसारात असलेल्या सर्व प्रकारचे अधिवचन (नाम, संज्ञा), सर्व प्रकारचे वचन व्यवहार, सर्व प्रकारचे निरुक्त (भाषा), सर्व प्रकारचे भाषा व्यवहार, सर्व प्रकारचे प्रज्ञप्ति (रूढी), सर्व प्रकारचे प्रज्ञप्ति व्यवहार (रूढी व्यवहार), सर्व प्रकारची प्रज्ञा (ज्ञान), सर्व प्रकारचे प्रज्ञेचे विषय या सर्वांना जाणतो तो 'मुक्त' होत असतो. (दीघ निकाय-२.२.३)

**स्कंधरूपी आत्मा अमान्य :-**

बुद्ध म्हणतात, जे आर्यांच्या (ज्ञानी पुरुषाच्या) दर्शनाने वंचित आहेत ते अविद्यायुक्त पुरुष रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान या पाच स्कंधाला पाहून 'हे माझे आहे.' 'हे मी आहे.' 'हा माझा आत्मा आहे.'; असे म्हणतात. इतकेच नाही तर असे हे अज्ञानी पुरुष जे काही पाहिले, ऐकले, आठवले, ज्ञात, प्राप्त, पर्योषित म्हणजे शोधलेले आणि मनाद्वारे अनुविचारीत झालेले पदार्थ आहेत त्यांना पाहून 'हे माझे आहे.' 'हे मी आहे' 'हा माझा आत्मा आहे.'; असे म्हणतात. या शिवाय असे हे पुरुष सहा प्रकारच्या दृष्टि साधनांना देखील 'हे माझे आहे.' 'हे मी आहे.' 'हा माझा आत्मा आहे.'; असे म्हणतात. पण जो आर्य दर्शनाने युक्त आहे, आर्य धर्माने परिचीत आहे तो विद्यायुक्त पुरुष रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान या पाच स्कंधाला पाहून, सहा दृष्टि साधनांना पाहून 'हे माझे नाही.' हे मी नाही.' 'हा माझा आत्मा नाही.'; असे म्हणतो. इतकेच नव्हे तर अत्ता हा विद्यायुक्त पुरुष मी उच्छिन्न होणार, मी नष्ट होणार, मी राहणार नाही. या पैकी कोणत्याही भावनेने शोकाकुल वा मूर्च्छित होत नाही. म्हणून बुद्ध म्हणतात की, आपण अशा आत्मवादाचा स्वीकार करावा की, ज्याने दुःख, पीडा, नैराश्य (परिदेव) उत्पन्न होत नाही. मग असा हा आत्मवाद कोणता आहे? तर बुद्ध म्हणतात की, आपल्या शरीरात वा शरीराच्या बाहेर, स्थूल वा सूक्ष्म, उत्तम वा निकृष्ट, दूर वा जवळ जे काही भूत-भविष्य आणि वर्तमानातले रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान आहेत; ते सर्व हा माझा नाही, हे मी नाही, हा माझा आत्मा नाही. असे मानणारा आत्मवाद दुःख, पीडा, नैराश्य देत नाही. बुद्धाच्या अशा या आत्मवादालाच 'अनात्मवाद' असे म्हणतात. (मज्झिम निकाय-१.३.२)

**अनात्मवादाचा परिणाम :-**

बुद्धाने सुचविलेला अनात्मवाद स्वीकारल्यानंतर, अनुभवात आणल्यानंतर भिक्षु पुरुषाच्या ठिकाणी कसल्याही प्रकारचा अंहूमभाव, ममत्व उरत नाही. परिणामी कोणी वाईट बोलले तर दुःख होत नाही. कोणी स्तुती वा पूजन केले तर आनंद होत नाही. कारण जे पहिलेच त्यागलेले आहे त्याविषयी ते बोललेले वाईट शब्द वा ते स्तुती वचन-पूजन असते. तेव्हा जे आपले नाही त्याला सोडले पाहिजे. कारण तेच (सोडणे) चिरकालापर्यंत हितकारक व सुखद आहे. अर्थात हे रूप, वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान, सहा दृष्टि आपले नाहीत, ते अनात्म आहेत. असे मानून त्याचा त्याग केला पाहिजे. (मज्झिम निकाय-१.३.२-४)

## ४.३ सारांश :

बौद्ध दर्शनामध्ये जगाचे व विश्वाचे सत्ताशास्त्रीय स्वरूप कसेही असले तरी मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात नीति-नियमांचे व नैतिक सदाचरणाचे कार्य व महत्त्व अबाधितपणे टिकून राहून मानवी जीवनाचे दुःखापासून संरक्षण व सुटका व्हावी म्हणून बुद्ध नैतिक सदाचरणाला सर्व मतभेदांच्या वर व पलीकडे ठेवतात. बुद्धांची नीती सामाजिकतेवर भर देण्यापेक्षा व्यक्तीच्या पवित्र जगण्यावर व अंतरिक विकासावर अधिक भर देणारी आहे. बौद्ध धर्माची शिकवणूक किंवा तत्त्वज्ञान प्रामुख्याने चार आर्य सत्यांशी निगडीत आहे. हाच बुद्धांचा सरळ सोपा उपदेश होतो. गौतम बुध्दांना म्हातारपण, आजारपण वा मृत्यू एवढ्याच घटना दुःखमय दिसल्या असे नाही तर जन्म, आशा, निराशा, गरजा, तृष्णा आदी सर्वच बाबी नव्हे, संपूर्ण मानवी जीवनच दुःखमय वाटले. अस्तित्व म्हणजेच दुःख असे त्यांचे मत बनले.

'यन किचिसमुद्द्ययम्यं सब्बे तं निरोध धम्म' याचा अर्थ असा की, ज्या कशाला उत्पत्ती आहे त्या सर्वाला विरोध आहेच. दुःख तृष्णेपासून निर्माण होते म्हणून त्याला ही विरोय आहेच. केवळ यासाठी खडतर तपश्चर्या, शारीरिक क्लेश, देहदंड व कर्मकांडाची आवश्यकता नाही. गौतम बुद्धांनी सर्वसामान्य लोकांना आचरता येईल असा १) प्रज्ञा ज्ञान २) शील ३) समाधी हा त्रिमार्ग सांगितला आहे, तोच आर्य अष्टांगिक मार्ग होय.गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली त्यावेळी त्यांना 'पटिच्चसमुत्पाद' या सिद्धांताचे ज्ञान झाले. दुःख आहे. कारण ते उत्पन्न झालेले आहे. त्याच्या उत्पत्तीची क्रिया चालू असेपर्यंत ते राहणारच असा त्यांचा सिद्धांत होता. 'पटिच्च' याचा अर्थ जाणणे अथवा बोध घेणे असा आहे. 'समुत्पाद' म्हणजे उत्पत्ती. सुत्पाद या संज्ञेने कार्यकारण परंपरा दर्शविली जाते. आत्मा याचा अर्थ केवळ सजीव पदार्थांच्या ठिकाणी मानला जाणारा आत्मा एवढाच नाही. आत्मा म्हणजे वेगवेगळ्या धर्माचा किंवा गुणांचा आपणास प्रत्यय येत राहतो त्यांना आधारभूत असलेला एक स्थिर केंद्रबिंदू आहे.

### ४.४ प्रश्न :

अ) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१) आर्य सत्यें .......... आहेत.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

२) तृष्णा ............. प्रकारची असते.

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

३) दुःखाचे मूळ कारण ......... आहे.

अ) उपादान ब) वेदना क) विज्ञान ड) अविद्या

४) दुःख निरोध मार्गास ........... म्हणतात.

अ) आर्य अष्टांग मार्ग ब) त्यागाचा मार्ग

क) सुखाचा उपभोग ड) ज्ञानाचा मार्ग

५) ............ हा कारण कार्यसंबंधी सिद्धांत आहे.

अ) अष्टांग मार्ग ब) द्वादश निदान क) प्रतित्यसमुत्पादवाद ड) क्षणिकवाद

६) पटिच्च म्हणजे ................ होय.

अ) विज्ञान ब) नीती क) बोध ड) अभ्यास

७) पंच ज्ञानेंद्रिये व सहावे मन या इंद्रियास मिळून ............ म्हटले जाते.

अ) उपादान ब) विज्ञान क) नामरूप ड) षडायतन

८) भगवान बुद्धांचा जन्म ......... मध्ये झाला.

अ) ५३६ इ.स.पू. ब) इ.स.पू. ५६३ क) इ.स.पू. ५६० ड) इ.स.पू. ५६५

९) आर्य अष्टांग मर्ग हा मानवासाठी ........... ध्येय प्राप्तीचा मार्ग आहे.

अ) ज्ञान ब) निर्वाबा क) सदाचार ड) यापैकी नाही

१०) सम्यक् व्यायाम हा ........... चा व्यायाम आहे.

अ) शरीर ब) मन क) संसार ड) यापैकी नाही

ब) थोडक्यात उत्तरे लिहा.

१) बौद्ध दर्शनातील चार आर्य सत्य स्पष्ट करा.

२) बौद्ध दर्शनातील आर्य अष्टांगिक मार्ग स्पष्ट करा.

३) बौद्ध दर्शनातील मध्यम प्रतिपद विशद करा.

४) बौद्ध दर्शनातील पटिच्चसमुष्पाद सविस्तर स्पष्ट करा.

५) बौद्ध दर्शनातील अनात्मवाद स्पष्ट करा.

क) टीपा लिहा.

१) चार आर्य सत्य.

२) आर्य अष्टांगिक मार्ग.

३) शील.

४) सम्यक् स्मृती.

५) सम्यक् समाधी.

६) पटिच्चसमुष्पाद.

७) अनात्मवाद.

## ४.५ संदर्भ


१. संपादक डॉ. ग. ना. जोशी, भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास खंड १ ते १२, श्रीपाद ऑफसेट, पुणे, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे, १९९४.

२. संपादक डॉ. ग. ना. जोशी, पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा इतिहास खंड १ ते ३, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर १९७८.

३. श्रीनिवास हरी दीक्षित, भारतीय तत्त्वज्ञान, फडके प्रकाशन, कोल्हापूर, भाग्यश्री मोरेश्वर फडके, सातवी २००२.

४. पां. दा. चौधरी, भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रसन्न मुजुमदार, १९७९.

५. विद्या जोशी, भारतीय व पाश्चात्त्य नीतिशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, २००४

६. वेदप्रकाश डोणगावकर, भारतीय तत्त्वज्ञान, मैत्री प्रकाशन, लातूर, २०२०

७. अनिल कठारे, बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००१.

८. प्रा. सिंधू डांगे, बौद्ध दर्शन व तत्त्वज्ञान

९. पाण्डे गोविंद चंद्र, बौद्ध धर्म के विकास का इतिहास, दिल्ली.


❑❑❑

# घटक १
# आयोनियन तत्त्वज्ञान

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२ ग्रीक तत्वज्ञानाची वैशिष्टे

१.२ आयोनियन तत्वज्ञान थेलीस

१.२ ॲनॅक्झिमेंडर,

१.२ ॲनॅक्झिमेनस

१.३ पारिभाषिक शब्द व अर्थ

१.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

१.५ सरावासाठी प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

या घटकांच्या अभ्यासाने आपणास

- ग्रीक तत्वज्ञानाची वैशिष्टे समजून घेता येतील.
- ग्रीक तत्वज्ञानाचे कालखंड समजून घेता येतील.
- थेलीस या पहिला तत्वज्ञाचे तत्वज्ञान समजून घेता येईल.
- ॲनॅक्झिमेंडरच्या तत्वज्ञानाचे स्वरूप लक्षात घेता येईल.
- ॲनॅक्झिमेनसच्या तत्वज्ञान 'वायु' तत्वाचे स्वरूप कळू शकते.

## १.१ प्रास्ताविक

**ग्रीक तत्वज्ञान :** पाश्चात्य तत्वज्ञानाच्या प्राचीन कालखंडात ग्रीक तत्वज्ञानाचा विशेषकरून उल्लेख होतो. इ.स.पू. ७ व्या शतकात ग्रीक तत्वज्ञानाचा उदय झाला. त्या आधी होमर या महाकवीची महाकाव्ये फार प्रसिध्द आणि लोकप्रिय होती. त्यानंतर तत्वज्ञानाचा कालखंड सुरू होतो. ॲनॅक्झिमेंडर, ॲनॅक्झिमेनस,

पायथागोरस, झिनोफेनिस, पार्मेनायडस, झिनो, हिरॅक्लिटस, प्रोटॅगोरस, गार्जियस, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, अशा महत्वाच्या तत्वचिंतकांनी ग्रीक तत्वज्ञान समृद्ध केले आहे.

जगाची उत्पत्ती कशी झाली या आश्चर्य भावनेतून व जिज्ञासेतून अनेक तत्वचिंतकांनी आपले विचार मांडले आहेत. यासोबतच विश्वाचे मुळ रूप काय आहे या संदर्भातही ग्रीक तत्ववेत्यांनी आपली मते प्रकट केली आहेत. तसेच या तत्वज्ञानाच्या उत्तर काळात मानवी अस्तित्व आणि बुद्धी, नैतिक जीवन या संदर्भातही प्रामुख्याने विचार झाल्याचे दिसते. म्हणूनच ग्रीक तत्वज्ञानाची वैशिष्टे लक्षात घ्यावी लागतात.

**१. विश्वकेन्द्री : विचार**

ग्रीक तत्त्वज्ञानाची सुरवात विश्वकेंद्री विचारातून झाली आहे. विश्वविषयक अनेक प्रश्नांतून त्यांचे विश्वचिंतन झाले आहे. विश्वाची निर्मिती कशी झाली? विश्वातील बदलामागे काय कारण आहे? त्याच्या निर्मिती मागे कोणते तत्त्व आहे? ती एक की अनेक आहेत? या सबंधीचा विचार ग्रीक तत्त्वज्ञानात झाला आहे.

**२. अमूर्तवादाचा आरंभ :–**

थेलीस, ॲनॅक्झिमेनस या तत्त्ववेत्यानी जल, वायू अशी एक एक तत्वे विश्वामागील कारण म्हणून सांगितली असली तरी ॲनॅक्झिमेंडरने मात्र हे तत्त्व असिम–अमर्यादित असे काहीतरी (something) सांगितले आहे. हे तत्त्वच जगाचे कारण आहे असे त्याने सांगितले आहे. यातूनच प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानात 'अमूर्त' चिंतनाकडे वाटचाल सुरु झाल्याचे दिसते.

**३. जडद्रव्य / तत्वाचा विचार :–**

ग्रीक तत्त्वज्ञानात अनेक तत्ववेत्यांनी विश्वाचे कारण जडद्रव्य आहे, असे सांगितले आहे. थेलीसने पाणी, ॲनॅक्झिमेनसने वायू, हिरॅक्लीटसने अग्नि आणि एम्पीडोक्लीस याने आप, तेज, वायू आणि पृथ्वी या चार तत्वांपासून विश्वनिर्मिती झाल्याचे सांगितले. हा विचार चार्वाकासारखाच होता. ही सर्व तत्वे जड असली तरी आत्ताच्या वैज्ञानिक अर्थाने नव्हेत. कारण त्यांनी या तत्वाकडे आध्यात्मिक दैवी म्हणून पहिले होते.

**४. रूढी–परंपरा नाकारल्या :–**

थेलीसने धर्म परंपरा लक्षात न घेता निरीक्षणावर आधारित आपले विश्वविषयक चिंतन मांडले आहे. झिनोफेनिस तर बैल, गाय, घोडा, वाघ यांना हात असते तर त्यांनी माणसांसारखी देवतांची चित्रे काढली असती. अर्थात ती स्वत: सारखीच काढली असती असे सांगतो. एका अर्थाने त्याने प्रचलित धर्मकल्पना परंपरा नाकारल्याचे दिसते.

**५. बुध्दीला महत्त्व :–**

पार्मेनायडीसच्या मते अपरिवर्तनशील नित्य असे 'सत्' या विश्वामागे आहे. त्याने या 'सत्चे' ज्ञान इंद्रियांनी होत नाही. कारण इंद्रिये ही भ्रम उत्पन्न करणारी असतात. असे सांगून सत् चे ज्ञान केवळ बुद्धीने होते. अये सांगितले आहे.याच अर्थाने बुद्धीलाही या तत्त्वज्ञानात महत्वपूर्ण स्थान आहे.

**६. मानवी अस्तित्वाला महत्त्व :-**

ग्रीक तत्त्वज्ञानात सोफिस्टापासून मानववादाची सुरुवात झाली. मनुष्य हा सर्व गोष्टींचा मापदंड आहे. असे सोफिस्ट विचारवंत प्रोटॅगोरसने म्हटले आहे. तेव्हापासून मानवी अस्तित्वाला महत्व द्यायला सुरवात झाली. यामध्ये सोफिस्टांची भूमिका काहीसी भौतिकवादी तर सॉक्रेटीसची भूमिका आध्यात्मिक अंगाने सद्गुणाने युक्त असा मानव बनवणारी होती.

**७. नैतिकतेला प्राधान्य:-**

'सद्‌गुण म्हणजे ज्ञान' Virture is Knowledge असे म्हणून सॉक्रेटिसने मानवी जीवनात क्रांती केली. माणसाला आपल्या केंद्रबिंदू मानून त्याने माणसाला सत्याचा शोध घ्यावयास सांगितले. एवढेच नव्हे तर Know thyself 'स्वत:ला ओळखा.' हा संदेश देऊन माणसाला 'माणूस' म्हणून भानावर आणले. त्याचबरोबर संतत्वाकडे जाता येते हे दाखवून दिले.

अशा तऱ्हेने ग्रीक तत्वज्ञानाची काही महत्वाची वैशिष्टे सांगता येतील.

**ग्रीक तत्वज्ञानाचे कालखंड –** हा कालखंड सुमारे नवशे वर्षाचा आहे. त्याची विभागणी सामान्यपणे तीन भागात केली जाते. कुशमन या विचारवंतज्ञच्या आधारे ही विभागती दिली आहे. ती पुढीलप्रमाणे :-

**अ) विश्वशास्त्र विषयक तत्त्वज्ञान (इ.स.पू ६२५ ते इ.स.पू. ४८०) :-**

या कालखंडात ग्रीकांचे तत्त्वचिंतन सुरू झाले. प्रामुख्याने हे चिंतन विश्वकेंद्री असे होते. आपल्याकडे वेदांमध्ये वैदिक ऋषींनी जसे निसर्ग चिंतनावर भर दिला होता. तसेच याही तत्वज्ञांनी विश्वावर लक्ष केंद्रित करून या विश्वात होणाऱ्या घडामोडी बदलांमागे किवा परीवर्तनामागे स्थिर व नित्य असे काही आहे का? किवा या परिवर्तनास कारण काय? असा प्रश्न विचारून या कारणांचा किवा तत्वांचा शोध घेण्यास सुरवात केली. सखोल असे चिंतन केले. यामध्ये विशेषत: थेलीस, ॲनॅक्झिमेंडर, ॲनॅक्झिमेनस यां तीन तत्त्वचिंतकांचा आरंभीच्या काळात समावेश होतो. यांचे तत्त्वज्ञान आयोनियन म्हणून येते. याच कालखंडानंतर एलियाटीक आणि इतरही ग्रीक तत्त्ववेत्ते झाले. झिनोफेनिस, पार्मेनायडीस, हिरॅक्लीटस, झीनो इ. तत्त्वचिंतकांनी एक-एक असे या विश्वाचे कारण सांगितले आहे. थेलीसने जल, ॲनॅक्झिमेंडरने 'अमर्यादीत' असे काहीतरी ॲनॅक्झिमेनस वायू, पार्मेनायडसने 'सत' हिरॅक्लीटसने 'अग्नि'असे कोणते तरी एक तत्त्व सांगितले आहे.

**ब) मानव विज्ञानात्मक तत्वज्ञान (इ.स.पू.४८० ते इ.स.पू.३९९) :-**

या काळात तत्त्वचिंतनाचा प्रमुख विषय मनुष्य होता. बाह्य-भौतिक जगाकडून तत्त्ववेत्यांचे लक्ष स्वतःकडे गेले. ज्या विषयाला आपण जाणले तो विषय जाणणार कोण? मी कोण? प्रश्न विचारला गेला आणि यातूनच सॉक्रेटीसने (Know Thyself) 'स्वतःला ओळखा' हा संदेश दिला. या काळात बौद्धिक चिंतन आणि आत्मचिंतनावर भर दिला गेला असे दिसते. आपल्याकडे वेदांच्या नंतर उपनिषदे येतात.

उपनिषदेही आत्मचिंतनावर भर देतात. यावरून माणूस भौतिकाकडून अभौतिक मूर्ताकडून अमूर्ताकडे कसा वाटचाल करतो हे लक्षात येते. माणूस हा सर्वांगिण विषय असल्याने 'माणूस' घडीवण्यावर भर दिला. यामध्ये सोफिस्टांचाही समावेश होतो.

**क) प्रणालीप्रधान कालखंड** :- इ.स.पू.३९९ ते इ.स.पू.३२२

या कालखंडात तत्त्वज्ञानातील विचारांची पद्धतशीर मांडणी व रचना झाली. त्यामुळे यास प्रणालीप्रधान तत्त्वज्ञान म्हणतात. डेमॉक्रीटस, ल्युसिपस, प्लेटो, ॲरीस्टॉटल इ. तत्त्ववेत्यांचा यामध्ये समावेश होतो. या कालखंडात विश्वाची उत्पत्ती कोणत्यातरी एका किवा अनेक तत्वांपासून झाली असल्याचे आणि विश्वातील सर्व गोष्टींचा 'ज्ञाता' मनुष्य आहे. असे मानून विचार केला आहे. म्हणजे विश्व आणि मानव यांचा दुहेरी अभ्यास-चिंतन यांनी सुरु केल्याचे दिसते. प्लेटोने या जगाला मूळ-सत्य जगाची पडछाया मानले आहे. त्याच बरोबर मानवी बुद्धीला महत्त्व देऊन ज्ञान व मत असा फरक करून बुद्धीने जे ज्ञान होते त्यास 'ज्ञान' म्हटले जाते.

- **आयोनियन तत्त्वज्ञान :-**

इ.स.पू.सहाव्या शतकातील ग्रीस येथील समृध्द मायलेटस या शहरात आयोनियन तत्त्वज्ञानाचा उदय झाला. शुद्ध बुद्धीने व विवेकाने विचार करणारा पहिला आयोनियन तत्त्वज्ञ थेलीसचा उदय झाला. त्याच्या सोबतच ॲनॅक्झिमेंडर, ॲनॅक्झिमेनस हे तत्वचिंतक मायलेटस या शहरात जन्माला आले. या तिन्ही तत्वज्ञांना निसर्गात होणाऱ्या सर्व विशिष्ट बदलांना आधारभूत नित्य असे एकच विश्वरुपी द्रव्य आणि ते गतिमान व चल स्वरूपाचे आहे. असे वाटत होते.

थेलीसच्या मते अंतिम वैश्विक द्रव्य 'जल' (water) हे होते. त्र ॲनॅक्झिमेंडर च्या दृष्टीकोनातून 'अमर्याद असे काहीतरी' या विश्वाचे कारण आहे. तर ॲनॅक्झिमनसच्या मते विश्वातील सर्व घडामोडीमागे 'वायू' हे तत्त्व आहे. या तिन्ही मतांचा पाश्च्यात्य विशेषतःग्रीक तत्त्वज्ञान व विज्ञान यावर प्रभाव होता. असे म्हणता येईल. या सर्व मतांचा आढवा घेऊ.

**१) थेलीस** (Thales)

थेलीसचा जन्म इ.स.पूर्व ६२४ मध्ये ग्रीक शहर मायलेटस येथे झाला. तो पाश्च्यात्य तत्त्वज्ञांनाचा जनक म्हणून ओळखला जातो. कारण त्याच्या पासूनच पाश्चात्य तत्वज्ञानाचा आरंभ झाल्याचे दिसते. थेलीस विषयी लोकांमध्ये आदर होता. त्याकाळातील सात शहाण्यांमध्ये त्याचा समावेश होतो. तो असामान्य बुद्धीचा विचारवंत होता. खगोलशास्त्र, गणित या विषयाचे त्याला सखोल ज्ञान होते. म्हणूनच त्याने इ.स.पू.५८५ मध्ये झालेले सूर्यग्रहण विषयक त्याकाळात अचूक असे भविष्यकथन केले होते. त्याला अनेक शास्त्रात गती होती. त्याने केलेले लिखान व सांगितलेले विचार उपलब्ध नाहीत पण हिरोडोटस या इतिहासकाराने त्याच्या विषयी जी माहिती लिहिली आहे त्यावरूनच त्याचे विचार कळतात. ॲरिस्टॉटलने थेलीस हा अनेक ज्ञानशास्त्रामध्ये पारंगत होता असे म्हटले आहे. ॲरिस्टॉटलने त्याचे अनेक विषयातील

विचार जगापुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे. थेलीसच्या मते पृथ्वी तबकडीसारखी असून पाण्यावर तरंगत आहे. एवढे असूनही त्याचे तात्विक विचार अत्यंत महत्वाचे मानले जातात. कारण त्याच्या तात्विक भूमिकेतूनच ग्रीक तत्वज्ञानाचा आरंभ झाला आहे.

**तत्वज्ञान**

थेलीसच्या मते सर्व वस्तुंचे आद्य व मूलद्रव्य जल हे असून या विश्वातील सर्व वस्तुंची उत्पत्ती 'जल' या तत्वापासून झाली आहे. आणि सर्व वस्तुंचा शेवटही जलातच होतो. अर्थात हा विचार आज वैज्ञानिक दृष्ट्या चुकीचा वाटत असला तरी त्याच्या मांडणीचे स्वरूप तात्विक, वैचारिक तसेच बौद्धिक होते. असे म्हणता येईल. त्याच्या आधीच्या पौराणिक व काल्पनिक अशा धार्मिक गोष्टीपेक्षा व विचारांपेक्षा निश्चितच त्याचा विचार सजग आणि वेगळा होता हे मान्य करावे लागते. त्याने काही प्रमाणात वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला होता. आपले तत्वज्ञान विषयक विचार स्पष्ट करताना अमूर्त अतिनैसर्गिक गोष्टीचा आधार न घेता नैसर्गिक शक्तींचा आधार घेतला होता. त्याने जल किंवा पाणी हे विश्वाचे आदि व मुलद्रव्य असले पाहिजे अशी भूमिका घेतली. पाणी हे मुळात अस्तित्वात असले पाहिजे. विश्वातील इतर सर्व पदार्थ पाण्यातच स्थित्यंतरे होऊन निर्माण झाले आहेत. अशी त्याची धारणा होती. त्याने पाणी हेच विश्वाचे मुलतत्व का मानले असावे? हे नेमकेपणे सांगता येत नसले तरी पाण्याचा स्वभाव अस्थिर, चंचल व गतिशील असा असतो. त्याच्यात विश्वातील बदल स्थित्यंतरे घडवून आणण्याचे सामर्थ असते हे जाणले असावे व त्यातूनच त्याने आपले विचार मांडले असावेत.

पाण्याचे रुपांतर बाष्पात किंवा वाफेत होत असते शिवाय घनिभवन होऊन त्यापासून वर्फही बनत असतो. ॲरिस्टॉटलचे मते थेलीसला पाणी हे विश्वद्रव्य आहे असे वाटले त्याचे कारण पाण्याने सर्व गोष्टींचे पोषण होत असते. प्राणी जीवनाला पाण्याचा फार मोठा आधार असतो. तसेच सर्व वस्तुंच्या गोष्टींच्या बिजामध्ये आर्दता असते व ते सर्व शक्तींच्या निर्मितीचे कारण असते. सुर्य उष्णतेने पाण्याची वाफ करून ते शोषून घेतो, त्याचे ढग बनतात पुन्हा पावसाच्या रूपाने ढगातील तेच पाणी जमिनीवर पडते. वनस्पतीचे पोषन व वाढ होते. धान्य, फळे, भाजी त्यापासून तयार होतात व जिवंत प्राण्यांना त्याच्या जगण्यासाठी उपयुक्त ठरतात. हे निसर्गातील चक्र पाहून थेलीसला पाण्यात मूलतत्व जाणवले असले तर ते चुकीचे नाही असे म्हणता येईल. थेलीसचे हे पाण्याचे तत्वज्ञान आज पोरकट वाटले तरी थेलीसच्या विचाराला एवढे महत्व का द्यावे? किंवा तत्वज्ञ का म्हणावे? त्याचे कारण थेलीसने आपल्या चिंतनातून या विश्वाचे आदिकारण कोणत्या तरी नित्य, शाश्वत, अपरिवर्तनीय तत्वात असले पाहिजे, असे सांगितले, या विचारात आहे. यातून सर्व गोष्टींची निर्मिती झाली असली पाहिजे असा विचार वैज्ञानिक वृत्तीकडे नेणारा आहे हे येथे महत्वाचे आहे. शिवाय अमूर्त अशा मुलतत्वाचा विचार करायला भाग पाडणारा म्हणून ते तत्वचिंतनही आहे. तत्वचिंतनाचा हा आरंभ आहे. आणखी एक महत्वाची गोष्ट ती ही की परिवर्तन किंवा बदल ही अनुभवातील गोष्ट म्हणून या विचारवंतांनी गृहीत धरली व त्यामागे नित्य एकच गोष्ट असली पाहिजे असे विचार मांडून दोन विश्वाची कल्पना मांडली आणि तत्व चिंतनाला सुरुवात झाली. अनुभवातील जग आणि

अनुभवाच्या पलीकडचे जग अशी दोन विश्वे या तत्वचिंतकांनी मानली नसली तरी ती त्यातून अप्रत्यक्षपणे मानल्याचे दिसते.

थेलीसच्या मते सर्व पदार्थ देवांचे केलेले आहेत. "All things are made of gods'. अर्वाचीन शास्त्रज्ञ जसे सर्व पदार्थ ईथरपासून होतात असे म्हणतात. म्हणून थेलीसचे जला बद्दलचे तशा प्रकारचे मत आहे असे म्हणता येईल. थेलीसच्या मते जगातील प्रत्येक पदार्थात ईश्वरी शक्ती आहे व तिच्या अस्तित्वाने त्या पदार्थांचे अस्तित्व असते. पदार्थातील शक्ति ईश्वरी आहे. किंबहुना दैवी शक्ती जगात सर्वत्र वास करीत आहे. त्याच्या मते पदार्थांना जीव व आत्मा आहे. लोहचुंबकात आत्मा असल्याने ते लोखंडाचे आकर्षण करते. या मताला Hylopsychism असे म्हणतात. जड देव आणि आत्मा एकच आहे असा या शब्दाचा अर्थ होतो. यातून निसर्ग हाच देव होय असे ध्वनित होते. म्हणून हा निसर्ग धर्म आहे असे म्हणता येईल.

**ॲनॅक्झिमेंडर** (Anaximanadar)

ख्रि.पू. ६१०-५४५

ॲनॅक्झिमेंडरचा जन्म मायटेलस येथे इ.स.पू. ६१० मध्ये झाला. हा थेलीसचा एक शिष्य होता. तो भूगोल व खगोल शास्त्राचा अभ्यासक असून त्याने विश्व उत्पत्तीचा अभ्यास केला होता. त्याचे लेखन त्रोटक स्वरूपात उपलब्ध आहे. त्याने या विषयावर लेखन केले होते. 'On Nature' हा त्याचा ग्रंथ होता. पण त्याचा आता मागमूस लागत नाही. पण त्यातील विचार अल्प स्वरूपात असे काही उपलब्ध आहेत. पहिला ग्रीक ग्रंथकार म्हणून त्याचा उल्लेख होतो. ॲनॅक्झिमेंडर वर म्हटल्याप्रमाणे जसा भूगोल व खगोलाचा अभ्यास होता तसाच त्याचा विश्व उत्पत्ती विषयक अभ्यास होता. त्याने पृथ्वी व आकाश यांचे नकाशे काढले होते. तसा प्रयत्न यापूर्वी कोणी केला नव्हता.

त्याला पृथ्वी तबकडीसारखी आहे हे थेलीसचे मत मान्य नव्हते. त्याच्या मते सर्व बाजूंनी पृथ्वी आकाशापासून समांतर आहे व म्हणून ती स्थिर आहे. असे त्याचे मत होते. विशेष म्हणजे ॲनॅक्झिमेंडरने पृथ्वीच्या ठिकाणी आकर्षणशक्ती (Gravity) आहे हे सांगितले होते. त्याचे आणखी एक महत्वाचे मत होते की, स्थिर पदार्थ बाह्य अशा प्रेरणेशिवाय स्थिरच राहतो. त्याला गती असल्यास तिच्या वेगात फरक होत नाही. तात्पर्य पदार्थ मुळात जड (Nnert) असतो म्हणून याला 'Law of Inertia' असे म्हणतात.

ॲनॅक्झिमेंडरचे सृष्टीच्या निर्मितीविषयीचे विचार थेलीस पेक्षा वेगळे होते. ग्रीक कवी हिसिआडने आपल्या काव्यात विश्व उत्पत्ती विषयक विचार मांडले आहेत. तो म्हणतो की, अव्यस्थित, व आकारहीन अशा काहीतरी अमर्याद द्रव्यापासून विश्वाची उत्पत्ती झाली आहे. हे मुलतत्व नेमके काय असावे हे लक्षात घेऊन थेलीसने ‘जल’ तत्व हे विश्वाचे कारण सांगितले. त्याचे हे मत ॲनॅक्झिमेंडर यास मान्य नव्हते. ‘जल’ या एकाच तत्त्वातून विविध गुणधर्म असलेले पदार्थ कसे उत्पन्न झाले. खरे तर ‘जला’ प्रमाणे इतरही पृथ्वी, वायु, अग्नि असे काही पदार्थ जलाची बरोबरी करू शकतात. त्यामुळे त्यातील कोणतेही एकच न घेता या सगळ्यांहून भिन्न पण सर्वांना सामावणारे असे एकच मुलतत्व असले पाहिजे. या तत्वाला त्याने असीम

'Boundless something' असे नाव दिले. 'किमामि अनवच्छीन्नम' असे ते होते. हे तत्व 'ब्रह्मा' सारखे आहे. विश्व व त्यातील घटकांची उत्पत्ती त्याच्यापासून झाली. पण 'ते' कसे झाले? याबाबत मात्र तो निरुत्तर आहे.

जे काही आहे ते 'अमर्यादित काहीतरी' पासून झाले. ते जेथून उत्पन्न होते तेथेच ते पुन्हा विलीन होते. कारण विश्वातील पदार्थ काळाच्या नियमनाप्रमाणे एकमेकांच्या नुकसानीची भरपाई करून देऊन एकमेकांना समाधान देतात. ॲनॅक्झिमेंडरचे हे तत्व जड आहे. एकाच सोन्यापासून अनेक अलंकार किंवा एकाच मातीतून अनेक वस्तू बनतात तसे या तत्वातून जगामधील सर्व गोष्टी निर्माण झाल्या. त्याचे मुलभूत तत्त्व अमर्यादित, शक्तिमान व अनंत आहे. तेच फक्त दैवी आहे. इतर देव देवता खालच्या स्तरावर असतात. जन्म मृत्यू त्यांनाही होतो. असे त्याचे मत होते. फक्त 'सततत्व'च (अमर्यादित असे काहीतरी) तेवढे अनंत होय. ब्रह्माचे स्वरूप जसे सांगितले जाते तसे या तत्त्वाचे स्वरूप आहे.

त्याच्या मते हे मुलभूत तत्व अनंत अमर्याद नसते तर निर्मितीचे कार्य घडता घडता ते स्वत: च संपुष्टात आले असते. ते तत्व अनादि, अविनाशी व सतत गतिमान असे आहे. ॲनॅक्झिमेंडरचे हे अमर्याद, निराकार, जड सततत्व थेलीसच्या पुढची पायरी आहे. असे म्हटले जाते.

**प्राणी सृष्टी कशी निर्माण झाली?**

याबाबतीत तो म्हणतो आरंभी पृथ्वी जल स्वरूपात त्यानंतर सूर्याच्या उष्णतेने पाण्याची वाफ होऊन समुद्र व जमीन उत्पन्न झाली. त्यानंतर समुद्रात मासे उत्पन्न झाले. त्यानंतर माश्यांपासून त्यासारख्या प्राण्यांपासून जमिनी वरील प्राणी उत्पन्न झाले. मानवाचे आदिपुर्वज माशाच्या पोटातून जन्मले व नंतर ते स्वावलंबी झाल्यावर जमिनीवर आले. ॲनॅक्झिमेंडरचा हा विचार आधुनिक उत्क्रांतीवादाची चाहूल होती. म्हणून ॲनॅक्झिमेंडरला उत्क्रांतीच्या विचाराचा जनक म्हणता येईल. आपली पुराणातील दशावतार कल्पना अशीच आहे.

पृथ्वी, जल, अग्नि आणि वायू याहून हे तत्व वेगळे असून ही चार तत्वे सान्त/मर्यादित आहेत. त्यांच्यात परस्परांच्यात संघर्ष आहे. जर या तत्वांमधील कोणते तरी एक द्रव्य जर अनंत असेल तर अन्य द्रव्यांची (पृथ्वी, आप इ.) सत्ता राहिली नसती. म्हणून या चार द्रव्याहून वेगळे तत्व मानावे लागते, की जे यांचा आश्रय/आधार बनू शकेल. या परमतत्वाला त्याने 'असीम' 'अमर्याद' (Apeiron or The Boundless ) असे म्हटले आहे. या पासून सर्व भूतांची निर्मिती होते. यातच ते स्थिर होतात आणि यातच ते विलीन होतात. ते स्वत: मात्र अपरिणामी, अगतिशील आहे.

**ॲनॅक्झिमेनस**

हा थेलीस व ॲनॅक्झिमेंडर या तत्वचिंतकाप्रमाणेच मायलेटस येथेच जन्मला होता. त्याचा कालखंड इ.स.पूर्व ५८८ ते इ.स.पूर्व ५२४ असा होता. ॲनॅक्झिमेनसचे जे तत्वज्ञान आहे, ते विशेषत: ॲरिस्टॉटल

यांनी जतन केले त्यांच्या मतानुसार मायलेसीयन संप्रदायातील ॲनॅक्झिमेनसच्या जीवनाबद्दल व कार्याबद्दल फारशी माहिती मिळत नाही त्याचे सर्व ग्रंथ हरवले आहेत.

ॲनॅक्झिमेनसने थेलीस व ॲनॅक्झिमेंडर प्रमाणेच विश्वाचे मुलभूत तत्व शोधण्याचा प्रयत्न केला. या दोघांइतका तो मोठा विचारवंत नव्हता. पण त्याचे निरीक्षण सूक्ष्म होते. त्याच्या मतानुसार मुलभूत तत्व वायु होय. तो म्हणतो जे आपल्या शरीरात आत्मा या नावाने असते, व आपल्या शरीराचे तत्व असते, तेच संपूर्ण विश्वाचे संघटन करते. "That which is our soul and constitutive principle, also holds the univers together'. ज्याप्रमाणे वायुने युक्त आत्मा शरीराची धारणा करतो त्या प्रमाणे वायु जगाची धारणा करतो. अर्वाचीन काळात हा विचार जडवादी वाटतो. पण पूर्वी भौतिक व अध्यात्मिक असा फरक नव्हता. त्यामुळे त्याकाळात त्याची भूमिका दैवी होती, असे म्हटले जाते. त्याच्या मते या विश्वाचे मुलतत्व भौतिक आहे. तरीपण थेलीस चे 'जलतत्व' आणि ॲनॅक्झिमेंडरचे 'अमर्यादित असे काहीतरी' हे या विश्वामागील तत्व आहे. हा विचार त्याने नाकारला आणि विश्वाचे मूलद्रव्य हे वायु आहे, असे त्याने म्हटले आहे. वायुने संपूर्ण विश्व व्यापले आहे. तो चंचल अस्थिर व गतिमान असतो एवढेच नव्हे तर त्याच्या ठिकाणी गती व हालचाल करण्याचे सामर्थ्य आणि प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीमुळे वायूपासून जगाचा विकास झाला आहे. असे ॲनॅक्झिमेनसचे मत आहे.

त्याने विश्वातील विकास प्रक्रियेचे दोन भाग केले आहेत.

१) विरलीभवन (Rarefaction) उष्णतीभवन

२) घनीभवन (Condensation) थंड होणे

हवा, वायु विरल झाल्यावर तिचे अग्नीत रुपांतर होते व नंतर त्यापासून तारे बनतात. याउलट हवेचे घनीभवन प्रक्रियेने मेघांमध्ये रुपांतर होते व क्रमाने तीचे जल, पृथ्वी पाषाणात रुपांतर होते.

ॲनॅक्झिमेनसच्या मते आपला आत्मा वायुमय आहे. तो जसा आपला शरीराला व्यापतो त्याप्रमाणे हवा संपूर्ण जगाला व्यापून राहते. त्याच्या मते पृथ्वी ही सपाट असून गृहताऱ्यासहित हवेत तरंगत असते. पृथ्वी ही तबकडीसारखी आहे व तिला अवकाशाने टोपीसारखे व्यापले आहे.

ॲनॅक्झिमेनसने काहीसी थेलीससारखी भूमिका घेतली आहे. थेलीसने 'जल' तत्व मानले तर त्याने 'वायु' हे तत्व मानले. त्याची ही भूमिका ॲनॅक्झिमेंडरपेक्षा अधिक स्पष्ट आहे. ॲनॅक्झिमेंडरचे तत्व निर्गुण व निराकार असल्याने त्यापासून जग निर्मिती कशी होते हे स्पष्ट होत नाही. याउलट ॲनॅक्झिमेनस जगाच्या निर्मितीला कारण असलेल्या विरलीभवन व घनीभवन या प्रक्रिया स्पष्ट करतो. घनीभवनाने जडपणा, टणकपणा येतो तो पाषाणरुपात अनुभवाला येतो तर विरलीभवनाने हवेचा दाब कमी होतो व परिणामी आकारमान वाढते. मऊपणा, हलकेपणा हे गुण व्यक्त होतात. यावरून ॲनॅक्झिमेंडर पेक्षा ॲनॅक्झिमेनस हा अधिक तर्कनिष्ठ व निश्चित विचारांचा तत्वज्ञ होता असे म्हणता येते. त्याची भूमिका शास्त्रीय व तात्विक दृष्ट्या महत्वाची आहे.

त्याच्या मते विश्वनिर्मिती होत असताना प्रथम पृथ्वी उत्पन्न झाली ती टेबलासारखी सपाट असून तिच्यावर हवा राहू शकते. तिच्यातून निघणाऱ्या वाफा उष्णतेने अग्निरूप झाल्या. त्यातील काही वाफांनी हवेच्या दाबामुळे तारकांचे रूप घेतले. त्यांचा आकारही पृथ्वीसारखा असून त्या हवेत तरंगत असून तिच्या भोवती फिरत असतात. चंद्र हा परप्रकाशी असून त्याला सूर्यापासून प्रकाश मिळतो हे सत्य त्यानेच प्रथम सांगितले. ग्रहणाची कारणेही त्यानेच सांगितली आहेत.

छांदोग्य उपनिषदात एका ऋषीने वायु हेच तत्व सांगितले आहे. त्याच्या मते वायुच सर्वांना आपल्यात समाविष्ट करतो. अग्नि, पाणी, चंद्र, सूर्य या सर्वांना वायुच ग्रासून टाकतो. असे हे वायु तत्व विश्वाचे मुलतत्व आहे. उपनिषदातील हे मत ॲनॅक्झिमेनस सारखेच आहे.

**सारांश**

या विश्वाचे अंतिम स्वरूप, आदिद्रव्य व मुलतत्व काय आहे? या मुलभूत प्रश्नाने आयोनियन तत्वज्ञान उदयाला आले. त्यांनी या प्रश्नाला काय आणि कोणते उत्तर दिले याला फारसे महत्त्व नाही. शिवाय ते द्रव्याची शाश्वतता, अविनाशित्व गृहीत धरतात. त्यांच्या मते आपण ज्या जगात राहतो तेवढे फक्त एक जग आहे. जरी ते काहीसे भौतिकवादी होते तरी त्यात अध्यात्मिकता होती. त्या तत्वांचे स्वरूप (वायु, जल, काहीतरी ही तत्वे) दैवी मानल्याचे दिसते. या तत्त्वज्ञांनी सॉक्रेटिस पूर्व तत्वज्ञानाची पायाभरणी केली. शिवाय त्यांच्या विचाराने विज्ञानाची वाढ होण्यास मदत झाली.

## १.३ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

१) अमुर्त - अभौतिक किंवा न दिसणारे इंद्रिय अनुभवाला न येणारे

२) अतिनैसर्गिक - निसर्गापलीकडचे, अभौतिक

३) Boundless something - अमर्यादित काहीतरी, नावरहित, सृष्टीमागील तत्व

४) द्रव्य - मुलतत्व, तत्व

५) विरलीभवन - उष्णतीभवन, अग्नित रुपांतर होणे.

६) घनीभवन - शितलीकरण थंड होण्याची प्रक्रिया

## १.४ स्वयंअध्ययानासाठी प्रश्न

**अ) योग्य पर्याय निवडा**

१) ग्रीक तत्वज्ञानची सुरुवात ............ विचारातून झाली.

अ) विश्वकेंद्री ब) मानवकेंद्री क) ईश्वरकेंद्री ड) प्रणालीप्रधान

२) मनुष्य हा सर्व गोष्टींचा मापदंड आहे हे ............ या तत्व चिंतकाचे मत आहे.

अ) प्लेटो ब) साक्रेटीस क) प्रोटॅगोरस ड) गार्जियस

३) ………… ने ग्रीक तत्वज्ञानाची विभागणी तीन भागात केली आहे.

अ) कुशमन ब) हिरोडोटस क) प्लेटो ड) ॲरिस्टॉटल

४) ग्रीक तत्वज्ञानाचे सामान्यपणे ………… कालखंड होतात.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

५) थेलीसने ………… मूलद्रव्य मानले.

अ) वायु ब) आकाश क) अग्नि ड) जल

६) ………… हा ग्रीक तत्वज्ञानाचा जनक आहे.

अ) थेलीस ब) ॲनॅक्झिमेंडर क) ॲनॅक्झिमेनस ड) झिनो

७) ………… ने Boundless something हे मूलद्रव्य मानले आहे.

अ) थेलीस ब) ॲनॅक्झिमेंडर क) ॲनॅक्झिमेनस ड) प्लेटो

८) ॲनॅक्झिमेंडरचे मूलद्रव्य ………… असे काहीतरी आहे.

अ) अमर्यादित ब) मर्यादित क) शाश्वत ड) नित्य

९) ॲनॅक्झिमेनसने ………… हे विश्वाचे मूलद्रव्य मानले.

अ) आप ब) तेज क) वायु ड) आकाश

१०) ॲनॅक्झिमेनसच्या मते घनिभवनाने वस्तुंच्या ठिकाणी ………… येतो.

अ) मऊपना ब) टणकपणा क) ठिसूळपणा ड) हलकेपणा

प्रश्न : थोडक्यात उत्तरे लिहा.

१) ग्रीक तत्वज्ञानातील विश्वशास्त्रीय कालखंडाचे स्वरूप थोडक्यात लिहा.

२) प्रणालीप्रधान कालखंडाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

३) घनीभवन आणि विरलीभवनाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

४) थेलीसच्या 'जल' तत्वाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

५) ॲनॅक्झिमेनसचे 'वायु' तत्व स्पष्ट करा.

६) 'अमर्यादित' असे काहीतरी हे तत्व स्पष्ट करा.

प्रश्न ३ टिपा लिहा.

१) प्रणालीप्रधान कालखंड

२) विश्वशास्त्रीय कालखंड

३) मानवकेंद्री कालखंड

४) ग्रीक तत्वज्ञानाची वैशिष्टे

५) विरलीभवनाची प्रक्रिया

६) घनीभवनाची प्रक्रिया

७) थेलीसचे जलतत्व

प्रश्न ४ दीर्घोत्तरी प्रश्न

१) ग्रीक तत्वज्ञानाचे स्वरूप आणि कालखंड स्पष्ट करा.

२) ग्रीक तत्वज्ञानाची वैशिष्टे स्पष्ट करा.

३) थेलीसचे तत्वज्ञान स्पष्ट करा.

४) ॲनॅक्झिमेंडरचे 'अमर्यादित असे काहीतरी' या तत्वाचे स्वरूप स्पष्ट करा.

५) ॲनॅक्झिमेंनचे विश्वाचे मुलतत्व म्हणून 'वायु' तत्व स्पष्ट करा.

**संदर्भ**


१) ग्रीक तत्वज्ञान तुळपुने - गो.वि. चित्रशाळा प्रकाशन, पुणे-

२) युरोपिय तत्वज्ञानाचा इतिहास - वा.पु. पटवर्धन, व्हीनस प्रकाशन, पुणे.

३) पाश्चात्य तत्वज्ञानाचा इतिहास - खंड -१ डॉ.ग.ना. जोशी, पुणे.

४) पाश्चात्य तत्वज्ञानाची रूपरेखा - माधवि कवि, ई.आर. मठवाले, क्रीयेटिव्ह पब्लिकेशन, नांदेड.

५) तत्वज्ञानाची ओळख - डॉ. वेदप्रकाश डोणगावकर, श्री. प्रकाशन, वाशिम.


❑❑❑

# घटक २
# एलियाटिक तत्त्वज्ञान

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ i) पारमेंनाइडस्ची सद्वस्तुविषयक उपपत्ती

ii) पारमेंनाईडस्चा अस्तित्वाचा सिद्धांत

२.२.२ i) झीनोचे तत्त्वज्ञान आणि द्वंद्वात्मक पद्धती

ii) झीनोचे युक्तीवाद (paradoxes)

iii) इंद्रियाच्या भ्रामकतेवर केलेली झीनोची मांडणी

२.२.३ i) हिरॅक्लीटसचा संतत प्रवाहवाद

ii) सोफिस्ट तत्त्वज्ञान

२.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययनातील प्रश्नांची उत्तरे

२.६ सारांश

२.७ सरावासाठी स्वाध्याय


## २.० उद्दिष्टे

१. या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास एलियाटिक संप्रदायाबद्दल माहिती मिळते.

२. या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पार्मेनाईडच्या सदवस्तू विषयक सिद्धांत समजेल.

३. झीनोचे तत्त्वज्ञान व द्वंद्वात्मक पद्धती विषयी माहिती मिळेल.

४. झीनोचे युक्तिवाद लक्षात येतील.

५. झीनोने इंद्रियांच्या भ्रामकतेवर केलेली मांडणी याविषयी माहिती मिळेल.

६. हिरॅक्लीटसच्या संतत प्रवाहवाद याविषयी माहिती मिळेल.

## २.१ प्रास्ताविक

### १. एलियाटिक संप्रदाय:

हा संप्रदाय ग्रीक तत्त्वज्ञानातील एक महत्त्वाचा संप्रदाय होता. जो मुख्यत्वे इटली मधील एलिया शहराशी संबंधित होता या संप्रदायातील विचारवंतांनी अस्तित्व, वास्तविकता आणि बदल या विषयावर आपले विचार मांडले. त्यामुळे तत्वज्ञानाला एक नवीन दिशा मिळाली पार्मेनाईड हा एलियाटीक संप्रदायाचा संस्थापक मानला जातो. त्याचा मुख्य विचार असा आहे की ''अस्तित्व आहे आणि नसते. अस्तित्व असू शकत नाही''. याचा अर्थ असा की कोणताही बदल किंवा निर्मिती ही भ्रम आहे. कारण सत्य स्वरूप बदलत नाही. त्याने हे देखील सांगितले की, इंद्रियानुभवाला नश्वरता आहे आणि खरे ज्ञान फक्त तर्कावर असू शकते. इलियाटिक तत्त्वज्ञानाची प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

### १. अचलता आणि अपरिवर्तनीयता

एलियाटिक तत्त्वज्ञ मानतात की, खरे अस्तित्व स्थिर, अचल आणि अपरिवर्तनीय आहे. जे काही बदलते ते खरे अस्तित्व नाही तो फक्त भास आहे.

२. तर्कशक्तीचे महत्व : या संप्रदायाने तर्काला इंद्रियानुभवापेक्षा अधिक महत्त्व दिले. ते मानतात की, ज्ञानाचे खरे कारण तर्कशक्ती आहे कारण इंद्रियांनी मिळवलेले ज्ञान फसवे असू शकते.

३. मायावादी दृष्टिकोन : त्यांचे तत्त्वज्ञान काही प्रमाणात मायावादी आहे कारण त्यांना असे वाटते की विश्वात जे काही बदल होतात तो एक भास आहे आणि तो वास्तव नसून तर्काच्या आधारे समजता येणाऱ्या सत्याशी विरोधाभाषी आहे.

एलियाटिक संप्रदायाने तात्विक तर्कांना अधिक महत्त्व दिले आणि पश्चिमी तत्त्वज्ञानाच्या इतिहासावर खोलवर प्रभाव टाकला.

२. **पार्मेनाइडस :** पार्मेनाइडस आणि झीनो हे समकालीन एलियाटिक संप्रदायाचे तत्त्वज्ञ, विचारवंत होत. पार्मेनाइडचा जन्म एका श्रीमंत सरदार घराण्यात ख्रिस्त पूर्व ५४० मध्ये झाला पार्मेनाईडसची अधिक माहिती उपलब्ध नाही. उपलब्ध माहितीनुसार पार्मेनाईड झिनोच्या समकालीन होता. तसाच तो झीनोचा गुरु होता. हे दोघेही एलीयाचे रहिवासी होते. पार्मेनायडिसच्या विचारावर पायथागोरसच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. पार्मेनाईड राजकारणात सहभाग घेत असे त्याने एलियासाठी कायद्याची नियमावली तयार केली. पार्मेनाईड तत्त्वज्ञ, राजकारणी व उत्तम खेळाडू होता त्याने ख्रिस्त पूर्व ५०४ ते ५०१ या चतुर्वर्षीय ओलंपियाड मध्ये सहभाग घेतल्याची नोंद आहे. पायथागोरिअन पंथातील दोन तत्त्वज्ञ पार्मेनाईडच्यासचे गुरु होते पैकी अमिनियास या गुरुने त्यांच्यात तत्त्वज्ञानाची आवड निर्माण केली. राजकारणात न पडता तत्त्वज्ञानाला वाहून घेण्याविषयी त्यांचे मन वळवले तर दुसरे गुरु डायाकेटीस यांच्या विषयी पार्मेनाईडला अपार आदर होता त्याच्यासाठी त्याने त्यांचे देऊळ बांधले मात्र समकालीन हिरॅक्लीटसच्या तत्त्वज्ञानाला त्याचा विरोध होता.

३. **झीनो:** पार्मेनाइडसचा, कट्टर समर्थक होता. झीनोने पार्मेनाईडच्या विचारांचा जोरदार प्रचार व प्रसार केलेला दिसतो. झीनो हा इलियाटिक संप्रदायाचा तिसरा तत्त्वज्ञ होय. त्याचा जन्म एलियामध्ये ख्रिस्त पूर्व ४८९ मध्ये झाला. त्याचे व्यक्तिमत्व अत्यंत रुबाबदार होते. आपल्या गुरुप्रमाणेच त्याला राजकारणाची आवड होती. सत्ताधारी लोकांच्या विरोधी उभारलेल्या कटामध्ये सहभागी झाल्याने त्याचा अनन्वित छळ करण्यात आला व त्यातच त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे एलियाटिक लोकांच्या मनामध्ये त्याच्याविषयी आदराची भावना बघायला मिळते. झीनो जन्मजात कुशाग्र बुद्धीचा तसेच लढवय्या होता तसेच तो उत्तम वादविवादपट्टू होता. त्याची ही पद्धती वैशिष्ट्यपूर्ण होती म्हणून तिला द्वंद्वात्मक पद्धती म्हणत. त्याने स्वतंत्र असे तत्त्वज्ञान सांगितले नसले तरी पार्मेनाईडच्या तत्त्वज्ञानाला जोरदार समर्थन देत असताना तत्त्वज्ञान विज्ञान आणि गणितातील विचार प्रवाहाला नवी दिशा दिली.

४. **हिरॅक्लीटस:** पार्मेनाईडच्या समकालीन असलेला हा तत्वज्ञ. त्याचा जन्म आशिया मायनर मधील एफेसस मध्ये एका राजघराण्यात ख्रिस्त पूर्व ५३५ मध्ये झाला. त्याने राजपद नाकारले असले तरी तो राजकारणात सक्रिय सहभाग घेत असे. हिरॅक्लीटस स्वातंत्र्य प्रेमी होता निसर्गाचे व एकांतवासाचे आकर्षण होते. स्वभावाने तो आत्मप्रौढी होता तो कोणाचेही शिष्यत्व मान्य करत नसे किंवा कोणालाही गुरु मानण्यास तो तयार नव्हता. सामान्य माणसाकडे तो अत्यंत तिरस्काराने पहात असे त्याची काही वचने अत्यंत धारदार व तिखट होती तीपुढील प्रमाणे. 'गाढवे सोन्यापेक्षा गवतच अधिक पसंत करतात'.

'कुत्री ज्यांना ओळखत नाहीत त्यांच्याच अंगावर भुंकतात'.

'माणसांना जे जे हवे से वाटते ते ते सर्व मिळणे चांगले नसते'.

'आजारामुळे आरोग्य, दुरितामुळे शिव, भुकेमुळे समृद्धी व थकव्यामुळे विश्रांती गोड वाटते.'

'माणसाचे चारित्र्य हे त्याचे नशीब असते.'

## २.२ विषय विवेचन

१. Theory of Being पार्मेनायडिस सदवस्तू विषयक सिद्धांत (उपपत्ती)

पार्मेनायडिसचे विचार हिरॅक्लीटसच्या गतिमानतेच्या सिद्धांता विरुद्ध आहेत किंबहुना हिरॅक्लीटसच्या परिवर्तन सिद्धांताला विरोध करण्यासाठी त्याने अस्तित्वाचा सिद्धांत म्हणजे गती व परिवर्तन यांच्या विरोधात मांडलेले तत्त्वज्ञान आहे.

पार्मेनायडिसच्या विचारांचा उगम गतिमान वस्तूच्या निरीक्षणातून झाला आहे. त्याच्यामते आपण ज्या जगाचा अनुभव घेतो ते जग प्रत्येक क्षणी बदलत असते. जगातील प्रत्येक वस्तू अस्तित्वात येते व त्या वस्तूचा अंतही होत असतो. पार्मेनाइड च्या मते जे सत् आहे त्यालाच अस्तित्व आहे त्याचाच फक्त विचार करता येतो किंवा त्याच्या विषयी काहीतरी सांगता येते जे असत् आहे त्याला अस्तित्व नाही त्याचा विचार करता येत नाही. दुसरे असे की सत्य पूर्वी अस्तित्वात नव्हते असे नाही ते अनादी आहे अंतही नाही त्याची स्थिती गीतेत वर्णिलेल्या आत्म्यासारखी आहे. या विधानावर त्याचा एवढा दृढ विश्वास होता की त्याला हे

सत् सर्वस्वी अचल व अविकारी वाटे. त्याच्यामते एखाद्या पदार्थाचा रंग पालटला किंवा पदार्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी गेला तर तो पदार्थ पूर्वी होता त्याच्या जागी नवीन आला आहे असे मानणे आवश्यक आहे तसे न मानल्यास सत् व असत् एकच होतील. या अस्तित्वाच्या मूळ नियमाचा भंग होईल. पार्मेनाइडस् सत् नूसते मर्यादित म्हणून थांबत नाही तर ते पूर्ण गोलाकार केंद्रापासून सर्वत्र सारखे पसरले आहे असे तो म्हणतो त्याचा हा विचार दृश्य विश्वाला (भौतिक विश्वाला) लागू पडतो. पार्मेनाईडस सत् चे गुण सांगताना अवकाशाचे/पोकळीचे गुण सांगतो. तो म्हणतो की अवकाश सर्वत्र पसरलेले अखंड, एकजात अविकारी आहे.

**२. अस्तित्वाचा सिद्धांत : ''शून्यातून कशाचीही निर्मिती होऊ शकत नाही.''**

Ex nilo fil

Out of nothing nothing comes 'शून्यातून कशाचीही निर्मिती होऊ शकत नाही' या तत्त्वावर पार्मेनायडिस अस्तित्वाचा सिद्धांत आधारित आहे.

पार्मेनायडिसचे विचार हिरॅक्लीटसच्या गतिमानतेच्या विरुद्ध आहेत. हिरॅक्लीटसच्या परिवर्तन सिद्धांताला विरोध करण्यासाठी त्याने अस्तित्वाचा सिद्धांत मांडला. अस्तित्वाचा सिद्धांत म्हणजे गती व परिवर्तन याच्या विरोधात मांडलेले तत्वज्ञान होय. पार्मेनायडिसच्या विचारांचा उगम गतिमान वस्तूंच्या निरीक्षणातून झाला आहे. त्याच्यामते आपण ज्या जगाचा अनुभव घेतो ते जग प्रत्येक क्षणी बदलत असते. जगातील प्रत्येक वस्तू अस्तित्वात येते व तिचा शेवटही होतो. त्याच्यामते अस्तित्व (being) सद्वस्तू व संभवन (becoming,) या दोन्हीमध्ये सारखा विरोध असतो मात्र त्याचे अस्तित्व कशावरही अवलंबून नसते पार्मेनाईड्च्या सिद्धांताचे स्पष्टीकरण करताना असे म्हटले जाते की, जर अस्तित्वाला आरंभ आहे असे मानले तर आरंभ कशापासून तरी होत असला पाहिजे ज्याच्यापासून अस्तित्वाचा आरंभ होतो तो भावरूप (in the form of being) किंवा अभावरूप (in the form of becoming) असले पाहिजे अस्तित्वाला कोणत्याही काळाची भाषा लागू पडत नाही. अस्तित्व शाश्वत व कालातीत आहे. अस्तित्वाचे विभाजन करता येत नाही अस्तित्व अचल व अभेद्य आहे. पार्मेनाईट्सने अस्तित्वाच्या संदर्भात संवेदन व बुद्धी या दोन कल्पना मधील फरक स्पष्ट केला आहे. त्याच्यामते या भासमान जगाचा आपणास संवेदनाने प्रत्यय येतो. आपली ज्ञानेन्द्रिय भ्रम, भास व प्रमादाचे उगमस्थान आहेत. सत् किंवा वास्तव ज्ञान मात्र बुद्धीलाच होऊ शकते. Hegel, Erdmann या तत्त्वचिंतकाच्या मते पार्मेनाईड चीद्वादी (idealistic) आहे तर प्रोफेसर बरनेट यांच्या मते पार्मेनाईड जडवादी (materialistic) विचारांचा आहे पार्मेनाईडच्या अस्तित्वाचा सिद्धांत त्याने वास्तवता व अभ्यास (reality and appearance) यात फरक आहे. त्याच्यामते हे दृश्य विश्व म्हणजे (physical universe) केवळ आभास (appearance) भ्रम आहे. खरे अस्तित्व (being or reality) हे ज्ञानेंद्रियांना कळू शकत नाही. ज्ञानेंद्रियांना वस्तूचे मूलभूत स्वरूप समजू शकत नाही उदाहरणार्थ शिंपला पाहून त्याला मोती समजले जाते. अंधारात दोरीला साप समजले जाते म्हणजेच आपली ज्ञानेन्द्रिय आपल्याला फसवतात बुद्धीद्वारे मात्र अशी फसगत होऊ शकत नाही.

### २.२.२ झीनो

**१. झीनोचे तत्त्वज्ञान**

झीनोने स्वतः तत्त्वज्ञानात कोणतीच भर घातलेली नाही. त्याचे कार्य अभावात्मक आहे. पार्मेनाइडस्च्या सिद्धांताचा जोरदार पुरस्कार करून त्याला पाठिंबा दिला. त्याने काढलेले निष्कर्ष नवीन व विशेष महत्त्वाचे नसले तरी पार्मेनाईडस्ने सिद्धांतास पोषक असे युक्तीवाद व कारण मीमांसा दिली त्यामुळे त्याच्या बुद्धीवादाला बळकट आधार मिळाला व त्याला त्याने तात्विक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

पार्मेनाईडस्च्या तत्त्वज्ञानाचा मुख्य गाभा असा होता की, फक्त एकच सत्ता अस्तित्वात आहे आणि ते सत्य अपरिवर्तनीय, अविभाज्य आणि अखंड आहे या विचारानुसार बदल (change) आणि गती ही फक्त इंद्रियांचा आभास आहे. त्याचा वास्तवतेशी काही संबंध नाही. पार्मेनार्डस्चे तत्त्वज्ञान इंद्रियांच्या भ्रामकतेवर आधारित होते या विचारांना झीनोने तात्विक आधार दिला.

**२. द्वंद्वात्मक पद्धती**

झीनोची बुद्धी तीक्ष्ण व भेदक होती तो उत्तम वादपटू होता. त्याची वाद पद्धती वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यामुळे झीनोने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात एक अनोखी पद्धत विकसित केली यालाच द्वंद्वात्मक पद्धती असे म्हणतात. द्वद्वात्मक पद्धती म्हणजे विरोधकांच्या गृहीतकांचा वापर करून त्यांच्या तर्काचे खंडन करणे होय. झीनोने विरोधकांच्या तर्काचा वापर करून त्यांच्याच विचारांमधील विरोधाभास उघड केला. त्याचे तर्क खोटे असल्याचे सिद्ध केले.

ॲरिस्टॉटलने झीनोच्या पद्धतीला विरोधाभासी तर्कशास्त्र असे म्हटले आहे. झीनोने विरोधकांच्या गृहीतकावर आधारित तर्क दिले ज्यातून दोन परस्पर विरोधी निष्कर्ष निर्माण केले.

**३. झीनोचे प्रसिद्ध युक्तिवाद किंवा तर्क**

१. झीनोने गती, अवकाश आणि अनेकवत्त्वावर आधारित पॅराडॉक्सिस मांडले. त्याचे काही प्रमुख पॅराडॉक्सिस खालील प्रमाणे आहेत.

**१. अकिलीस आणि कासवाचा युक्तिवाद**

या युक्तिवादामध्ये झीनोने असे म्हटले आहे की अकिलीस एक अत्यंत वेगवान धावपटू आहे परंतु तो गती मंद चालणाऱ्या कासवाला कधीच पकडू शकत नाही कारण जरी कासवाला अगोदर थोडा वेळ दिला तरी झीनोच्या मते जेव्हा अकिलीस कासवाच्या ठिकाणी पोहोचेल तेव्हा कासव थोडे पुढे गेलेले असेल हा पाठलाग निरंतर चालू राहतो म्हणून अकिलीस कासवाला कधीच पकडू शकत नाही. यावरून झीनोने गतीवर प्रश्न उपस्थित करून असे सिद्ध केले की, गती ही केवळ आभास आहे.

२. गतिमान बाणाचा युक्तिवाद (Arrow paradox) : बाणाच्या युक्तिवादामध्ये झीनो असे म्हणतो की, जेव्हा बाण गतीत असतो तेव्हा प्रत्येक क्षणाला तो एका विशिष्ट बिंदूवर असतो. प्रत्येक क्षणाला बाण एका

ठिकाणी स्थिर असतो जर तो प्रत्येक क्षणाला स्थिर असेल तर गती ही अस्तित्वात येऊ शकत नाही त्यामुळे झीनोने गतीला नकार दिला.

झीनोच्या या प्रकारच्या युक्तिवादाला आधुनिक परिभाषेत विप्रतिषेध असे म्हणतात. विप्रतिषेध म्हणजे जेव्हा बदललेल्या दोन परस्पर विरोधी विधाने निष्पन्न होतात तेव्हा या प्रकारच्या प्रमाणास सिद्धतेस/ विप्रतिषेध म्हणतात.

### ३. द्विभागी युक्तिवाद

या युक्तिवादामध्ये झीनोने असे सांगितले आहे की, कोणत्याही गतंव्यापर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक वेळी आधी त्या गतंव्याचे अर्धे अंतर कापावे लागते आणि मग उरलेल्या गतंव्याच्या अर्धे ही प्रक्रिया अखंड चालू राहते त्यामुळे अंतिम गंतव्य कधीच गाठता येत नाही. या तर्कानुसार प्रवास करणे तात्विक दृष्ट्या अशक्य आहे कारण कोणतेही ठिकाण गाठणे हे अनंत काळ चालणारी प्रक्रिया आहे.

### ४. अनेकत्वाचा विरोध

झीनोने अनेकत्वावर देखील प्रश्न उपस्थित केले आहेत त्याच्यामते जर वस्तू अनेक असतील तर त्या विभाज्य असल्या पाहिजेत आणि जर त्या विभाज्य असतील तर त्या अनंतकाळ विभाज्य असतील परिणामी वस्तूंचे अस्तित्व तात्विकदृष्ट्या शक्य नाही. कारण अनंत विभाजन हे वस्तूच्या अखंडतेला नकार देते झीनोने अनेकत्वाला तात्विक दृष्ट्या खोटे ठरवले

### ४. पोकळी आणि अवकाश याविषयीचे तात्विक विचार

पार्मेनायडिसने पोकळी आणि अवकाश याविषयीचे अस्तित्व नाकारले होते झीनोनेही याला पाठिंबा दिल्याचे पाहायला मिळते झीनोने पोकळी आणि अवकाश याविषयी विचार मांडले आहेत त्याने असा तर्क केला की, जर वस्तू अवकाशात असेल तर त्या अवकाशालाही एका वेगळ्या अवकाशात असले पाहिजे. अशा प्रकारे अवकाशाचा विचार सतत चालू राहतो आणि हे तात्विक दृष्ट्या अशक्य आहे. झीनोच्या या तर्कामुळे अवकाशाच्या संकल्पनेवर नव्याने विचार करण्याची प्रेरणा मिळाली.

### ५. झीनोचा तत्त्वज्ञानातील वारसा

झीनोने गती, अनेकत्व आणि अवकाशाच्या संकल्पनावर उभे केलेले युक्तिवाद आजही तात्विक चर्चांमध्ये महत्त्वाचे आहेत त्याच्या तर्काने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात नवनवीन विचारसरणी तयार केली त्यामुळे ग्रीक तत्त्वज्ञानाच्या इतिहासात झीनोचे स्थान उच्च दर्जाचे आहे.

### ६. इंद्रिय संवेदना आभास, इंद्रियाच्या भ्रामकतेवर झीनोची मांडणी

- इंद्रिय संवेदन (sensation) म्हणजे इंद्रियापासून होणारे ज्ञान असे आपण मानतो पण झीनोच्या मते हे ज्ञान सत्य नसून तो केवळ एक आभास आहे कारण काहीवेळा इंद्रिय आपणास फसवू शकतात झीनोच्या मते तात्विक ज्ञान हे विचारांच्या आधारे असावे कारण इंद्रियांची विश्वावरची पकड फक्त

बाह्यरूपाने होते. झीनोच्या मते ज्ञानाच्या खऱ्या स्वरूपात इंद्रियावर अवलंबून राहणे अपूर्ण आहे कारण बाह्य जगाचा अनुभव इंद्रियांना मिळत असला तरी ते सत्य ज्ञान नाही तर केवळ भास आहे त्याकरिता त्यांनी बाजरीच्या दाण्यांचे उदाहरण दिले आहे. बाजरीचा एक दाणा पडला तर आवाज होत नाही पण हजारो दाने एकत्र पडल्याने आवाज होतो यावरून त्यांनी इंद्रियावर आधारित ज्ञानाच्या मर्यादा दाखवून दिल्या यावरून सिद्ध होते की इंद्रिय संवेदनावर पूर्ण विश्वास ठेवणे योग्य नाही.

Philosophy of Heracleitus

**२.२.३ १. हिरॅक्लिटसचे तत्त्वज्ञान**

कालखंड इसवी सन पूर्व ५३५ ते इसवी सन पूर्व ४७५ बीसी

तत्त्वज्ञानाच्या इतिहासात हिरॅक्लिटस हा गुढ विचारांचा व दुर्बोध विचाराचां तत्त्वचिंतक म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचे विचार दुर्बोध मानले जातात कारण त्याने आपल्या विचारांचे सरळ विवेचन कधीच केले नाही.

तो आपल्या विचारांच्या संदर्भात म्हणतो की, ''मी मूर्खांच्यासाठी लिहीत नाही जिज्ञासूंना माझे विचार जर समजत समजले तर ठीकच पण माझे विचार कोणाला समजले नाही तर ते त्यांचे दुर्दैव.''

हिरॅक्लीटस पूर्वी इटलीमध्ये इलियाटिक नावाचा तत्त्वज्ञान. संप्रदाय होता या संप्रदायाने परिवर्तन सिद्धांताविरुद्ध विचार सांगितले होते. संप्रदायाच्या विचारांचा विरोध करण्यासाठी हिरॅक्लीटसने परिवर्तन सिद्धांत सांगितला होता.

**२. हिरॅक्लीटसचा प्रवाहवाद /संतत प्रवाहवाद / प्रवाहवाद सिद्धांत**

Theory of flux concept

इलियाटिक संप्रदायानुसार विश्व किंवा सत्ता अविकारी व अपरिवर्तनशील असते. आणि हे जे अविकारी व अपरिवर्तनशील असते तेच खरे अस्तित्व होय. जे बदलत नाही. ज्यात परिवर्तनाचा अभाव असतो त्यांचेच अस्तित्व खरे असते व बदल हा मिथ्या असतो. हिरॅक्लीटसला इलियाटिक संप्रदायाचे हे विचार मान्य नाहीत. या विचाराविरुद्ध तो म्हणतो की बदल हा निसर्गाचा नियम आहे, स्वभाव आहे. परिवर्तनानेच जीवनाला व विश्वाला विशिष्ट आकार प्राप्त होतो. जे परिवर्तनीय असते, विकारी असते तेच खरे अस्तित्व होय. कारण परिवर्तनासाठी सामर्थ्य आवश्यक असते आणि ज्यामध्ये सामर्थ्य नसेल ते असून नसल्यासारखेच असते.

जे अविकारी नित्य म्हणजेच शाश्वत असते ते नाशरुप व मिथ्या नसते जगातील प्रत्येक वस्तू बदलते, वस्तू बदल होणे म्हणजेच वस्तूला दुसरे रूप प्राप्त होणे. कोणतीही गोष्ट स्थिर राहू शकत नाही किंवा जे आहे ते तसेच टिकून राहू शकत नाही. आपल्या परिवर्तन सिद्धांताला अनुसरूनच हिरॅक्लीटस असे म्हणतो की, 'वाहत्या नदीच्या त्याच पाण्यात आपल्याला दोनदा पाऊल ठेवता येत नाही कारण पाण्यातील पाय उचलून पुन्हा पाण्यात ठेवे पर्यंत आधीचे पाणी वाहून गेलेले असते.'

त्याच्यामते निसर्गात गतिमानता व परिवर्तनशीलता नसती तर सभोवतालच्या वस्तू दिसल्याच नसत्या व ज्या आहेत त्या अजून बदलणार आहेत. परिवर्तनवादानुसार जेथे जन्म आहे तेथे मृत्यू असणारच.

इलियाटिक संप्रदायाच्या मते विश्वातील प्रत्येक वस्तू स्वतः सारखीच असते. वस्तूच्या या अवस्थेला अस्तित्व म्हणतात तर वस्तू बदलल्यानंतर जी अवस्था असते त्या अवस्थेला becoming किंवा not being असे म्हणतात या दोन्ही अवस्था खऱ्या नसतात या विचाराविरुद्ध हिरॅक्लीटस म्हणतो की becoming आणि not becoming या दोन्ही अवस्था सारख्याच सत्य असतात.

हिरॅक्लीटसचा परिवर्तन सिद्धांत व भारतीय तत्त्वज्ञानातील बौद्ध दर्शनातील सांगितलेला क्षणवादाचा सिद्धांत यामध्ये बरेच साम्य दिसते. क्षणवादी विचारानुसार या विश्वात सारखे परिवर्तन होत असते. भाव व अभाव या दोन्ही अवस्था सारख्याच सत्य असतात. वस्तूचे स्वरूप प्रत्येक क्षणी हळूहळू बदलत असते कारण बदल हा निसर्गाचा स्वभाव असतो, नियम असतो.

हिरॅक्लीटसच्या मते भावामध्ये अभाव अंतर्भूत असतो. कारण जो भावारूपी आहे, अस्तित्वात आहे त्याचाच अभाव निर्माण होतो. जे भावरूपी आहे ते नष्ट झाल्यावर अभाव निर्माण होईल कारण भाव व अभाव हे परस्पर व्याघाती, विरुद्ध असल्यामुळे एकाच वेळी दोन्ही अस्तित्वात असू शकत नाहीत.

जेथे जन्म आहे तेथे मृत्यू आहे. एका अर्थाने जन्मात मृत्यू गर्भित आहे. प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत भाव व अभावाची तत्त्वे लागू पडतात. तसेच प्रत्येक गोष्टीत परस्पर विरोधी गुणही दिसून येतात. जेथे शिव, सत्, चांगले तेथे दूरीत (evil) आहे. हिरॅक्लीटसच्या संतत प्रवाह सिद्धांतानुसार विश्वातील सुसंवादाचे मूळतत्व विश्वातील वस्तूमध्ये असणाऱ्या परस्पर विरोधीगुणांमध्ये दिसून येते. विरोधीगुणामध्ये सारखा संघर्ष चालू असतो. या संघर्षातून विरोधीगुणामध्ये एक वाक्यता म्हणजेच समन्वय प्रस्थापित होत असतो. परिवर्तन किंवा संघर्ष हाच सर्व गोष्टीचा जनक आहे.

हिरॅक्लीटस ईश्वर मानतो त्याच्यामते विश्वात परस्पर विरोधी द्वंद्व असते उदा. पूर्ण–अपूर्ण, सुसंवाद – विसंवाद यात मेळ बसवण्याचे कार्य ईश्वर करतो.

Fire as the central principle of reality /?universe

**३. हिरॅक्लीटसचे अग्नी तत्व**

'अग्नी हेच विश्वाचे मूलद्रव्य आहे.' या विधानाचे हीरॅक्लीटसच्या दृष्टिकोनातून स्पष्टीकरण करा.

हिरॅक्लीटसच्या तत्त्वज्ञानात देखील इतर प्राचीन ग्रीक तत्त्वचिंतकाप्रमाणे विश्वाच्या मूलद्रव्याचा विचार केलेला आहे. विश्वाच्या मूलकारणाची मीमांसा करताना हिरॅक्लीटस म्हणतो की, कोणा विशिष्ट माणसाने विश्व निर्माण केलेले नाही किंवा हे विश्व ईश्वराने सुद्धा निर्माण केलेले नाही. तर शाश्वत अशा अग्नितत्त्वापासून निर्माण झालेले आहे.

हिरॅक्लीटसचे अग्नितत्त्व म्हणजे या विश्वातील ऊर्जा होय. कोणत्याही निर्मितीला ऊर्जेची गरज असते. ही ऊर्जा म्हणजेच अग्नी. हे विश्व व विश्वातील सर्व वस्तू अग्नीपासून तयार झाल्या आहेत व त्याचा शेवटही अग्नीमध्येच होत असतो. जसे सोन्यापासून अलंकार व अलंकारापासून सोने बनवता येते त्याप्रमाणेच सर्व वस्तू अग्नीपासून निर्माण होतात.

**प्रवाहवाद**

हिरॅक्लीटसच्या संतत प्रवाहवादाचा (theory of flux) त्याच्या विश्वाच्या मूलद्रव्यासंबंधीच्या विचारात प्रत्यय येतो. त्याच्यामध्ये अग्नी हा सर्वात अधिक बदलणारा, सर्वात गतिमान व अत्यंत प्रभावी असा पदार्थ आहे.

**४. विश्व निर्मितीची प्रक्रिया**

अग्नीपासून विश्व कसे निर्माण होते? यासंबंधी हिरॅक्लीटसने आपल्या तत्त्वज्ञानाच्या दोन प्रक्रियांचा विचार केला आहे.

१. अधोगामी downward path

२. उर्ध्वगामी मार्ग

**१. अधोगामी मार्ग–** या मार्गानुसार मूळ अग्नीचे वायूत रूपांतर होते वायूचे जलात व जलाचे पृथ्वीत रूपांतर होते हा मार्ग खालील प्रमाणे दर्शविता येतो येईल विश्व निर्मितीची अधोगामी प्रक्रिया

अग्नि

↓

वायू

↓

जल

↓

पृथ्वी

विश्व निर्मितीची दुसरी प्रक्रिया म्हणजे

२. उर्ध्वगामी मार्ग – या प्रक्रियेनुसार प्रथम पृथ्वीचे जलात रूपांतर होते, जलाचे वायूत व वायूचे अग्नीत रूपांतर होते हा मार्ग खालील प्रमाणे दाखवता येईल.

विश्व निर्मितीची उर्ध्वगामी प्रक्रिया

पृथ्वी

↓

जल

↓

वायू

↓

अग्नि

हिरॅक्लीटसच्या अग्री तत्वाच्या विचारात त्याचे आत्म्यासंबंधीचे विचार सांगितले आहेत. त्याच्यामते आत्मा (soul) हा अग्नीच असतो. म्हणजेच आत्मा अग्नी प्रमाणे शाश्वत (immortal) असतो. अग्निप्रमानेच आत्माही गतिमान आहे. आत्मा सभोवतालच्या विश्वातून सतत काहीतरी घेत असतो व काही परत देत असतो या देवघेवीच्या प्रक्रियेत आत्मा ज्ञानेन्द्रिय, विचार, बुद्धी यांचे सहाय्य घेत असतो.

मानवी आत्मा हा स्वतंत्र असा आत्मा नसून विश्वव्यापक भाग आहे. तसेच आत्मा विश्वातील अस्थिर (chenig) भुतासारखे (वस्तू) (अस्थिर वस्तू सारखा) नसून तो अत्यंत सत्य असतो. आत्मा स्थलकालाने कधीच बाधित होत नाही. विचारशीलता (thinking) व शहाणपणा (wisdom) हे आत्म्याचे गुण आहेत. ज्ञान मिळवणे हे आत्म्याचे खास वैशिष्ट्य होय. (आत्मा ज्ञानवान मानवी आत्म्याने आपल्या व्यक्तिगत जगाच्या पलीकडे जाऊन म्हणजेच संकुचित वैयक्तिक हिताच्या विचारातून बाहेर पडून विश्वव्यापक जीवन प्रवाहात मिसळले पाहिजे व या विश्वाचे सूत्रबद्ध (systematic) जीवन जगले जाते त्या जीवन प्रवाहाशी व्यापक दृष्टिकोनातून निस्वार्थी व उदार होऊन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**सोफिस्ट तत्त्वज्ञानाचे स्वरूप**

सोफिस्ट तत्त्वज्ञानाने तत्त्वज्ञानाच्या इतिहासात दुसऱ्या कालखंडाची सुरुवात होते. सोफिस्ट विचारवंत तात्त्विक विचार व युक्तिवाद करण्यात मोठे पटाईत होते. सोफिस्टाना आरंभीच्या काळात तत्त्वज्ञानाचे शिक्षक म्हणून ओळखले जात असे पण पुढे सोफिस्टानी आपल्या ज्ञानाचा उपयोग व्यावहारिक दृष्टिकोनातून भौतिक समृद्धी व संपत्ती मिळवण्यासाठी केला म्हणून काही करणे धंदेवाईक शिक्षण म्हणून मानले.

सोफिस्ट तत्त्वज्ञानाचा विचार करताना ग्रीकमधील धार्मिक, राजकीय सामाजिक परिस्थितीचा विचार करावा लागतो. सर्वसामान्य जनता, प्रजा व राज्यकर्ते यांच्यामध्ये दीर्घ काळापासून चाललेल्या झगड्यामध्ये लोकशाही तत्त्वाचा विजय झाला होता. ग्रीक मधील लोकशाही ही आजची प्रचलित लोकशाही सारखी नव्हती.

ग्रीक लोकशाही ही काही प्रतिनिधिक संस्था नव्हती.

ग्रीकमधील लोकशाहीच्या विजयाने धार्मिक तत्त्वज्ञानाचा ऱ्हास होऊ लागला. ईश्वरनिष्ठतेचा अनादर केला जाऊ लागला यास मात्र ग्रीकमधील धार्मिक स्थितीच कारणीभूत होती. ग्रीकमधील धर्म तत्त्वज्ञानाच्या ऱ्हासास विज्ञान व तत्त्वज्ञान यांचा उदय कारणीभूत होता. सोफिस्टानी ग्रीक विचारांना धर्म विचाराच्या पकडीतून, तावडीतून मुक्त करण्याचे महान कार्य केल्यामुळे त्यांना त्या काळाचे अपत्य म्हणून संबोधले जाते.

सोफिस्ट कोण होते? या प्रश्नाचे उत्तर देताना असे म्हणावे सोफिस्ट हा तत्त्वज्ञानाचा संप्रदाय नव्हता. त्याची पायथागोरिअन अथवा आयोनियन सारख्या तत्त्वज्ञानाच्या संप्रदायाशी तुलना होऊ शकत नाही. कोणत्याही सोफिस्ट विचारवंताने तत्त्वज्ञानाची विशिष्ट अशी विचार पद्धती सांगितलेली नाही. मात्र सोफीस्ट मानवी संस्कृतीचे चिकित्सक व भाष्यकार होते (अभ्यासक) सोफिस्ट वादविवादात अत्यंत पटाईत असल्याने आपले विचार सुसंगतपणे पटवून प्रतिपक्षाचे खंडन करीत असत.

प्लेटोने सोफिस्टचे आध्यात्मिक मालाचे दुकानदार असे उपहासात्मक वर्णन केले आहे.

**सोफिस्ट पूर्वतत्त्वज्ञान व सोफीस्ट तत्त्वज्ञान यातील फरक**

१. सोफिस्टपूर्व विचार विश्व केंद्री होते. विश्वाची निर्मिती व मूलद्रव्य विषयक विचार हाच या तत्त्वज्ञानाचा मुख्य विषय असे sophist तत्त्वज्ञान मानव केंद्री होते. त्यांनी आपल्या तात्त्विक विचारात मानव, मानवी समाज, संस्कृती, सामाजिक संबंध, धर्म, राजकारण, नीती इत्यादी विषयांचा समावेश केला. सोफिस्टानी ईश्वर वगैरे आदर्श कल्पनांचा अनादर केल्याने व्यक्तीकेंद्री, अविवेकी व स्वार्थी प्रवृत्तींना समाजात चालना मिळाली.

२. विचार पद्धती व संशोधन पद्धतीच्या बाबतीतही सोफिस्टपूर्व आणि सोफीस्ट तत्त्वज्ञानात फरक आढळतो. सोफिस्ट पूर्वतत्त्वज्ञनात वेगळी पद्धत वापरली जात असे या पद्धतीत सामान्यापासून विशिष्ट विषयी अनुमान केले जाते. सोफिस्टच्या ज्ञानपद्धतीचा आधार प्रत्यक्ष अनुभव व निरीक्षण हा असे. म्हणजे सोफिस्टची विचार पद्धती अनुभवनिष्ठ व विगामी होती.

३. सोफिस्टपूर्व तत्त्वज्ञान व सोफिस्ट तत्त्वज्ञानात उद्दिष्टाच्या बाबतीतही फरक आढळतो. सत्याचा शोध घेणे हे पूर्वीच्या तत्त्वज्ञानाचे ध्येय असे. ज्ञानासाठी ज्ञानाची उपासना केली जात असे. आपल्या विद्यार्थ्यांना तत्त्वज्ञ बनवणे हे त्यांचे उद्दिष्ट असे म्हणून त्यांचे ध्येय सिद्धांतिक उच्च दर्जाचे व ज्ञान साधनेचे असे. सोफिस्टांच्या मते जीवन यशस्वी करण्यासाठी ज्ञानाचा साधन म्हणून उपयोग केला पाहिजे. सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्यास उपयुक्त असे ज्ञान देणे त्यास सुशिक्षित करणे हे सोफीस्टचे ध्येय असे. यावरून सविस्तर विचारांचे उद्दिष्ट व्यावहारिक किंवा उपयुक्ततावादी होते असे म्हणावे लागेल.

**सोफिस्ट तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये**

सोफिस्ट तत्त्वज्ञान (Sophist Philosophy) हे प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानातील एक महत्त्वपूर्ण विचारप्रवाह आहे. ज्याचा उदय सुमारे इ.स.पू. पाचव्या शतकात झाला. सोफिस्ट हे शिक्षक होते. जे विशेषतः वाद

झाला. भाषणकला आणि तर्कशास्त्र शिकवायचे. त्यांची शिकवण दिली जाणारी सामग्री मुख्यत्वे व्यावहारिक ज्ञानावर आधारित होती. ज्याचा उपयोग समाजात प्रतिष्ठा आणि यश मिळविण्यासाठी केला जाऊ शकतो. त्यांची तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-

१. सापेक्षतावाद (Relativism) सोफिस्ट तत्त्वज्ञानी हे सापेक्षतावादी होते. त्यांच्या मते सत्य हे निश्चित नसून व्यक्तीच्या दृष्टिकोनानुसार बदलते. प्रत्येकाच्या विचारसरणीनुसार सत्य भिन्न असू शकते. प्रोटॅगोरस या सोफिस्ट तत्त्वज्ञाने 'मनुष्य हा सर्व गोष्टीचे मापदंड आहे' हे विधान मांडले. ज्याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीचे अनुभव व विचार सत्य असू शकतात.

२. नैतिक सापेक्षता (Moral relativism) सोफिस्ट लोकांच्या मते नैतिकतेचे कोणतेही सार्वत्रिक नियम किंवा तत्त्वे नाहीत. काय योग्य? आणि काय अयोग्य? हे व्यक्तीच्या आणि समाजाच्या संदर्भानुसार ठरते. नैतिक मूल्य ही व्यक्तीच्या गरजा आणि परिस्थितीवर आधारित असतात.

३. प्रायोगिक ज्ञानावर भर (Emphasis on practical knowledge) सोफिस्ट हे प्रत्यक्ष जीवनातील अनुभवावर आधारित शिक्षणावर भर/जोर देत असत. त्यांनी विचारसरणीपेक्षा आचरण आणि समाजातील व्यावहारिक यश महत्त्वाचे मानले. त्यांचे शिक्षण प्रामुख्याने राजकीय, कायदेशीर आणि सामाजिक परिस्थितीमध्ये कसे यशस्वी होता येईल यावर केंद्रित होते.

४. भाषण कला (Importance of rhetoric) सोफिस्ट तत्त्वज्ञानी हे भाषणकलेचे शिक्षक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांना विश्वास होता की, एखाद्या व्यक्तीला योग्य भाषण कलेच्या सहाय्याने कोणत्याही गोष्टीला योग्य किंवा अयोग्य ठरवता येते. त्यामुळे ते न्यायालयात आणि राजकारणात यशस्वी होण्यासाठी महत्त्वाचे मानले जात.

५. अज्ञेयवाद (Agnosticism) सोफिस्टापैकी अनेक तत्त्वज्ञ अज्ञेयवादी होते, ज्यांना देव किंवा अंतिम सत्याविषयी ठोस माहिती मिळवणे अशक्य वाटत होते. उदा. प्रोडिक्स आणि प्रोट्यागोरस यांनी देवांच्या अस्तित्वाबद्दल संशय व्यक्त केला होता.

६. तर्कशास्त्र आणि वादकला आहेत (Logic and Dialectics) सोफिस्टांनी तर्कशास्त्र आणि वादकलेला महत्त्व दिले. ते वादविवादात किंवा तर्कात निपुण असले पाहिजेत, कारण यश प्राप्त करण्यासाठी उत्तम संवादकला आणि तर्कशक्ती महत्त्वाची होती.

निष्कर्ष : सोफिस्ट हे तत्त्वज्ञानी शिक्षणाच्या क्षेत्रात प्रभावी होते परंतु त्यांच्या सापेक्षतावाद आणि भाषण कलेच्या वापरावर टीका देखील करण्यात आली. प्रसिद्ध तत्त्वज्ञ सॉक्रेटिस, प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी सोफिस्टांच्या तत्त्वज्ञानावर आक्षेप घेतले. कारण त्यांना असे वाटत होते की, सोफिस्ट तत्त्वज्ञानी/तत्त्वज्ञ सत्याच्या शोधाऐवजी केवळ यशासाठी वाद करतात.

## २.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

**अ) गाळलेल्या जागा भरा.**

१. पार्मेनायडिसच्या मते ............. अचल व अभेद आहे.

२. पार्मेनाईडसने व ............. या दोन कल्पनांमधील फरक स्पष्ट केला आहे.

३. पार्मेनायडिसच्या विचारावर ............. विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

४. पार्मेनाईडस हा ............. संप्रदायाचा संस्थापक आहे.

५. झीनो ............. संप्रदायाचा आहे.

६. झीनोचा जन्म ............. येथे झाला.

७. झीनो ............. चा शिष्य होता

८. झीनोने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात ............. पद्धती विकसित केली.

९. ॲरिस्टॉटलने झीनोच्या पद्धतीला ............. म्हंटले आहे.

१०. हिरॅक्लीटसने एलियाटिक संप्रदायाच्या विचारांचा विरोध करण्यासाठी ............. सिद्धांत सांगितला.

११. हिरक्लीटसला ............. चे विचार मान्य नव्हते.

१२. हिरॅक्लीटसच्या मते विश्व निर्मितीची दुसरी प्रक्रिया म्हणजे ............. मार्ग होय.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पार्मेनायडिसच्या अस्तित्वाचा सिद्धांत कोणत्या तत्वावर अवलंबून आहे.

२. अस्तित्वाचा सिद्धांत म्हणजे काय?

३. पार्मेनायडिसने अस्तित्वाचा सिद्धांत का मांडला?

४. इंद्रिय संवेदना म्हणजे काय?

५. विप्रतिशेध कशास म्हणतात?

६. द्वंद्वात्मक पद्धती कोणी विकसित केली?

७. अकीलिस व कासवाचा युक्तिवाद कोणी सांगितली?

८. संतत प्रवाह वाद सिद्धांत कोणी मांडला?

## २.४ स्वयं अध्ययनातील प्रश्नांची उत्तरे.

अ) १. अस्तित्व २. संवेदन व बुद्धी ३. पायथागोरस ४. एलियाटीक

५. एलियाटिक ६. एलिया ७. पार्मेनायडिस ८. द्वंद्वात्मक

९. विप्रतिशेध १०. परिवर्तनाचा ११. एलियाटिक संप्रदायाचे

१२. ऊर्ध्वगामी

ब) १. शून्यातून कशाचीही निर्मिती होत नाही.

२. गती व परिवर्तन यांच्या विरोधात मांडलेले तत्त्वज्ञान.

३. हिरॅक्लीटसच्या परिवर्तन सिद्धांताला विरोध करण्यासाठी.

४. इंद्रियापासून होणारे ज्ञान.

५. जेव्हा बदललेली दोन परस्पर विधाने निष्पन्न होतात तेव्हा या प्रकारच्या प्रमादास विप्रतिषेध म्हणतात.

६. झीनो.

७. झीनो.

८. हीरॅक्लीटस.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

१. पार्मेनाइडसचा अस्तित्वाचा सिद्धांत स्पष्ट करा.

२. पार्मेनाइडसचा सद्वस्तू विषयक सिद्धांत स्पष्ट करा

३. झीनोचे युक्तिवाद स्पष्ट करा.

४. हिरॅक्लीटसचा संतत प्रवाहवाद स्पष्ट करा.

**टिपा लिहा**

१. इलियाटिक संप्रदाय

२. इंद्रियाच्या ब्राह्मकतेवर झीनोची मांडणी

३. हिरॅक्लीटसचे अग्नि तत्व

४. हिरॅक्लीटसची विश्व निर्मितीची प्रक्रिया

## २.७ सारांश

पार्मेनाईड, झीनो व हिरॅक्लीटस हे तत्त्वज्ञानाच्या इतिहासातील महत्त्वाची व्यक्तिमत्वे आहेत. त्यांनी ग्रीक तत्त्वज्ञानाच्या तात्विक चर्चेत नवीन दृष्टिकोन निर्माण केला त्यामुळे गणित विज्ञान भौतिकशास्त्र तत्त्वज्ञान यासारख्या विविध क्षेत्रात त्यांचे विचार अजूनही महत्त्वपूर्ण ठरतात. त्यांनी मांडलेल्या तर्कांनी तात्विक विश्लेषणाची पद्धत आली आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात नवीन पहाट झाली.

**संदर्भ**


१) ग्रीक तत्वज्ञान तुळपुने - गो.वि. चित्रशाळा प्रकाशन, पुणे-

२) युरोपिय तत्वज्ञानाचा इतिहास - वा.पु. पटवर्धन, व्हीनस प्रकाशन, पुणे.

३) पाश्चात्य तत्वज्ञानाचा इतिहास - खंड -१ डॉ.ग.ना. जोशी, पुणे.

४) पाश्चात्य तत्वज्ञानाची रूपरेखा - माधवि कवि, ई.आर. मठवाले, क्रीयेटिव्ह पब्लिकेशन, नांदेड.

५) तत्वज्ञानाची ओळख - डॉ. वेदप्रकाश डोणगावकर, श्री. प्रकाशन, वाशिम.


❑❑❑

# घटक ३
# सॉक्रेटिस व प्लेटोचे तत्त्वज्ञान
**सॉक्रेटिस** (Socrates) **ख्रि. पू. ४७० ते ख्रि. पू. ३९९**

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ सॉक्रेटिसची पद्धती

 ३.२.२ सॉक्रेटिसची प्रश्नोत्तर संभाषण पद्धती

 ३.२.३ सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टीकोन

३.३ प्लेटो – विषय विवेचन

 ३.३.१ प्लेटोचा ज्ञानसिद्धांत

 ३.३.२ प्लेटोच्या आयडियाजचा सिद्धांत

३.४ विद्यापीठीय प्रश्न

३.५ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये :

१) सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती समजून घेता येईल.

२) सॉक्रेटिसची प्रश्नोत्तर संभाषण पद्धती जाणून घेता येईल.

३) सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टीकोन समजून घेणे.

४) प्लेटोचा ज्ञानविषयक सिद्धांत जाणून घेणे.

५) प्लेटोच्या गुहेचे रूपक समजावून घेणे.

६) प्लेटोच्या आयडियाजच्या सिद्धांताचे महत्व जाणून घेणे.

## ३.१ प्रस्तावना –

सॉक्रेटिस या तत्त्वचिंतकाचा जन्म इ.स. पूर्व ४७० मध्ये अथेन्स, ग्रीसमधील सिरका (Ciraca) येथे झाला. सॉक्रेटिसच्या वडिलांचे नाव सोफ्रोनिस्कस (Sophroniscus) होते. ते मूर्तिकार होते तर आईचे नाव फेनॅरीट (Phaenarate) होते. ती सुईणीचा व्यवसाय करीत असे. सॉक्रेटिसच्या पत्नीचे नाव झांथिपी

(Xanthippe) असे होते. त्याच्यापासून तिला तीन मुले झाली. लॅम्प्रोक्लिस (Lanprokles), सोफ्रोनिस्कॉस (Sophroniskos) व मेनेक्झिनॉस (Menexenos) अशी त्यांची नावे होती. झांथिपीच्या व तिच्या मुलांच्या नावावरून ती घरंदाज, प्रतिष्ठित घराण्यातील असावी. झांथिपी तापट स्वभावाची होती. त्यामुळे सॉक्रेटिसचे वैवाहिक जीवन सुखाचे नव्हते असे दिसते.

सॉक्रेटिस सामान्य परिवारातील होता. त्याचे नाक आखूड, बसके व शेंडा वर उचललेला होता. त्याचा जबडा मोठा होता व दाढी अस्ताव्यस्तपणे वाढलेली असायची. त्याचे पाय लहान होते व ढेरी वाढलेली होती. तो गबाळ्यासारखा पोषाख करीत असे. त्याचे डोळे पुढे आलेले व बटबटीत होते. तो दिसायला कुरूप होता. त्याची चालण्याची ढब चमत्कारिक होती. अरिस्टोफेनस त्याची चाल बगळ्याच्या चालीसारखी असल्याचे वर्णन करतो. प्लेटो म्हणतो की, सॉक्रेटिसला शारीरिक सौंदर्याचा भाग नव्हता, तर चाणाक्ष व चतुर संवाद आणि सखोल विचार याचे प्रतिबिंब त्याच्या नजरेत दिसत होते. त्याच्या व्यक्तिमत्वात प्रसन्नता व स्वभावात सौजन्य होते. तो कमालीचा निस्वार्थी वृत्तीचा होता. झीनोफेन म्हणतो की, सॉक्रेटिसच्या ठिकाणी कोणाला वाईट असे कधी काही पहावयास मिळाले नाही. ईश्वराची अनुमती घेतल्याशिवाय तो काही करीत नसे, इतका तो पवित्र होता. त्याने सद्गुणास कमी लेखून कधी चैनीस प्राधान्य दिले नाही. तो चांगले व वाईट यांच्यातील निवड करण्यात कधी चुकला नाही. तो विवेकी होता. थोडक्यात सर्व लोकात तो लोकोत्तम व सर्वात सुखी प्राणी होता.

अथेन्सच्या युवकांना संवादाच्या माध्यमातून योग्य आणि अयोग्य म्हणजे काय? हे त्याने पटवून सांगितले. अथेन्समधील अनेक युवक त्याचे शिष्य झाले. त्यापैकी प्लेटो हासुद्धा एक शिष्य होता. सॉक्रेटिसच्या या प्रभावी कार्यामुळे प्रस्थापित राजकीय मंडळी त्याच्यावर नाराज असत. 'सॉक्रेटिस हा युवकांना राज्याच्या विरोधात भडकावत आहे' असा त्याच्यावर आरोप लावला व त्याच्यावर खटला सुरू केला. यामध्ये त्याची हार झाली. त्याला ई.स. पूर्व ३९९ मध्ये हेमलॉक नावाचे विष देण्यात आले. त्याने हे विष शांत व प्रसन्न चित्ताने प्राशन केले. तेथेच त्याचा मृत्यू झाला.

**सॉक्रेटिसची पद्धती**

सॉक्रेटिसने विशिष्ट असे तत्त्वज्ञान किंवा तत्त्वज्ञानाचा संप्रदाय निर्माण केला नाही. तत्त्वज्ञानाच्या नंतरच्या इतिहासात अनुभवाद, बुद्धिवाद यासारखे तत्त्वज्ञानाचे संप्रदाय निर्माण झाले. यासारख्या संप्रदायाचे विवेचन त्याने केलेली नाही. कारण एखाद्या संप्रदायाचे विवेचन व समर्थन करणे म्हणजे तत्त्वचिंतनाला मर्यादा घालणे होय. सॉक्रेटिसचे तत्त्वज्ञान तत्वज्ञानातील सर्व संप्रदायांनी स्वीकारले. यातून सॉक्रेटिसच्या तत्त्वदृष्टीचे दृष्टेपण स्पष्ट होते. तत्त्वचिंतन अक्षरबद्ध होण्यासाठी त्या तत्त्वचिंतनाला विशिष्ट शब्दप्रयोगाने संबोधले पाहिजे यादृष्टीने सॉक्रेटिसच्या विचारांना 'संवाद पद्धती' म्हणून संबोधले जाते. सॉक्रेटिसची भूमिका केवळ तत्वचिंतन प्रकटपणे सांगणे एवढ्यापुरती मर्यादित नव्हती. तत्त्वचिंतन म्हणजे एखाद्या विचारवंताने अधिकारी पुरुषांनी किंवा जाणकाराने समाजातील सामान्य माणसाच्या व्यवहारीक समस्यांवर केलेले विचार व त्या समस्यांवर सुचवलेले उपाय होत सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती संवादात्मक होती संवाद पद्धतीत एखाद्या

प्रश्नाचे समस्येचे नुसते उत्तर सुचविणे अपेक्षित नसून त्या प्रश्नाविषयी समस्येविषयी समोरच्या व्यक्तीला विचारप्रवृत्त करणे अपेक्षित असते उदा. चांगले प्रशासन म्हणजे काय या प्रश्नाचे संवाद पद्धतीद्वारे लोकांकडून जनतेचे प्रश्न सोडवणारे, जनतेच्या अडचणींचे निवारण करणारे, जनतेचे जगणे सुसह्य करणारे व जनतेला आपले वाटणारे असे प्रशासन हे उत्तर सॉक्रेटीसला अपेक्षित होते.

संवाद पद्धतीद्वारे सॉक्रेटिस अथेन्समधील प्रशासनाच्या उणीवांचे लोकांमध्ये प्रबोधन करीत असे. या प्रबोधन कार्यासाठी त्यांनी अथेन्समधील सार्वजनिक ठिकाणी उदा शहरातील महत्त्वाचे चौक, बाजारतळ व इतर गजबजलेल्या ठिकाणाची निवड केलेली आढळते. याचे कारण म्हणजे तेथे लोकांशी संवाद साधण्यासाठी लोक सहजपणे उपलब्ध होत असत. सॉक्रेटिसच्या संवाद पद्धतीचा मुख्य हेतू म्हणजे लोकांना जीवनातील व्यवहारिक प्रश्नांविषयी, स्थानिक प्रशासनाविषयी विचारप्रवृत्त करणे होय. सॉक्रेटिसचेमते स्वतः विचार करण्याविषयीच्या उदासीनतेतून व्यक्तिगत व सामाजिक प्रश्न वाढत जातात. सॉक्रेटिसने आपल्या संवाद पद्धतीत तरुण पिढीला प्राधान्य दिले होते. अथेन्स शहर व ग्रीक नगर राज्यामध्ये प्रशासनाबाबतचे असमाधानकारक चित्र दिसत होते. त्यांचे महत्त्वाचे कारण म्हणजे लोकजागृती नसणे हे होय. विचार मंथनाबाबत अथेन्समध्ये जी सामसूम दिसत होती त्यामुळे राजकर्ते अनिर्बंधपणे व अन्यायकारकपणे भ्रष्टाचार करीत होते अथेन्सच्या राज्यकर्त्याविरुद्ध बंड करण्यासाठी सॉक्रेटिसने तरुण पिढीला हाताशी धरले. आपल्या संवाद पद्धतीचा उपयोग करून अथेन्समध्ये लोकप्रबोधन करण्याचे महत्त्वाचे कार्य सॉक्रेटिसने केले.

**सॉक्रेटिसच्या संवाद पद्धतीची वैशिष्ट्ये:**

१. **संशयवाद –** सॉक्रेटिसच्या पद्धतीत संशयवाद असतो. संशयवादात एखाद्या तथ्याविषयी, गोष्टीविषयी सुरुवातीला शंका उपस्थित केली जाते. संशय व्यक्त केला जातो उदा. हे सोने खरे आहे काय? म्हणजे आपल्या समोरच्या सोन्याच्या खरेपणाविषयी प्रथम संशय व्यक्त करावयाचा. या सोन्याच्या खरे खोटेपणाविषयी जाणकार सुवर्णकाराचे मत घ्यावयाचे विशिष्ट रसायन वापरून सोन्याला हिरवट रंग येतो काय? ते पहावयाचे. या रासायनिक प्रचितीनंतरही आधीचे सोने हिरवट न पडता पिवळे धमकच राहत असेल तर सोने खरेच आहे असा निष्कर्ष काढावयाचा म्हणजे संशयाच्या शेवट सत्याच्या शोधामध्ये करावयाचा. यावरून सॉक्रेटिसचा संशय हा सत्यान्वेषण करणारा होता असे म्हणले पाहिजे.

२. **संभाषणात्मक –** सॉक्रेटिस एखाद्या गोष्टीविषयी अनेक लोकांशी चर्चा करीत असे. चर्चेमध्ये अनेकांची अनेक मते असू शकतात. प्रत्येक व्यक्ती आपल्या वैचारिक कुवतीनुसार अनुभवातील वस्तूविषयी, प्रश्नाविषयी आपले मत बनवीत असते. वस्तूचे ज्ञान मिळवताना वस्तू विषयी विविध मते असतील मात्र अगदीच भिन्न मत असेल तर ते विचारात न घेता त्याचे वर्जन करावयाचे अनेकांपैकी जे साधारण असेल म्हणजे ज्याविषयी अनेकांचे एकमत होऊ शकते ते स्वीकारावयाचे अशा रीतीने संभाषण पद्धती वापरून सॉक्रेटिस ज्ञाननिश्चिती करीत असे. सॉक्रेटिसचे मते ज्ञानविस्तारासाठी, विचारांच्या विकासासाठी संभाषण पद्धती अधिक उपयुक्त आहे. कारण या पद्धतीत सर्वसाधारण विचारक्षमता असलेल्या व्यक्तीपासून ते विशेषज्ञापर्यंत सर्वांच्या सहभागाचा उपयोग करून घेता येतो.

३. **व्याख्यानात्मक व संकल्पनात्मक –** सॉक्रेटिसचे मते वस्तूच्या मूलभूत व निश्चित ज्ञानासाठी त्या–त्या वस्तूंच्या व्याख्या करणे आवश्यक असते. यासंदर्भात व्याख्या म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर प्रथम पाहू. शब्दांना, कल्पनांना अनेक अर्थ असू शकतात. जेव्हा अर्थाच्या बाबतीत अनेक पर्याय असतात तेव्हा नेमका कोणता अर्थ स्वीकारावयाचा? हा प्रश्न उपस्थित होतो. व्याख्या म्हणजे एखाद्या पदाचा, शब्दाचा निश्चित नेमका व सर्वसामान्य होईल असा अर्थ सांगणे होय. तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत एखाद्या पदाचे व्यवस्थेदक लक्षण सांगणे नेमका अर्थ सांगणे म्हणजे व्याख्या होय. पदाचा अथवा शब्दाची व्याख्या केल्यावर ते पद अथवा शब्द इतरांपासून कसे भिन्न आहेत हे स्पष्ट होते. सॉक्रेटिसचे मते व्याख्या शिवाय ज्ञानाचा विस्तार शक्य नसतो व्याख्या करताना व्याख्या या वस्तूचे सार्वत्रिक स्वरूप स्पष्ट होते. सॉक्रेटिस ने आपल्या पद्धतीमध्ये 'न्याय', 'शहाणपण', 'धैर्य' यासारख्या संकल्पनांच्या व्याख्या निश्चित केलेल्या दिसून येतात आपल्या संभाषण पद्धतीद्वारे 'न्याय' या संकल्पनेला योग्य गोष्ट करणे असा एक अर्थ केला उदा कर्जदाराने आपण घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड करणे न्यायाचे आहे योग्य आहे प्रत्येकाने आपण नेमून दिलेले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे म्हणजे न्याय होय. प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथांमध्ये सॉक्रेटिसने न्याय या शब्दाचा जो अर्थ सांगितला तो प्रमाण मानलेला आहे यावरून सॉक्रेटिस शब्दांचे किती अचूक अर्थ निश्चित करीत असे हे स्पष्ट होते. सॉक्रेटिसने शहाणपण, धैर्य यासारख्या संकल्पनांच्या व्याख्या निश्चित केलेल्या आहेत.

४. **अनुभवावर आधारित व विगामी –** तत्त्वज्ञानातील विचार केवळ काल्पनिक असणे योग्य नाही. तात्विक विचार सर्वसामान्य माणसाला समजले पाहिजेत यासाठी तत्त्वचिंतनाला लौकिक व्यवहारातील अनुभवांचा आधार असला पाहिजे. सॉक्रेटिसने अथेन्स नगर राज्यातील प्रशासनाचा स्वतः अनुभव घेतला होता व त्या अनुभवावरून त्याने आपले राज्य व्यवस्थेबद्दलचे विचार व्यक्त केले होते सॉक्रेटिसचेमते जगताना माणसाने वेगवेगळे अनुभव मग ते सुखद असोत अथवा दुःखद असोत घेतले पाहिजे व आपल्या अनुभवाच्या आधारे आपले विचार पक्के केले पाहिजेत. आपल्या विचारांचा अनुभव हा आधार असला पाहिजे असे सॉक्रेटिस आग्रहपूर्वक प्रतिपादन करतो. विगामी पद्धती म्हणजे काय? तत्त्वज्ञान व तर्कशास्त्राच्या अभ्यासात विगामी पद्धती ही एक मान्यता पावलेली पद्धती आहे. आपल्या सभोवतीच्या विश्वातील सर्वच घटनांचे ज्ञान अथवा अनुभव आपल्याला नसते तथापि अनुभवातील काही मोजक्या घटनांच्या आधारे आपल्याला काही निष्कर्ष काढता येतात. विगामी पद्धतीत विशिष्ट उदाहरणे विचारात घेऊन त्यांच्या आधारे तशाच प्रकारच्या सर्व उदाहरणाविषयी एक व्यापक निष्कर्ष काढला जातो. उदा. क्ष ही कष्टाळू व्यक्ती आयुष्यात यशस्वी झाली. य ही कष्टाळू व्यक्ती आयुष्यात यशस्वी झाली म्हणून सर्व कष्टाळू व्यक्ती आपली आयुष्यात यशस्वी होतील. या निष्कर्षाचा अर्थ असा की जो कोणी आपापल्या क्षेत्रात कष्ट करील तो यशस्वी होईल असा सामान्य निष्कर्ष काढता येतो. विगामी पद्धतीत विशिष्ट उदाहरणाच्या साह्याने सामान्य निष्कर्ष काढला जातो. मात्र हा निष्कर्ष संभाव्य मानला जातो. संभाव्य निष्कर्षाचे खंडन करणे शक्य असते. त्याचा बाध होऊ शकतो. आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा विकास ही विगमन पद्धतीची यशस्वी फलनिष्पत्ती मानली जाते

५. **निगामी –** सॉक्रेटीसची पद्धती निगामी स्वरूपाची आहे. तत्त्वज्ञान व तर्कशास्त्राच्या अभ्यासात विगामी पद्धती प्रमाणेच निगामी पद्धतीही विशेष महत्त्वाची आहे. या दोन पद्धतींचा उपयोग करून ज्ञानविस्तार शक्य असतो. जेव्हा एखाद्या व्यापक तत्वाच्या आधारे अथवा नियमांच्या आधारे ते तत्व अथवा नियम ज्या क्षेत्राला लागू पडतो त्या क्षेत्रातील सर्व वस्तूविषयी अनुमान करणे म्हणजे निगामी पद्धत होय. निगामी पद्धतीचे स्वरूप खालील युक्तीवादावरून स्पष्ट करू १) सर्व भौतिक वस्तू गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने बद्ध आहेत.

२) **दगड ही भौतिक वस्तू आहे.**

म्हणून दगड गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने बद्ध आहे. या युक्तिवादाचा निष्कर्ष आधार विधानावरून म्हणजे पुराव्याच्या विधानावरून निष्पन्न झाला आहे. तर्कशास्त्रातील अनुमानाचा आशय असा असतो की, जर आधार विधाने सत्य असतील तर निष्कर्ष सत्यच असला पाहिजे. निगामी पद्धतीने प्राप्त झालेले निष्कर्ष सबळ पुराव्यावर आधारित असल्याने त्यांचे खंडन करता येत नाही किंवा त्यांचा बाध होत नाही.

**सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टीकोन :**

सॉक्रेटिसचे ध्येय 'केवळ ज्ञानाकरिता ज्ञान' मिळविणे हे नव्हते तर त्याला ज्ञानाचे प्रचंड आकर्षण व प्रेम होते. माणसाने केवळ कल्पना करून त्या कल्पनांमध्ये रमून जाऊ नये, स्वैरकल्पनांच्या विहारात व साम्राज्यात स्वच्छंदाने तरंगत राहू नये असे त्याचे मत होते. याउलट ज्ञानाने आपले नैतिक आचरण व जीवन स्वच्छ, पवित्र व उच्च पातळीचे व्हावे असे त्याला वाटे. म्हणजे केवळ सैद्धांतिक ज्ञान मिळविणे, बुद्धीचा विकास इतरांना दाखविणे हे त्याचे ध्येय नव्हते तर व्यवहारात व प्रत्यक्ष जीवनात ज्ञानाने माणसांना सदाचरणी व सच्छील बनवावे अशीच त्याची खऱ्या ज्ञानापासून अपेक्षा आहे. ''कोणताही माणूस स्वेच्छेने चूक करीत नाही'' हे छोटेस एक वाक्य आहे. पण ते सॉक्रेटिसचे तत्त्वज्ञान अत्यंत अर्थपूर्णरितीने व्यक्त करते. या वाक्याचा संपूर्ण अर्थ व रहस्य असे आहे की, प्रत्येक नैतिक वैगुण्याचे मूळ माणसाच्या बुद्धीत असते व ते आकलनाच्या विभ्रमात असते. थोडक्यात त्याचा अर्थ असा की, ज्याला चांगले (शिव) काय आहे ते समजते तोच चांगले आचरण करतो. अंतर्दृष्टी किंवा मर्मदृष्टीचा अभाव हे अनैतिक आचरणाचे खरे कारण आहे यावरून सॉक्रेटिसच्यामते संकल्पनेचे स्पष्ट व निःसंदिग्ध ज्ञान हे नैतिक आचरणास कसे सहाय्यक, उपयुक्त व आवश्यक आहे हे स्पष्ट होते. 'सद्‌गुण म्हणजे ज्ञान' ही सॉक्रेटिसची उक्ती एक अविनाशी, विश्वसत्य म्हणून ओळखली जाते. त्याच्या मते आत्म्यामध्ये अविवेकाचा असा कोणताही भाग नसतोच. माणसाची प्रत्येक कृती ही बुद्धीने निर्धारीत होत असते. माणसाची केवळ बुद्धीच सर्व काही ठरवीत व नियंत्रित करीत असते. म्हणजे एखादी गोष्ट योग्य व चांगली आहे आणि तरीही ती न करणे व कृतीत न आणणे किंवा एखादी गोष्ट वाईट आहे असे माहित असूनही ती करावयास भाग पाडणाऱ्या प्रवृत्तीस बळी पडणे ही गोष्ट सॉक्रेटिसच्या मते केवळ शोकजनक व घातकच नाही, पण ती घडणे केवळ अशक्यप्राय आहे असे सॉक्रेटिसचे मत आहे. इच्छेच्या आहारी जाणाऱ्या मनाच्या प्रवृत्तीच्या विरूद्ध सॉक्रेटिस नुसता निषेध

किंवा झगडा करून थांबत नाही तर इच्छेने मानवी मन पूर्णपणे गिळंकृत होणे, मानवी कामवासनेच्या संपूर्ण आहारी जाणे ही गोष्ट सॉक्रेटिस अशक्यच समजतो.

जानामि धर्म नच मे प्रवृत्तीः।
जानामि अधर्म नच मे निवृत्तीः।

अशी जी मनाची अवस्था असते ती सॉक्रेटिसला मान्य नाही. विकारांच्या आहारी गेलेले मन सॉक्रेटिसला जरी कल्पनेतही अशक्य वाटत असले तरी ते असत नाही असे म्हणता येणार नाही, आणि जे मन कामविकारांच्या आहारी जाते त्याला चारित्र्य, शील किंवा दृढविश्वास असतो असे म्हणता येणार नाही.

सॉक्रेटिसला नैतिक सद्वर्तन किंवा सदाचरण यावर भर द्यावयाचा आहे. नैतिक सद्वर्तन किंवा सदाचरण होण्यासाठी माणसाचे नीतिविषयक विचार स्पष्ट व निश्चित असले पाहिजेत. चांगले (शिव) व इष्ट काय आहे हे जर माणसाला बुद्धीनिष्ठ रितीने विचार करून व आपले विकार, मोह, कामवासना, पूर्वग्रह यांच्या पलिकडे जाऊन पक्के समजले व पटले आणि मान्य झाले तर त्याचा प्रभाव इतका असतो की, चांगल्या व इष्ट विचारांच्या व आदर्शांच्या विरूद्ध व त्यांच्याशी विसंगत असे कोणतेही कृत्य करण्याची त्याला इच्छा व हिंमतच होणार नाही. त्या सत्याचा प्रभाव इतका जबरदस्त असतो की त्याच्या सामर्थ्याने त्याचे संपूर्ण जीवन भारले जाते व नियंत्रित होते आणि म्हणून त्याच्या विरूद्ध व त्याच्याशी विसंगत असा साधा विचारही त्याच्या मनात डोकावत नाही व एखादा तसा विचार आल्यास सहनही होत नाही. सत्य व शिव यांच्या उदात्त आदर्शांच्या सामर्थ्याने मनुष्य इतका प्रभावित होतो की त्याचे केवळ मानसिक जीवनच नव्हे, तर त्याचे वाचिक व कायिक आचरणही त्याच्या विचारांच्या व बुद्धीच्या संपूर्ण नियंत्रणाखाली राहते. म्हणजे अशा विचारी व स्पष्ट बुद्धीच्या माणसाच्या जीवनात मन, वाचा व काया यांच्यात संपूर्ण संवाद व मेळ प्रस्थापित होतो. म्हणजे त्याच्या मनात जे विचार व चित्तात ज्या भावना खेळतात त्याच त्याच्या वाणीत व्यक्त होतात. मनाला जे स्वच्छ व स्पष्टपणे समजलेले व पटलेले असते फक्त तेवढेच तो बोलतो. त्याला जे आवडलेले व पटलेले नसते त्याचा उच्चारही तो आपल्या तोंडाने करीत नाही. थोडक्यात सॉक्रेटिसच्या मते सदाचरणाला बौद्धीक सुस्पष्टता व निःसंदिग्धता असणे ही आवश्यक अट आहे. ज्याच्या विचारात गोंधळ असतो आणि परस्परविरोधी विचारांनी ज्याच्या मनात संकट व कोलाहल निर्माण होतो. त्याच्या चित्तातही गोंधळ व अराजक निर्माण होते. थोडक्यात त्याच्या व्यक्तिमत्वाला व शीलाला तडे जातात आणि विचारांऐवजी विकारांचा दास बनून त्याची अवस्था केविलवाणी बनते. याउलट ज्याचा विचार स्वच्छ व स्पष्ट असतो, ज्याची सत्याविषयी व शिवाविषयी संपूर्ण खात्री पटलेली असते, त्याचे बोलणे व वागणे त्यानुसारच होत राहते व अशा माणसांच्या ठिकाणी सत्यनिष्ठा, चारित्र्याची एकसंधता, अविकलता व अखंडता निर्माण होते. काया-वाचा-मनाचा संपूर्ण सुसंवाद व मेळ त्याच्या ठिकाणी प्रस्थापित होऊन त्याचे जीवन मधूर भावांनी भरून राहते.

सॉक्रेटिस नैतिक आचरणावर अधिक भर देतो. त्याची सातत्याने नीतिमान समाज बनविण्यासाठी धडपड असे. या हेतूनेच सॉक्रेटिसने सद्‌गुणाचा विचार लोकांसमोर मांडला. त्याचे सद्‌गुणविषयक विचार पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**नैतिक आधार :**

तत्त्वज्ञानामध्ये नीतिशास्त्र ही एक महत्वाची शाखा आहे. नीतिशास्त्रात चांगले-वाईट, पाप-पुण्य, योग्य-अयोग्य इ. संकल्पनांचा अभ्यास केला जातो. नीतिशास्त्रात उद्देश, हेतू, परिणाम, उपयुक्तता, योग्यता इ. च्या आधारे नैतिक संकल्पना स्पष्ट केल्या जातात. परंतु सॉक्रेटिसची भूमिका लक्षात घेतली असता तो बुद्धीला नैतिकतेचा आधार मानतो, असे आपल्याला म्हणता येईल.

**नैतिकता आणि ज्ञान :**

साधारणपणे माणसे बुद्धीचा संबंध ज्ञानाशी जोडतात. पण सॉक्रेटिस मात्र बुद्धीचा संबंध नैतिकतेशी आहे अशी मांडणी करतो. त्याच्या मते ज्ञान हेच सर्वोच्च शुभ आहे आणि शुभ हे आदर्शवत असते. म्हणजेच ज्ञानदेखील आदर्शवत आहे. ज्याअर्थी ज्ञान हे आदर्शवत आहे त्याअर्थी नैतिकता पण आदर्शवत ठरते. म्हणून नैतिकतेसाठी ज्ञान व ज्ञानासाठी नैतिकता ही परस्परपूरक मानली जाते.

**सद्‌गुण हेच ज्ञान आहे :**

सामान्यतः आपण ‘Knowledge’ याला ज्ञान मानतो. पण सॉक्रेटिसला ज्ञानाचा हा अर्थ अभिप्रेत नाही. सॉक्रेटिसच्या मते ‘‘अंतर्दृष्टीने सत्याची प्राप्ती होणे म्हणजे ज्ञान होय. अशा या ज्ञानाला आणि सद्‌गुणाला सॉक्रेटिस परस्परपूरक मानतो. म्हणूनच तो ‘Virtue is knowledge’ असे म्हणतो. त्याच्या मते ज्याप्रमाणे सद्‌गुण हे ज्ञान आहे त्याप्रमाणे ज्ञान हे देखील सद्‌गुण आहे. याचे कारण जी व्यक्ती सद्‌गुणी असते ती ज्ञानी असते आणि जी व्यक्ती ज्ञानी असते, ती सद्‌गुणी असते. उदा. ज्या व्यक्तीला ‘चोरी करणे हे वाईट आहे’ याचे ज्ञान होते ती व्यक्ती कधीच चोरी करणार नाही. म्हणजेच ती व्यक्ती सद्‌गुणी आहे असे म्हटले जाईल. किंवा जी व्यक्ती कधीच चोरी करीत नाही. ती मुळातच सद्‌गुणी असते. कारण तिला ‘चोरी करणे वाईट आहे’ या विषयीचा निश्चय त्याच्या पूर्वीच झालेला असतो.

**सद्‌गुणाचे शिक्षण देता येते :**

माणसाला उपजतच सद्‌गुण हा असतो. तो परिस्थितीनेही बनतो असे काही विचारवंतांचे मत आहे. सॉक्रेटिस हा बुद्धीला महत्व देणारा असल्याने तो सद्‌गुणाचा आधार म्हणून बुद्धीला महत्व देतो. त्याच्या मतानुसार जशी ज्ञानाची शिकवण देता येते तशी सद्‌गुणाची सुद्धा शिकवण देता येते.

**सद्‌गुण हे एकमेव आहे :**

प्लेटो या तत्त्वज्ञाने शहाणपण, धैर्य, संयम आणि न्याय यांना सद्‌गुण म्हटले आहे तर सॉक्रेटिस सद्‌गुणाला प्लेटोप्रमाणे पाहत नाही. तो सद्‌गुणाला ज्ञानाच्या स्वरूपात पाहतो. जसे की ज्ञान हे विभागले

जात नाही त्याप्रमाणे सद्‌गुणही विभागले जात नाहीत. त्याच्या दृष्टीकोनातून जर आपण शहाणपण, धैर्य, संयम आणि न्याय यांना सद्‌गुण मानले तर सद्‌गुणावर मर्यादा येऊ शकते. म्हणजे शहाणपण, धैर्य, संयम आणि न्याय यांच्याशिवाय आपण प्रेम, दया, करूणा, सत्य, प्रामाणिकपणा इत्यादीला सद्‌गुण मानू शकणार नाही. म्हणून सॉक्रेटिस असे म्हणतो की, ज्या गोष्टी आपल्या अंतर्दृष्टीला सत्य आहेत असे वाटतात त्या सर्व गोष्टी जरी संख्येने अनेक असल्या तरी त्या एकच असतात अर्थात सद्‌गुणसुद्धा एकमेव आहे.

**सद्‌गुण ही कला नाही :**

सॉक्रेटिसच्या मतानुसार ज्याप्रमाणे सद्‌गुणाचे शिक्षण घेता येते त्याप्रमाणे कलेचे शिक्षण देता येते. परंतु सद्‌गुण आणि कला यामध्ये फरक आहे. कलेवर कलाकाराचे नियंत्रण असते. कलाकाराला अवगत झालेली कला कोठे सादर करावी किंवा करू नये याचे स्वातंत्र्य असते. तसेच ज्या व्यक्तीला सद्‌गुण किंवा ज्ञान प्राप्त झाले आहे. तो कलाकार असो अथवा इतर कोणी तो सर्वत्र एकच भाव ठेवणारा असतो. थोडक्यात सत्य हे चांगले आहे याचे भान ज्याला होते तो सर्वत्र सत्यानेच वागतो.

**सद्‌गुण आणि सुख :**

सॉक्रेटिसच्या मतानुसार सद्‌गुण आणि सुख यांच्यात संबंध आहे. सद्‌गुणाचा परिणाम सुख तर दुर्गुणाचा परिणाम दुःख आहे. अज्ञान हे दुःखाचे कारण आहे. सॉक्रेटिसच्या मतानुसार ज्याला चांगले म्हणजे काय? हे कळते तो चुकीचे वागत नाही. कारण अशी व्यक्ती मुळात सद्‌गुणी असते परिणामी सद्‌गुणी व्यक्ती सदैव सुखी असते.

## प्लेटो

### इ.स. पूर्व ४२७ ते इ.स. पूर्व ३४७

ग्रीस या देशातील महान तत्त्वज्ञानी व राजकीय विचारवंत प्लेटो याचा जन्म अथेन्समधील एका कुलीन घराण्यात झाला होता. त्याच्या वडिलांचे नाव एरिस्टन व आईचे नाव परिक्लियनो असे होते. वडिलांकडून तो राजवंशाशी व आईकडून सोलोन या अथेन्सच्या कायदेकारांशी संबंधीत होता. लहानपणी त्याला खानदानी शिक्षण मिळाले. नंतर तो सॉक्रेटिसच्या प्रभावाखाली आला. प्लेटो आठ वर्षे सॉक्रेटिसच्या सहवासात राहिला व त्याने सॉक्रेटिसला आपला गुरू मानले. तरूणपणी त्याचे विचार खूपच क्रांतिकारी होते. राजकारणात आपले जीवन व्यतित व्हावे अशी त्याची इच्छा होती. अथेन्सच्या सत्ताधिकाऱ्याने सत्तेच्या स्वार्थापायी सॉक्रेटिसला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली. त्यामुळे प्लेटोचा लोकशाही व सक्रीय राजकारण याबद्दलचा आदर नष्ट होऊन तो आदर्श राज्यव्यवस्था कशी निर्माण करता येईल याबाबत विचार करू लागला. यासाठी त्याने १२ वर्षापर्यंत इतर देशांचा प्रवास करून तेथील प्रचलित शासन व्यवस्थांचा अभ्यास केला. परंतु प्लेटो पूर्णतः राजकारणाकडे न गेल्यामुळे त्याची तत्वज्ञ म्हणूनही जगाला ओळख झाली.

प्लेटोच्या अभ्यासाचे व चिंतनाचे राज्यशास्त्र, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, कलाशास्त्र व तत्वज्ञान हेच प्रामुख्याने विषय ठरले. आपल्या विचारांना व्यापकता व दृढता प्राप्त करून देण्यासाठी त्याने विद्यापीठ

स्वरूपी अकादमीची स्थापना केली. त्याठिकाणी तत्त्वज्ञानाबरोबर इतर विषयांचेही ज्ञानार्जन होऊ लागले. शिक्षण क्षेत्रातील प्लेटोचे हे महान कार्य समजले जाते. प्लेटोने अनेक ग्रंथांची रचना केली. त्यामध्ये संवाद स्वरूपी फिडो व रिपब्लिक हे त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

**प्लेटोचा ज्ञानसिद्धांत :**

ज्ञान हे सत्य आणि असत्य अशा दोन प्रकारचे असते. त्याचप्रमाणे ते नित्य आणि अनित्य स्वरूपाचेही असते. त्याच्या मते ज्ञान हे कोणत्याही व्यक्तीच्या इंद्रियसंवेदनावर अवलंबून नसते. ज्ञान हे इंद्रिय संवेदनाच्या पलिकडील आकाररूप आयडियाजचे बुद्धीद्वारा होणारे बोधन होय.

प्लेटो अनित्य स्वरूपाच्या ज्ञानाला असत्य ज्ञान मानतो तर तो नित्य स्वरूपाच्या ज्ञानाला सत्य ज्ञान मानतो. ज्ञानाची ही नित्य-अनित्यता विषयाच्या लक्षणावरून स्पष्ट करता येते असे त्याचे मत आहे. याचाच अर्थ ज्या विषयाचे ज्ञान स्थिर, स्पष्ट व निःसंदिग्ध स्वरूपाचे असते तेच ज्ञान सत्य असते असे प्लेटो मानतो. प्लेटोची ज्ञानमीमांसा त्याच्या तत्त्वमीमांसेला अनुसरून आहे. म्हणजेच प्लेटो आयडियाज स्थिर, स्पष्ट आणि निःसंदिग्ध असल्याचे मानतो. अर्थात त्याच्यासाठी आयडियाज किंवा परिकल्पना सारखे विषय हेच नित्य व सत्य असतात. प्लेटो बुद्धीवादाचा पुरस्कर्ता असला तरी तो इंद्रिय जगताच्या ज्ञानाला नाकारीत नाही. बुद्धीच्या तुलनेत इंद्रियांनी जे ज्ञान प्राप्त होते ते संदिग्ध, परिवर्तनीय स्वरूपाचे असते म्हणून अशा ज्ञानाला सत्य म्हणून स्वीकारता येत नाही. तो इंद्रियांनी होणाऱ्या ज्ञानाला पूर्ण ज्ञान व पूर्ण अज्ञान यामधली अवस्था असे वर्णन करतो.

प्लेटोने 'थिअटेटस' नावाच्या संवादात ज्ञानविषयक उपपत्तीची चर्चा केलेली आहे. त्यात त्याने प्रामुख्याने 'ज्ञान हे इंद्रियसंवेद्य असते' या मताचे खंडन केले आहे. प्लेटोच्या ज्ञानमीमांसेत सत्ताशास्त्री भूमिकेशी जवळचा संबंध स्पष्ट होतो. यथार्थ ज्ञान मिळविण्यासाठी प्लेटो बुद्धीला स्रोत मानतो. प्लेटो हा द्वंद्वात्मक विचारसरणीचा प्रणेता होता. त्याने परस्पर व्यावर्तक अशा इंद्रियगम्य व बुद्धिगम्य अशा दोन भिन्न सृष्टींची कल्पना मांडली. हे द्वैत मानवविज्ञानात शरीर व आत्मा यांच्या भेदात व्यक्त होताना दिसते. प्लेटो नीती व राज्यशास्त्र यामध्येही हे द्वैत मानतो व त्यात इंद्रियातील सृष्टीवर तो आपला विचार केंद्रित करतो. प्लेटोने महत्वाची दोन प्रमेये मांडली. १) नैतिक सद्गुण म्हणजे ज्ञान, २) ज्ञान म्हणजे इंद्रियसंवेदना नव्हे. नैतिक सद्गुणाविषयी सॉक्रेटिसचे जे मत होते तेच मत अधिक तर्कशुद्ध रितीने प्लेटोने मांडले. त्याने सॉक्रेटिसच्या शिकवणीचे सार कायम ठेवले व त्याची बुद्धीवादी रितीने मांडणी करून त्याच्या आधाराने आपली तत्वप्रणाली घडविली.

प्लेटोने ज्ञानाच्या चार पातळ्या मानल्या त्या पुढीलप्रमाणे

**१) प्रातिभासिक ज्ञान :** भ्रम, विभ्रम, स्वप्न आणि कल्पना इ. मार्फत प्राप्त होणारे ज्ञान हे प्रातिभासिक ज्ञान असते. हा ज्ञानाचा अगदी खालचा स्तर आहे.

**२) व्यावहारिक ज्ञान :** प्रातिभासिक ज्ञानाच्या तुलनेत व्यावहारिक ज्ञान उच्च स्वरूपाचे आहे. या ज्ञानाची प्राप्ती माणसाला जागृतावस्थेत होते. सामान्यतः दैनंदिन व्यवहारामध्ये या प्रकारच्या ज्ञानाचा उपयोग केला जातो.

**३) बौद्धीक ज्ञान :** बौद्धीक ज्ञान हे पूर्णत्वाकडे नेणारे ज्ञान आहे. सामान्यतः या पातळीवर वैज्ञानिक व गणितीय स्वरूपाचे ज्ञान प्राप्त केले जाते.

**४) विवेकात्मक ज्ञान :** या ज्ञानाची अतिशय उच्च स्वरूपाची पातळी आहे. याठिकाणी प्राप्त होणारे ज्ञान पूर्णज्ञान असते. सामान्यतः याठिकाणी मनुष्य व्यावहारिक ज्ञानापासून मुक्त होऊन सामान्यत्वाचे, दिव्यत्वाचे अर्थात प्रत्ययाचे (आयडियाज) ज्ञान प्राप्त करीत असतो.

ज्ञानाची मीमांसा करताना प्लेटो सत्य ज्ञान हे प्रत्यक्ष अनुभवावर अवलंबून नसते हे सांगण्यासाठी काही तर्क मांडतो.

१) प्रत्यक्ष अनुभवातून कधी-कधी विरोधी गुण पहावयास मिळतात. म्हणजे प्राप्त ज्ञानामध्ये संदिग्धता पहावयास मिळते.

२) जर आपण प्रत्यक्ष अनुभवातून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाला सत्य मानले तर शिक्षणाची अथवा वादविवादाची आवश्यकता पडणार नाही.

३) प्रत्यक्ष अनुभव हाच सत्य ज्ञानासाठी कसोटी असेल तर मानवेतर प्राण्यामध्ये आणि मानवामध्ये अंतर करण्याला काहीच अर्थ उरत नाही.

४) प्रत्यक्ष अनुभव हे व्यक्तीसापेक्ष असतात. परिणामी प्रत्यक्षामुळे वस्तूंचे मूळ स्वरूप संपुष्टात येते.

एकंदर सत्य ज्ञान हे केवळ प्रत्यक्ष अनुभवावर अवलंबून असते हे सोफिस्टांचे मत प्लेटो याठिकाणी अमान्य करतो.

प्रत्यक्ष अनुभव ज्याप्रमाणे सत्य ज्ञान होऊ शकत नाही त्याप्रमाणे एखादे 'मत' सुद्धा सत्य ज्ञान म्हणून स्वीकारता येत नाही असे प्लेटो मानतो. कारण त्याच्या मते सत्य ज्ञान तार्किक बुद्धीवर आधारीत असते. ते कोणत्याही प्रेरणेने परिवर्तन पावत नाही. कोणत्याही वाकचातुर्याने बदलत नाही. बुद्धीच्या तुलनेत मत हे मात्र विश्वासावर, श्रद्धेवर, आस्थेवर आधारीत असते. ते एखाद्या विषयाने प्रेरीत होऊन किंवा वाकचातुर्याने प्रभावित होऊन परिवर्तन पावू शकते. तेव्हा अशा परिस्थितीत 'मत' हे सत्य ज्ञान ठरत नाही अशी भूमिका प्लेटो घेतो. प्लेटोने अप्रगत अवस्थेतील बोधनाला मत व प्रगत अवस्थेतील बोधनाला ज्ञान संबोधिले आहे. मत ही अप्रगत अवस्था व्यावहारिक ज्ञान व प्रातिभासिक ज्ञान यात विभाजीत होते. प्रातिभासिक ज्ञान कल्पनाविलासाचे भ्रामक असते. व्यावहारिक ज्ञान इंद्रियसंवेद्य विश्वाचे व जगण्यासाठी पुरेसे असते. मात्र व्यावहारिक ज्ञानाला सत्य म्हणता येत नाही.

ज्ञानाची प्रगत अवस्था ही विवेकात्मक ज्ञानात व विलक्षण बुद्धीने प्राप्त झालेल्या ज्ञानात विभाजीत होते. विलक्षण बुद्धीने गणितीय ज्ञान मिळविता येते. तसेच वैज्ञानिक चिंतनही करता येते. या स्वरूपाचे ज्ञान

सत्याच्या जवळ जाणारे असले तरी संपूर्ण सत्याचे ज्ञान विलक्षण बुद्धीने मिळविता येत नाही. विवेकी ज्ञानातून संपूर्ण सत्याचे म्हणजे 'आयडियांचे' ज्ञान होते असे प्लेटोचे मत आहे.

ज्ञानप्राप्तीसाठी अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाताना वैचारिक शिस्त व मानसिक बळाची आवश्यकता असते. Eros हे तत्व मानवी मनाचा विकास घडवूण आणते. Eros हे अशरीरी प्रेम होय. इंद्रियातीत आकाररूप आयडियांचे संपूर्ण आकलन होणे हे मानवी मनाच्या विकासाचे उद्दिष्ट आहे.

**ज्ञानी व्यक्तीचा आदर्श :**

ज्या माणसाजवळ ज्ञान आहे त्याचे वर्णन प्लेटोने केलेले आहे. त्याच्या मते ज्ञानी मनुष्य हा सत्याचा प्रेमी असतो. सत्याच्या व ज्ञानाच्या प्रेमामुळे ज्ञानी मनुष्य शारिरीक सुखोपभोगापेक्षा आत्म्याच्या सुखांकडे अधिक लक्ष देतो. त्याचे विचार व व्यक्तीमत्व खुजे नसून उन्नत स्वरूपाचे व उमदे असते. कालातीत व स्थलातीत अशा आकाराचे चिंतन केल्यामुळे स्वतःच्या सान्त मनाची जीवनाची त्याला फारशी पर्वा वाटत नाही. त्यामुळे त्याला मृत्यूचे भय वाटत नाही. तो न्यायप्रिय, सौम्य स्वभावाचा, खुल्या वर्तमानाचा आणि संतुलित व्यक्तिमत्वाचा असतो. त्याची स्मृती चांगली असून त्याला शिकण्याची हौस असते. तो अगदी उत्स्फुर्तपणे सत्च्याच जगात सहजपणे वावरत असतो. वरील सर्व वर्णनावरून ज्ञानी व्यक्तीचा आदर्श म्हणून सॉक्रेटिस प्लेटोच्या डोळ्यापुढे होता.

ज्ञान मिळविलेल्या व्यक्तीची परिस्थिती व ज्ञानाचे स्वरूप प्लेटोने आपल्या रिपब्लिक या ग्रंथामध्ये गुहेच्या रूपकामध्ये चित्रण केले आहे.

**प्लेटोच्या गुहेचे रूपक :**

एका भुयारी गुहेत काही माणसांना बालपणापासूनच त्यांचे हात, पाय व माना साखळदंडानी बांधून ठेवलेल्या आहेत. यामुळे ते हालचाल करीत नाहीत. त्यांना केवळ आपल्या समोरचे दिसते. त्यांच्या मागे अग्नी जळतो आहे हे त्यांना पाहता येत नाही. त्यांच्यासमोर एक कमी उंचीची भिंत आहे. त्या भिंतीवर त्यांना स्वतःच्या किंवा कैद्यांच्या सावल्या दिसतात. त्यांच्या मागून इकडून तिकडे जाणाऱ्या निरनिराळ्या वस्तू वाहणाऱ्या माणसांच्या सावल्या दिसतात. यामध्ये काही माणसे बोलतात तर काही माणसे शांत असतात. सर्व आवाजाचे गुहेत घुमणारे प्रतिध्वनी कैद्यांना ऐकू येतात. कैद्यांना फक्त सावल्याच दिसत असल्याने त्यांना खऱ्या जगाचे ज्ञान नसते. त्यांना ऐकू येणारे प्रतिध्वनीदेखील त्या सावल्यांमधून येतात. अशीच त्या गुहेतील लोकांची समजूत झालेली असते. त्यापैकी एखादा कैदी जर मुक्त झाला आणि त्याने वळून पाहिले तर त्याला वेगळेच जग दिसेल. जे सावल्यांच्या जगाइतके सत्य नाही असे त्याला प्रथम वाटेल. अग्नीच्या तेजामुळे त्याचे डोळे दुखावतील. हळूहळू त्याची दृष्टी सरावेल, साफ होईल व सत्य काय आणि भासमान काय याचे त्याला चांगले ज्ञान होईल.

गुहेतील माणसाला जबरदस्तीने बाहेर आणले आणि सूर्यप्रकाशात थांबविले तर काय होईल? सूर्याच्या उजेडामुळे त्या माणसाचे डोळे असे दिपतील की, ज्याला आपण खरे जग मानतो त्यातले त्याला काहीच

दिसू शकणार नाही. तो संपूर्णपणे बावचळून जाईल. मग त्याच्या नजरेला या नव्या जगाच्या रूपाची सवय करावी लागेल. आधी सावल्या, मग पाण्यातील प्रतिबिंबे, मग जगातील विविध वस्तू व माणसे, त्यानंतर चंद्रप्रकाश, चांदण्या, नक्षत्रांनी भरलेले आभाळ असे क्रमाक्रमाने तो पाहू शकेल. सर्वात शेवटी तो पाण्यामध्ये झळाळणारे सूर्याचे प्रतिबिंब व नंतर स्वतः सूर्यच पाहू शकेल. सूर्य जसा आहे तसा त्याला दिसेल. तो त्या सूर्याचे चिंतन करू शकेल. त्यानंतर त्याविषयी बुद्धीनिष्ठ विचार करू शकेल. गुहेतील आपल्या कैदी मित्रांची आठवण होताच त्याला दया वाटेल. त्यांच्यासोबत पुन्हा पूर्वीसारखे जगण्याची कल्पनादेखील त्याला सहन होणार नाही. त्या गुहेत गेल्यास त्याच्या डोळ्यापुढे अंधारीच येईल. मग ते कैदी म्हणतील, पहा, हा बाहेर गेला त्याचा काय लाभ झाला म्हणजे काय? हा तर आपली दृष्टीच गमावून बसला. पण तो मात्र पुन्हा त्या जुन्या कल्पना व विश्वास स्वीकारू शकणार नाही.

प्लेटोच्या या गुहेच्या रूपकात गुहा म्हणजे इंद्रियसंवेदनांचे (येथे दृष्टीचे) जग, तर तेथे पेटलेला अग्नी म्हणजे सूर्य होय. गुहेबाहेरील वर जाण्याचा मार्ग हा आत्म्याच्या विवेकाकडे होणारा प्रवास आहे. प्लेटोने या स्वरूपात ज्ञानासाठी गुहेचे रूपक वापरले आहे.

**प्लेटोचा आयडियाजचा सिद्धांत (Theory of Idea):**

प्लेटोच्या मतानुसार सत्य ज्ञानाचा विषय हा सुस्थिर व शाश्वत असला पाहिजे. तो विषय इंद्रियसंवेदनांचा न राहता बुद्धीचा विषय झाला पाहिजे. बौद्धीक ज्ञान ही ज्ञानाची सर्वोच्च अवस्था असते. यासाठी आयडिया 'कल्पना' महत्वपूर्ण वाटते. आयडिया या व्यक्तीच्या डोक्यात नसून त्या प्रत्यक्ष जगात असतात. म्हणजेच आयडिया या व्यक्तिनिष्ठ नसून त्या वस्तुनिष्ठ असतात. त्यांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्लेटोने प्रयत्न केलेला आहे. आयडियाजच्या सिद्धांताचा तार्किक व सत्ताशास्त्रीयदृष्ट्या काय अर्थ आहे याची चर्चा प्लेटोने केली आहे. परंतु याविषयी प्लेटोच्या मनात संदिग्धता आहे. 'रिपब्लिक' या ग्रंथामध्ये असे स्पष्ट होते की, समान नाव असलेल्या अनेकविध वस्तूंच्या मागे एक कल्पना अथवा आकार असतो. यात त्या बहुविध गोष्टींमधील समान गुणविशेष एकवटलेले असतात. सुंदर गोष्टी अनेक असतात पण सौंदर्य संकल्पना म्हणजेच प्लेटोस अभिप्रेत असलेली आयडिया मात्र एकच असते. ही आयडिया जगात, वास्तवात असते हा प्लेटोचा सिद्धांत सामान्य वाटतो. परंतु येथे प्लेटोच्या मतानुसार मानवी बुद्धी ही वास्तवाचा ठाव घेते. त्याचे ज्ञान प्राप्त करते, तर ज्ञानेंद्रिये वास्तवाचा ठाव घेऊ शकत नाहीत. मग बुद्धी आयडियाचा ठाव, त्या खऱ्या असल्याशिवाय कसा काय घेऊ शकेल? बुद्धी आयडियाजना शोधून काढते, त्यांना निर्माण करीत नाही.

आयडियाज ह्या द्रव्य, सामान्य, विचार, एकक, अचल, अविनाशी, सार, पूर्ण, दिक् व कालापासून मुक्त बौद्धीक, श्रेणीयुक्त, आदर्शात्मक आणि संख्यायुक्त आहेत. या लक्षणांमुळे त्या नित्य व निरपेक्ष मानल्या जातात. आयडियाज ह्या आदर्शांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या असतात. आयडियाज ह्या जरी भौतिक जगतात असल्याचे वाटत असले तरीही त्या भौतिक जगतात नसतात. भौतिक जगतात अनुभवाला येते ते 'सामान्य' असते. सामान्य ही भौतिक वस्तुला अनुसरून असलेली अभौतिक (चेतन) बाब आहे. उदा. भौतिक

जगतामध्ये आपण अनेक अश्व (घोडे), अनेक माता, अनेक वाघ आपल्या इंद्रियांच्या साहाय्याने पाहतो. मात्र या सर्व प्रकारच्या प्राण्यांमध्ये जे समान गुण असतात. ज्याच्या साहाय्याने आपण घोड्याच्या ठिकाणी अश्वत्य, मातांच्या ठिकाणी ममत्व, वाघांच्या ठिकाणी व्याघ्रत्व या सामान्य तत्वाचे अस्तित्व असल्याचे मानतो. पण त्या सामान्य तत्वाचे ज्ञान इंद्रियांना होऊ शकत नाही. कारण ते इंद्रिय जगताच्या पलिकडे असलेल्या कल्पनांचा अंश आहे. अर्थात आयडिया ह्या सामान्याचे प्रतिनिधी असतात.

प्लेटो आयडियाजचे वर्गीकरण तार्किक दृष्टीकोनातून करतो असे जरी असले तरी त्यांना वास्तव जगातही स्थान आहे, अस्तित्व आहे हा विचार प्लेटोने सोडला नाही. त्याच्या मते आयडियाज या अनंत, कधीही स्वरूप न बदलणाऱ्या व अमूर्त असतात. त्यामुळे त्या इंद्रियगोचर नसून केवळ बुद्धीस / विचारास गम्य असतात. प्लेटोचा असा कायम आग्रह होता की, दोन समान काठ्या व समानता या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. समान काठ्या म्हणजेच समानता नव्हेत. समान, सुंदर, पवित्र असे शब्द जेव्हा आपण वापरतो तेव्हा समानता, सुंदर, पावित्र्य अशा अमूर्त निकषांचाच संदर्भ आपण देत असतो. हे अमूर्त विकल्प म्हणजेच प्लेटोच्या ज्ञानाचे विषय असतात. सॉक्रेटिसची साररूपी (Eidos) व्याख्या येथे ज्ञानाचा विषय बनून येते. तिला सत्ताशास्त्रीय स्थान व दर्जा प्राप्त होतो. सर्व सत्कृत्ये एकमेकांशी विशिष्ट तऱ्हेने बांधलेली असतात. ती सतच्या आयडियाजमध्ये सहभागी असतात. त्याचप्रमाणे समान काठ्या समानतेच्या आयडियामध्ये सहभागी असतात.

यावर असे म्हणता येईल का, की जगात जितक्या गोष्टी, व्यक्ती, प्राणी आहेत. कमीत कमी तितक्याच संख्येने 'आयडियाज' वास्तवात आहेत. अनुभवाचे हे आपले जग हे कमी वास्तव आहे, तर आयडियाज संपूर्णपणे वास्तव आहेत. (प्लेटोनुसार) म्हणजे वास्तव जग इतके गजबजलेले असते का? आयडियाज स्वतंत्र विश्वात वास्तव्य करतात का? प्लेटोच्या भाषेवरून तसा ग्रह होतो खरा, त्याच्या या आयडियाज नामक सारतत्त्वांचे स्वतंत्र विश्व आहे. परंतु येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, भाषा सर्वसामान्यपणे इंद्रियगम्य वस्तूंसाठी वापरताना त्या भाषेला अनेक मर्यादा येतात. किंबहूना तिच्या वापरातच असंख्य समस्या निर्माण होऊ शकतात. एका अर्थी प्लेटोची ही असहायता असू शकते.

या आयडियाजचे वर्गीकरण करण्याचे प्लेटोने जे मार्ग सांगितले आहेत ते विविध संवादांमध्ये विखुरलेले असून प्रत्येक संवादात त्याचा वेगवेगळा पैलू पहावयास मिळतो. तसेच मानवी ज्ञान व आयडियाज यांचे परस्परांशी असलेले नाते १) टिमिअस, २) सिम्पोझियन, ३) फीडो, ४) प्रोटॅगोरस, ५) फिअड्रस, ६) मीनो, ७) द रिपब्लिक, ८) पारमेनीडीज या संवादातून निरनिराळ्या रूपात पहावयास मिळते.

प्लेटोच्या आयडियाजच्या सिद्धांतामध्ये हिरॅक्लिटस, पार्मेनायडिज व सॉक्रेटिसच्या विचारांचे संमिश्रण सापडते. प्लेटोने इंद्रियगोचर वस्तूंच्या अविरत परिवर्तनाची कल्पना हिरॅक्लिटसकडून घेतली. आयडियांच्या चिरंतन अस्तित्वाची कल्पना पार्मेनायडिजकडून घेतली. सॉक्रेटिसच्या संकल्पनांना चिरंतन अस्तित्व देवून प्लेटोच्या आकाररूप सारतत्त्वांच्या सिद्धांताचा उगम झाला.

प्लेटोच्या मते आयडियांची अथवा सारतत्वांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१) आयडियाज या मूलतः सारतत्वरूपी असून एका अर्थी त्या व्याख्येप्रमाणे आहेत. सॉक्रेटिसने वापरलेल्या आयडॉस (Eidos) या शब्दावरून आयडिया (Idea) या शब्दाचा सारतत्वरूपी अर्थ ध्यानात येतो. अर्थात सॉक्रेटिसचा आयडॉस हा प्रायः नैतिक-अध्यात्मिक स्वरूपाचा होता, तर प्लेटोच्या आयडियाज या सत्ताशास्त्रीय आहेत.

२) बहुतेक सामान्य संकल्पना या आदर्श नैतिक स्वरूपाच्या असतात, तर कधी त्या भौमितिक स्वरूपाच्या असतात. या दोनही अर्थाच्या दृष्टीकोनातून संकल्पनांना आदर्श मूल्ये, निकष अथवा कसोटी असतात याचा अनुभव येतो. उदा. प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा, वर्तुळ, त्रिकोण यासारख्या सामान्य संकल्पनांचे हे लक्षण आयडियाजच्या बाबतीतही बऱ्याच प्रमाणात लागू पडते.

३) व्यावहारिक व दैनंदिन जीवनातील गोष्टी अथवा व्यक्ती या अशाश्वत स्वरूपाच्या असतात. आजचे हिरवे पान उद्या पिवळे पडलेले दिसते. परंतु हिरवा रंग हा शाश्वत आहे. (संकल्पना म्हणून व आयडिया या दृष्टीने देखील) आयडियाज शाश्वत असतात.

४) जगातील सर्व गोष्टी कालामध्ये बद्ध असतात. उदा. सॉक्रेटिस अमूक साली जन्माला आला आणि अमूक साली त्याचा देहांत झाला. पिरॅमिड आज अस्तित्वात आहेत इ. जगातील सर्व प्राणीमात्रे व वस्तू यांना काळाचे परिमाण लागू असते. पण हा गुणधर्म संकल्पनांना लागू पडत नाही. दोन ही संख्या आजपासून सम झाली अशी विधाने आपण करू शकत नाही. कालातीत असण्याचा सामान्य संकल्पनांचा गुणधर्म आयडियाजमध्ये देखील दिसतो.

५) आयडिया ऐक्यरूप (Unity) असतात. आयडिया अनेकामध्ये एक असते. सृष्टीमध्ये अनेक झाडे असतात. परंतु झाड ही आयडिया एकच असते.

६) आयडिया इंद्रियगोचर वस्तूंचा आधार (Ground) असतात. असंख्य, विविध वस्तूंच्या विवक्षित अस्तित्वाचे स्पष्टीकरण आयडियामुळे होते.

७) आयडिया अपरिवर्तनशील अविकारी व अविनाशी (Eternal) असतात. सुंदर वस्तू कालांतराने नाश पावतात. परंतु सौंदर्य ही आयडिया कधीच नष्ट होत नाही. भूतलावरील सर्व माणसे नाहीशी झाली तरी मनुष्य ही संकल्पना नित्य व अविनाशी आहे.

८) आयडिया (सारतत्वे) पूर्णत्व (Perfection) व्यक्त करीत असतात. इंद्रियगोचर सृष्टीमधील वस्तूंमध्ये काही ना काही न्युनत्व अथवा अपूर्णत्व आढळते. परंतु सारतत्वे सर्व दोषांपासून मुक्त असून ती परिपूर्ण असतात.

९) आयडिया वस्तूमध्ये अन्तर्हित अथवा अंतर्यामी (Immanent) असतात. त्याचप्रमाणे वस्तूंच्या अतीत (Transcendental) सुद्धा असतात. सौंदर्य ज्याप्रमाणे फुलांमध्ये सामावलेले असते.

१०) आयडिया दिक् आणि काल (Space & Time) यांच्या मर्यादांपासून मुक्त व अतीत असतात.

११) आयडियांचे आकलन केवळ विवेकबुद्धीला होते. असंख्य तसेच विभिन्न वस्तूंमधील समानता शोधून त्यातील सार तत्वाचे आकलन केवळ विचारमंथनाने शक्य होते.

१२) आयडिया अनेक प्रकारच्या असतात. घोडा, मनुष्य, झाड, नदी, तारा यासारख्या भौतिक वस्तूंच्या आयडिया असतात. शुभ्रत्व, गुरूत्व, माधुर्य यासारख्या गुणधर्माच्या आयडिया असतात. न्याय, सौंदर्य, सत्य, शिवत्व यासारख्या नैतिक आयडियासुद्धा असतात. नैसर्गिक तसेच मानवनिर्मित वस्तूंच्या ही आयडिया असतात.

१३) प्लेटो आयडियांच्या रचनेतील सर्वश्रेष्ठ व सर्वव्यापी आयडियाला शिवतत्व (Idea of Good) म्हणतो. शिवतत्व हीच अंतिम सत्ता असून ती सर्वोत्तम, सर्वव्यापक व सर्वसमावेशक आहे. तत्वज्ञानाचे उद्दिष्ट अंतिम सत्ता असलेल्या शिवतत्वाचे यथार्थ आकलन करून घेणे आहे.

१४) आयडिया परिपूर्ण असतात. मात्र इंद्रियगोचर विश्व सदोष व अपूर्ण आहे. अनुभवजन्य विश्वातील वस्तूंच्या दोषांचे अपूर्णत्वाचे कारण जड द्रव्य आहे. प्लेटोच्या मते ईश्वर (Demiurge) सारतत्वानुसार भौतिक वस्तू घडवितो. ईश्वर विश्वाचा निर्माता नसून तो विश्वाचा रचनाकार आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

१) सॉक्रेटिस हा .............. या देशातील तत्वज्ञ होता.

अ) इंग्लंड ब) अमेरिका क) ग्रीस ड) जपान

२) सॉक्रेटिसचा .............. हा शिष्य होता.

अ) प्लेटो ब) अरिस्टॉटल क) झिनो ड) पारमेनायडिज

३) सॉक्रेटिसने मानवी बुद्धीवर व तर्कावर आधारलेली .............. व्यवस्था समाजात स्थापन करण्याचा प्रयत्न केला.

अ) सामाजिक ब) नैतिक क) आर्थिक ड) राजकीय

४) सॉक्रेटिस हा .............. तत्वज्ञ होता.

अ) अनुभववादी ब) बुद्धीवादी क) समाजवादी ड) धर्मवादी

५) सॉक्रेटिसची आवडती .............. पद्धत होती.

अ) संभाषण प्रश्नोत्तर ब) निरीक्षण क) प्रयोग ड) तर्क

६) सॉक्रेटिसच्या मते बौद्धीक प्रवासाची सुरूवात .............. तून झाली पाहिजे.

अ) विश्वास ब) असत्य क) प्रामाणिकपणा ड) कल्पना

७) सॉक्रेटिसच्या मते प्रत्येक नैतिक वैगुण्याचे मूळ माणसाच्या .............. असते.

अ) बुद्धी ब) आत्मा क) मत ड) इंद्रियात

८) ............. हेच ज्ञान होय असे सॉक्रेटिसचे मत होते.

अ) सद्गुण ब) अनुभव क) बुद्धी ड) विचार

९) सॉक्रेटिसचे मते ज्याला चांगले कळते तो व्यक्ती सदैव ............. असते.

अ) निरोगी ब) श्रीमंत क) सुखी ड) स्वतंत्र

१०) प्लेटोने ............. नावाच्या संवादात ज्ञानविषयक उपपत्तीची चर्चा केलेली आहे.

अ) थिअटेटस ब) फिडो क) पारमेनिडीड ड) झिनो

११) प्लेटो आयडियाज ............. असल्याचे मानतो.

अ) अनित्य ब) स्थिर क) दृश्य ड) भासमान

१२) प्लेटोच्या मते नैतिक सद्गुण म्हणजे ............. होय.

अ) ज्ञान ब) अज्ञान क) कल्पना ड) विचार

१३) प्लेटोच्या मते ज्ञान म्हणजे ............. नाही.

अ) इंद्रियसंवेदना ब) वेदना क) आकलन ड) तर्क

१४) प्लेटोचा ............. हा प्रसिद्ध ग्रंथ आहे.

अ) रिपब्लिक ब) इथिक्स क) द मेटाफिजिक्स ड) इलियड

१५) प्लेटोने प्रगत अवस्थेतील बोधनाला ............. संबोधले आहे.

अ) भविष्य ब) वैयक्तिक मत क) ज्ञान ड) कल्पना

१६) प्लेटोच्या मते ज्ञानी मनुष्य हा ............. प्रेमी असतो.

अ) शरीर ब) सत्य क) सुख ड) मैत्री

१७) प्लेटोच्या आयडिया या प्रत्यक्षात ............. असतात.

अ) जग ब) व्यक्ती क) समाज ड) कुटूंब

१८) आयडियाज ह्या ............. प्रतिनिधित्व करणाऱ्या असतात.

अ) नेतृत्व ब) आदर्श क) राजकारण ड) अध्यात्म

१९) आयडियाज संपूर्णपणे ............. आहेत.

अ) निरपेक्ष ब) सापेक्ष क) वास्तव ड) विवक्षित

२०) प्लेटोच्या आयडिया ............. मानल्या जातात.

अ) नित्य ब) अनित्य क) विशेष ड) विनाशी

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सॉक्रेटिसने आपल्या तत्त्वज्ञानात कोणत्या प्रश्नांना महत्व दिले.

२) सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती कशावर अवलंबून आहे.

३) सॉक्रेटिसच्या मते 'ज्ञान हे संकल्पनात्मक असते' म्हणजे काय?

४) सॉक्रेटिस प्रश्नोत्तर पद्धतीच्या प्रश्नाचे स्वरूप सांगा.

५) सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टीकोन थोडक्यात स्पष्ट करा.

६) सत्याच्या प्राप्तीसाठी सद्गुणाची आवश्यकता असते थोडक्यात स्पष्ट करा.

७) प्लेटोच्या ज्ञानाची महत्वाची दोन प्रमेये सांगा.

८) प्लेटोच्या ज्ञानाच्या चार पातळ्या कोणत्या आहेत.

९) प्लेटोच्या मते ज्ञानी व्यक्तीचा आदर्श थोडक्यात सांगा.

१०) प्लेटोच्या ज्ञानाचे विषय कोणते ते सांगा.

**टीपा लिहा.**

१) सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती

२) सॉक्रेटिसची प्रश्नोत्तर संभाषण पद्धती

३) सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टीकोन

४) सद्‌गुण म्हणजे ज्ञान

५) प्लेटोचा ज्ञानसिद्धांत

६) प्लेटोचा आयडियाज सिद्धांत

७) प्लेटोच्या आयडिया/सारतत्वांची वैशिष्ट्ये

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती सविस्तर स्पष्ट करा.

२) सॉक्रेटिसची प्रश्नोत्तर (संभाषण) पद्धती सविस्तर स्पष्ट करा.

३) सॉक्रेटिसचा नीतिविषयक दृष्टीकोन सविस्तर स्पष्ट करा.

४) प्लेटोचा ज्ञानसिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

५) प्लेटोच्या आयडियांचा सिद्धांत स्पष्ट करा.

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ग्रीस | २) प्लेटो | ३) नैतिक | ४) बुद्धीवादी | ५) संभाषण प्रश्नोत्तर |
| ६) प्रामाणिकपणा | ७) बुद्धी | ८) सद्‌गुण | ९) सुखी | १०) थिअटेटस |
| ११) स्थिर | १२) ज्ञान | १३) इंद्रियसंवेदना | १४) रिपब्लिक | १५) ज्ञान |
| १६) सत्य | १७) जग | १८) आदर्श | १९) वास्तव | २०) नित्य |

**संदर्भ ग्रंथ –**

१) ग. ना. जोशी, पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास, खंड पहिला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर १०, १९७५.

२) वेदप्रकाश डोणगावकर, पाश्चात्य तत्त्वज्ञान, सौ. एस. व्ही. डोणगावकर, श्री प्रकाशन, जुलै २०२३.

३) अर्चना देगावकर, प्राचीन व मध्ययुगीन पाश्चात्य तत्त्वज्ञान, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, जून २०२१.

४) मेधा मराठे, सॉक्रेटिस, प्लेटो, लेनिन, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, २०१६.

५) संपादक एन. एच. फापाळे, पाश्चात्य तत्त्वज्ञान, तत्त्वज्ञान अभ्यासपत्रिका, मुंबई विद्यापीठ, प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, २०१६.

❑❑❑

## घटक ४
## ॲरिस्टॉटल (Aristotle)
### (इ.स. पूर्व ३८४ ते इ.स. पूर्व ३२२)

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ ॲरिस्टॉटलचे राजकीय विचार

४.२.२ ॲरिस्टॉटल आणि कुटुंबसंस्था

४.२.३ ॲरिस्टॉटलचा कारण सिद्धांत

४.२.४ ॲरिस्टॉटलची द्रव्य आणि आकार संकल्पना

४.२.५ ॲरिस्टॉटलचा ईश्वर

४.३ विद्यापीठीय प्रश्न


### ४.० उद्दिष्ट्ये :

१. ॲरिस्टॉटलची आदर्श राज्याची कल्पना आपणास आजची राज्यव्यवस्था कशी आहे याचे भान करून देते.

२. ॲरिस्टॉटलने सांगितलेली कारणकल्पना आपली विचारप्रक्रिया जागृत आणि प्रगल्भ करण्यास मदत करते.

३. विश्वात ज्या घटना किंवा कार्ये घडतात ती घडविणारी जी प्रेरक शक्ती ते म्हणजे ईश्वर ही ॲरिस्टॉटलची संकल्पना आपणांस विश्वनिर्मिती मागील तथ्य समजून घेण्यास मदत करते.

### ४.१ प्रस्तावना:

मॅसिडोनियन राज्याच्या सरहद्दीजवळ असलेल्या स्टागिरा या गावी ॲरिस्टॉटलचा जन्म ख्रि.पू. ३८४ मध्ये झाला. ॲरिस्टॉटलचे कुटुंब सुशिक्षित आणि सधन असे होते. ॲरिस्टॉटलचे वडील प्रसिद्ध राजवैद्य होते. फिलीप्स या मॅसिडोनियनच्या राजाशी ॲरिस्टॉटलचे चांगले संबंध होते. ॲरिस्टॉटल सर्व प्रकारच्या विद्या आणि कला यांचा जाणता व उपभोक्ता होता त्यामुळे राजा फिलीप्सने त्याचा मुलाला म्हणजे ॲलेक्झांडरला शिकवण्यासाठी मार्गदर्शक शिक्षक म्हणून ॲरिस्टॉटलची नेमणूक केली होती.

जन्मत:च ॲरिस्टॉटलची निरीक्षणशक्ती उत्तम होती. प्रखर बुद्धिमत्ता व विचारशक्ती यामुळे त्याचा कल अध्ययन आणि अध्यापनाबरोबर संशोधनाकडे देखील होता. त्याला सर्व विषयांचे ज्ञान अवगत होते. त्यापैकी वनस्पतीशास्त्र हा त्याच्या अत्यंत आवडीचा विषय होता. विविध प्रकारच्या वनस्पती गोळा करून त्यांच्यातील समान व विषम गुणवैशिष्ट्यांचे वर्गीकरण करणे ही त्याची आवड होती. त्याने केलेले राज्यांचे वर्गीकरण हे त्याच्या वनस्पतीशास्त्रांच्या विश्लेषणात्मक अभ्यासाचे मूळ होते असे म्हणता येईल.

प्लेटोप्रमाणेच ॲरिस्टॉटलने देखील विद्यार्थ्यांसाठी प्रबोधिनी सुरू केली होती. तो स्वतः प्लेटोच्या अकॅडमीमध्ये शिक्षणासाठी दाखल झाला व प्लेटोचा शिष्य राहिला. आपल्या गुरूबद्दल नितांत आदर ठेवून आपली स्वतःची मते तो निर्भीडपणे मांडत असे. प्लेटोच्या कुटुंब, विवाह आणि वित्तसंस्थांविषयक विचारांवर ऑरस्टॉटलने केलेले भाष्य हे गुरू-शिष्य संबंधांचे चिरकाल टिकणारे उदाहरण होते. ॲरिस्टॉटल प्लेटोच्या अकॅडमीत अठराव्या वर्षी दाखल झाला. ॲरिस्टॉटल वयाच्या सदतिसाव्या वर्षी प्लेटोच्या अकॅडमीतून बाहेर पडला आणि त्याने इतरांना शिक्षण देण्यासाठी स्वतःची अकॅडमी सुरू केली.

राजाश्रयाने प्लेटो आणि ॲरिस्टॉटल आपले ज्ञानार्जन आणि ज्ञानदानाचे काम करत असत. ॲरिस्टॉटलला मॅसिडोनियाजवळील हार्मिआस राजाच्या दरबारी आश्रय मिळाला. ॲरिस्टॉटलच्या बुद्धिमत्तेमुळे राजा हार्मिआस इतका प्रसन्न झाला की, त्याने आपल्या पुतणीचा विवाह ऑरस्टॉटलबरोबर केला. ॲरिस्टॉटल हा रूढी-परंपरांचा आदर करणारा विचारवंत होता. त्याचे व्यक्तिगत जीवन परंपरावादी होते. व्यक्तिगत जीवनाबाबत प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्यात फरक दिसून येतो. प्लेटो अविवाहित होता. त्यामुळे प्लेटो विचाराने स्वप्नाळू होता. याउलट, ॲरिस्टॉटल कुटुंबवत्सल असल्यामुळे त्याची वास्तवाशी कधीही फारकत झाली नाही. याशिवाय असे दिसून येते की, प्लेटो आणि ऑरिस्टॉटल यांच्या अभ्यासपद्धती वेगवेगळ्या होत्या. प्लेटोने सॉक्रेटिसबरोबर केलेली भ्रमंती आणि सॉक्रेटिसच्या गुरू-शिष्य संवादातून संकलित केलेल्या ज्ञानाच्या आधारावर निगमनात्मक पद्धतीने आपल्या अकॅडमीमध्ये बसून ग्रंथरचना केली. ॲरिस्टॉटलने मात्र आपला अनुभव आणि निरीक्षणाचा ज्ञानप्राप्तीसाठी उपयोग करून घेऊन निगमनात्मक पद्धतीने विचार मांडले, तसेच ग्रंथही लिहिले. ख्रिस्तपूर्व ३६५ मध्ये ॲरिस्टॉटल अथेन्स या नगरराज्यात परत आला. त्याच वर्षी मेसिडोनियाचा राजपुत्र अलेक्झांडर हा जगज्जेता बनण्याच्या मोहिमेवर निघाला होता. निघण्यापूर्वी ॲरिस्टॉटलने अलेक्झांडरला उपदेश करताना म्हटले की, महत्त्वाकांक्षेचे परिवर्तन आततायीपणात होऊ देऊ नकोस. तसेच तुझ्या जग जिंकण्याच्या महत्त्वाकांक्षेस आवर घाल. परंतु, अलेक्झांडरने आपल्या गुरूचा हा उपदेश मानला तर नाहीच, उलट 'तुझा कसा समाचार घेतो ते बघ' असे दम देणारे पत्र ॲरिस्टॉटलला पाठवले. पुढे ॲरिस्टॉटल मॅसिडोनिया सोडून अथेन्सला परतला. अथेन्समध्ये ॲरिस्टॉटलने 'लिसियम' (Licyum) या नावाने शिक्षणसंस्था स्थापन केली. आपली शिक्षणसंस्था अध्ययन, अध्यापन आणि संशोधनासाठी आहे याची बूज त्याने अखेरपर्यंत बाळगली. या बारा वर्षांच्या काळात ॲरिस्टॉटलने एकूण १५८ नगरराज्यांच्या घटनांचा अभ्यास केला आणि त्याचे विश्लेषण करून आपली राजकीय तत्त्वे निश्चित केली. निराश अलेक्झांडर जेव्हा आशियाच्या मोहिमेवरून, विशेषतः भारतातून परत आला तेव्हा ॲरिस्टॉटलला त्याच्या आगमनामुळे आनंद वाटण्याऐवजी भीती वाटू लागली. परंतु, तो ग्रीसमध्ये

पोहोचण्यापूर्वीच ॲरिस्टॉटलचे इजिप्तमध्ये निधन झाले. प्लेटो आणि ॲरिस्टॉटलच्या प्रयत्नांमुळे अथेन्समध्ये स्थिर होऊ पाहत असलेली लोकशाही पुन्हा एकदा नष्ट झाली. अलेक्झांडरचा गुरू म्हणून ॲरिस्टॉटलकडे पाहताना अथेन्समधील नागरिक त्याचा द्वेष करू लागले. सॉक्रेटिसवर जसा आरोप ठेवला गेला, तसा ॲरिस्टॉटलवर धर्मभेदाचा आरोप ठेवला गेला. सामान्य लोकांकडून त्याची अवहेलना होऊ लागली.

**ॲरिस्टॉटलची ग्रंथसंपदा :**

ऑरेस्टॉटलचा प्रमुख राजकीय ग्रंथ 'पॉलिटिक्स' (Politics) हा प्लेटोच्या द रिपब्लिक, द लॉज आणि द स्टेट्समन या तीनही ग्रंथांपेक्षा अनेक दृष्टीने वेगळा आहे. त्याने रिपब्लिक या ग्रंथापेक्षा 'पॉलिटिक्स' (Politics) या ग्रंथात अगदी वेगळी भूमिका मांडली आहे. या ग्रंथाचे स्वरूप म्हणजे त्यात ॲरिस्टॉटलची लिखित व्याख्याने आणि त्याच्या शिष्यांनी लिहून घेतलेले त्याचे विचार यांचे यांचे संकलन आहे. त्याची लेखनपद्धती विगमनात्मक (Inductive) स्वरूपाची असून त्याने मिळवलेली ही माहिती त्याच्या निरीक्षण आणि अनुभवांवर आधारित होती. अथेन्समध्ये आल्यावर त्याने सुरू केलेल्या लिसियम (Licyum) या शिक्षणसंस्थेत त्याचे बरेचसे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन झाले. त्याने संकलित केलेल्या माहितीचे शास्त्रशुद्ध विश्लेषण केले. त्याने दीर्घकाळ शास्त्रीय पद्धतीने केलेल्या लेखनात राजकारणा व्यतिरिक्त इतर अनेक विषयाचा त्यामध्ये समावेश केला होता. तसेच त्याच्या काळातील लहान-मोठ्या १५८ राज्यांच्या राज्यघटनांचा अभ्यास ॲरिस्टॉटलने केला.

व्यक्ती आणि समूह यांचा विचार करणारा ॲरिस्टॉटल हा समाजशास्त्रज्ञ होता. त्याने विज्ञान, मानव्य, कला, साहित्य, संगीत अशा विविध विषयांचा सविस्तर व सर्वसमावेशक असा अभ्यास केला होता. ॲरिस्टॉटल हा जितका वनस्पतिशास्त्रात पारंगत होता तितका अन्य विषयांत नव्हता. असे असले तरी त्याने मानवी आणि समाजजीवनाच्या विविध विषयांना अनुसरून आपले तात्विक लेखनातून योगदान दिले आहे. काळ आणि परिस्थिती याकडे तटस्थपणे पाहून त्याने विश्वातील घडामोडींचा आढावा घेतला. तो प्राचीन ग्रीसच्या वैभवसंपन्न परंपरेत व राज्यव्यवस्थेत प्लेटोपेक्षाही अधिक रमला होता. त्याची स्मरणशक्ती विलक्षण व तीव्र स्वरुपाची होती. आपले डोळे व कान जागृत व सजग ठेवून आपल्या प्रगल्भ निरीक्षणद्वारे सत्य काय आहे याचे वास्तववादी स्वरूप त्याच्या लिखाणात ठिकठिकाणी आढळते.

**१. ॲरिस्टॉटलचे राजकीय विचार :**

**ॲरिस्टॉटलची आदर्श राज्याची कल्पना :**

सॉक्रेटिस आणि प्लेटो यांना सामाजिक शास्त्राचे प्रणेते तत्त्वज्ञ म्हणून नेहमीच उल्लेख केला जातो. प्लेटो या तत्वचिन्तकाने आदर्श राज्याच्या कल्पनेची सर्वप्रथम मांडणी केली. प्लेटोला त्याचे जितके श्रेय जाते तेवढे ॲरिस्टॉटलला दिले जात नाही हे तेवढेच खरे आहे. त्यामुळे आदर्श राज्याची कल्पना ॲरिस्टॉटलनेही केली असेल असे एकदम पटत नसले तरी प्लेटोच्या आदर्श राज्याच्या कल्पनेचे खंडन वा टीका करताना ॲरिस्टॉटलने स्वत:ची आदर्श राज्याची कल्पना अप्रत्यक्षपणे मांडली आहे. थोडक्यात, राज्य आणि समाज

यांचे काही बिघडले अथवा काही समस्या निर्माण झाल्या आहेत व त्या कशा पद्धतीने दुरुस्त करावयाच्या या प्रश्नाचा विचार हा प्लेटोच्या आदर्श राज्याचे मूळ सूत्र असल्याचे निदर्शनास येते. ॲरिस्टॉटल मात्र याबाबत वेगळा विचार करतो. आदर्श राज्याचे मूलतत्त्व म्हणून घटनात्मक सत्ता व कायद्याचे अधिराज्य या तत्त्वांना तो प्राधान्य व महत्त्व देतो. रूढी, कायदा आणि परंपरा यांच्या आदरातून घटनात्मक सत्ता निर्माण होते असे त्याचे मत आहे. कायद्याचा मूलस्रोत घटना हीच असते. घटनेवर आधारीत निर्माण झालेले कायदे चांगला राज्यकारभार करण्यास सहाय्यभूत ठरतात. ॲरिस्टॉटलने घटना आणि कायदा या दोन गोष्टींना राजकीय विचारांच्या अत्युच्च कोटीला नेऊन बसवले आहे. त्यामुळे असे म्हणता येते कि, ॲरिस्टॉटल हा घटनात्मक राज्यपद्धती आणि कायद्याचे अधिराज्य या तत्त्वांचा पुरस्कार करणारा पहिला राजकीय विचारवंत होता. प्लेटोने मांडलेला काल्पनिक आदर्शवाद दूर करून ॲरिस्टॉटलने वस्तुनिष्ठ आणि व्यावहारिक आदर्शवाद निर्माण केला.

ॲरिस्टॉटल कायद्याचे महत्त्व विशद करताना म्हणतो की, ज्या राज्यात कायदा श्रेष्ठ असतो, त्याच राज्यात व्यक्तीला व्यक्ती म्हणून खरा नैतिक आणि नैसर्गिक दर्जा मिळतो. जेथे कायद्याचे अधिराज्य असते, तेथेच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य व समता या मूल्यांना स्थान असते. याचे कारण कायदा हा नागरिकांच्या इच्छेतून निर्माण होत असल्यामुळे आणि तो व्यक्तीविकास आणि व्यक्तीसुरक्षा या गोष्टींना उपयुक्त असतो. राज्यातील गुलाम नागरिक त्याचे पालन उत्स्फूर्तपणे करतात. आपले आचरण कायद्याप्रमाणे ठेवणे हे एक प्रकारे स्वयंशासन आणि स्वयंनियंत्रण असते, कायद्याला न मानता एखादी व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह राज्यकारभार करू लागला तर व्यक्तींना नागरिक म्हणण्याऐवजी 'हुकुमाचे ताबेदार' म्हणणे भाग पडेल. कायद्याच्या पालनाने मिळणाऱ्या लाभांचाही ॲरिस्टॉटलने विचार केला आहे. प्रत्येक कायद्याच्या पाठीमागे दीर्घकालीन अनुभवाची जोड असते. याबरोबरच व्यक्तींची सामूहिक इच्छा हा त्या-त्या कायद्याचा आधार असतो. समाजातील रूढी, परंपरा, रीतिरिवाज यामधून प्राप्त झालेले अनुभवाचे शहाणपण कायद्यामधून प्रतिबिंबित होत असते. एक व्यक्ती किंवा एका व्यक्तीसमूहापेक्षा समाजाची सामूहिक विचारबुद्धी आणि शहाणपण हे महत्त्वाचे असते. ॲरिस्टॉटल एका अर्थाने रूढी आणि परंपरावादी विचारवंत आहे असे वाटते. तो असे म्हणतो की, ''शतकानुशतके चालत आलेल्या रूढी आणि परंपरांचा आपण आदर केला पाहिजे ते आपल्या जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे''. ॲरिस्टॉटलच्या याविषयीच्या भाष्यात कायद्यापासून निर्माण होणाऱ्या सकारात्मक व नकारात्मक उपयुक्ततेची चर्चा आढळते. निषेधात्मक दृष्टिकोनातून विचार करताना तो म्हणतो की, लोकांनी भावनाविवशतेपेक्षा, वासनांच्या आहारी जाण्यापेक्षा, स्वत:च्या विवेक बुद्धीच्या माध्यमातून प्रत्येक कृती करावी. आपणास राज्याकडून मिळालेल्या कायद्याचे पालन केले असता ही गोष्ट सहज शक्य व सरल आहे. कायद्याकडे पाहाण्याचा प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो. सदाचारी वा सत्प्रवृत्तीची माणसे स्वत:हून कायद्याचे पालन करतात तर दुराचारी वा दुष्ट प्रवृत्तीची माणसे कायदा मोडण्यातच मोठेपण मानतात. हा फरक लक्षात घेऊनही कायदा सर्वांनाच समान आहे हे सर्वांनी समजून घ्यावे. समाजव्यवस्थेला व्यक्तीकडून धोका पोहोचणार नाही असे वर्तन करण्यास व्यक्तीला कायदा भाग पाडतो. कायद्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहताना ॲरिस्टॉटल उत्तम व सर्वसमावेशक

समाजव्यवस्थेची अपेक्षा करतो. 'State exists, but a good state must exist for good life' ॲरिस्टॉटलचे हे विधान एवढे सकारात्मक आहे की, तो केवळ राज्याला महत्त्व न देता त्याच्या दृष्टिकोनातील आदर्श राज्याला महत्व देतो. चांगल्या, शांततामय आणि नैतिक जीवनासाठी राज्य देखील आदर्श असले पाहिजे हा आग्रह ॲरिस्टॉटल राज्याकडून धरतो. तत्त्वज्ञ राज्यकर्ते ही संकल्पना स्पष्ट करताना प्लेटोने राजा आणि राज्यकर्ते यांना कायद्यापेक्षा श्रेष्ठ व मोठे मानले आहे. ॲरिस्टॉटल मात्र प्लेटोच्या या विचारांशी सहमत नसल्याचे दिसते. राज्यकर्ते आदर्श असतील तर समाजही आदर्श बनेल हे प्लेटोचे विचार स्वप्नरंजनात्मक वाटतात असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. प्लेटोच्या आदर्श राज्याच्या निर्मितीची परिस्थितीही अशीच आहे. ॲरिस्टॉटल म्हणतो लहान वयात मुलामुलींना त्यांच्या आई-वडिलांपासून वेगळे दूर ठिकाणी ठेऊन राज्याच्या पालकत्वाखाली प्रशिक्षण दिल्यास आदर्श राज्यकर्ते निर्माण करता येतील, हे एक प्लेटो वगळता कोणीही मान्य केलेले नाही. हा ॲरिस्टॉटलचा उपरोध त्यादृष्टीने योग्य व खरा म्हणावा लागेल. राज्यकर्ता व्यक्ती ही जणूकाही सर्वगुणसंपन्न असून तिला पूर्वग्रह, इच्छा आकांक्षा, भाव-भावना, वासना हे विकार मुळीच नसतात असे गृहीत धरून चालणे केवळ चुकीचेच नाही तर धोकादायक देखील आहे. व्यक्तीला सामाजिक स्थैर्य हे कायद्यामुळे प्राप्त होऊ शकते. ॲरिस्टॉटल त्याविषयी आग्रही असल्याचे दिसून येते. तरीही कायदा अपरिवर्तनीय असावा असे ॲरिस्टॉटल म्हणत नाही. काळानुरूप बदलत्या परिस्थितीनुसार कायद्यामध्येही दोष निर्माण होतात किंवा कायदा निरुपयोगी ठरतो. म्हणून कायद्यामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार सुयोग्य असे परिवर्तन होणे आवश्यक असते. असे असले तरी, व्यक्तीला कायदा हा कधीही अडथळा आहे असे वाटता कामा नये. कायद्याच्या वर्चस्वामुळे आपण कायद्याचे गुलाम बनलो आहोत असे न वाटता कायद्यामुळे आपले व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राहून ते आपणास व्यवस्थितपणे उपभोगता येतात असे व्यक्तीला वाटावयास हवे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याच्या संकल्पनेचा विचार केल्यावर ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्य समजावून घेणे सोपे वाटते. पहिली गोष्ट म्हणजे ॲरिस्टॉटल आपल्या आदर्श राज्याची कल्पना मांडताना प्लेटोप्रमाणे स्वप्नरंजन करीत नाही. ॲरिस्टॉटल मानवी स्वभाव, नैसर्गिक वृत्ती यांचा वास्तव शोध घेऊन त्याची आदर्श राज्याची कल्पना मांडतो. प्लेटोची राज्याची कल्पना ही आदर्श राज्याची कल्पना आहे, तर ॲरिस्टॉटलची आदर्श राज्याची कल्पना ही आदर्श शासनसंस्थेची कल्पना आहे असे म्हणता येते. याचाच अर्थ असा की, ॲरिस्टॉटलने राज्यसंस्था आणि शासनसंस्था यात फरक करून शासन संस्थेला राज्याचे मूर्त स्वरूप मानले आहे. अर्थात, त्याच्या लेखी राज्य म्हणजेच शासन असे नव्हे. त्याला राज्य आदर्श असण्यापेक्षा शासनसंस्था ही आदर्श असावी असे वाटते. तो जेव्हा राज्यघटना, कायदा, न्याय, स्वातंत्र्य या मूल्यांचा विचार करतो तेव्हा ती मूल्ये प्रत्यक्षात कशी उतरतील याचा विचार तो महत्त्वाचा मानतो. राज्य आणि शासनसंस्था यांचे विविध प्रकार परिस्थितीनुरूप प्रत्यक्षात उतरवणे हे किती अवघड आहे हे ऑरस्टॉटल मोठ्या खुबीने पटवून देतो. उदा. राजसत्ता किंवा राजेशाही ही तात्त्विक दृष्टिकोनातून चांगली आहे असे चित्र रंगवता येते. परंतु, राजा नावाच्या एका व्यक्तीमध्ये कितीही सर्वगुणसंपन्नता असली तरी केवळ राजा नावाची एक व्यक्ती आदर्श राज्य निर्माण करू शकेलच असे नाही. शिवाय एक आदर्श राजा नाहीसा झाल्यानंतर पुढील राजा तितकाच आदर्श आणि गुणसंपन्न निघेल यावर विसंबून राहता येत नाही. राजेशाही खालोखाल महाजनसत्तेचीही तीच गत असू शकते. असा इशारा ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याच्या

कल्पनेत दडल्याचे दिसून येते. एका राजा ऐवजी काही श्रेष्ठ व्यक्ती किंवा महाजन जर राज्य करू लागले तर त्यांच्या हातातील सार्वभौम सत्ता ते स्वतःच्या आर्थिक आणि सामाजिक लाभासाठी वापरणे हे अधिक शक्य आहे असे ॲरिस्टॉटलला वाटते. राजसत्ता आणि महाजनसत्ता यांच्याप्रमाणे ऑरस्टॉटल आधुनिक लोकशाही पद्धतीच्या शासनालाही दोष देतो. लोकशाही राज्यव्यवहारात अधिकाधिक लोकांचा अधिकाधिक सहभाग अपेक्षित असतो. ऑरस्टॉटलला, लोक अशा सहभागासाठी तयार होतील हे अशक्य, अशास्त्रीय आणि थेट मूर्खपणाचे वाटते. व्यक्तीव्यक्तींमधील नैसर्गिक फरक लक्षात न घेता शासन स्थापन करणे म्हणजे बहुसंख्याकांच्या झुंडशाहीला (Tyranny of Majority) प्रोत्साहन देण्यासारखेच होईल असे त्याला वाटते. थोडक्यात, आधुनिक लोकशाहीतील लोकांचे सार्वभौमत्व ही कल्पना ॲरिस्टॉटलला मान्य नाही.

ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्य म्हणजे जागरूक मध्यमवर्गीयांचे राज्य असे म्हणता येईल. त्यादृष्टीने प्लेटोप्रमाणे तोही समाजातील तीन प्रमुख वर्गांचा विचार करतो. विशेष म्हणजे या तीन वर्गांचा विचार आधुनिक लोकशाही समाजातही केला जातो. ते तीन वर्ग म्हणजे धनिकांचा वर्ग, गरिबांचा वर्ग आणि मध्यम वर्ग. ऑरेस्टॉटलच्या काळातील ग्रीक नगरराज्यात मर्यादित लोकसंख्येत धनिक आणि गरिबांचे वर्ग संख्येने लहान तर मध्यमवर्ग हा बहुसंख्यांकांचा वर्ग असे चित्र असावे. म्हणून ॲरिस्टॉटलच्या मते मध्यमवर्ग हा समाजाचा कणा आहे. ॲरिस्टॉटलची सगळीच विधाने ही आधुनिक काळातही गृहीतकांसारखी मांडली जातात. म्हणूनच आजही मध्यमवर्गाला लोकशाहीचा कणा म्हटले जाते. मनुष्य सामाजिक, विवेकी आणि राजकीय आहे अशी मूलभूत विधाने ऑरस्टॉटलने केली आहेत. त्या सर्वांतून राजकीय आणि सामाजिक वर्तन करणारी सुसंस्कारित मध्यमवर्गीय व्यक्ती निर्माण होते आणि ती व्यक्ती राज्यघटना, कायद्याचे अधिराज्य, न्याय आणि स्वातंत्र्य या संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी वस्तुनिष्ठ राज्य आणि शासनपद्धती निर्माण करू शकते.

अर्थात, एक गोष्ट खरी की, मध्यमवर्गीयांचा राज्यकारभारात सहभाग म्हणजे प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे आणि सर्वांना राज्यकारभारात सहभाग मिळणे असे नव्हे. ऑरिस्टॉटल त्याच्या आदर्श राज्याच्या कल्पनेत प्रातिनिधिक कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे समाजातील श्रीमंत, गरीब आणि मध्यमवर्गावर अवलंबून ठेवतो. कायदेमंडळात मध्यमवर्गीयांनी प्रतिनिधित्व करावे म्हणजे कायदे निर्मितीचे काम शांततामय वातावरणात विचारपूर्वक होईल असे त्याला वाटते. कायदे निर्मितीत हलगर्जीपणा व्हावयाचा नसेल तर कायदेनिर्मितीचा अधिकार मध्यमवर्गीयांवर सोपवावा असे सुचवतो. या उलट, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यामध्ये तीनही वर्गाच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले तर गुणवत्तेच्या आधारावर काम करण्याचे श्रेय हे श्रीमंत आणि गरीब यांना देता येईल असे त्याला वाटते. थोडक्यात, लोकशाही आणि महाजनसत्ता या दोन प्रकारच्या शासनपद्धतीचा समन्वय साधल्याने राज्यकारभारात स्थैर्य आणि कार्यक्षमता निर्माण होईल अशी त्याची धारणा असल्याचे दिसते.

**२. आदर्श राज्यपद्धतीचे निकष:**

१) आदर्श राज्याचा भौगोलिक आकार आटोपशीर असावा आणि लोकसंख्या मर्यादित असावी. आकाराने मोठे राज्य प्रत्येक व्यक्तीचे नियंत्रण करू शकत नाही. त्यामुळे कार्यक्षमता धोक्यात येऊ शकते. तसेच

भौगोलिक क्षेत्राच्या प्रमाणाबाहेर लोकसंख्या गेली तर असे राज्य सामाजिकदृष्ट्या शांतताविरोधी, आर्थिकदृष्ट्या गरीब आणि राजकीयदृष्ट्या अस्थिर बनण्याचा धोका असतो. थोडक्यात, स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण राज्यासाठी भूप्रदेश आणि लोकसंख्या यांच्या प्रमाणाचा विचार करणे ॲरिस्टॉटलला आवश्यक वाटते.

२) आकाराबरोबरच राज्याचे स्थान राज्यमंडळात कसे असावे, यासंबंधीचा निकषही ॲरिस्टॉटलला महत्त्वाचा वाटतो. त्याच्या मते, राज्याचे सहजपणे संरक्षण होईल, आवश्यक तो व्यापार करण्याची संधी नागरिकांना मिळेल, राज्याच्या सरहद्दी सुरक्षित ठेवता येतील, बाह्यआक्रमणाची भीती असणार नाही अशा सुरक्षित ठिकाणी राज्याची स्थापना करता आली पाहिजे. ॲरिस्टॉटलच्या काळात सागरी व्यापारामुळे जिकडेतिकडे सुस्थिती निर्माण झाली होती. परंतु, अशा समृद्धीमुळे नागरिक हुरळून जाऊ नयेत म्हणून ॲरिस्टॉटल व्यापारावर अनेक बंधने घालतो.

३) राज्याची लोकसंख्या इतकी थोडी असावी की राज्यातील लोकांनी परस्परांना ओळखावे, त्यांच्या अडीअडचणींला धावून जावे आणि आदर्श असा स्वयंपूर्ण समाज निर्माण करावा असे ॲरिस्टॉटलचे मत दिसून येते.

४) भूप्रदेश आणि लोकसंख्या आटोपशीर असण्याचा महत्त्वाचा फायदा म्हणजे नगर राज्यातील नागरिक एकमेकांना व्यक्तिशः ओळखू शकतात. त्यामुळे सहभागी शासनपद्धती निर्माण होऊन न्याय आणि स्वातंत्र्याचे रक्षण होईल असे ॲरिस्टॉटलला वाटते.

५) आदर्श राज्यासाठी नागरिकही आदर्श असले पाहिजेत असा ॲरिस्टॉटलचा आग्रह दिसतो. नागरिकांमध्ये पाश्चात्त्य जीवनपद्धती आणि पौर्वात्य जीवनपद्धती यांचा मिलाप झाल्यास आदर्श नागरिक निर्माण होऊन लोकशाहीला पोषक अशी राजकीय संस्कृती निर्माण होऊ शकेल असे त्याला वाटते. त्या दृष्टिकोनातून ग्रीक नागरिकांचे धैर्य आणि चैतन्य आणि पूर्वेकडील संस्कृतीमधील माणसांचे साधेपण आणि शहाणपण या गुणांचे मिश्रण आदर्श नागरिकांमध्ये असणे त्याला श्रेयस्कर वाटते.

६) आदर्श राज्यामध्ये कृषकवर्ग, कलाकार व कारागीर, सैनिक, पुरोहित व प्रशासक असे सर्व प्रकारचे लोक असणे ॲरिस्टॉटलला आवश्यक वाटते. परंतु, शेती करणारे तसेच जीवनोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणारे लोक शारीरिक कष्ट करणारे असतात. त्यांना आपल्या कामासाठी भरपूर वेळ द्यावा लागतो. अशा लोकांना नागरिक असे संबोधण्यास ॲरिस्टॉटल तयार नाही. काबाडकष्टाची कामे गुलाम आणि परकीयांना देऊन स्थानिकांचे नागरिकत्व अबाधित ठेवण्याची ॲरिस्टॉटलची शक्कल थोडी विचित्र वाटते हे खरे. त्याची नागरिकांकडून असलेली अपेक्षा म्हणजे विचारनिर्मिती, शिक्षण आणि कलागुणांचा विकास आणि बौद्धिक कामे एवढीच असल्याचे दिसते. ॲरिस्टॉटल नागरिकांसाठी उद्योग आणि व्यापार ही क्षेत्रेही मोकळी ठेवत नाही. तो नागरिकांचा 'वयाप्रमाणे काम' असाही विचार करतो. उदा. संरक्षणाचे काम तरुणांनी करावे, प्रशासनाचे काम मध्यमवयस्कांनी पहावे आणि धार्मिक कार्याकरता वृद्धांनी वेळ द्यावा असे तो म्हणतो. सर्व

सामूहिक आणि सार्वजनिक कामे ही नागरिकांनीच पार पाडावीत आणि ती नागरिकांची सामूहिक मालकी असलेल्या ठिकाणीच पार पाडावीत असाही त्याचा आग्रह दिसून येतो.

७) प्लेटोप्रमाणे ॲरिस्टॉटलनेही विवाहसंस्था, कुटुंबसंस्था आणि वित्तसंस्थेचा नगरराज्याच्या दृष्टिकोनातून विचार केल्याचे आढळते. विवाहयोग्य स्त्री पुरुषांचे वय, त्यांना होणारी अपत्ये त्यांच्या संगोपनाची काळजी, त्यांचा शारीरिक-मानसिक विकास व बौद्धिक विकास या सर्व बाबींचा ऑरस्टॉटलने बारकाईने विचार केला आहे. आदर्श राज्यात शिक्षण व्यवस्था ही केली जावी, सर्वांना समान शिक्षण दिले जावे, शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाबरोबर सद्गुणांचीही जोपासना व्हावी असे ॲरिस्टॉटलचे म्हणणे असल्याचे दिसून येते. त्यादृष्टीने सर्व विद्यार्थ्यांचा विकास वाचन, लेखन, चिंतन, चित्रकला, संगीत, साहित्य अशा सर्वांगाने व्हावा असे त्याला वाटते. ऑरस्टॉटलने मनुष्याला सामाजिक, विवेकशील, राजकीय प्राणी असे संबोधले आहे. मात्र, मनुष्यातील प्राणीपण नष्ट करावयाचे झाल्यास ॲरिस्टॉटल शिक्षण, प्रशिक्षण आणि संस्कार यावर भर देताना दिसतो.

## २) ॲरिस्टॉटल आणि कुटुंबसंस्था :

ऑरॅस्टॉटल हा वास्तववादी विचारवंत होता. मात्र तो सामाजिक रूढी आणि परंपरा यांचा नेहमी आदर करीत होता. विवाहसंस्था, कुटुंबसंस्था आणि वित्तीयसंस्था या संस्था उच्चवर्गीयांसाठी असू नयेत हे प्लेटोचे मत ॲरिस्टॉटलला नाकारतो.. याशिवाय आदर्श राज्यकर्त्यांच्या निर्मितीसाठी, वैवाहिक साम्यवादाच्या नावाखाली वरिष्ठ वर्गीयांना मुक्त लैंगिक स्वातंत्र्य देणे हे ॲरिस्टॉटलला अमान्य होते. त्याच्या मते 'वैवाहिक साम्यवादाची कल्पना' ही केवळ अव्यवहार्य नाही, तर ती घातक देखील आहे. 'वैवाहिक साम्यवादामुळे समाजातील घटकांमध्ये राग, द्वेष, लोभ, मद, मत्सर इत्यादी वाईट वृत्तींचा प्रादुर्भाव वधील लागेल.. मुक्त लैंगिक व्यवहारात कोणत्याही स्त्री-पुरुषाने केवळ आपली वासना पूर्ण करण्यासाठी कसेही वागावे, हे ॲरिस्टॉटलला अनैतिक वाटते. त्यामुळे त्याने 'आदर्श राज्यकर्त्यांच्या निर्मितीसाठी सार्वजनिक कुंटणखान्यांना परवानगी देणे गैर आहे' अशी वैचारिक भूमिका घेतली. अशा अनैतिक संबंधातून जन्माला आलेली अपत्ये कोणत्याही प्रकारची भावनिक गुंतवणूक महत्त्वाची मानणार नाहीत म्हणून ती कधीही आदर्श राज्यकर्ते होऊ शकणार नाहीत. प्लेटोच्या विचारांमुळे आदर्श अशा नैतिक राज्याची निर्मिती होऊ शकेल ही गोष्ट ॲरिस्टॉटलच्या मनाला पटत नाही. शिवाय कौटुंबिक साम्यवादात विवाहसंस्था कालबाह्य ठरण्याचा धोका संभवतो.

ॲरिस्टॉटलच्या मते, अपत्याबद्दलचे प्रेम हे पती-पत्नीच्या नात्यातून निर्माण होते. परंतु, वैवाहिक साम्यवादाच्या नावाखाली माणसांमधील प्रेमभावनाच नष्ट केल्यामुळे समाजाचे अधिकाधिक नुकसान होईल. थोडक्यात, ॲरिस्टॉटलची वरील मते केवळ त्याच्या विचारांनाच पुष्टी देतात असे नाही तर तो एक असे व्यावहारिक राज्य निर्माण करतो की, ज्यात राज्याचा अधिकारही रक्षिला जातो; शिवाय व्यक्तीस्वातंत्र्यही नष्ट होत नाही.

३. **कारण सिद्धान्त (Causation ) :**

कारण (Cause) व हेतू (Reason) यांत फरक आहे. हेतू किंवा प्रयोजन (Reason) यंत्रणेच्या साहाय्याने परिणाम घडवून आणते ते कारण (Cause) होय.

उदा. मृत्यू हा रोगामुळे किंवा घाताने येऊ शकतो; पण ही कारणे जगात मृत्यू हा 'का' असावा याविषयी मात्र काही सांगू शकत नाहीत.

ॲरिस्टॉटलच्या कारण कल्पनेत मात्र कारण वस्तू किंवा प्रयोजन या दोघांचाही समावेश आहे. एखाद्या उपपत्ती किंवा तिचे अस्तित्व यथार्थपणे समजण्यासाठी जे जे म्हणून आवश्यक आहे, मग ते कारण असो की प्रयोजन असो, त्यांचा समावेश ॲरिस्टॉटलच्या कारण-सिद्धान्तामध्ये झालेला आहे. इतक्या व्यापक अर्थाने जर कारणकल्पनेकडे पाहिले तर ॲरिस्टॉटलची कल्पना चांगल्या अर्थाने समजू शकते.

ॲरिस्टॉटलच्या म्हणण्याप्रमाणे कशाचेही ज्ञान होणे म्हणजे त्याच्या कारणांचे ज्ञान होणे. उदा., एखादा पुतळा घडविणे किंवा बीजापासून वृक्ष बनणे, ह्या प्रक्रियांची कारणे जर समजली, तर त्यांचे स्वरूप समजले असे होईल. बदलाच्या किंवा प्रक्रियेच्या स्वरूपाचा उलगडा करण्यासाठी ॲरिस्टॉटल चार प्रकारची कारणे मानतो. ती म्हणजे

१. द्रव्य/ उपादान कारण (Material Cause):

२. आकार (Form);

३. निमित्त (Efficient )

४. अंतिम उद्दिष्ट किया प्रयोजन (Final Cause )

द्रव्य/उपादान कारण घडविण्यात आलेल्या किंवा उत्पन्न झालेल्या वस्तूचे रूप ज्या आशयरूप अधिष्ठानात वसते, ते अधिष्ठान म्हणजे उपादानकारण. उदा., पुतळा ज्या धातूचा घडविलेला असेल, तो धातू त्या पुतळ्याचे उपादानकारण. : जे स्वरूप अंगी असल्यामुळे वस्तू एका विवक्षित आकारिक कारण प्रकारची वस्तू ठरते, ते स्वरूप म्हणजे त्या प्रकारच्या वस्तूचे आकारिक कारण. उदा., जे रूप अंगी असल्यामुळे एखादी वस्तू घोडेस्वाराचा पुतळा ठरते, ते स्वरूप अथवा तो आकार म्हणजे घोडेस्वाराच्या पुतळ्याचे आकारिक कारण. ज्या हेतूच्या परिपूर्तीसाठी एखादी प्रक्रिया घडत असते आणि जो पूर्णपणे साध्य झाला, की त्या प्रक्रियेचा, ती सफल झाल्यामुळे, शेवट होतो, तो हेतू म्हणजे त्या प्रक्रियेचे हेतुकारण.

प्रत्येक घटनेत ही चारही कारणे उपस्थित असतात. उदा. कारणकल्पनेत कशा पासून काहीतरी नवीन व वेगळे घडत किंवा तयार होत असते; कारण परिवर्तनात किंवा बदलात काहीतरी असते किवा कशात तरी बदल होत असतो. लाकडापासून पलंग तयार होतो. म्हणजे कशात तर परिवर्तन होते किंवा नवे रूप मिळते. कारणाच्या प्रक्रियेत चारही घटक एकाच वेळी कार्य करीत असतात असे ॲरिस्टॉटल मानतो. निसर्गात

आपोआप जे बदल होतात त्यांच्यात किंवा मनुष्य जे घडवितो किंवा निर्मितो त्यात ही चारही कारणे अनुस्यूत असतात.

### १. द्रव्य/ उपादान कारण (Material Cause):

ज्या विशिष्ट द्रव्याची वस्तू बनत असते ती तिचे 'उपादान कारण' (Material Cause, Matter) असते. म्हणजे उपादान कारण हे वस्तू ज्या पदार्थापासून होते किंवा तिचा जो कच्चा माल (Raw material) असतो तो असतो. उदा०, एखाद्या संगमरवरी दगडाचा जर पुतळा तयार असला तर तो 'संगमरवरी दगड' हा त्या पुतळयाचे उपादान कारण असतो. म्हणजे मग तांबे, पितळ, खोड धातू, माती, लाकूड, दगड अशासारख्या ज्या पदार्थांना आपण भौतिक पदार्थ किंवा द्रव्य म्हणू ते सर्व ॲरिस्टॉटलच्या कल्पनेप्रमाणे 'उपादान कारण' होत.

### २. निमित्त कारण ( Efficient cause):

गती किंवा हालचाल घडविण्यास जे कारण जबाबदार असते ते निमित्त कारण असते. यात फक्त स्थलांतराचाच अंतर्भाव नसतो; तर त्यात रूपांतरही समाविष्ट असते. उदा०, दगड खाली पडण्यात किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यात जशी गती आहे तशीच गती हिरवे पान पिवळे होण्यातही आहे. म्हणजे बदल घडून येण्यात जे जबाबदार ठरते, जे शक्ती किंवा सामर्थ्य पुरविते त्यास ॲरिस्टॉटल निमित्त कारण (Efficient cause) म्हणतो.

### ३. आकारिक कारण (Formal Cause):

कारणांचे कार्यात परिवर्तन होताना किंवा झाल्यावर त्याला जो 'आकार' किंवा 'रूप' मिळते ते त्याचे आकारिक कारण ठरते. त्याला ॲरिस्टॉटल 'द्रव्य' किंवा 'सार' (Substance, Essence ) म्हणतो. वस्तूचे सार हे तिच्या व्याख्येत स्पष्ट केलेले असते आणि संकल्पना ही अधिक स्पष्ट केली म्हणजे तिची व्याख्या बनते.

### ४. अंतिम उद्दिष्ट किया प्रयोजन (Final Cause ):

ज्या हेतूच्या परिपूर्तीसाठी एखादी प्रक्रिया घडत असते आणि जो पूर्णपणे साध्य झाला, की त्या प्रक्रियेचा, ती सफल झाल्यामुळे, शेवट होतो, तो हेतू म्हणजे त्या प्रक्रियेचे हेतुकारण उदा. एका ठराविक आकाराचा पुतळा अस्तित्वात आणणे, हा पुतळा घडविण्याच्या प्रक्रियेचा हेतू असतो आणि नेमका त्या आकाराचा पुतळा अस्तित्वात आला, की ही प्रक्रिया थांबते.

कोणतीही वस्तू किंवा कार्य घडण्यासाठी वरील चार प्रकारची कारणे असावी लागतात असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. एखादा संगमरवरी दगड घेऊन त्याची मूर्ती किंवा प्रतिमा घडविली जाते, त्या प्रक्रियेत संगमरवरी दगड हा 'भौतिक कारण' असतो, मूर्ती घडविणारा शिल्पकार हा 'निमित्त कारण' असतो व त्याला जो आकार प्राप्त होतो तो त्याचे आकारिक कारण असतो. संगमरवरी दगडाला हा किया तो असा

कोणता तरी आकार दिखा जातो. तो आकार त्या दगडाच्या स्वभावात अनुस्यूत असतोच असे नाही. तो दगड फक्त आकारग्रहणक्षम असतो; आकार घेण्याची क्षमता त्याच्या ठिकाणी असते इतकेच; पण अमुकच एक आकार त्याला मिळेलच किंवा मिळालाच पाहिजे असे त्याच्या अंगभूत रचनेत किंवा स्वरूपात किंवा स्वभावात काही नसते. म्हणजे त्याला लाभणारा आकार किंवा रूप हे त्याचे 'आनुषंगिक रूप असते. पण प्रत्येक बाबतीत असेच होईल असे नाही. त्या दगडाने अमुकच एक आकार ग्रहण करण्यात अपरिहार्यता (Necessity) नसते. पण इतर काही बाबतीत अपरिहार्यता असू शकते असे दिसून येते. पण जेव्हा एखादी गाय गवत खाते तेव्हा ते पचविले जाते व त्याचे रक्तात रुपांतर होते तेव्हा त्याला नवीन द्रव्याचा प्राप्त होतो. खरे पाहाता असे दिसते की शेवटी कशाचे कशातही रूपांतर होऊ शकते; म्हणजे अंतिम द्रव्य (आधार द्रव्य Substratum) असे असते की ज्याला स्वतःचे असे कोणतेही गुणधर्म नसतात, पण त्याच्या ठिकाणी काही 'अव्यक्त क्षमता (Potentiality) मात्र असते. परिणाम किंवा कार्य घडविणारे जे निमित्त कारण असते ते अगदी अंतिम मूलभूत पदार्थावर कृती करू शकत नाही; ती व्यक्ती किंवा शक्ती कोणत्या तरी निश्चित पदार्थावर कार्य करीत असते, याची ॲरिस्टॉटलला पूर्ण जाणीव होती. उदा. शिल्पकार हा संगमरवरी पाषाणावर काम करून तिच्यातून मूर्ती तयार करतो; किंवा गवताचे रूपांतर रक्तात होते. म्हणजे नुसते-केवळ, आकार व गुणरहित असे अंतिम व मूलभूत द्रव्य असे कधी अस्तित्वातच नसते. अंतिम मूलद्रव्य हे कोणत्या तरी आकाराशी संलग्न असते व तो आकार त्याला काही एक समजण्यासारखा आकार, गुणधर्म स्वरूप देत असतो. म्हणजे आकाराशिवाय व आकाराव्यतिरिक्त केवळ स्वतःच्या बळावर अंतिम व मूळ द्रव्य असूच शकत नाही; ते केवळ तर्कदृष्ट्या आकारापासून वेगळे असे कल्पनेत ओळखता येते. जे बदल होतात त्याचा ते आधार असते व भौतिक वस्तूमध्ये ते खरे द्रव्य असते व आकार त्याच्याहून वेगळा असतो, असे म्हणणे अर्थपूर्ण ठरते हेही खरे. पण त्याचबरोबर अंतिम मूलद्रव्य हे भौतिक विश्वात अविभाज्य वस्तू किंवा पदार्थ (Body) असते असे मात्र आपणास म्हणता येणार नाही. कारण ते वस्तू (Body) असे नसतेच; अविभाज्य वस्तुतही ते त्या वस्तूचेही एक द्रव्यच राहाते. ॲरिस्टॉटल असेही म्हणतो की सूक्ष्म भौतिक विश्वामध्ये ज्या अविभाज्य वस्तू असतात, किंवा पृथ्वी, आप, तेज व वायू ही जी मूलद्रव्ये आहेत. त्यांच्यातही अंतर्विरोध असतात व त्यांचे एकमेकात रूपांतर होऊ शकते. ती जर तशी बदल शकत असतील तर त्यांच्यात 'अव्यक्त क्षमता व कृती यांचे संयोजन होते हे गृहीत धरलेले असले पाहिजे. म्हणजे मग उदा०, वायू हा अग्नी होऊ शकतो. मग त्याला बायचा आकार हा प्रत्यक्षस्वरूप वास्तविकता किंवा 'प्रकटता' (Actuality) असतो आणि अग्नी होण्याची अपक्त क्षमता, 'विभव' (Potentiality) असते. पण वास्तविकता मान्य करण्यापूर्वी कोणती तरी अव्यक्तता, विभव गृहीतच धरावे लागेल व अशी क्षमता ही 'केवळ क्षमता' (Bare potentiality) असू शकेल.

तर्कदृष्ट्या हे जरी आवश्यक वाटत असले तरी हल्लींचे विज्ञान आकारिक व अंतिम प्रयोजक कारणे अमान्य करीत नाही, पण त्याचबरोबर ती आपल्या कक्षेत मोडतात असेही मानत नाही. आकारक व प्रयोजक कारणांना ते आपल्या विचाराच्या क्षेत्राच्या बाहेरची मानते; त्यांच्याशी आपणांस काही कर्तव्य नाही अशी काहीशी विज्ञानाची भूमिका आहे. विज्ञान हे प्रामुख्याने यांत्रिक कारणांचाच विचार करणे हे आपले काम

आहे आणि प्रयोजक किंवा हेतु–कारणांचा विचार करणे आपले काम नाही असे समजते. या दोन कारणांना विज्ञान कारणेही समजत नाही. आधुनिक विज्ञान विश्वाविषयी यांत्रिक दृष्टिकोन स्वीकारते व म्हणून प्रयोजन किंवा हेतू याची ते उपेक्षा करते. ॲरिस्टॉटलने मात्र आपल्या कारण सिदान्तात यांत्रिक व प्रयोजन कारण या दोहोंचाही समावेश केलेला आहे.

**४. द्रव्य आणि आकार:**

द्रव्याविषयी सामान्यपणे अशी कल्पना असते की द्रव्य हे सदासर्वकाळ द्रव्यच राहाते. एका दृष्टिकोनातून भौतिक व जड असते व दुसऱ्या दृष्टिकोनातून ते अभौतिक किंवा चिन्मय असते असे त्याच्याविषयी होत नाही. ते सर्व अवस्थांत द्रव्यच राहाते व काळाच्या प्रवाहात त्याचे द्रव्यपण नष्ट होत नाही. उदा. पितळ हे इतर काही होत नाही. काही वेळा एका प्रकारच्या द्रव्याचे दुसऱ्यात रूपांतर होते. उदा०, रेडियम हे हेलियममध्ये रूपांतरित होते. पण ॲरिस्टॉटलची द्रव्यविषयक संकल्पना ही सापेक्ष आहे. त्याच्या द्रव्य (Matter) व आकार (Form) याविषयीच्या संकल्पना ठोकळेबाज नसून काहीशा तरल व लवचिक आहेत. सर्व प्रकारच्या परिवर्तनात जे बनते किंवा घडते किंवा जे परिवर्तनीय असते ते म्हणजे द्रव्य ज्याच्यावर किया ज्याच्यामध्ये बदल घड़न येतो ते द्रव्य असते; ज्याच्या दिशेने बदल घडतो ते आकार असते, जे बनते ते द्रव्य व द्रव्य जे आकार किया रूप घेते ते म्हणजे आकार असते. अशा अर्थाने पाहिले असता पलंगाच्या संदर्भात लाकडाचा विचार केल्यास लाकूड हे द्रव्य असते; कारण जे पलंग बनते ते लाकूड असते. पण एखाद्या वाढत्या रोपाच्या संदर्भात विचार केला तर तेच लाकूड आकार ठरते; कारण रोपानंतर जे बनते किंवा जे रूप धारण करते ते लाकूड असते म्हणजे रोपाचा आकार असतो. याशिवाय आकार (Form) म्हणजे केवळ एखादी आकृती होय, असेही समजून चालत नाही. कारण जे एका दृष्टीने आकार असते ते दुसऱ्या एका दृष्टीने द्रव्य असते. पण आकृती (Shape) ही आकृतीव्यतिरिक्त इतर काहीही असू शकत नाही. आकृती (शेप) ही आकाराचा एक भास अवश्य असते, कारण आकारामध्ये वस्तूच्या सर्व गुणधर्मांचा समावेश असतो. आकारामध्ये आकृती, गुणधर्म हे तर असतातच, पण त्याशिवाय त्या वस्तूची रचना, तिच्या भागांचे परस्परातील संबंध, आणि सर्व भागांचे तिच्या पूर्ण स्वरूपाप्रत असणारे गौणत्व यांचाही त्यात अंतर्भाव होतो. कार्य हे कारणात आधीच अप्रकट, असते; ते नव्याने अस्तित्वात येत नाही. शिवाय जो बदल होतो तो कोणत्यातरी ध्येयाप्रत किंवा उद्दिष्टाप्रत होत असतो व ते ध्येय किंवा उद्दिष्ट जर जे बदलते त्यावर प्रभाव पाडून त्याच्यात गतिमानता निर्माण करू शकत नतेल तर ते प्रभावी उद्दिष्ट किंवा प्रयोजन राहणार नाही. म्हणून वस्तूमध्ये होणारा बदल तिला जे शेवटी रूप प्राप्त व्हावयाचे असते त्याच्याच प्रभावामुळे होत असतो व अंतिम ध्येय किंवा उद्दिष्ट किंवा गन्तव्य हे जरी शेवटी दृश्य स्वरूपात व्यक्त होताना दिसत असले तरी ते तिच्या गर्भात सुप्त व अप्रकट रूपाने असलेच पाहिजे व त्यालाच ॲरिस्टॉटल द्रव्य म्हणतो. बदल हा बाह्य कारणांनी न होता व त्याला मागून ढकलण्याची गती न मिळता ती वस्तू ज्या रूपात विकसित होऊन पूर्णत्वाप्रत पोचावयाची असते त्या तिच्या आदर्श आधाराने प्रेरित व प्रभावित होऊन तिच्यातील अंतर्भूत ध्येयाप्रत खेचली जात असते. अशा दृष्टीने पाहाता असे म्हणता येईल की वस्तूची आदर्श घडण करावयास जे जे बाह्य व आंतरिक संबंध कारणीभूत असतात त्या सर्वांचा समुच्चय व त्यांची

गुंतागुंतीची सुंदर गुंफण म्हणजे तिचा आकार (Form) असतो. वस्तूच्या आकारामध्ये तिच्या कार्याचाही (Function) अंतर्भाव होत असतो; कारण त्यात तिचे अंतिम कारण सामावलेले असते. आणि वस्तूचे कारण म्हणजे तरी काय असते? ती वस्तू ज्या (हेतू) करिता असते ते तिचे कार्य असते; आणि ज्याच्याकरिता ती असते तेच तिचे उद्दिष्ट, ध्येय प्रयोजन किंवा अंतिम कारण असते. म्हणून वस्तूचे कार्य हे आकारात अंतर्भूत असते. हाताच्या पंजाचे कार्य, पकडण्याची त्याची शक्ती ही त्याच्या आकाराचा भाग असते. पंजा जर हातापासून तोडून अलग केला तर त्याचे कार्य संपते व त्याचबरोबर त्याचा आकारही संपुष्टात येतो. मृत देहाचा हाताचा पंजा हा जिवंत देहाच्या हाताशी तुलना करता त्यांचे कार्य संपले असल्याने एक प्रकारचा आकार राहू शकत नाही. कारण वस्तू पकडण्याचे त्याचे महत्त्वाचे कार्यं करण्याचे सामर्थ्य त्यात राहिलेले नसते. मृत देहाच्या हाताचा पंजा हा त्याची हाडे, मांस यांच्या दृष्टीने पाहिल्यास त्यांचा तो आकार असतो, पण खऱ्या अर्थाने त्याच्या अपेक्षित कार्याच्या दृष्टीने पाहिल्यास त्यांचे हातपाय किंवा आकार नष्ट झालेला असतो. मृत देहाच्या हाताच्या पंजाची आकृती व जिवंत देहाच्या हाताची आकृती या सारख्याच असतात, पण त्यांचे कार्य व पूर्ण आकारत्व लक्षात घेता त्या दोघांचा आकार एकच राहिलेला नसतो. आकारामध्ये वस्तूच्या सर्व गुणधर्मांचा अंतर्भाव होत असतो. ज्याला गुणधर्म असतात ते द्रव्य असते. सर्व प्रकारचे गुणधर्म हे सामान्ये (Universals) असतात. उदा. सोन्याच्या पदार्थाचा रंग पिवळा असतो याचा अर्थ इतर सोन्याच्या पदार्थामध्ये जसा पिवळेपणा असतो व इतरही पिवळया पदार्थांच्या ठिकाणी जो पिवळेपणा असतो तो सर्व एकच सामान्यधर्म असतो. एखाद्या वस्तूला एखादा गुणधर्म आहे असे म्हणणे म्हणजे तिचा एका वर्गात समावेश करणे आणि त्या वर्गाच्या (जातीच्या) घटकांमध्ये जे सामान्य गुण असतात ते 'सामान्य' असतात. वस्तू गुणधर्माविरहित राहू शकत नाही आणि वस्तूशिवाय गुणधर्म राहू शकत नाहीत. याचाच आकार हे परस्परांव्यतिरिक्त राहू शकत नाहीत. द्रव्य व आकार अशा प्रकारे पाहिल्यास जे आकार पूर्णपणे आकारविरहित असते ते द्रव्य असते. द्रव्य हे सर्व वस्तूंची आधारभूमी अधिष्ठान (Substratum) असते. त्याला स्वतःचा असा कोणताही गुणधर्म किंवा लक्षण नसते/मुलद्रव्य हे पूर्णतः लक्षण व गुणविरहित, अनिश्चित धर्मविरहित असे काहीतरी असते. वस्तूला जे जे म्हणून काही निश्चित रूप, गुणधर्म, लक्षण देते आणि जे जे त्याला अमुक एक (रूपाचे) बनविते ते त्याचा आकार (Form) असते; म्हणजे द्रव्या मध्ये कोणताही फरक असू शकत नाही. फक्त वेगवेगळे गुणधर्म असल्याने वस्तू एकमेकीपासून वेगळया ठरतात. द्रव्याला गुणधर्मच नसल्याने त्याच्यामध्ये भेद नसतात. यावरून ॲरिस्टॉटलला अभिप्रेत असलेली द्रव्याची कल्पना ही आपण सर्वसाधारणपणे जे भौतिक द्रव्य म्हणून समजतो तिच्याहून वेगळी आहे. पितळाहून लोखंड भिन्न असते असे आपण म्हणतो; पण ॲरिस्टॉटलच्या मते यात द्रव्याचा भेद नसून तो केवळ आकारातील भेद आहे. म्हणजेच द्रव्यावर ज्या प्रकारचा ठसा उमटेल त्या प्रकारची वस्तू ते बनते. म्हणजेच द्रव्य म्हणजे 'काहीही बनण्याची शक्यता असते व प्रत्यक्षात किंवा वास्तविकपणे ते अमुक एक असे निश्चित काहीही नसते. त्याला आकाराची प्राप्ती होऊन ते काहीतरी बनते. या त्याच्या भेदावरूनच त्याने जे 'द्वंद्व' निर्माण केलेले आहे. ते द्वंद्र 'अव्यक्तक्षमता' (Potentiality) आणि 'वास्तविकता' (Actuality) हे होय. सुप्त वा अव्यक्त क्षमता म्हणजेच द्रव्य (Matter), आणि

वास्तविकता किंवा व्यक्तत्व किंवा प्रकटता म्हणजेच आकार (Form) होय. कारणद्रव्य हे अव्यक्तरूपाने कोणतेही रूप बनण्याची शक्यता असते. ते काहीही बनू शकते; ते प्रत्यक्ष अमुक एक वस्तू नसले तरी ते कोणतेही रूप धारण करू शकते आणि काहीही बनू शकते. द्रव्य हे केवळ शक्यता किंवा अव्यक्त क्षमता असते. त्याला हे किंवा ते असे विशिष्ट व निश्चित रूप जे देते व त्याला मूर्त रूप देऊन प्रत्यक्ष व साकार करते ते त्याचा आकार (Form) असते. म्हणजे वस्तूचे प्रत्यक्ष मूर्तत्व किंवा व्यक्तत्व हे तिचा आकार असते. भाव (Being) व संभवन (Becoming) यांचे पुरातन द्वंद्व अशा रीतीने सोडविण्याचा ॲरिस्टॉटलने प्रयत्न केलेला आहे. जगातील स्थिरता, अपरिवर्तनीयता, सनातनत्व, शाश्वतता आणि परिवर्तनशीलता यांचा संबंध स्पष्ट कसा करावयाचा हे एक न उलगडणारे कोडे तत्त्वज्ञान्यांना फार प्राचीन काळापासून होऊन राहिलेले आहे. त्याचा उलगडा ॲरिस्टॉटलने यशस्वीपणे करण्याचा महान प्रयत्न केला खरा; पण त्यात पूर्णपणे यशस्वी झाला असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. भाव व आभाव यांच्यातील परस्परसंबंध कसा आहे हे नीट सांगणे फार अवघड बनले होते. इलियाटिक्सने हा प्रश्न उपस्थित केला होता; कारण भावाचे भावामध्ये गमन होणे म्हणजे संभवन नसते, कारण त्यात बदल किंवा परिवर्तन होत नसते; आणि अभावाचे भावामध्ये गमन होणे हे अशक्यच असते. कारण शून्यातून काहीच निर्माण होऊ शकत नाही; पण ॲरिस्टॉटलच्या मतानुसार अभाव आणि भाव यांच्यात संपूर्ण व्यावर्तन करणारी व त्यांच्यात भेद दर्शविणारी विभाजक रेषा काढता येत नाही. या परस्परव्यावर्तक शब्दांऐवजी तो अव्यक्तक्षमता व व्यक्त वास्तविकता अशी सापेक्ष पदे वापरतो. ती एकमेकांत संमिश्र होऊ शकतात. ॲरिस्टॉटलच्या पूर्वीच्या प्रणालीमध्ये जे अभावात्मक किंवा शून्यरूप असे त्याचे वर्णन त्याने 'अव्यक्तक्षमता (Potentiality) या पदाने मांडले आणि त्याची ही अव्यक्तक्षमतेची कल्पना केवळ किंवा निर्भेळ अभाव किंवा शून्याच्या कल्पनेसारखी एकच नाही. ती अभावात्मक आहे; कारण ते वास्तविक व व्यक्त असे काही नसते; पण ती भावात्मक आहे; कारण भावरूप घेण्याची सुप्तक्षमता तिच्या ठिकाणी असते. म्हणून संभवन किंवा परिवर्तनाच्या प्रक्रियेत शून्यातून काहीतरी बनण्याकडे जी अशक्यप्राय झेप असते ती अन्तर्भूत नसते. तिच्यात फार तर अव्यक्ताकडून व्यक्ताकडे व्हावयाचे संक्रमण असते. म्हणजे मग सर्व बदल किंवा परिवर्तन हे द्रव्याकडून आकाराकडे किंवा अव्यक्ताकडून व्यक्ताकडे होणारे संक्रमण किंवा गमन असते.

### ५. **ईश्वर (God) :**

या विश्वात ज्या घटना किंवा कार्ये घडतात ती घडविणारी कोणतीतरी एख्यादी प्रेरक शक्ती असली पाहिजे आहे. अव्यक्ताकडून व्यक्ताकडे जाण्याची जी अव्याहत अशी प्रवृत्ती आहे तिला ॲरिस्टॉटल ईश्वर म्हणतो. थोडक्यात या विश्वातील जी गतिशीलता आहे या गतीशिलतेला कारणीभूत कोणतीतरी अशी एखादी शक्ती किंवा तत्त्व हे असणारच. अशा शक्तीला किंवा तत्त्वाला ॲरिस्टॉटल 'आद्य चालक, आद्य प्रवर्तक, प्रयोजन प्रेरक' (First Mover) असे म्हणतो. 'आद्यचालक किंवा प्रेरक या संज्ञेने असा समज होणे शक्य आहे की हे आदितत्व गतीस निर्माण करणारे असते. पण अशी कल्पना करणे चूक ठरेल. 'आद्य चालक' किंवा 'प्रवर्तक प्रेरक' ही संज्ञा कालिक (Temporal) संदर्भात घेता येणार नाही; कारण अरिस्टॉटलच्या मते गती ही अनिवार्यत, अनादी, अनिर्मित, सनातन अशी आहे. म्हणून (First) आद्य या

शब्दाचा अर्थ 'परमश्रेष्ठ' (Supreme) असा घ्यावयास पाहिजे. आद्यचालक हा सनातन गतीचे सनातन उगमस्थान किंवा प्रेरक असतो. ॲरिस्टॉटलचा हा ईश्वर जग निर्माण करणारा जगाचा कारक किंवा कर्ताही (Creator) नाही; कारण ॲरिस्टॉटलच्या मते हे जग अनादी कालापासून चालत आलेले आहे. त्याची निर्मिती कोणी केली नाही. ते अनादी, अजात, अनिर्मित असे आहे. ईश्वर जगास आकार देतो (Forms) पण त्याची निर्मिती किंवा घडण करीत नाही. तो जगास आकार देतो तो अशा अर्थाने की जगातील परिवर्तनास तो गती किंवा शक्ती पुरवितो व तो त्याला सतत आपल्याकडे आकर्षित करीत असतो. तो जगावर त्यांचे अंतिमकारण' (Final Cause) म्हणून कार्य करीत असतो. अर्थात ईश्वर हा प्रेरक किंवा चालक म्हणून जर कार्य करीत असेल तर त्याच्या स्वतःमध्ये सुद्धा काही ना काही हालचाल, गतिमानता, बदल होणार हे ओघाने आलेच. म्हणजे ईश्वर स्वतःही गतिशील असतो पण स्वतः न हालता किंवा गतिमान न होताही विश्वातील सर्व घटनांमध्ये कृती व हालचाली करीत असतो. हे त्याचे स्वरूप वरून विरोधाभासात्मक वाटत असले तरी ईश्वराच्या बाबतीत मात्र ते खरे असते. ईश्वर हा अचल चालक' (Unmoved mover) असतो असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. ईश्वराच्या ठिकाणी जी गतिमानता किंवा कृतिशीलता असते ती शुद्ध असते. त्याचा अर्थ ईश्वराच्या ठिकाणी अव्यक्त, अप्रकट किंवा सुप्त असे काहीच नसते. तो परिपूर्ण असल्याने व प्रत्यक्ष (Actual) किंवा साकार असल्याने त्याच्या ठिकाणी घडावयाचे किंवा भविष्यकालात साकार किंवा मूर्त व्हावयाचे असे काहीच नसते. साधारणपणे सर्व क्रिया किंवा गती ही अव्यक्ताकडून व्यक्तीकरणाच्या दिशेने घडत असते. गतीमध्ये पार्थिवता किंवा भौतिकता (Materiality) असते, तशी ईश्वराच्या ठिकाणी नसते. ईश्वराच्या ठिकाणी शुद्ध किंवा अमिश्रित गतिमानता असते व त्याची गती चक्राकार असते. ईश्वर पहिला स्वर्ग स्वतः प्रत्यक्ष हलवितो व तो ताऱ्यांना पृथ्वी भोवती रोज फिरावयास लावतो. तो ईश्वर व प्रेम यांना प्रेरणा देऊन जगास फिरवितो. आद्य चालक (First Mover) एक आहे की अनेक आहेत याविषयी ॲरिस्टॉटल वेगवेगळी मते धारण करताना दिसतो. 'फिजिक्स' व 'मेटॅफिजिक्स' या त्याच्या ग्रंथामध्ये तो आद्यचालक अनेक असावेत असेही मत व्यक्त करताना दिसतो. पण त्याचा कल एकच आचालक असावा या मताकडे अधिक झुकलेला दिसतो. मध्ययुगीन तत्वज्ञानात अनेक चालक हे देवदूत असले पाहिजेत कारण त्यांपैकी प्रत्येकास स्वतंत्र व वेगळी बुद्धी असते व बुद्धी वेगवेगळ्या प्रकारची असते. आद्यचालक हा अशरीरी किंवा अभौतिक (Immaterial) असल्याने तो कोणतीही शारीरिक क्रिया करू शकत नाही. ईश्वराच्या सर्व कृती या आध्यात्मिक व बौद्धिक किंवा वैचारिक स्वरूपाच्या असतात. पण मग ईश्वराच्या या वैचारिक कृतीचा विषय तरी कोणता असतो? ईश्वर हा परिपूर्ण असल्याने स्वाभाविकपणे त्याच्या चिंतनाचा किंवा विचाराचा विषय हा या जगातील ज्या परिवर्तनीय घटना असतात, जी वेदने असतात व जे नवनवीन म्हणून काही निर्माण होते, ते नसते. त्याच्या शाश्वत चिंतनाचा विषय ईश्वर हा स्वतःच असतो; त्याचे चिंतन हे आत्मबोधात्मक असते व ते त्याला अंतर्ज्ञानाने होत असते. म्हणून ॲरिस्टॉटल हा ईश्वराची व्याख्या 'विचारांचा विचार' (Thought of thoughts) अशी करतो. ईश्वर हा सदैव स्वतःचेच चिंतन करणारा जिवंत विचार असतो. शिवाय ईश्वराच्या चिंतनाचा विषय स्वतःच्या बाहेर अन्य काही असू शकत नाही; जर त्याच्या चिंतनाचा विषय स्वतःच्या बाहेर

असला तर त्याचा अर्थ असा होईल की ईश्वराचे उद्दिष्ट त्याच्या स्वतःच्या बाहेर आहे; त्याचाच अर्थ ईश्वर अपूर्ण ठरतो. म्हणून ईश्वर हा केवळ स्वतःलाच जाणतो. सेन्ट टॉम हा ॲरिस्टॉटलचा अर्थ लावताना असे म्हणतो की ईश्वर हा आपल्या ज्ञानातून जगाचे ज्ञान वगळत नाही. पण प्रत्यक्ष ॲरिस्टॉटलला तसे कितपत म्हणावयाचे होते हे संदिग्धच राहाते. खरे पाहाता जगाच्या निर्मितीस व धारणेस ईश्वर कारणीभूत आहे याविषयी ॲरिस्टॉटलचे काहीच मत नाही. ऑरिस्टॉटलला अभिप्रेत असलेला ईश्वर हा 'व्यक्तिरूप' आहे का असाही प्रश्न उद्भवतो. ॲरिस्टॉटल हा एकेश्वरवादी होता यात शंकाच नाही. फक्त त्याचा ईश्वर हा व्यक्तित्वसहित होता की काय हा एक प्रश्न आहे. ज्याअर्थी तो ईश्वर हा बुद्धी किंवा विचारयुक्त आहे असे ॲरिस्टॉटल मानतो त्याअर्थी तो व्यक्तिरूप (Personal) असला पाहिजे असा अर्थ संभवतो. परंतु ॲरिस्टॉटलला अभिप्रेत असलेला अचलचालक हा व्यक्तिरूप नसावा. त्याचा ईश्वर हा पूर्णपणे आत्मकेंद्रित आहे व तो पूजेचा, उपासनेचा किंवा प्रार्थनेचा विषयही नसतो. ईश्वराशी स्नेहाचे नाते जोडता येणे शक्य नाही, कारण ईश्वर हा प्रेमास प्रतिसाद देत नाही व म्हणून त्याच्यावर प्रेमही करता येत नाही. या जगातील सर्व वस्तू कमी अधिक प्रमाणात व अंशात पूर्ण असतात; चांगल्याहून अधिक चांगले असे काहीतरी असते व त्याहून अधिक चांगले म्हणजे सर्वोत्कृष्ट असते व हे सर्वोत्कृष्ट किंवा परिपूर्ण ईश्वर असला पाहिजे असाही एक युक्तिवाद ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी वापरला जातो. पण पुन्हा हे सर्वोत्कृष्ट असणार नाही हे कशावरून? या जगातील जे उत्कृष्ट किंवा पूर्ण हे सापेक्ष किंवा तौलनिक असू शकते, अंतिम सर्वोत्तम उत्कृष्ट असेलच व ते काय असेल हे कसे प्रस्थापित करता येईल? थोडक्यात, ॲरिस्टॉटलची ही ईश्वरविषयक उपपत्ती ही दोषमुक्त नाही. ॲरिस्टॉटलचा ईश्वर हा या जगाचे संचालन करतो, तो जगाचे निमित्त कारण आहे असे फारतर म्हणता येईल. पण या त्याच्या ईश्वरास जगाचे ज्ञान नाही व त्यात अनुस्यूत असलेली दैवी योजना कशी आहे याची माहितीही त्याला नाही. विश्वातील सर्व घटना व कार्ये यात एक हेतुसूत्र व पूर्वनियोजित योजनासूत्र आहे व ते अबोधपूर्वकही होत असेल. असे असले तरी या विश्वात जे सतत परिवर्तन व कार्य होत आहे ते हेतुरहितपणे घडत नसून अव्यक्ताकडून व्यक्तत्वाकडे जाण्याची व अंतिम उद्दिष्ट व ध्येय साकार करण्याची ती एक सतत कार्य करणारी प्रक्रिया आहे व तिला 'अर्थ' आहे असा महत्वपूर्ण विचार ॲरिस्टॉटल या विचारवंताने मांडला आहे.

**स्वाध्याय:**

१. खालील बहुपर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.

१. ॲरिस्टॉटलचा जन्म कोणत्या साली झाला?

अ. ख्रि.पू. ३७४ ब. ख्रि.पू. ३८४ क. ख्रि.पू. ३८० ड. ख्रि.पू. ३८७

२. कोणाला शिकवण्यासाठी मार्गदर्शक शिक्षक म्हणून ॲरिस्टॉटलची नेमणूक केली होती?

अ. ॲलेक्झांडर ब. होमर क. फिलीप्स ड. यापैकी नाही

३. ............. चा प्रमुख राजकीय ग्रंथ 'पॉलिटिक्स' (Politics) हा होता.

अ. ॲलेक्झांडर ब. ॲरिस्टॉटल क. फिलीप्स ड. यापैकी नाही

४. ज्या विशिष्ट द्रव्याची वस्तू बनत असते ती तिचे '............. कारण' असते.

अ. उपदान  ब. अंतिम  क. निमित्त  ड. आकारिक

५. ज्याच्यामध्ये बदल घडून येतो ते............. असते.

अ. द्रव्य  ब. आकार  क. वस्तू  ड. किंमत

६. वस्तूचे प्रत्यक्ष मूर्तत्व किंवा व्यक्तत्व हे तिचा............. असते.

अ. द्रव्य  ब. आकार  क. वस्तू  ड. किंमत

७. कारण भावाचे भावामध्ये गमन होणे म्हणजे............. नसते.

अ. संभवन  ब. असंभवन  क. विभवन  ड. भाव

८. ............. हा अचल चालक' (Unmoved mover) असतो असे ॲरिस्टॉटलचे मत आहे.

अ. प्राणी  ब. दानव  क. ईश्वर  ड. मानव

९. ............. च्या मते हे जग अनादी कालापासून चालत आलेले आहे.

अ. ॲरिस्टॉटल  ब. ॲलेक्झांडर  क. फिलीप्स  ड. होमर

१०. ॲरिस्टॉटल हा ईश्वराची व्याख्या............. अशी करतो.

अ. आचारांचा विचार  ब. विचारांचा विचार

क. विचार  ड. प्रचार

२. **लघुप्रश्न**

१. ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्यपद्धतीचे निकष कोणते?

२. द्रव्य कारण म्हणजे काय?

३. आकार म्हणजे काय विशद करा.

४. निमित्त कारण कसे कार्य करते?

५. ईश्वर म्हणजे काय?

३. **सविस्तर उत्तरे लिहा.**

१. ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याची कल्पना सविस्तर सांगा.

२. द्रव्य आणि आकार ही संकल्पना विशद करा.

३. ॲरिस्टॉटलच्या सांगितलेली चार कारणांची संकल्पना सविस्तर लिहा.

४. ईश्वर अचल चालक आहे असे ॲरिस्टॉटलने का म्हटले आहे. तुमचे मत सांगा.

❑❑❑